**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या पुतळयाला हार घालण्यासाठी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक 10.30 ते 10.50 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 10.50

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, प्रश्नोत्तरासाठी मला विधानसभेत जावयाचे असल्यामुळे आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेली सातव्या क्रमांकाची अर्धा तास चर्चा प्रथम घेण्यात यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. माझी त्याला हरकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी अर्धा तास चर्चेची सूचना मांडावी.

पृ.शी. : मुंब्रा-दिवा-डोंबिवली परिसरात तिवरांच्या झाडाची होत असलेली कत्तल

मु.शी. : मुंब्रा-दिवा-डोंबिवली परिसरात तिवरांच्या झाडांची होत असलेली कत्तल यासंबंधी श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो .

"मुंब्रा-दिवा-डोंबिवली हा पट्टा दलदलीचा व खारफुटी तिवरांचा पट्टा असलेला प्रदेश असून या सखल प्रदेशात पावसाळ्यातील वाहून येणारे पाणी पसरत असते सदर प्रदेशातील खारफुटी तिवारांना संरक्षण दिलेले आहे परंतु गत पाच-सहा वर्षात या भागातील ४०-४५ हजाराहून जास्त तिवारांच्या झाडांची कत्तल करण्यात आलेली आहे. या सखल भागात भराव टाकून बांधकाम करण्यात येत आहे. तसेच भराव टाकण्यासाठी कचऱ्याचे ट्रक रिकामे केले जात आहेत. ज्यातून हजारो टन प्लास्टीक पिशव्या या भागात पडतात. खारफुटीचा भाग आता कचऱ्यासाठी डंपीग ग्राऊंड म्हणून वापरला जात आहे. निसर्ग चक्रातील साखळीचा हा महत्वाचा भाग असून खारफुटीच्या जाळ्यात माशांची नैसर्गिक पैदास होत असते. ती नाहीशी झाल्याने असंख्य माशांच्या जाती नामशेष होण्याचा धोका संभवत असल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ...

सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या विषयावर मी अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे. ठाणे जिल्हा हा खाडीने व्यापलेला आहे. ठाण् जिल्हयाच्या एका बाजूला समुद्र आहे आणि दुस-या बाजूला खाडी आहे. ठाणे- कळवा- मुंब्रा-दिवा- डोंबिवली या स्टेशनच्या लगत काय स्थिती निर्माण झालेली आहे हे आपल्याला रेल्वेतून जातांना व येतांना दिसून येईल. या ठिकाणी रेल्वेच्या लगत मोठया प्रमाणावर तिवरांची झाडे होती. तिवरांच्या झाडांमुळे पर्यावरणाचा समतोल सांभाळला जातो आणि नैसर्गिक दृष्टया हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. त्याचबरोबर तिवरांच्या जाळयामध्ये असंख्य माशांची पैदास होत असते. इतकेच नव्हे तर तिवरांच्या झाडापासून मोठया प्रमाणावर ऑक्सिजन वायू देखील पुरविला जातो. त्यामुळे तिवरांच्या झाडांची आवश्यकता आहे. ही बाब वेळोवेळी लक्षात आणून दिली होती. परंतु आज त्या ठिकाणी तिवरांच्या झाडांची कत्तल मोठया प्रमाणावर केली जात आहे. भरती ओहोटीमुळे जी काही माती वा रेती वाहून येते ती तिवरांच्या झाडाला घट्ट धरुन ठेवते त्यामुळे नैसर्गिक बांध किंवा तटबंदीचे काम तिवरांची झाडे करीत असतात. कळवा-मुंब्रा- दिवा व डोंबिवली रेल्वे स्टेशनच्या लगत मोठया प्रमाणावर तिवरांची झाडे होती परंतु सध्या या तिवरांच्या झाडांची मोठया प्रमाणावर कत्तल केली जाते . माननीय मंत्री जर अंबरनाथहून वा कर्जत - कसा-याहून ठाण्याकडे रेल्वेने यावयास निघाले तर या परिसरात तिवराची कत्तल मोठया प्रमाणावर झालेली त्यांना दिसून येईल. मागच्या वेळी अतिवृष्टी झाली होती तेव्हा हे पाणी रेल्वे ट्रॅकवर आले होते.कर्जत कसारा इत्यादी भागातून दररोज 60 लाख प्रवासी रेल्वेने मुंबईला येत असतात हे आपल्याला माहीत आहे. गेल्या चार पाच वर्षापासून या परिसरातील तिवरांची कत्तल मोठया प्रमाणावर केली जात आहे असे आपल्याला दिसून येईल. इतकेच नव्हे तर तिवरांची कत्तल केल्यानंतर त्या ठिकाणी ट्रकने मातीचा भराव राजरोसपणे टाकण्यात येतो त्यासंदर्भात तक्रार केली तरी त्यातून काहीही निष्पन्न होत नाही. मातीचा भराव टाकल्यामुळे त्या ठिकाणी आफ्रिकन गवत उगवले आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळीकडून मी माहिती घेतली असून त्या माहितीच्या आधारे ज्या ठिकाणी मातीचा भराव टाकलेला आहे त्या ठिकाणी आफ्रिकन गवत मोठया प्रमाणावर निर्माण झालेले आहे. ते गवत खारफुटीचा नाश करीत आहे. अशा प्रकारे सर्व दृष्टीने तेथे विनाशाचे काम सुरु आहे. त्या भागात डम्पीग ग्राऊन्ड

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ...

नसल्यामुळे कचरा टाकण्यासाठी त्याचा वापर केला जातो. त्यामुळे तेथे मोठया प्रमाणावर कच-याचे ढिग निर्माण झालेले आहेत व प्लॅस्टिकच्या पिशव्या तेथे टाकल्या जात आहेत .

नंतर श्री.सरफरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ....

अशा प्रकारे भराव टाकून बांधकाम केल्यामुळे पावसाळयामध्ये पाणी साचून राहिल्यामुळे रेल्वे ट्रॅकला मोठया प्रमाणात धोका निर्माण झाला. दिनांक 26 जुलै 2005 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठया प्रमाणात रेल्वे ट्रॅकवर पाणी वाहून आल्यामुळे रेल्वे सेवा बंद झाली होती. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील लाखो प्रवासी कामावर जाऊ शकले नाहीत. महत्वाची गोष्ट अशी की, त्यामध्ये रेल्वे ट्रॅक वाहून जाण्याचा धोका निर्माण झाला होता. ज्या प्रमाणे मुंबईमधील मिठी नदीच्या पात्रामध्ये करण्यात आलेल्या अतिक्रमणामुळे त्या दिवशी मुंबईमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली होती तशा प्रकारची परिस्थिती खारफुटीच्या झाडांची तोडणी करण्यात आल्यामुळे निर्माण झाली. परंतु प्रशासनाकडून रेल्वे ट्रॅकच्या सुरक्षिततेकडे डोळेझाक केली जात आहे. या करिता मी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून हा विषय उपस्थित करीत आहे. आज प्रशासनाच्या हातामध्ये सर्व प्रकारचे अधिकार आहेत. कायद्यातील तरतुदींचा वापर करुन प्रशासन या बाबत तात्काळ कारवाई करु शकते, परंतु खारफुटीच्या झाडांना वाचविण्यासाठी प्रशासनाकडून कोणतीही कारवाई केली जात नाही. त्यामुळे खाडी लगतच्या भागामध्ये निर्माण झालेला धोका आपल्याला नाकारता येणार नाही. या करिता प्रशासनाकडून तत्काळ कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. रेल्वे स्टेशन लगत उभी असलेली झाडे तोडण्यात आल्यामुळे ती नष्ट झालेली आहेत, परंतु जी झाडे उभी आहेत ती उद्ध्वस्त होता कामा नयेत, त्या झाडांना आपण वाचविले पाहिजे.

सभापती महोदय, त्याच प्रमाणे मुंबई-भिवंडी बाय पास रोडच्या बाजूला मोठया प्रमाणात तिवरांचे जंगल उभे आहे. कदाचित हा भाग या अर्धा तास चर्चेच्या कक्षेमध्ये येत नसेल परंतु त्या ठिकाणी देखील खाडी लगतच्या भागामध्ये मोठया प्रमाणावर भराव टाकून गोडाऊन उभे करुन निरनिराळ्या इमारती बांधण्याचे काम मुंबईतील माफिया गॅंगमार्फत सुरु आहे ते आपण ताबडतोब थांबविले पाहिजे व त्यांना कठोर शासन झाले पाहिजे. या निमित्ताने मी सुचविलेल्या निरनिराळया उपाय योजना शासनाने केल्यास एका अत्यंत महत्वाच्या विषयाला न्याय दिल्यासारखे होईल. ठाणे जिल्ह्याच्या दृष्टीने आणि विशेषत: रेल्वे लगतच्या भागाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा गंभीर विषय असून या बाबत योग्य ती कारवाई करुन निरनिराळया भागामध्ये सुरु असलल्या खारफुटीच्या झाडांच्या तोडीला आपण आळा घालावा अशी मी विनंती करतो.

-----

18-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) C 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खारफुटीच्या झाडांच्या तोडणीबद्दल या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली आहे. कोकण किनारपट्टीवर मोठया प्रमाणात खारफुटीच्या झाडांचे जंगल उभे राहिले आहे. या जंगलामुळे अनेक वेळा तूफानी वाऱ्यापासून आणि समुद्राच्या लाटांमुळे जमिनीच्या होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण मिळत आहे. या करिता सन 2005 मध्ये सर्वोच्च न्यायालयामध्ये एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर शासनाने एक परिपत्रक काढले होते. त्यामध्ये म्हटले होते की, 12 आठवडयामध्ये आयुक्तांमार्फत सदर जागेची मोजणी करुन नोंदी करण्यात याव्यात. परंतु आज महसूल विभागाचा विचार केला तर अशा प्रकारची मोजणी करण्यासाठी लागणारा पुरेसा निधी या विभागाकडून मिळत नसल्यामुळे त्या नोंदी होत नाहीत. तेव्हा अशा प्रकारे समुद्र किनाऱ्या लगत असलेल्या खारफुटीची जंगले वाचविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार त्या जागेची मोजणी करुन नोंदी करण्याची कारवाई करणार काय? याचे उत्तर मंत्री महोदयांनी आपल्या भाषणामध्ये द्यावे अशी मी विनंती करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी मुंबई आणि मुंबईच्या परिसरामध्ये, ठाणे जिल्ह्याच्या खाडी किनारी उभे असलेले कांदळवन, ज्यांना आपण तिवराची झाडे, खारफुटीची झाडे म्हणतो त्यांची मोठया प्रमाणावर कत्तल सुरु आहे. ही झाडे वाचविणे हे पर्यावरण, प्रदूषणाच्या दृष्टीने व त्याचबरोबर खाडी किनारी मोठया प्रमाणात होणारी धूप थांबविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असल्यामुळे या विषयाकडे या सभागृहाचे लक्ष वेधले आहे. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, निसर्गाने स्वत:हून प्रत्येक ठिकाणी अशाप्रकारच्या वेगवेगळया गोष्टींची निर्मिती, उत्पत्ती करुन ठेवली आहे. कळत न कळत प्रत्येक ठिकाणी एकमेकांना पूरक असलेल्या गोष्टी निर्माण करुन नैसर्गिकरित्या संरक्षण करण्याची व्यवस्था निर्माण करुन ठेवली आहे.

मुंबई आणि मुंबईचा परिसर बघितला तर हे शहर पूर्वी बेटांचे शहर म्हणून ओळखले जात होते. आज मुंबईचा अवाढव्य विस्तार झाल्यामुळे या शहरामध्ये मोठया प्रमाणात झोपडपट्टया, नागरी वस्त्या निर्माण झाल्या. मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावर खाडीमध्ये भराव टाकून, गाळ टाकून त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर वस्त्या निर्माण झाल्या आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

किंवा मोठमोठया प्रमाणात इमारती उभ्या राहिल्या आहेत, त्या समुद्राच्या पाण्यामध्ये, खाडीमध्ये भराव टाकून वस्ती उभी करण्यात आलेली आहे ही गोष्ट नाकारण्याचे कारण नाही. म्हणून या संदर्भात मुंबई हाय कोर्टामध्ये 2004 मध्ये एक तक्रार दाखल करण्यात आली होती आणि दिनांक 06 ऑक्टोबर 2005 रोजी मुंबई उच्च न्यायालयाने एक निर्णय दिला आणि त्यामध्ये असे सांगण्यात आले की, शासकीय जमिनीवरील तांदळवनाचे जे क्षेत्र आहे, ते आपण संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करावे आणि सदरहू निर्णय हा मुंबई व मुंबई उप नगराच्या संदर्भातील होता. त्या निर्णयाची अंमलबजावणी झाली असून, आज मुंबई आणि मुंबई उपनगराच्या बाबतीत हा विषय लक्षात घेतला तर जवळजवळ मुंबई, मुंबई उपनगर किंवा ठाणे जिल्ह्यातील काही भाग 5588 आणि 9374 हेक्टर आर क्षेत्र हे आता संरक्षित वने म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. संरक्षित वने आणि वने अशा प्रकारच्या दोन शब्दांमध्ये याची विभागणी केलेली आहे. त्यामध्ये खूप मोठया प्रमाणात भराव टाकून इमारती उभ्या करण्याचे काम होत आहे हे नाकारण्याचे कारण नाही. यासंबंधात सुध्दा काही लोकांवर म्हणजे जवळजवळ 31 लोकांवर पर्यावरण कायद्यांतर्गत महसूल विभागाकडून गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. ज्यामध्ये पाच वर्षापर्यंत शिक्षा आणि 1 लाख रुपयापर्यंत दंड इतकी शिक्षा असू शकते.परंतु यामुळे या घटनांना आळा बसेल अशातला भाग नाही.

सभापती महोदय, मी मघाशी या विषयाच्या अनुषंगाने माहिती घेतली. याबाबत वन विभागाचे अधिकारी सांगतात की,याबाबतीत महसूल विभागाची जबाबदारी आहे.दुसरीकडे महसूल विभागा कडून सांगितले जाते की, आमच्या कडे मोठ्या प्रमाणात काम आहे.एखाद्या ठिकाणी बांधकामाची परवनगी देत असताना महानगरपालिके कडून परस्पर परवानगी दिली जाते,त्यावेळी आमच्या विभागाला विचारात घेतले जात नाही आणि दुसरीकडे फॉरेस्ट विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत आमच्या कायद्यामध्ये येत नाही किंवा आमच्याकडे वन हस्तांतरीत होत नाही तोपर्यंत आमचा त्यावर अधिकार पोहोचत नाही. परंतु यासंदर्भात दिनांक 27-01-2010 रोजी हाय कोर्टाने निर्णय दिलेला आहे, त्या नुसार आता अशा प्रकारचे बंधन घालण्यात आलेले आहे की, एखादे वन संरक्षित असू दे किंवा वन असू दे, या संदर्भात वनेतर म्हणजे त्याठिकाणी इतर कोणत्याही प्रकारच्या ॲक्टीव्हीटीज करावयाच्या असतील किंवा त्याठिकाणी कोणताही विकास करावयाचा असेल तर त्यासाठी फॉरेस्ट विभागाप्रमाणे,केंद्र शासनाची सुध्दा वन संरक्षण अधिनियम, 1980 अन्वये परवानगी घ्यावी लागेल. त्यामुळे आता पुढच्या काळामध्ये बांधकाम करण्यासाठी भराव



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

टाकून काम सुरु करीत असताना त्याबाबतीत केंद्र शासन आणि फॉरेस्ट विभागाकडून सुध्दा परवानगी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे आता या वनांच्या बाबतीत, तिवरांच्या झाडांचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही सर्वांवर आलेली आहे. अशा वेळी आता केवळ याबाबतीत परवानगी देण्यासाठी एक टेबल वाढले असे न होता, वनांचे, तिवरांच्या झाडांचे संरक्षण करणे ही देखील आपली जबाबदारी आहे याची जाणीव शासनाकडून संबंधित विभागाला करुन देण्यात आलेली आहे. यामुळे वनांचे, तिवरांच्या झाडांचे रक्षण करण्याचे काम पुढच्या काळामध्ये अधिक व्हावे असा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी मुंब्रा, दिवा, डोंबिवली या पट्ट्यातील खाडी किनाऱ्याचे जे क्षेत्र आहे, ते मात्र अजूनपर्यंत महसूल आयुक्तांनी फॉरेस्ट विभागाकडे वर्ग केलेले नाही ही गोष्ट खरी आहे. पण त्याच संदर्भात "महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लीकेशन सेंटर" यांच्या वतीने डिजिटलाईज नकाशे तयार करण्याचे काम सुरु असून ते काम अंतिम टप्प्यामध्ये आलेले आहे आणि ते पूर्ण झाल्यानंतर हे क्षेत्र सुध्दा "वन संरक्षित क्षेत्र" म्हणून घोषित करण्यात येईल.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ प्रथम सौ रणदिवे.... 11:05

श्री. भास्कर जाधव....

तूर्त ठाणे जिल्हयातील 1471.412 हेक्टर इतके क्षेत्र संरक्षित वने म्हणून घोषित करण्यात आले आहे. उर्वरित क्षेत्र संरक्षित वने म्हणून घोषित करण्याची कार्यवाही लौकरच केली जाईल, अशा प्रकारची ग्वाही मी या सदनाला देऊ इच्छितो. केवळ महसूल विभागाची ही जबाबदारी आहे आणि बाकीच्या विभागांची जबाबदारी नाही, अशा प्रकारे जबाबदारी झटकून देण्याचे काम सुरु झाले होते. ही कॉर्पोरेशनची जबाबदारी आहे. संबंधित नियोजित प्राधिकारणाची जबाबदारी आहे. फॉरेस्ट विभागाची जबाबदारी आहे. महसूल विभागाची जबाबादारी आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : खार लँड विभागाची सुध्दा ही जबाबदारी आहे.

श्री. भास्कर जाधव :सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांच्या म्हणण्या प्रमाणे खार लँड विभागाने सुध्दा आपले क्षेत्र वाचविण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. तशा प्रकारच्या सूचना त्यांना सुध्दा देण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी समुद्र किनाऱ्या बद्दल संगितले तर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी खाडी किनाऱ्या बद्दल सांगितलेले आहे. ही गोष्ट खरी आहे की, समुद्र किनाऱ्याच्या बाजूच्या जागेची मोठया प्रमाणात धूप होत आहे, याची शासनाला निश्चितपणे जाणीव झालेली आहे. मी त्या संदर्भातील नोटिफिकेशनचा उल्लेख केला आहे.तसेच दिनांक 27-01-2010 च्या कायद्याची आणि त्या अनुषंगाने हाय कोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कोकण आयुक्तांकडे जो एरिया प्रोटेक्टेड फॉरेस्ट म्हणून घोषित करावयाचा आहे, त्याची कार्यवाही लवकरच पूर्ण होईल, अशा प्रकारची मी ग्वाही देतो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता जे आश्वासन दिलेले आहे तेच आश्वासन मागील अधिवेशनामध्ये सुध्दा दिलेले आहे. खारलँडचे पाणी खार जमिनीमध्ये येते तसेच भात जमिनीमध्ये येते त्यामुळे त्या ठिकाणी तिवरांच्या झाडाची वाढ होते व त्याच्या नोंदी घेतल्या जातात.. त्यामुळे त्या ठिकाणी भात शेती सुध्दा करता येत नाही. शासनाकडे अशी नोंद पाहिजे की, गेल्या वर्षी या ठिकाणी भात शेती होत होती पण यावर्षी बाहेर काटा फुटल्यामुळे खारे पाणी आल्यामुळे या ठिकाणी तिवराची झाडे वाढलेली आहेत. तेव्हा याबाबतीत शासन केंद्र शासनाला काही धोरण सुचविणार आहे काय? अशा प्रकारे तिवरांची झाडे वाढत असतील पण त्या आधी त्या ठिकाणी भात शेतीची नोंद असेल तर शासन त्या संबंधीचा विचार करणार आहे काय?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी प्रश्न विचारल्यानंतर दोन्ही प्रश्नाला एकाच वेळी उत्तर देण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी सविस्तर उत्तर दिलेले आहे. पण त्यांनी असे सांगितले की, ही सगळयांचीच जबाबदारी आहे. सगळयांची जबाबदारी म्हणजे ती कोणाचीच जबाबदारी नाही. हा गंभीर विषय आहे. रेल्वे ट्रॅकच्या बाजूला तिवरांची झाडे आहेत. रेल्वे ट्रॅक उद्ध्वस्त झालेले आहेत. याबाबतीत आपल्याला आधीचा अनुभव आहे. ज्या वेळी आग लागते त्यावेळी आपण ऐन वेळी धावपळ करतो पण आधी उपाययोजना करीत नाही, म्हणून सबंधित अधिकारी, महापालिका किंव अन्य विभागाकडे याची जबाबदारी फिक्स असली पाहिजे. ही जबाबदारी कोणावर फिक्स करणार, 31 गुन्हे दाखल केलेले आहेत, ते समुद्र किनारपट्टी भागातील आहेत, रेल्वे ट्रॅकच्या जवळचे आहेत का संपूर्ण महाराष्ट्रातील आहेत, हे 31 गुन्हे कोणावर दाखल केलेले आहेत, माफियांवर दाखल केलेले आहेत का अधिकाऱ्यांवर दाखल केलेले आहेत, याला कोण अधिकारी जबाबदार आहेत? अधिकाऱ्यांना या सर्व गोष्टी दिसत असताना सुध्दा ते कारवाई करीत नाहीत. तेव्हा मंत्री महोदय या बाबतचा खुलासा करतील काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी थोडया वेळा पूर्वी याच संदर्भात सांगत होतो. या ठिकाणी संरक्षित वन ( प्रोटेक्टेड फॉरेस्ट ) जाहीर झाल्यानंतर फॉरेस्ट विभागाची जबाबदारी असते. पण ज्याचा केवळ 'वन'असा उल्लेख केला जातो त्याची जबाबदारी महसूल खात्यावर टाकली जाते. मी या संदर्भात थोडया वेळा पूर्वी विस्ताराने समजून सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. संरक्षित वनाची जबाबदारी वन विभागावर टाकण्यात येते. या संदर्भात मी वन विभागाच्या अधिकाऱ्याना एक प्रश्न विचारला होता. ही तुमची जबाबदारी नाही असे सांगता पण या संरक्षित वनातील लाकूड तोड होत असेल आणि ते ट्रकमधून नेण्यात येत असेल तर तुम्ही त्यांना पकडता की नाही? तर ते त्यांना पकडतात. कारण लाकूड तोड करुन ते वन विभागातून बाहेर नेण्यासाठी जो पास लागतो तो त्यांच्याकडे नसल्यामुळे त्यांना पकडण्यात येते. त्याच पध्दतीने संरक्षित वनाच्या व्यतिरिक्त सुध्दा जर चुकीच्या पध्दतीने तोड होत असेल तर त्याची जबबादारी सुध्दा वन विभागाला स्वीकारावी लागेल, अशा प्रकारचे उत्तर मी या ठिकाणी दिले आहे. या संदर्भात महसूल खात्याची तर जबाबदारी आहेच. पण आता या संदर्भात वन विभागाची सुध्दा

.....3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

जबाबदारी राहील.

सभापती महोदय, बिल्डिंगसाठी परवानगी देत असताना कॉर्पोरेशन सदर बिल्डिंग आमच्या कॉर्पोरेशन एरियात आहे अशा प्रकारचा हक्क सांगत असते. पण तिचे संरक्षण करण्याच्या बाबतीत मात्र महसूल विभागाकडे बोट दाखविण्यात येते. अशा पध्दतीने फक्त हक्क सांगण्यासाठी आम्ही आणि जबाबदारी घेण्या करिता दुसरे असू नये अशा प्रकारचा उल्लेख मी केला. म्हणून याबाबतीत सर्वांनाच जबाबदार धरले जाईल. संरक्षित वनाची शंभर टक्के जबाबदारी वन विभागाकडे आहे. उर्वरित क्षेत्र महसूल विभागाकडे आहे. त्याबाबतीत महसूल विभागाची जबाबदारी आहे.

...यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

परंतु यामध्ये आपल्याला अधिकची जबाबदारी स्वीकारावी लागेल असे मी म्हणालो. पूर्णपणे महसूल विभागाची जबाबदारी आहे, हे नाकारण्याचे काही कारण नाही. कोर्टाने सुध्दा निर्णय दिलेला आहे की, यामध्ये केंद्र सरकारची सुध्दा परवानगी घ्यावी लागेल, वन विभागाची परवानगी घ्यावी लागेल. त्यामुळे पर्यायाने यामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षप्रणे वन विभागाची सुध्दा जबाबदारी निश्चित झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी दोन प्रश्न उपस्थित केले. गेल्या वर्षी 31 डिसेंबर, 2010 आणि 1 जानेवारी, 2011 ला मोठ्या प्रमाणावर म्हणजे गेल्या 70-80 वर्षात आले नव्हते तेवढे उधाण आले आणि त्या खार जमिनीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी अप्रत्यक्षपणे उल्लेख केला तसेच त्यांनी दुसरा उल्लेख तिवरांची झाडे ज्याला आपण मॅनग्रोव्हज म्हणतो त्या संबंधीचा उपस्थित केला. तिवराची झाडे उगवणे हा थोडा संशोधनाचा भाग आहे. कारण मॅनग्रोव्हज कोठेही उगवतात. मॅनग्रोव्हज उगवण्याकरिता खास विशिष्ट क्षेत्र लागते किंवा त्याची निर्मिती करावी लागते किंवा ते ठराविक ठिकाणीच उगवतात अशातील भाग नाही. अशा प्रकारची थोडी झाडे उगवल्यानंतर कोणीही सांगतात की, त्या ठिकाणी मॅनग्रोव्हजची झाडे उगवली आणि त्यामुळे शेतकऱ्यांना अडचण निर्माण होते. त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असावा असे मला वाटते. ती अडचण सुध्दा लक्षात आलेली आहे. या संदर्भात आता कोणते क्षेत्र अशा पध्दतीचे आहे हे नक्की करुन भात शेतीला याची अडचण येणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : माननीय मंत्री महोदयांनी विनंती केल्यामुळे यानंतर अनुक्रमांक 5 वरील सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिलेली अर्धा-तास चर्चा चर्चेला घेण्यात येईल. त्यानंतर अनुक्रमांक 1 पासून अर्धा-तास चर्चा चर्चेला घेण्यात येतील.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, दुपारी 12.00 वाजेपर्यंत अनुक्रमांक 1 व 2 वरील अर्धा-तास चर्चा संपल्या तर बरे होईल. कारण विधानसभा सभागृहामध्ये माझी लक्षवेधी सूचना आहे.

श्री. दिवाकर रावते : आज सकाळी 20 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली. त्या बद्दल माझे काही म्हणणे नाही. खरे म्हणजे पहिल्या दिवशी सोमवारी आपण कधीही अतिरिक्त सत्र घेत नाही. मी या संदर्भात प्रधान सचिव डॉ. अनंत कळसे यांच्याशी बोललो. मी त्यांना सांगितले की, आपल्याला अर्धा-तास चर्चा घ्यावयाच्या असतील तर संबंधितांना आपण दूरध्वनीवरुन तसे कळवावे व त्याप्रमाणे व्यवस्था करावी. त्या बद्दल माझे काही म्हणणे नाही. आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोला हार घालण्याचा कार्यक्रम आहे हे माहीत असताना सकाळी 10.30 वाजता सभागृहाची बैठक ठेवण्याचे कारण नव्हते. त्यामुळे सकाळी 20 मिनिटे वाया गेली. ती 20 मिनिटे वाढवून द्यावीत. सभागृहाची नियमित बैठक 20 मिनिटे पुढे ढकलावी. आपण जर न्याय द्यावयाचे ठरविले आहे तर व्यवस्थितपणे न्याय द्यावा. नाही तर मग प्रशासकीय प्रश्न निर्माण होतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त हार घालण्याचा कार्यक्रम आहे आणि त्यासाठी 20 मिनिटे लागतील हे आपल्याला माहीत असताना सभागृहाची बैठक सकाळी 10.30 वाजता कशाला ठेवली, हा विषय येतो. त्या बद्दल मला वाद घालावयाचा नाही. आपण माननीय सभापतींची मंजुरी घेऊन विशेष सत्राच्या कामकाजासाठी 20 मिनिटे वाढवून द्यावीत आणि सभागृहाचे नियमित कामकाज दुपारी 1.15 ऐवजी 1.30 वाजता सुरु करावे.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

---



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

**पृ. शी.** : मुंबईच्या कारागृहातील जामीन, अभिवचन व संचितवर सुटलेले 14,754 गुन्हेगार भूमिगत झाल्याबाबत

**मु. शी.** : मुंबईच्या कारागृहातील जामीन, अभिवचन व संचितवर सुटलेले 14,754 गुन्हेगार भूमिगत झाल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 12834 ला दिनांक 21 मार्च, 2011 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मुंबईच्या कारागृहातील जामीन, अभिवचन व संचितवर सुटलेले 14,754 गुन्हेगार भूमिगत झाल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 12834 ला दिनांक 21 मार्च, 2011 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, अत्यंत दुर्लक्षित परंतु एका महत्वाच्या प्रश्नावर प्रकाश पडावा या दृष्टीकोनातून मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. अनेक सदस्य अनेक प्रश्न विधान परिषदेच्या अधिवेशनामध्ये देत असतात आणि त्या संदर्भात चांगली उत्तरे मिळावीत अशी अपेक्षा असते. मुंबईच्या कारागृहातील जामिनावर, अभिवचन व संचितवर सुटलेले 14 हजार 754 गुन्हेगार भूमिगत झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. हे गुन्हेगार फरार आहेत. शासनाने असे उत्तर दिले आहे की, आम्ही वारंवार आढावा घेतो. एकट्या मुंबई शहराच्या कारागृहातून 14 हजार 754 गुन्हेगार जामिनावर सुटून किंवा पॅरोलवर सुटून फरार झाले असतील तर त्यामध्ये अनेक शक्यता निर्माण होतात. ते मुंबई शहरातील त्या त्या पोलीस स्टेशनच्या अखत्यारीत न राहता अनेक वेळा आम्ही बघतो तसेच सन्माननीय गृह मंत्र्यांना सुध्दा कल्पना आहे की, खास करुन अनेक निवडणुकांच्या वेळेला पॅरोलवर सुटलेले काही कैदी त्या भागात प्रचारात सुध्दा जाहीरपणे दिसलेले आहेत. त्याच बरोबर काही वेळा नावे बदलून किंवा आंतरराज्य स्तरावर इतर राज्यांमध्ये सुध्दा जाऊन स्वत:ची नावे बदलून परत वेगवेगळ्या पध्दतीने गुन्हे करण्याची शक्यता असते. प्रत्येक जण असे गुन्हे करतोच असे मी म्हणणार नाही पण तशी शक्यता आहे. यातील तिसरा भाग

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

असा आहे की, मुंबई शहरातील एवढे गुन्हेगार भूमिगत असतील किंवा फरार असतील, खरे तर आपण भूमिगत शब्द राजकीय कैद्यांसाठी वापरतो पण प्रश्नामध्ये भूमिगत शब्द आल्यानंतर आपण फरार या शब्दाचा उपयोग केलेला आहे. मला असा प्रश्न उपस्थित करावयाचा आहे की, किती जणांना फेरअटक केलेली आहे ? ही फेर अटक करीत असताना या कारागृहातील कैद्यांच्या संदर्भात श्री. जवाहरसिंग यांनी जी अनुचित पध्दतीने कार्यवाही केली होती त्यामुळे शासनाने त्यांना निलंबित केले होते.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

4-5 प्रकारचे वेगवेगळे कैदी आहेत. त्यामध्ये गॅंगस्टर्स किंवा अतिरेकी गुन्ह्यांशी संबंधित असलेले कैदी निराळे आहेत. त्या सोबतच सामाजिक परिस्थितीमुळे विशेषत: जमिनीच्या वादामधून खुनापर्यंत पोहोचलेली प्रकरणे वेगळी आहेत. बलात्कार व दरोडे घालण्याचा हेतू ठेवून झालेले खून, त्या खेरीज काही लोक विशेषत: बाल गुन्हेगार, कुमारी माता व अनेक वृध्द लोक त्याच्याशी संबंधित असल्यामुळे आजही अनेक जेलमध्ये सडत आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या आरोपींपैकी किती आरोपींना फेर अटक झाली आहे, राज्यातील असे किती गुन्हेगार फरार आहेत, फरार आरोपींना शोधण्याची जबाबदारी त्या त्या पोलीस स्टेशनवर टाकली जाते व त्याचा जर पाठपुरावा झाला नाही तर किती गुन्हेगार पकडले गेले याचा काही थांगपत्ता लोकांना लागत नाही, संपूर्ण महाराष्ट्रात जे गुन्हेगार फरार झाले आहेत त्यांना पकडण्यासाठी शासनाने कोणती पावले उचलली आहेत ?

त्याचप्रमाणे संयुक्त महाराष्ट्राचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. सामाजिक गुन्ह्यांमध्ये विशेषत: बाल गुन्हेगार आहेत. काही वेळेला त्यांना वकील मिळत नाही असे मानवाधिकार आयोगाच्या लक्षात आलेले आहे. अशा प्रकारे गंभीर नसलेल्या गुन्ह्यांतील सुध्दा काही लोक वर्षानुवर्षे शिक्षा भोगत असतात. त्यांच्यासाठी शासन काही धोरण आखणार आहे काय, फरार आरोपींना फेर अटक करण्यासाठी सरकारने कोणती पावले उचलली आहेत याबद्दल माननीय गृह मंत्र्यांनी विवेचन करावे अशी माझी अपेक्षा आहे.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/

श्री.आर.आर.पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, एखादा गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांना पूर्णपणे ताकद लावून आरोपींना शोधावे लागते. त्यांना अटक करावी लागते, कोर्टासमोर हजर करावे लागते. काहींना मॅजिस्ट्रेट समोर उभे केले जाते तर काहींना कोर्टासमोर उभे केले जाते. पण आरोपींना मानवतेच्या दृष्टीकोनातून गुन्ह्याचा निकाल लागेपर्यंत जामीन दिला जातो. परंतु जामीन मिळाल्यानंतर आपला पत्ता बदलणे, दुसऱ्या राज्यामध्ये जाऊन राहणे, कोर्टाने जामीन दिल्यानंतरही कोर्टात हजर न राहणे, असे प्रकार मोठ्या प्रमाणात घडलेले आहेत ही गोष्ट मला कबूल करावी लागेल. मुंबईतील ही संख्या 14,754 इतकी आहे. ही जी संख्या आहे ती पूर्वीपासूनची एकत्रित केलेली संख्या आहे. हे आरोपी 1-2 वर्षात फरार झालेले नाहीत. आजपर्यंत रेकॉर्डवर दिसणारे फरार झालेले एकत्रित आरोपींची ही संख्या आहे. या संबंधी चौकशी केल्यानंतर यातील बरेच आरोपी मयत झालेले आहेत. कारण खूप वर्षापूर्वीचे हे आरोपी आहेत. परंतु कोर्टाने स्वत:हून रिट दाखल करुन घेतल्यानंतर व कोर्टाने निदेश दिल्यानंतर शासनाने विशेष मोहिम हाती घेतली आहे.

दिनांक 9 नोव्हेंबर, 2010 रोजी राज्यातील सर्व पोलीस गट प्रमुखांसाठी एक परिपत्रक काढण्यात आले आहे. त्याच बरोबर दिनांक 11.3.2011 रोजी एक परिपत्रक काढले असून त्यात प्रत्येक गट प्रमुखांनी एक विशेष कक्ष स्थापन करावा, त्यामध्ये निरीक्षक दर्जाचे एक अधिकारी व दोन कर्मचारी असावेत. त्यांनी आपापल्या कार्य क्षेत्रातील फरारी आरोपींचा शोध घ्यावा असे नमूद केलेले आहे. अशा प्रकारचा कक्ष स्थापन करण्याच्या सूचना पोलीस महासंचालकांनी दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे आतापर्यंत या दोन महिन्यामध्ये 235 आरोपींना फेर अटक केलेली आहे. उर्वरित आरोपींना अटक करण्याच्या दृष्टीने सरकारने उपाययोजना केलेली आहे. यातील काही गुन्हे 15 वर्षापूर्वीचे, 20 वर्षापूर्वीचे आहेत. यातील काही गुन्हे अगदी जुजबी पध्दतीचे आहेत, ज्यामध्ये 100 रुपयांचा दंड केलेला आहे, असे किरकोळ स्वरुपाचे गुन्हे आहेत. या सर्व गुन्ह्यांचे एकदा वर्गीकरण करण्यात येईल. ज्या गुन्ह्यांना 10 वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला आहे. जे गुन्हे अत्यंत किरकोळ स्वरुपाचे आहेत असे गुन्हे काढून टाकण्याची भूमिका स्वीकारली जाईल. यातील काही लोक मेलेले आहेत. परंतु त्यावेळी त्यांना अटक न झाल्यामुळे रेकॉर्डवर असे आरोपी

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/

श्री.आर.आर.पाटील.....

फरारी दिसतात. एखादा आरोपी मेल्यानंतरही रेकॉर्डवर फरार दिसत असेल तर पोलिसांनी त्याला कोठे पकडायचे, पोलिसांनी त्यासाठी किती ताकद खर्च करावयाची, यालाही काही मर्यादा आहे. म्हणून जे गुन्हे किरकोळ स्वरुपाचे आहेत व ज्याचा कालावधी 10 वर्षापेक्षा अधिक झालेला आहे, असे गुन्हे काढून टाकण्याची भूमिका स्वीकारली जाईल. त्याच बरोबर जे गुन्हे गंभीर स्वरुपाचे आहेत. ज्यात खुनासारखे गुन्हे आहेत, बलात्कारासारखे गुन्हे आहेत, गॅंगस्टर्समध्ये समावेश आहे अशा गुन्ह्यातील आरोपींना प्राधान्य देऊन असे आरोपी लवकरात लवकर पकडले जातील. त्या दृष्टीने सुरु केलेली मोहिम आणखी गतीमान करण्यात येईल.

सभापती महोदय, ज्या ज्यावेळी राज्यात व देशामध्ये आनंदाचे प्रसंग असतात त्यावेळी कैद्यांना माफी देण्यात आलेली आहे असा अनुभव आहे. आपले राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ 11:20

श्री. आर.आर.पाटील...

जेलमध्ये गेल्यानंतर काही लोकांना शिक्षा झालेली असते, त्यांच्यावरचे आरोप सिद्ध झालेले असतात, त्यांच्या हातून अपराध घडलेला असतो, परंतु ते नेहमीचे सराईत गुन्हेगार नसतात. काही महिला आणि वयोवृध्द लोकांकडूनही गुन्हे घडतात. हे लोक बाहेर आल्यानंतर त्यांच्या पासून समाजाला खूप मोठा धोका असतो अशी स्थिती नसते. परंतु जेलमध्ये अटक झालेल्या लोकांकडून कायद्याचे पालन करणा-या लोकांना त्रास होणार नाही हेही पाहणे आवश्यक असते. ज्या गुन्हेगारांचा बालकांवरील अत्याचाराच्या, महिलांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यामध्ये समावेश नाही, जे गँगस्टर्स् नाहीत, तरी सुध्दा ते तुरुंगात आहेत अशा गुन्हेगारांच्या बाबतीत राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष लक्षात घेऊन, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचने प्रमाणे त्यांच्या शिक्षेमध्ये सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. या बाबतचा निर्णय महिन्याभरात घेण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : मंत्री महोदयांनी मुंबईतील गुन्हेगारांची आकडेवारी सांगितली. मी राज्यातील फरार असलेल्या गुन्हेगारांची आकडेवारी विचारली होती. ही आकडेवारी त्यांनी सांगावी. कैद्यांना पॅरोलवर पाठविण्याच्या बाबतीत शासनाचे धोरण ठरले पाहिजे. कारागृह निरीक्षक कैद्यांना केव्हाही पॅरोलवर पाठवितात. पॅरोलवर सुटलेले अनेक कैदी निवडणूक प्रचाराच्या वेळी दिसतात. त्यामुळे निवडणुकीच्या वेळी दहशत निर्माण होते. या कैद्यांना पॅरोलवर पाठविण्याच्या बाबतीत शासन कोणते धोरण स्वीकारणार आहे ?

श्री. एस.क्यू.जमा : सभापति महोदय, गृह मंत्री जी ने यह बात मानी है कि यह मामला बहुत गंभीर है. कैदी फरार हो जाते हैं या किसी कारण से बाहर आ जाते हैं और फिर वे मिलते नहीं है. मंत्री महोदय ने कहा कि वे इन कैदियों के वर्गीकरण करने की नीति बना रहे हैं. जिन लोगों पर गंभीर आरोप नहीं हैं, उनके बारे में मंत्री महोदय एक महीने में नीति बनाएंगे. ऐसा लगता है कि शासन के पास, गृह मंत्रालय के पास इस बारे में कोई नीति नहीं है. ट्रेड यूनियन के छोटे छोटे मामलों के ऊपर मास एक्शन हुआ है. ट्रेड यूनियन के लोगों ने डिमोस्ट्रेशन किया तो उनके ऊपर 147 इत्यादि धाराएं लगाकर 15-20 साल से केस चल रहे हैं. ऐसे कई प्रकरणों में हमने आपको लिखा है और आपने जबाब दिया है कि प्रकरण संबंधित विभाग को भेज दिया है. बहुत से ऐसे पत्र हमने पिछले 2-3 साल में लिखे हैं, लेकिन इन प्रकरणों में

. . . H-2

. . . श्री. एस.क्यू जमा

अभी तक निर्णय नहीं आया है. मेरा आपसे अनुरोध है कि इसके बारे में नीति बनाते समय हम लोगों की, माननीय सदस्यों की राय ली जाए. जिनके ऊपर गंभीर गुनाह नहीं हैं, उनका वर्गीकरण करके स्वर्ण महोत्सव वर्ष में अगर आप उनको छोड़ने की नीति बना लें तो बहुत अच्छा होगा.

सभापति महोदय, मेरा दूसरा मुद्दा यह है कि अगर कोई ऐसी घटना होती है, जिसका संबंध आतंकवाद से जोड़ा जाता है तो इसमें बहुत सारे इनोसेंट लोगों को भी गिरफ्तार कर लिया जाता है और गिरफ्तार करने के बहुत दिनों के बाद उनके ऊपर चार्जशीट दाखिल की जाती है, उसके बाद भी उनके ऊपर मुकदमे साबित भी नहीं होते हैं. इन्टरोगेशन के लिए पकड़े जाने वाले लोगों की संख्या बहुत अधिक है. अभी हमारे सामने केवल मुंबई शहर की संख्या सामने आई है, लेकिन अगर हम पूरे महाराष्ट्र की संख्या देखें तो यह संख्या लाखों में है. आतंकवाद के नाम पर बहुत सारे लोगों को गिरफ्तार कर लिया जाता है और बाद में 2-3 साल के बाद उनको छोड़ा जाता है, उनकी नौकरी चली जाती है, उनकी पढ़ाई खराब होती है. जिनका इनवेस्टीगेशन पूरा हो गया है, ऐसे लोगों को तुरन्त छोड़ने के बारे में क्या आप कोई नीति बनाएंगे ?

श्री. आर.आर.पाटील : मी आधीच सांगितले की, हे पॅरोलवरचे आरोपी एक-दोन वर्षातील नाहीत. हे 20-25 वर्षापासूनचे पॅरोलवरचे आरोपी आहेत. मुंबईतील अशा आरोपींची संख्या 14700 आहे. रेकॉडवरुन राज्यामध्ये 23766 आरोपी हे फरार दिसतात. या फार जुन्या केसेस आहेत. ही आकडेवारी माझ्या आणि वरिष्ठ अधिका-यांच्याही लक्षात आली. त्याबाबतची मी माहिती घेतली. आतापर्यन्तच्या तपासात 15 ते 20 टक्के आरोपी मयत असल्याचे आढळलेले आहे, काहींचे पत्ते बरोबर नाहीत, काही जण 10 वर्षापूर्वीच मृत झालेले आहेत. रेकॉर्ड दुरुस्त करण्याचे काम चालू आहे. राज्यातील फरार आरोपींची आकडेवारी मी सांगितलेली आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

iABG/ KGS/ D/ प्रथम श्री. शिगम 11:25

श्री.आर.आर.पाटील....

या ठिकाणी किरकोळ स्वरुपांच्या गुन्हयांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला गेला, त्या बाबतीत जरुर विचार केला जाईल. निवडणुकीच्या कालावधीत शक्यतो सराईत गुन्हेगारांना सोडत नाही. तशा शासनाच्या स्पष्ट सूचना आहेत. उलट ज्यांच्यावर आरोप आहेत, त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करीत असतो. पण निवडणुकीचा फायदा घेऊन कोणी गुन्हेगार सुटत असतील तर व लोकशाही सारख्या चांगल्या प्रक्रियेमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक निवडणुकीच्या कामात भाग घेत असतील तर त्यांना अटकाव करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे काही उपाययोजना केल्या जातील.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शालेय पोषण आहार शिजविण्याचे काम महिला बचत गटाना देणेबाबत.

**मु. शी.** : शालेय पोषण आहार शिजविण्याचे काम महिला बचत गटांना देणे यासंबंधी श्री.परशुराम उपकर,वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" राज्य व केंद्र शासन पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता असून आहार बनविण्याच्या नव्या पध्दतीनुसार प्रत्येक विद्यार्थ्यामागे 50 पैसे मोबदला देण्याचे ठरविण्यात येणे, यामुळे आहार शिजविण्यासाठी महिला कर्मचारी मिळत नसल्याने हा आहार शिजविण्याची वेळ मुख्याध्यापकांवर येऊन ठेपणे, सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेच्या बहुतांश शाळांत बऱ्याच ठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या कमी प्रमाणात असून ज्या शाळेत 10 ते 12 विद्यार्थी असतील त्या शाळेत 50 पैसे प्रमाणे पाच ते सहा रुपयांकरिता आहार शिजविणारी महिला न मिळणे शैक्षणिक धोरणामुळे मूल्यमापनाच्या नवीन पध्दतीनुसार विद्यार्थ्यांचे दैनंदिन निरीक्षण करणे, नोंदी होणे,शालेय कागदपत्र तयार करणे, आदि विविध कामांचा बोजा यापूर्वीच शिक्षकांवर असतांना शालेय पोषण आहार शिक्षकांनी स्वत: तयार करणे म्हणजे तारेवरची कसरतच असणे, परिणामी शालेय पोषण आहाराचा सिंधुदुर्ग जिल्हयात उडालेला फज्जा, ज्याप्रमाणे पोषण आहार साहित्य पुरविण्याचे कंत्राट फेडरेशनला दिले, त्याप्रमाणे पोषण आहार शिजविण्याचे काम महिला बचत गटांना देण्याबाबतची करण्यात आलेली मागणी, या बाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, राज्य आणि केंद्र शासन पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी सुरु आहे. कोकणातील भौगोलिक परिस्थितीमुळे ही योजना त्या ठिकाणी राबविण्यास बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या आहेत. आहार पोषणासाठी लागणारे अन्न, धान्य यासाठी पुरवठादार म्हणून मार्केटिंग फेडरेशनला नेमले गेले आहेत.

3...



iABG/ KGS/ D/ प्रथम श्री. शिगम 11:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

5, 10, 12 आणि 50 अशा पटसंख्येच्या शाळांना शालेय पोषण आहाराचा पूर्ण वर्षाचा पुरवठा केला जातो. यात चणा, सोयाबीन, कडधान्य दिले जाते. त्यांना बुरशी येण्याचे प्रकार अनेक ठिकाणी आढळून आलेले आहेत. असाच बुरशी येण्याचा प्रकार मालवण तालुक्यातील तारकर्ली गावातील एका शाळेत आढळून आला व ती बाब ग्रामस्थानी आरोग्य सभापतींच्या निदर्शनास आणून दिली आहे.

अनेक शाळांना शालेय पोषण आहाराचा साठा करण्यासाठी स्वतंत्र असे गोडाऊन नसते, त्यामुळे तो साठा एका वर्गातील खोलीमध्ये ठेवला जातो. मुळात शाळेतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी वर्गखोल्या कमी असतात, दोन, दोन वर्ग एका खोलीत भरविले जातात आणि त्या ठिकाणच्या वर्ग खोल्यांमध्ये सदरहू साठा ठेवला जातो, त्यावर बंधन आणले जाणार आहे काय व तो साठा ठेवण्यासाठी त्या शाळांना पर्यायी व्यवस्था करुन देण्यात येईल काय ? कोकणातील दुर्गम परिसरातील आहार पोषण पुरवठादार काही ठिकाणच्या शाळांमध्ये धान्याचा साठा घेऊन जाऊ शकत नाही. सिंधुदुर्ग जिल्हयातील जवळपास 350 शाळा शालेय पोषण आहारापासून वंचित राहिल्या आहेत. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अन्न शिजविण्यासाठी पर विद्यार्थी 50 पैसे दिले जातात. पाच ते दहा रुपयांमध्ये विद्यार्थ्यांना अन्न शिजविण्यासाठी महिला उपलब्ध होत नाहीत. बऱ्याच वेळा मुख्याध्यापकांना अन्न शिजवून द्यावे लागते. शालेय पोषण आहारासंबंधीचे रेकॉर्ड ठेवण्यासाठी स्वतंत्र असा शिक्षक नेमला जातो. त्यामुळे शिक्षकास शालेय पोषण आहाराकडे जास्त लक्ष द्यावे लागते, पर्यायाने त्या शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम होते.

शालेय पोषण आहार शिजविण्याचे काम पूर्वी महिला बचत गटाकडे सोपविण्यात आले होते. ती व्यवस्था पुन्हा सुरु करण्यात येणार आहे काय ? सदरहू पोषण आहारातील अन्नधान्यांच्या नोंदी ठेवण्यासाठी शिक्षक नसतो. त्या नोंदी ठेवण्यासाठी स्वतंत्र शिक्षक ठेवण्यात येईल काय ? त्याचप्रमाणे कोकणातील शालेय विद्यार्थी सोयाबीन, शेंगदाणे खात नाही. कोकणातील शालेय विद्यार्थी खोबऱ्यांचा अंश असलेले पदार्थ खावू शकतात. म्हणून कोकणातील शालेय विद्यार्थ्यांना शेंगदाणे देण्याऐवजी खोबरे उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत या योजनेच्या निकषात काही बदल करण्यात येईल काय ? अनेक शाळांना शालेय पोषणासाठी लागणारे अन्नधान्य पुरवठादाराकडून अतिशय निकृष्ट दिले आहे, तसेच ते वेळेवर पुरविले नाही, त्या ठेकेदारावर शासन काय कारवाई

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

करणार आहे ? महिलांचे सबलीकरण व्हावे म्हणून महिलांचे बचत गट निर्माण करण्यात आले आहे. म्हणून शालेय विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचे अन्नधान्य शिजवून देण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हयातील महिला बचत गटाकडे सदर काम देण्यात येईल काय, या संबंधी माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

यानंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढविणे आणि गळतीचे प्रमाण कमी करणे या हेतूने ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेमुळे बऱ्याच प्रमाणात यश मिळत आहे.

माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी कोकण विभागातील शालेय पोषण आहार योजनेबाबत काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. शासनाने शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीबाबत अभ्यास करण्यासाठी शासनाने दिनांक 18.06.2009 रोजी एका अभ्यास गटाची नियुक्ती केली होती. या अभ्यास गटाच्या अहवालानुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्या निर्णयानुसार नवीन पध्दतीने तीन प्रकारचे टप्पे निश्चित केले आहेत. पहिला टप्पा म्हणजे एफ.सी.आय.कडून डायरेक्ट शाळांना धान्य पोहोचविले जाते. दुसरा टप्पा म्हणजे हळद, तेल, मीठ, मोहरी आदी पदार्थांच्या पुरवठ्यासाठी मार्केटिंग फेडरेशनची नियमित पध्दतीने नेमणूक करण्यात आली आहे आणि तिसरा टप्पा म्हणजे ग्राम शिक्षण समितीच्या माध्यमातून अन्न शिजविण्याचे काम महिला बचत गटांना दिले जाते. या योजनेमध्ये दुरुस्ती करुन सुधारित दर निश्चित केले आहेत. पूर्वी प्रत्येक विद्यार्थ्यामागे 50 पैसे अन्न शिजविण्यासाठी महिला बचत गटांना किंवा संस्थांना दिले जाते होते, ते परवडत नसल्याच्या तक्रारी शासनाला प्राप्त झाल्यामुळे हे दर वाढविण्याचे काम शासनाने केले आहे. आता पहिली ते पाचवीच्या वर्गासाठी प्रती विद्यार्थ्यामागे 2.08 रुपये ऐवजी 2.60 पैसे असा सुधारित दर निश्चित करण्यात आला आहे. सहावी ते आठवीच्या वर्गासाठी 2.60 रुपये ऐवजी 3.85 रुपये असा सुधारित दर निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये धान्य आणणे आणि शिजविण्याचे काम करावयाचे आहे. धान्य पुरवठा खर्चासाठी 1.70 रुपये देतो. इंधन, भाजीपाला यासाठी 50 पैसे ऐवजी 90 पैसे देत आहोत. 9 पैसे सूक्ष्म पोषणासाठी आणि प्राथमिक व माध्यमिक वर्गांसाठी 18 पैसे ठेवण्यात आले आहेत. अशा पध्दतीने दरवाढ केली आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये पटसंख्या कमी असणे हे एक मुख्य कारण आहे. ज्या ठिकाणी पटसंख्या कमी आहे तेथे महिला बचत गटांना अन्न शिजविण्याचे काम करणे परवडत नाही. रोजच्या मजुरीच्या तुलनेत त्यांना 4 ते 5 रुपये मिळतात, त्यामुळे हे काम स्वीकारण्यास

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KGS/ 11:30

प्रा.फौजिया खान........

महिला बचत गट तयार होत नाहीत. फेब्रुवारी, 2011 पासून शासनाने नवीन दर लागू केल्यामुळे महिला बचत गट हे काम स्वीकारण्यास आकर्षित झालेले आहेत. अधिक संख्येने अन्न शिजविण्याच्या कामासाठी महिला पुढे येत आहेत. स्वयंपाकी देण्याचाही शासनाने निर्णय घेतला आहे. ग्रामीण भागामध्ये पटसंख्येनुसार दर निश्चित केले आहेत. पटसंख्या 25 पर्यंत असेल तर स्वयंपाक्याला महिन्याला 1 हजार रुपये देतो. 900 पेक्षा जास्त विद्यार्थी असतील तर स्वयंपाक्यासाठी महिन्याला 10 हजार रुपयांपर्यंत रक्कम देत आहोत.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी शिक्षकांच्या जबाबदारीबद्दल उल्लेख केला आहे. शिक्षकांना अन्न शिजविण्याचे काम करावे लागू नये यासाठी शासनाने हे निकष ठरविले आहेत. महिला बचत गट व स्वयंपाकी यांना दर वाढवून देण्यात येत आहेत. त्यामुळे धान्याची सफाई करणे, आहाराचे वाटप करणे, जेवण झाल्यानंतर साफसफाई करणे, भांडी धुणे ही सगळी कामे त्यांनी करावीत असे निकष ठरविले आहेत. त्यामुळे माननीय सदस्यांनी जे काही प्रश्न उपस्थित केले, त्यातील काही प्रश्नांचे निवारण झालेले आहे.

सभापती महोदय, मार्केटिंग फेडरेशनबद्दल काही प्रश्न उपस्थित केले आहेत. फेडरेशनचे स्थानिक पातळीवर ठेकेदार आहेत.

नंतर के.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ........

फेडरेशनच्या बाबतीत सुध्दा काही प्रमाणात आमच्याकडे तक्रारी आलेल्या आहेत. कारण स्थानिक ठेकेदार नेमलेले असतात त्यांच्याकडून वेळेवर असा धान्य पुरवठा होत नाही अशा तक्रारी होत असतात. या सर्व बाबींचाशासन स्तरावर विचार करुना ही संपूर्ण प्रक्रिया सुधारण्याचा प्रयत्न केला जाईल. ग्रामीण भागाचा उल्लेख केला त्याचप्रमाणे शहरी भागासाठी देखील एक वेगळ्या प्रकारचे नियोजन केलेले आहे. त्यात काही शाळांचा एक ग्रुप तयार करुन त्यासाठी कॉमन किचनची सवलत देण्याचा विचार आहे. हीच पध्दत संपूर्ण ग्रामीण भागात सुरु करता येईल काय याचाही विचार सुरु आहे. अशा प्रकारे ही संपूर्ण प्रोसेस स्ट्रीमलाईन करण्याबाबत शासन स्तरावर सध्या विचार सुरु आहे.

श्री. रामनाथ मोते : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी शालेय शिक्षण विभागात सुरु असलेल्या शालेय पोषण आहार योजनेबाबतचा मुद्दा उपस्थित केला असून त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मंत्री महोदयांकडून उत्तर मात्र मिळाले नाही. सन्माननीय सदस्यांचा मूळ प्रश्न असा होता की, राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन शासनाने शालेय पोषण आहारामध्ये बदल करण्याचा विचार करावा. वास्तविक या योजनेचा मूळ उद्देशच असा होता की, शिक्षणाच्या प्रवाहामध्ये येणारा विद्यार्थी टिकला पाहिजे, त्याची उपस्थिती वाढली पाहिजे, गळतीचे प्रमाण कमीत कमी झाले पाहिजे. त्यासाठी केंद्र शासनाची ही अत्यंत चांगल्या प्रकारची योजना राज्यात सुरु आहे. पण बदलत्या परिस्थितीत त्या त्या भागात जो आहार पोषक असेल अशाच प्रकारचा आहार देण्याची योजना असायला हवी. पण तसे न करता संपूर्ण राज्यात एकाच प्रकारचे अन्न पोहचविले जाते. रायगड जिल्ह्यात एक-एका शाळेत चार-चार, पाच-पाच बेसनाची पोती दिली जातात. वास्तविक एवढ्या मोठ्या प्रमाणात बेसनाचा काहीच उपयोग नाही. आठ दिवसातच त्यामध्ये गाठी होतात व बुरशी येते. तसेच सोयाबीनचे चूर्ण मुलांना दिले जाते व तेच मुले खातात, पण त्यातही गाठी तयार झाल्या. पावसाळ्यात आठ दिवसांपेक्षा जास्त दिवस अशा प्रकारचे अन्न टिकत नाही म्हणून दिलेले अन्न परत न्यावे लागले. तसेच कोकणात जास्तीत जास्त खोबऱ्याचा वापर होतो तरी देखील तेथे शेंगदाणेच पुरविले जातात. भौगोलिक परिस्थितीचा विचार केला तर कोकणात शेंगदाणे मुले खातच नाहीत. त्याऐवजी खोबऱ्याचा पुरवठा

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .........

केला तर मुलांनाही खाण्याचा कंटाळा येणार नाही. यासंबंधी शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

महोदय, त्याचबरोबर ठाणे जिल्हा हा राज्यातील सर्वात मोठा जिल्हा असून आदर्श जिल्हा म्हणून सन्मानित झालेला जिल्हा सुध्दा आहे. या जिल्ह्यात अनेक ठिकाणी खाजगी कंपन्यांमार्फत शालेय पोषण आहाराचा पुरवठा चांगल्या प्रकारे सुरु आहे. अशाच प्रकारचा प्रोजेक्ट शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी राज्याच्या अन्य जिल्ह्यातही शासन सुरु करणार काय ?

रात्रीच्या शाळा अत्यंत उपयुक्त असा उपक्रम असून अशा शाळांमध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शिकत आहेत. या शाळांमध्ये शिकणाऱ्या किमान आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मिड-डे मिलची मी मागणी करणार नाही पण चहा, नाश्ता अथवा बिस्कीट्स देण्याची योजना शासन सुरु करणार काय ?

श्री. परशुराम उपरकर : महोदय, कोकणातील ज्या 350 शाळांमध्ये शालेय पोषण आहाराचा पुरवठा झालेला नाही त्या पुरवठादारावर शासन कोणती कारवाई करणार आहे, दुसरे म्हणजे भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन त्या त्या भागात विद्यार्थ्यांना जे अन्न खाण्याची सवय असते त्याप्रमाणे पुरवठा करण्याची अट शासन टाकणार आहे काय, तसेच शाळांमध्ये शिक्षकांना या योजनेचे रजिस्टर भरावे लागते ते भरावे लागू नये यासाठी संबंधितांना आदेश देण्यात येणार आहेत काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : सभापती महोदय, 1000 विद्यार्थ्यांच्या मागे 1000 रुपये अन्न शिजवण्यासाठी मानधन देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. परंतु कोकणामधील शाळांमध्ये उपस्थितीचे प्रमाण जास्त नसते त्यामुळे या ठिकाणच्या 25 विद्यार्थ्यांच्या मागे अन्न शिजवण्यासाठी आपण किती मानधन देणार आहात ? प्रत्येक विभागामध्ये खाण्याच्या पध्दती निरनिराळया असतात त्यामुळे लोकल पध्दतीवाईज अन्न उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य शासन शिफारस करणार आहे काय ?

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, शालेय पोषण आहारामध्ये एकाने अन्न पुरवायचे, दुस-याने पोहचून द्यावयाचे व तिस-याने ते शिजवून विद्यार्थ्यांना द्यावयाचे अशा पध्दतीने पोषण आहाराचे काम सुरु आहे. परंतु कोकणामध्ये शाळेतील पटसंख्या कमी असल्यामुळे आर्थिक दृष्टया ही बाब शक्य होत नाही. प्रत्येक शाळेमध्ये माळी काम करणारा असतो किंवा इतर कर्मचारी वर्ग राहत असतो त्यामुळे अशा प्रकारे त्या शाळेच्या आवारात राहणा-या कुटुंबाला अन्न शिजवण्याचे काम दिले व बल्क पध्दतीत वस्तु घेण्याचे काम सोपवले तर चांगले होऊ शकेल. तसेच हे कुटुंब स्थानिक असल्यामुळे स्थानिक पध्दतीने अन्न शिजवून ते मुलांना मिळू शकेल व विद्यार्थी सुध्दा ते अन्न आवडीने खाऊ शकतील. आपण या योजनेच्या माध्यमातून शाळांना वर्षभराचे जे धान्य पुरवतो ते न करता शाळेत राहणा-या कुटुंबाकडे यांसदर्भातील सर्व काम दिले तर अन्नाची नासडी होणार नाही व तेथील विद्यार्थ्यांना लोकल पध्दतीचे अन्नही उपलब्ध होऊ शकेल त्यामुळे यासंदर्भात शासन विचार करणार आहे काय ?

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, शालेय पोषण आहार शिजवण्याचे काम ज्या महिला बचतगटांना दिले जाते त्यांना ते कमी पटसंख्यामुळे अजिबात परवडत नाही. त्यामुळे एकाच ठिकाणी अन्न शिजवण्याचे काम करावे व शिजवलेले अन्न जवळपासच्या शाळांना पुरवले जावे किंवा मुलांना महिन्याचे धान्य दिले तर त्या मुलांच्या माता आपल्या मुलांना त्या धान्यापासून चांगल्या प्रकारचे जेवण डब्यामधून देऊ शकतील. या योजनेअंतर्गत काही ठिकाणी चण्याचे पीठ म्हणून वाटाण्याचे पीठ दिले जाते. काही ठिकाणी पिठात अळया सुध्दा पडलेल्या असतात. त्यामुळे असे बुरशी युक्त अन्न खाल्ल्यामुळे लहान मुले आजारी पडत असतात. मुंबईतील विद्यार्थ्यांना सुगंधी दुधापासून विषबाधा झाली होती. आपण मुलांना पोषक आहार देत आहात की, मुले आजारी

....2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

पडण्यासाठी आहार देत आहात ? त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना डाळी, कडधान्य, रवा दिला तर या विद्यार्थ्यांच्या माता त्यांना ते शिजवून डब्यातून देऊ शकतील. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना डाळी, कडधान्य, रवा अशा खाद्य पदार्थांचा पुरवठा केला तर जास्त संयुक्तिक होईल असे मला वाटते.

श्री. भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, शालेय पोषण आहाराचे रेकॉर्ड मेन्टेन करण्यासाठी प्रत्येक शाळेतील एका तरी शिक्षकाला काम करावे लागत असते. ज्यावेळेस शिक्षण अधिकारी शाळेला भेट देतात तेव्हा ते अधिकारी गुणवत्तेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा शालेय पोषण आहाराच्या संदर्भात शिक्षकाला अडचणीत कसे आणावयाचे याच संदर्भात काम करीत असतात. यामुळे राज्यातील अनेक मुख्याध्यापक, अनेक शिक्षक शालेय पोषण आहाराच्या प्रश्नामुळे सस्पेंड झालेले आहेत. शालेय पोषण आहाराच्या मुद्यामध्ये शिक्षकांना अडचणीत आणण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे शालेय पोषण आहाराचे काम शासन बाहय यंत्रणेवर सोपवले जाणार आहे काय ? पोषण आहाराचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो त्यामुळे शालेय पोषण आहाराचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष असे प्रयत्न केले जाणार आहेत काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, या अर्धातास चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य परशुराम उपरकर, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी भौगोलिक परिस्थितीनुसार पोषण आहार पुरवण्यासंबंधी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. याविषयाच्या संदर्भात शासन विचार करीत असून रिजनल लेव्हलवर ठेकेदार नेमून पुरवठा करण्याचा शासन विचार करीत आहे. नागरी क्षेत्रात गरम अन्न उपलब्ध करुन देण्याची योजना असून ही योजना ग्रामीण भागात सुध्दा उपलब्ध करुन देता येईल काय यासंदर्भातही शासन स्तरावर विचार सुरु आहे.

यानंतर श्री. गायकवाड ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ....

त्यासाठी रिव्हयू कमिटीची बैठक घेण्यात येते. ही संपूर्ण योजना स्ट्रीम लाईन करण्याची गरज असून त्या संदर्भात योग्य निर्णय घेण्याकरता रिव्हयू कमिटी स्थापन करण्यात आली आहे हे मी या पूर्वीच सांगितले होते. रात्रीच्या शाळांमध्ये ही योजना लागू करता येईल काय असे सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते यांनी विचारले आहे. रात्रीच्या शाळांमध्ये ही योजना लागू करणे आवश्यक आहे असे मला देखील वाटते. त्यामुळे त्याबाबत अवश्य विचार करण्यात येईल आणि ही बाब तपासून पहाण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री प्रकाश बिनसाळे यांनी महिला बचत गटाकडें भाजीपाला आणि इतर आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी तसेच अन्न शिजवण्यासाठी पैसे देण्यात यावे व या कामातून त्यांना फायदा मिळावा अशी सूचना केली होती.

श्री.प्रकाश बिनसाळे :सभापती महोदय, मी अशी सूचना केली होती की आपण वेगळया ठिकाणी अन्न शिजवतो त्या ऐवजी तेथील स्टाफकडे हे काम देण्यात यावे.

प्रा.फौजिया खान : त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या स्टाफला चार पैसे मिळावे याकरिता या योजनेमध्ये काही बदल करता येईल काय या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सूचना केली होती या संदर्भात मी या पूर्वीच उल्लेख केला होता. स्वयंपाकी नेमण्याची मुभा देण्याची तरतूद योजनेमध्ये करण्यात आलेली आहे.स्थानिक पातळीवर स्वयंपाकी नेमण्याचा अधिकार दिलेला आहे.त्याचबरोबर मटेरिअल खरेदी करण्याचा अधिकार देखील त्यांना आहे. त्याकरिता पैसे वाढवून दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांची सूचना या योजनेमध्ये अंतर्भूत आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : महिला बचत गटाचा मी उल्लेख केलेला नाही. एखाद्या ठिकाणी माळी काम करणारी व्यक्ती असेल तर त्याचे कुटुंब त्या ठिकाणी राहत असते . एखाद्या ठिकाणी दहा बारा विद्यार्थी असतील तर प्रत्येक विद्यार्थ्यामागे अमुक पैसे ठरवून देण्यात आले तर ती व्यक्ती विद्यार्थ्यासाठी अन्न शिजवून देतील व त्यांना प्रत्येक विद्यार्थ्यामागे ठराविक पैसे मिळतील. तेव्हा अशी व्यवस्था करण्यात येणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : मी या प्रश्नाचे उत्तर देतच होते. ग्राम शिक्षण समितीला यासबंधीची मुभा आहे.एखाद्या ठिकाणी जर कमी विद्यार्थी असतील तर अन्न शिजविण्याचे काम कोणाला द्यावयाचे हे ठरविण्याचा अधिकार ग्राम शिक्षण समितीला आहे. जर विद्यार्थी संख्या कमी असेल तर स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना देण्यात आलेला आहे. यासंबंधीची तरतूद

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ....

या योजनेमध्ये करण्यात आली आहे.भाजीपाला खरेदी करण्यासाठी आणि स्वयंपाक तयार करण्यासाठी आता दर वाढवून देण्यात आला आहे. त्यामुळे हे पैसे त्यांनाच मिळणार आहेत. त्यातून स्थानिक पातळीवरील व्यक्तीला चार पैसे अधिक मिळण्याची शक्यता आहे.सन्माननीय सदस्य श्री भगवान साळुंखे यांनी असे सांगितले आहे की, यामुळे शिक्षकांचे काम वाढलेले आहे. त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छिते की,या योजनेतील नवीन बाब मी नुकतीच सांगितली असून यामध्ये रेकॉर्ड किपींग व्यतिरिक्त शिक्षकांना दुसरे कोणतेही काम करावयाचे नाही. या योजनेवर मॉनिटरींगचे काम तर करावेच लागणार आहे.मुलांना अन्न देत असल्यामुळे त्यासबंधीचे रेकॉर्ड ठेवावेच लागणार आहे त्यामुळे तेवढया पुरतेच काम शिक्षकांना करावे लागणार असून बाकीचे काम ग्राम शिक्षण समिती वा स्वयंपाकी वा लोकल बचत गट यांना करावे लागणार आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, 350 शाळांना ठेकेदारांनी धान्य पुरविले नाही त्यामुळे विद्यार्थ्यांना पोषण आहारापासून वंचित रहावे लागले आहे. त्या ठेकेदाराविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय, त्याचबरोबर सोयाबीन आणि चण्याचे पीठ वगळून नारळयुक्त पदार्थ देण्याची सोय करण्यात येणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय स्थानिक आवडीप्रमाणे पोषण आहार देता येईल काय याबाबतीत अवश्य विचार करुन तशा प्रकारचा निर्णय घेण्यात येईल. मी रिव्हयू कमिटीचा उल्लेख मघाशी केला होता, त्या कमिटीमध्ये या संबंधीचा विचार करण्यात येईल. वेगवेगळया जिल्हयामधून ठेकेदाराच्या संदर्भात तक्रारी आल्या आहेत त्यामुळे अशा ठेकेदाराविरुध्द काय कारवाई करु शकतो या संदर्भात डेप्युटी डायरेक्टर यांना त्या ठिकाणी भेट देण्यास सांगितले असून जर अशा प्रकारे झाले असेल तर त्यांच्याविरुध्द निश्चित कारवाई करण्यात येईल.

----

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शालेय शिक्षणामध्ये नावीन्यपूर्ण असे मोठया प्रमाणावर बदल करण्याबाबतचा आराखडा

**मु. शी.** : शालेय शिक्षणामध्ये नावीन्यपूर्ण असे मोठया प्रमाणावर बदल करण्याबाबतचा आराखडा या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 11283 ला दिनांक 4 डिसेंबर, 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

(चर्चा पुढे चालू...)

( माननीय सदस्य अनुपस्थित )

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : माननीय सदस्य श्री. विक्रम काळे आता सभागृहात उपस्थित नाहीत.

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, या अर्धा तास चर्चेवर या पूर्वी चर्चा झालेली असून फक्त उत्तर द्यावयाचे राहिले आहे.

**तालिका सभापती** : आपण आपले उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/

**पृ. शी.** : गृहनिर्माण मंडळाच्या कायद्यातील त्रुटींमुळे चाळींची दुरुस्ती, पुनर्बांधणी करण्यामध्ये येत असलेल्या अडचणी

**मु. शी.** : गृहनिर्माण मंडळाच्या कायद्यातील त्रुटींमुळे चाळींची दुरुस्ती, पुनर्बांधणी करण्यामध्ये येत असलेल्या अडचणी यासंबंधी श्री. विजय सावंत, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"मुंबई शहरातील, विशेषतः जी (साऊथ) परिसरातील झोपडीवजा चाळींची दुरुस्ती करणेबाबत रहिवाशांना राज्य शासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळामार्फत शंभर महिन्यांचे भाडे घेऊन सदर जागा मालकी हक्काने दिलेल्या असणे, या झोपडीवजा चाळीतील अल्प उत्पन्न गटातील रहिवासी स्वखर्चाने चाळ दुरुस्ती करण्यास असमर्थ असणे, अत्यंत दयनीय अवस्थेत असलेल्या या चाळी केव्हाही कोसळून जमीनदोस्त होण्याची भती असल्याने व त्यामुळे फार मोठी जीवितहानी होण्याची शक्यता लक्षात घेऊन सदरहू चाळीतील रहिवासी चाळ दुरुस्ती वा पुनर्बांधणी विकासकामार्फत करण्याच्या सातत्याने प्रयत्नात असूनही याबाबत असलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या कायद्यातील त्रुटींमुळे सदरहू गरीब चाळकरी रहिवासी आपल्या चाळींची दुरुस्ती, पुनर्बांधणी तसेच विकास करण्यास असमर्थ असणे, परिणामी असुरक्षिततेची टांगती तलवार डोक्यावर घेऊन त्यांना प्रत्येक दिवस कंठावा लागणे, ही परिस्थिती दूर होण्याकरिता संबंधित गरीब चाळकऱ्यांना दिलासा मिळण्याचे दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना".

सभापती महोदय, मुंबईमध्ये ज्या जुन्या इमारती आहेत त्या म्हाडाच्या 1976 च्या कायद्यातील चॅप्टर 8 अन्वये ॲक्विझिशन करण्यात आल्या. त्या चाळींचे मालक भाडेकरुंना सुविधा देत नव्हते, मनमानी करीत होते म्हणून भाडेकरुंकडून 100 महिन्यांचे भाडे घेऊन त्या चाळीतील खोल्या सोसायटीच्या नावावर करुन देण्यात आल्या. म्हाडाने हा कायदा करीत असतांना नजर चुकीने त्यामध्ये चूक राहिली आहे. त्यामध्ये सदर इमारत दान, गहाण, देणगी म्हणून देऊ नये म्हणजेच कुठेही मॉरगेज करु नये अशा प्रकारची तरतूद असल्यामुळे या इमारती दुरुस्त करता येत नाहीत. या करिता भाडेकरु संघाचे अध्यक्ष श्री. गोयंका यांनी अर्ज करुन आणि विधानसभेच्या एका सन्माननीय सदस्यांनी या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याची मागणी केली होती. सभापती महोदय, या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत....

कायद्यातील चॅप्टर 8 हे म्हाडाचे प्रमुख हत्यार असून ते वगळण्यात येऊ नये अशी माझी मागणी आहे. त्या करिता या कायद्यातील कलम "सी" मध्ये दुरुस्ती करण्यात यावी या करिता मी या ठिकाणी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. या कायद्यातील "सी" कलमामध्ये दुरुस्ती करण्या करिता मी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो तसेच माननीय राज्य मंत्री श्री. सचिन अहिर यांना देखील भेटलो. या कलमामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे असे मंत्री महोदयांचे देखील म्हणणे आहे. परंतु गृहनिर्माण विभागामध्ये श्री. गायकवाड नावाचे एक अधिकारी असून त्यांनी या विषयाला कलाटणी देऊन हे कलम दुरुस्त करता येत नाही असे सांगितले. जरी सुप्रीम कोर्टामध्ये केस दाखल झाली असली तरी घटनेच्या कलम 19 (ब) प्रमाणे आपण या कायद्यामध्ये दुरुस्ती करु शकतो. या कायद्याच्या बाबतीत एका प्रकरणामध्ये शासन कोर्टामध्ये केस जिंकले आहे. त्यानंतर सुप्रीम कोर्टामध्ये अपिल करण्यात आले असता मालकांच्या असोसिएशनकडून त्या करिता मोठ मोठे वकील उभे करुन हा कायदा संमत होऊ नये यासाठी प्रयत्न केले जात आहेत. वास्तविक या कायद्याला न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आलेली नाही. या केसमध्ये पहिल्यांदा दोन जज्ज, नंतर तीन जज्ज, नंतर पाच जज्ज, नंतर सात जज्ज, नंतर नऊ जज्ज अशा प्रकारे अनेक जज्जच्या बेंचपुढे जाण्यासाठी गेली 20 वर्षे ही केस रेंगाळत ठेवण्यात आली आहे.

सभापती महोदय, या चाळी मिल मजदूर लोकांच्या आहेत, त्यांची संख्या फक्त 27 ते 28 आहे, त्यांचा विकास करण्याबाबतचा हा प्रश्न आहे. घटनेतील तरतुदीनुसार कायद्यात दुरुस्ती करण्याचा आपल्याला अधिकार आहे. जरी कोर्टामध्ये केस सुरु असली तरी कायदा दुरुस्त करता येतो अशाप्रकारे सुप्रीम कोर्टामध्ये जज्जमेंट झाले आहे. परंतु शासनाच्या मनमानी करणाऱ्या अधिकाऱ्याने हा कायदा दुरुस्त करता येत नाही असे सांगितले. हा कायदा दुरुस्त करावा याबाबत गृहनिर्माण विभागाच्या सचिवांच्या मनाची तयारी झाली आहे. त्या करिता एक बैठक देखील घेण्यात आली व त्यामध्ये म्हाडाच्या कायद्यातील कलम 37(9), 37(10) मध्ये आपण दुरुस्ती करावी अशाप्रकारचे सोल्यूशन देण्यात आले. त्याचे मिनिटस रेकॉर्ड करण्यात आले, परंतु तशा प्रकारची दुरुस्ती अजूनपर्यन्त करण्यात आली नाही. सभापती महोदय, घटनेने जर आपल्याला अधिकार दिले आहेत तर मग हे अधिकारी मनमानी पध्दतीने याला विरोध कसा काय करु शकतात? हा कायदा दुरुस्त केल्याशिवाय त्यामधून मार्ग निघून शकत नाही. या कायद्यातील कलमामध्ये दान, गहाण, देणगी हे कलम आहे त्याप्रमाणे कलम 32 (ग) खाली मोठ मोठया जमीनदारांकडून जमिनी घेऊन





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत...

त्या शेतकऱ्यांना देण्यात आल्या त्या साठी देखील हे कलम लागू होते. त्यामध्ये अशी रेमिडी ठेवण्यात आली की, कलेक्टर, एसडीओ यांच्या परवानगीने जमीन विकता येते. अशाप्रकारे या मध्ये हुकूमशाहीसारखे अधिकार आपल्याकडे घेण्यात आले आहेत. म्हणजेच झोपडीमध्ये राहणाऱ्या माणसाने झोपडीतच मरावे काय? आज परिस्थिती आहे. मुंबईमध्ये 1995 पर्यन्तच्या झोपडया अधिकृत करुन त्यांना 229 चौ.फूटाऐवजी 350 चौ. फूटाचे घर देण्यात येते आणि या ठिकाणी मात्र घरे पडावयास आली आहेत, इमारती जमीनदोस्त व्हावयास लागल्या आहेत. त्यामध्ये राहणारे भाडेकरु मिल मजदूर असल्यामुळे ते रिपेअर करु शकत नाहीत यासाठी कायद्यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. या कायद्यामध्ये दुरुस्त करणे अतिशय सोपे असून त्याला शासनाची देखील तयारी आहे. परंतु शासनातील एकच अधिकारी याला विरोध करीत आहे. आज जिकडे जावे तिकडे आदर्शबद्दल बोलले जाते. आदर्शच्या बाबतीत माझे स्वत:चे असे मत आहे की, त्यामध्ये अधिकाऱ्यांची चूक नाही, मंत्र्यांची चूक नाही सर्व काही कायदेशीर केले आहे. तसे या ठिकाणी सर्व कायदेशीर असतांना अधिकारी मात्र हे चुकीचे असल्याचे सांगत आहेत. एका अधिकाऱ्याने जर विरोधात लिहिले तर पुढे कुणीही सह्या करावयास तयार होत नाहीत. या करिता माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, कायदेशीररित्या यामध्ये कोणतीही अडचण नसतांना आपण हा कायदा दुरुस्त केला तर आपले काम होऊ शकते. त्या करिता सुप्रीम कोर्टाने जज्जमेंट दिले असून त्याची प्रत मी आपणास सादर करण्यास तयार आहे.

सभापती महोदय, पूर्वीचे सचिव श्री.क्षत्रिय साहेब यांनी अशाच एका केसमध्ये विधी व न्याय विभागाचे ओपिनियन घेतले आहे. त्याबाबत विधी व न्याय विभागाने आपण कायदा दुरुस्त करु शकता अशा प्रकारचे ओपिनियन दिले आहे. त्याचप्रमाणे एक नामांकित वकील श्री. अशोक देसाई यांचे मत घेतले असता तुम्ही हा कायदा केव्हाही दुरुस्त करु शकता अशा प्रकारचा सल्ला त्यांनी दिला आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:55

श्री.विजय सावंत . . ..

असे असताना जर लिगल विभागाकडून सांगण्यात आले असेल की, कायदा दुरुस्त करु शकतो. त्यामुळे कायदा दुरुस्त करण्यासाठी विधान मंडळाला आणि लोकसभेला अधिकार आहे तो आपण तो अधिकार कसा गमावू शकतो. याबाबतीत जो कायदा करण्यात आलेला आहे, त्यामध्ये चूक झाली असून,यामुळे गरीब लोकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे हे त्यावेळी कायदा करणाऱ्यांच्या लक्षात आले नाही. अशा वेळी गरीब लोकांचे नुकसान भरुन काढण्यासाठी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, सदरहू कायदा दुरुस्त करण्यात यावा. हा कायदा दुरुस्त केला तर त्याला कोणी चॅलेंज करण्याची देखील शक्यता आहे असा मुद्दा निर्माण होण्याची शक्यता आहे. पण संबंधितांना तसे करण्याचा अधिकार आहे, त्याप्रमाणे त्यांना चॅलेंज करु द्यावे. मात्र शासनाने या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने प्रोसेस सुरु करावी आणि गरिबांवर जो अन्याय होत आहे, तो दूर करण्याचा प्रयत्न करावा अशी मी शासनाला विनंती करतो.

-----

. . . .ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी रेकॉर्डवर एका गोष्टीची नोंद होऊ नये म्हणून सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांनी आपल्या भाषणामध्ये असे सांगितले की, "याबाबतीत एक बैठक घेतली तर सदरहू कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यास शासन तयार आहे, परंतु विभागातील एक डेस्क ऑफीसर करीत नाही." याठिकाणी रेकॉर्डवर चुकीची नोंद होत आहे. हे अधिकारी शासन चालवितात काय ? जर सन्माननीय सदस्य या पध्दतीने सांगत असतील की, डेस्क ऑफीसर ही दुरुस्ती अडवित आहे, तर ते चुकीचे होईल. शासनाची जर दुरुस्ती करण्याची तयारी असेल तर शासनाने त्याबाबतीत खुलासा करावा. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शासन तयार आहे. पण शासन म्हणजे कोण ? हे आम्हाला कळले पाहिजे. जर एखादा डेस्क ऑफीसर शासन चालवित असेल तर ते बरोबर नाही. त्यामुळे याची कामकाजामध्ये नोंद होता कामा नये.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांनी भाषण करीत असताना असे मत मांडले, जे या विषयाशी अजिबात संबंधित नाही. त्यांनी भाषण करीत असताना असे सांगितले की, "त्यांच्या मताप्रमाणे आदर्श घोटाळयाच्याबाबतीत तसे काही चुकीचे नाही." परंतु अशा वेळी जर आम्ही याबाबत सभागृहामध्ये काहीच मत मांडले नाही तर आम्हाला देखील सन्माननीय सदस्यांचे मत मान्य आहे की काय? अशी शंका निर्माण होण्याची शक्यता आहे.ज्या आदर्श घोटाळ्याच्या बाबतीत सी.बी.आय.मार्फत चौकशी सुरु आहे, उच्च न्यायलय देखील या प्रकरणाचा पाठपुरावा करीत आहे आणि इतकेच नाहीतर त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला आणि स्वत: विद्यमान माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत जाहीर केले की, आम्ही अधिकाऱ्यांवर कारवाई करु. असे असतानाही श्री.जयराज फाटक महाराष्ट्रामध्ये परत येत आहेत आणि त्यांच्या बाबतीत काय करावयाचे असा महाराष्ट्रातील जनतेसमोर प्रश्न निर्माण झालेला आहे. अशा वेळेला स्वत: कॉंग्रेस हाय कमांड, सी.बी.आय., उच्च न्यायालय याच्यापेक्षाही सन्माननीय सदस्यांचे मत असे आहे, अशा पध्दतीने सन्माननीय सदस्यांनी जे मत मांडलेले आहे, त्यावरुन ते स्वत:ला सुपर, सुपर, सुप्रीम मानत असावेत. परंतु सन्माननीय सदस्यांचे मत आम्हाला अजिबात मान्य नाही हे मला रेकॉर्डवर आणणे गरजेचे वाटते.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय,सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे या त्यांचे जे काही मत असेल ते मांडू शकतात.मला या सदनामध्ये कशावरही बोलण्याचा अधिकार आहे म्हणून मी बोलत आहे.मी माझ मत मांडलेले आहे.कोर्ट काय करणार आहे किंवा सी.बी.आय.काय करणार





श्री.विजय सावंत . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे याच्याशी माझे देणे-घेणे नाही.सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना माझ्या वक्तव्यावर भाष्य करण्याचा अधिकार नाही. त्यांना त्यांचे जे काही मत मांडावयाचे आहे, ते त्यांनी मांडावे. मला माझे मत मांडण्याचा अधिकार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना बोलावेच लागणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे की, आदर्श मधील भ्रष्टाचाराबाबत चौकशी सुरु आहे. त्यामध्ये केंद्र शासनातील माननीय मंत्री महोदय अडकलेले आहेत. याठिकाणी माननीय मुख्यमंत्री मान्य करीत आहेत आणि अशा वेळी त्या पक्षाच्या बाकावर बसून जर सन्माननीय सदस्य हे आदर्शमध्ये घोटाळा झालेला नाही असे जर ते जाहीर करीत असतील तर पहिल्यांदा सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत प्रश्न निर्माण झालेला आहे की, ते या सदनामध्ये कसे बसू शकतात, त्या पक्षाबरोबर कसे राहू शकतात. ही गोष्ट बरोबर नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांनी आदर्शच्या संबंधात जे वक्तव्य केलेले आहे, ते सर्व रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, तुम्हाला एकट्याला बोलण्याचा अधिकार दिलेला नाही .....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये अधिकार कुठे वापरावा आणि कसा वापरावा याबद्दल ......

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी माझ ो म्हणणे एक मिनिट ऐकावे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य माननीय मुख्यमंत्र्यांच्या विरोधात बोलत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांना अधिकार आहे काय ? कारण माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे जाहीर केलेले आहे की, आदर्श सोसायटीमध्ये घोटाळा झालेला आहे. मग याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी उभे राहून आपले मत मांडावे.

श्री.विजय सावंत (खाली बसून) : सन्माननीय सदस्यांनी मला सांगू नये.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडावे.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, मला माझे मत मांडण्याचा अधिकार आहे.



**तालिका सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी अर्धा तास चर्चेच्या अनुषंगाने आपले विचार मांडावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांनी अत्यंत महत्वाच्या प्रश्नाबाबत चर्चा उपस्थित केलेली आहे, मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये गेल्या वर्षापासून हा प्रश्न रेंगाळत राहिलेला आहे. 100 पट भाडे द्यावयाचे आणि ओनरशीप जागा घ्यावयाची अशा प्रकारचे स्वप्न या शहरातील गरीब भाडेकरुंच्या समोर ठेवले. त्यानुसार सर्व भाडेकरु एकत्र आले आणि मग त्यानुसार प्रोसेस झाली, हे सर्व झाले. त्या अनुषंगाने ॲक्वीझिशनच्या दृष्टीने त्याचे प्रोसेसही पूर्ण झाले. परंतु सुप्रीम कोर्टामध्ये ही केस रेंगाळल्यामुळे आज त्यांच्या जागेचे फिजीकल हॅण्डींगओव्हर करण्याचा जो भाग आहे, तसे करणे शक्य होत नाही. एका बाजूला अशी परिस्थिती आहे की, त्या जागेचे फिजीकल हॅण्डींगओव्हर होत नाही, त्यामुळे पुनर्बांधणीच्या संबंधातील प्रक्रिया पुढे जाऊ शकत नाही आणि दुसऱ्या बाजूला . . ..

श्री.विजय सावंत (खाली बसून) : कोर्टाचा स्टे आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, कोर्टाचा स्टे फक्त एकाच गोष्टीसाठी आहे आणि माझ्या माहितीनुसार तुम्ही फिजीकल हॅण्डींगओव्हर करु शकत नाही तर त्यासंबंधातील प्रोसेस पूर्ण करु शकता.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ प्रथम सौ. रणदिवे.... 12:00

श्री. प्रकाश बिनसाळे....

त्यामुळे पुढची सगळी कामे रेंगाळत आहेत. या 100 वर्षा पूर्वीच्या अत्यंत जुन्या चाळी आहेत. गिरगाव किंवा परेल वगैरे या भागात असलेल्या या गिरणी कामगारांच्या चाळी आहेत. या चाळींची दुरुस्ती होऊ शकत नाही, अशी परिस्थिती आहे. माझा प्रश्न असा आहे की, ॲक्विझिशन प्रोसिडिंग कॅम्प्लीट झाले असेल पण या चाळी हॅण्ड ओव्हर झाल्या नसतील तर त्या चाळींची परिस्थिती जैसे थे आहे. या सेस प्रॉपर्टी असतील तर त्या डी-सेस करता कामा नये. या चाळी डी-सेस झाल्या नाहीत तर म्हाडा पुढाकार घेऊन या चाळींची दुरुस्ती निश्चितपणे करु शकते.

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शंभरपट भाडे दिल्या नंतर या चाळी ओनरशीप होणार आहेत. शासनाच्या अडीच एफ.एस.आय.च्या योजनेचा मी या ठिकाणी उल्लेख करणार नाही. पण एकदा या चाळी ओनरशीपच्या झाल्या की, त्या डीसेस होतात आणि त्या डी-सेस झाल्या की, त्यांना कायदा लागू होत नाही. म्हणून या पध्दतीने कायद्यामध्ये दुरुस्ती करुन जे बेनिफिट्स सेस प्रॉपर्टीसाठी आहेत तेच बेनिफिट या कायद्यातंर्गत ॲक्वायर झालेल्या पॉपर्टीज ज्या नंतर सोसायटीकडे हॅण्डओव्हर करण्यात येणार आहेत त्यांना उपलब्ध करुन देण्यात येतील काय, ते करण्यासाठी काय पाऊले उचलण्यात येतील?

सभापती महोदय, माझा तिसरा आणि महत्वाचा प्रश्न आहे. हे प्रकरण सुप्रीम कोर्टामध्ये अनेक वर्षा पासून रेंगाळत असलेले प्रकरण आहे. हे प्रकरण लवकर मार्गी लावण्यासाठी कायद्याचा आधार घेऊन, पिटिशनच्या माध्यमातून जे काही करता येणे शक्य आहे, ते टाईम-बाऊन्ड पध्दतीने करण्यात येणार आहे काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भातील आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.मुळात असा प्रश्न आहे की, हे दुरुस्ती महामंडळ निर्माण करण्याची गरज का भासली? दुरुस्ती महामंडळ तयार करण्याचा प्रयत्न ज्या वेळी करण्यात आला त्यावेळी त्याचे दोन-तीन भाग करत असताना त्यामध्ये काही बदल सुचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. रेंट ॲक्टच्या बाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांना माहीत आहे की, रेंट ॲक्टमध्ये जशी भाडेकरुंना आधार देण्याची भूमिका शासनाने घेतली आहे त्याच प्रमाणे मूळ मालकाला देखील या कायद्याच्या माध्यमातून समान अधिकार देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. एकंदर 19 हजार इमारती उप कर प्राप्त करत असताना मूलभूत तीन टप्प्यामध्ये केवळ दुरुस्ती करणे एवढयाच मर्यादित उद्देश ठेवून चालणार नाही तर पुनर्बांधणीच्या दृष्टिकोनातून काही करता येईल काय, अशा प्रकारची भूमिका घेण्याचा प्रयत्न शासनाने केला. पहिल्या टप्प्यामध्ये घर मालक आणि भाडेकरु एकत्र येत असतील, 70 टक्केपेक्षा जास्त भाडेकरुंची परवानगी घेतली तर स्वत: घर मालक पुनर्विकास करु शकतात. 70 टक्के पेक्षा जास्त भाडेकरु जर खाजगी विकासकाला घेऊन आले आणि त्यांना मालकाचे ना हरकत प्रमाणप्रत्र मिळाले तर ते पुनर्बांधणी करण्या करिता पुढे येऊ शकतात आणि त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याची भूमिका शासनाने घेतली.

सभापती महोदय, तिसरी महत्वाची आणि या विषयाशी संबंधित बाब म्हणजे चॅप्टर 8 (अ) मध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. ज्यावेळी मालक पुढे येत नसेल आणि भाडेकरु देखील पुढे येत नसतील आणि अशा परिस्थितीत मालक निव्वळ इमारती जुन्या होण्याची वाट पहात असतील, त्यामुळे त्या संदर्भात काहीच कारवाई करीत नसतील, अशा वेळी भाडेकरुंच्या हितासाठी काही करता येईल काय या दृष्टिकोनातून चॅप्टर 8 (अ) मध्ये मोठया प्रमाणात बदल किंवा कायद्यामध्ये तरतूद करण्याची भूमिका राज्य शासनाने घेतली. 100 पट भाडे भरुन संपूर्ण प्रॉपर्टी भाडेकरुंनी तयार केलेल्या गृहनिर्माण सोसायटीला हस्तांतर करण्याची भूमिका शासनाने घेतली. मालकांच्या तावडीतून सुटून स्वत:चा विकास करण्याचा अधिकार भाडेकरुंना असावा किंबहुना त्या पूर्ण मालमत्तेची देखरेख करण्याचा अधिकार भाडेकरुला असावा, ही त्याच्या पाठीमागची मूलभूत

..3..



SMT/ D/ 12:00

श्री. सचिन अहिर......

संकल्पना होती. कालांतराने ही संकल्पना काही लोकांनी अंमलात आणली आणि 20 ते 25 सोसायटया तयार झाल्या. मुंबई शहरात या 20 ते 25 सोसायटया हस्तांतरित करुन त्या भाडेकरुंच्या ताब्यात देण्याची भूमिका राज्य शासनाने घेतलेली आहे. त्यानंतर चॅप्टर 8 (अ) हा चुकीचा कायदा आहे, असा युक्तीवाद करण्याची भूमिका मालकवर्गाने घेतली. आमचा अधिकार भाडेकरुंना देण्यात येत आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .....

आणि सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सुप्रीम कोर्टाने त्याला स्थगिती देण्याचे काम केले आहे. आजही ती स्थगिती कायम आहे. एक-दोन गोष्टींवर ती स्थगिती दिलेली आहे. कॉन्स्टिट्यूशनल बेंचकडे हा विषय गेला. त्या बेंचमध्ये सुधारणा क्रमांक 17 आणि 19 च्या अंतर्गत आमचा जो मूलभूत अधिकार आहे तो हिसकावून घेण्याचा प्रयत्न चालू आहे, असा युक्तिवाद करण्याचा प्रयत्न झाला आणि तूर्त कोर्टाने सांगितले की, तुम्ही संपूर्ण प्रोसेस करा परंतु हस्तांतरित करण्याची कार्यवाही करण्याची भूमिका घेता कामा नये. या दृष्टीकोनातून हा कायदा अधांतरी राहण्याचे काम झाले आहे. त्यानंतर त्या कायद्याचा विपरित परिणाम होत आहे किंबहुना यामध्ये आम्ही तरतूद करीत असताना चॅप्टर 8(ए) नंतर 8(सी) येतो त्यामध्ये आपण असा युक्तिवाद केला आहे की, भाडेकरुंना जर कोणत्याही प्रकारे पुनर्विकास करावयाचा असेल तर तो पुनर्विकास करताना जे अतिरिक्त क्षेत्रफळ आहे ते बाजार भावामध्ये विकू शकत नाहीत. त्यांनी स्वत:हून विकास करावयास पाहिजे आणि ते क्षेत्रफळ त्यांच्याकडेच ठेऊ शकतात. लोन घेऊन ते दुसऱ्याकडे सुध्दा ठेऊ शकत नाहीत. ही अडचण आल्यामुळे आज सर्वसामान्य भाडेकरुंना मोठ्या प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागत आहे. बाजूच्या इमारतीमध्ये खाजगी विकासक पाहिजे तसे देतो. किंबहुना त्यांनी स्वत: विकास केल्यानंतर जे अतिरिक्त क्षेत्रफळ आहे ते त्यांना बाजार भावाने विकता येते. पण या तरतुदींमध्ये तसे करता येत नाही, ही यामध्ये मूलभूत संकल्पना आहे.

यामध्ये संकल्पना अशी होती की, हे भाडेकरुंकडे द्यावयाचे आणि भाडेकरुंनी स्वत: विकास करावा. पण या तरतुदीमुळे निश्चितपणे आज आपल्याला असे पहावयास मिळते की, भाडेकरु जरी पुढे आले असले तरी त्यांना विकासाचा फायदा मिळत नाही. सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत किंवा श्री. प्रकाश बिनसाळे यांनी सांगितल्याप्रमाणे आजही आपल्याकडे तरतूद आहे की, समजा त्यांना कर्ज मिळवावयाचे असेल तर ते ती प्रॉपर्टी लोन बेसिसवर ठेऊ शकतात आणि त्यावर कर्ज मिळवू शकतात. त्यांना जर असे वाटले की, आपल्याला काहीच करता येत नाही किंवा अमुक करता येत नाही तर कायद्यामध्ये आपण अशीही तरतूद केली आहे की, सोसायटीने भरलेले 100 महिन्यांचे जे भाडे असेल ते त्यांना परत देऊन ती संपूर्ण प्रॉपर्टी म्हाडा घेऊ शकते आणि म्हाडा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ....

पुनर्बांधणीचा विचार करु शकते. सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न दुरुस्ती होऊ शकते की नाही या बाबत विचारला. विशेष बाब म्हणून आपण त्यांना दुरुस्ती करुन देऊ शकतो. दुरुस्ती केल्या नंतर त्याची जी रक्कम आहे ती त्यांच्याकडून वसूल करण्याची भूमिका सुध्दा आपण घेऊ शकतो. आज इमारत मोडकळीस आल्यानंतर ती इमारत पडली तर काय होईल ? त्यांना ट्रान्झिट कॅम्प उपलब्ध होणार आहे. सदस्यांची अशी अपेक्षा दिसते की, यामध्ये तात्पुरते सोल्यूशन न काढता कायमस्वरुपी सोल्यूशन काढले पाहिजे किंवा पर्याय उपलब्ध केला पाहिजे. या दृष्टीकोनातून शासनाच्या स्तरावर निश्चितपणे विचार करता येईल.

सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांनी उल्लेख केल्याप्रमाणे एक गोष्ट निश्चित आहे की, शासनाने काहीच केले नाही असे नाही. 5 बेंचेसकडून आणि सुप्रीम कोर्टाच्या कॉन्स्टिट्यूशनल बेंचकडून स्थगिती मिळाल्यानंतर त्याच्या अधीन राहून आपल्याला कायद्यामध्ये सुधारणा करता येईल का या दृष्टीने ॲडव्होकट जनरलकडे युक्तिवाद करण्याचे काम केले. एक रिपोर्ट असा आला की, आपल्याला ते करता येईल पण ते करीत असताना सुप्रीम कोर्टाची परवानगी घेणे योग्य राहील. असा युक्तिवाद आल्यानंतर परत सुप्रीम कोर्टाकडे जावयाचे का आणि सुप्रीम कोर्टाकडे जाऊन आपल्याला परवानगीच घ्यावयाची असेल तर या एस.एल.पी.च्या बाबतीत कोर्टाचा संपूर्ण निकाल लावता येईल का, याचाही विचार करण्याचा मानस आपण केलेला आहे. परत एकदा आपण नव्याने या संदर्भातील काही सूचना, काही प्रश्नोत्तरे करुन काही क्वेरीज ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे दिलेल्या आहेत. गेल्या 7-8 महिन्यांपासून त्यांच्याकडे ते प्रलंबित आहे. त्यांचा युक्तिवाद किंवा अभिप्राय लवकरात लवकर मागवून घेण्याचा प्रयत्न आपल्याला करता येईल. मला या सभागृहाच्या माध्यमातून निश्चितपणे सांगावयाचे आहे की, कायदा करीत असताना त्या वेळी फार दूरदृष्टी ठेऊन विचार करुन हा कायदा केलेला आहे. त्यामुळे पूर्ण कायदा रद्द करा किंवा पूर्ण कायद्यामध्ये बदल करा अशी सन्माननीय सदस्यांची भूमिका नाही. अशी भूमिका आपल्याला घेता येणार नाही. कारण त्यामुळे आपण कोठे तरी भाडेकरुंवर अन्याय करतो की काय आणि भाडेकरुंसाठी केलेला कायदा दुसरीकडे घेऊन जातो की काय हा प्रश्न देखील या निमित्ताने



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ...

निर्माण होईल. त्यामुळे ॲडव्होकेट जनरलकडे हा प्रस्ताव पाठविण्याचे काम आपण केले होते. त्या पध्दतीने त्यांच्याकडे पाठविण्याची भूमिका घेतली जाईल आणि ते आपण तपासून बघू. एक गोष्ट निश्चित आहे की, कायदा करीत असताना आपण यामध्ये वन वे केला. एकदा ट्राफीकमध्ये गेल्यानंतर नो एंट्रीसारखी परिस्थिती निर्माण झाली. अशी अडचण या कायद्यामध्ये झालेली आहे हे आम्ही नाकारत नाही. त्यामध्ये निश्चितपणे या बाबतीत काही सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून आपल्याला काही मार्ग काढता येईल का, ही बाब आपल्याला तपासून पाहता येईल. सुप्रीम कोर्टामध्ये एवढा वेळ गेल्यानंतर या भाडेकरुंना कोणी वाली आहे की नाही, ही जी मानसिकता सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी व्यक्त केलेली आहे त्या मताशी आम्ही निश्चितपणे सहमत आहोत.

सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांनी एका अधिकाऱ्याचे नाव सांगितले. अशा अधिकाऱ्याने काही जरी भूमिका घेतली असली तरी शासन म्हणून आमचे मत किंवा आमची भूमिका ठाम आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

शासनाची भूमिका ठामपणे घेत असताना कृतीतून काही तरी निष्पन्न झाले पाहिजे. या भावनेतून याकडे पाहण्याचा प्रयत्न केला जातो. तसा प्रयत्न या बाबतीत सुध्दा करण्याचा प्रयत्न केला जाईल. आता पर्यंत वन-वे ट्राफिक झाल्यामुळे एन्ट्री झालेली आहे. त्याला पुन्हा टू-वे कसे करता येईल या दृष्टीकोनातून विचार करता येईल. उदाहरण द्यावयाचे झाल्यास एकदा ॲक्विझिशन झाल्यानंतर पुन्हा डिॲक्विझिशनची प्रोसेस केली जात नाही. पण डिॲक्विझिशन झाल्यानंतर जे मालक जागरुक नाहीत ते जागरुक होतील, ज्यांची प्रॉपर्टी घेतली आहे ते जागे होतील की काय, असा प्रश्न सुध्दा निर्माण होऊ शकतो. त्या मालकाने मला ह्या भाडेकरुंबरोबर जायचे नाही, ते सांगत असलेल्या विकासकाकडे जायचे नाही, मला दुसऱ्या विकासकाकडे जायचे आहे किंवा मलाच विकास करावयाचा आहे अशी मालकांनी जर भूमिका घेतली तर पुन्हा भाडेकरु व मालक यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. या सर्व बाबी फार विचारपूर्वक तपासून पाहण्याची गरज आहे. या कायद्याच्या अधीन राहून शासनाने धोरणात्मक बदल करावा अशी सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केलेली आहे. त्या बाबत सकारात्मक भूमिका घेतली जाईल. आज भाडेकरुंना असे वाटते की, आमच्या मागे कोणी नाही. परंतु त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याचा शासनाचा प्रामाणिक प्रयत्न आहे. एवढेच मी या प्रसंगी मी सांगतो.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी व सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी जे सांगितले आहे त्या बाबत चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी सांगतो. सुप्रीम कोर्टाने या बाबतीत स्टे दिलेला नाही. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाची प्रत माझ्या हातामध्ये आहे. शासनाने कोणतीही कार्यवाही करावी, परंतु ती सुप्रीम कोर्टाच्या निकालाच्या अधीन राहून करावी असे त्यात नमूद केलेले आहे. मंत्री महोदयांनी मूलभूत अधिकाराचा उल्लेख केला आहे. कलम 32-ग च्या केसेस झाल्या होत्या त्यावेळी काही लोक मूलभूत अधिकाराचा भंग होत असल्याचे सांगून कोर्टात गेले होते. शासनाने कायदा केल्यानंतर किंवा एखादा सामुदायिक निर्णय घेतला जातो त्यावेळी वैयक्तिकरित्या कोणावरही अन्याय करण्याची शासनाची भूमिका नसते. त्यामुळे

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत.....

मूलभूत अधिकाराचा प्रश्न उद्‌भवत नाही. पण शासनाला यासाठी कायद्यामध्ये दुरुस्ती करावी लागणार आहे. मंत्री महोदय, या कायद्यात दुरुस्ती करण्याची प्रक्रिया किती दिवसात सुरु करणार आहेत ?

श्री.प्रकाश बिनसाळे : सुप्रीम कोर्टात असलेल्या केसचा निकाल लवकर लागावा यासाठी एखादी उप समिती नेमून तिच्या मार्फत पाठपुरावा करण्याची योजना आखण्यात येईल काय, अधिकारी स्तरावर एखादा गट नेमून त्यांच्यामार्फत पाठपुरावा करणे, पुढे कोणती पावले उचलावीत याचा विचार करणे अशा प्रकारची कार्यवाही झाली पाहिजे. या प्रकरणी नियमितपणे कार्यवाही होत नाही. गेली 20 वर्षे ही केस प्रलंबित आहे. या केसबाबत नियमितपणे काम केले जात नाही म्हणून याकडे लक्ष देण्यासाठी वेगळा कृती गट तयार केला पाहिजे. तो गट त्याला जबाबदार राहील. असा कृती गट शासन नेमणार आहे का ?

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी मघापासून ही चर्चा लक्ष देऊन ऐकत होते. मी गृहनिर्माण मंडळाच्या प्रश्नासंबंधी पुन्हा सांगते की, सन्माननीय सदस्य प्रश्न मांडत असतात आणि मंत्री महोदय त्याला उत्तर देत असतात. पण ज्यावेळी खरोखरच कार्यवाही करण्याची वेळ येते त्यावेळी सरकारकडून लोकांना ठोस उत्तरे मिळत नाहीत. सचिव स्तरावर कितीही चांगले काम करण्याचा प्रयत्न केला तरी सचिवांच्या नंतरची जी फळी आहे ती फळी शासन कार्यान्वित करणार आहे की नाही, हा खरा प्रश्न आहे. ही केस बरीच वर्षे सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे असे गृहनिर्माण मंडळात काम केलेल्या माझ्या सारख्या व्यक्तीला ऐकावे लागते. या केसचा किती दिवसात निकाल लागणार आहे ते मंत्री महोदय सांगू शकतील काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माझ्याकडे सुप्रीम कोर्टाचे आदेश आहेत. या आदेशामध्ये असे नमूद केलेले आहे की, "It is directed that no Final Order in the acquisition proceeding be made in the hearing." या पुढे कोणतीही कार्यवाही करु नये, असा त्याचा अर्थ आहे. पण या कायद्यात सरकारने कोणतीही सुधारणा करु नये असा त्याचा अर्थ होत नाही. सुप्रीम कोर्टात 5 डिव्हीजन बेंचसमोर हे प्रकरण प्रलंबित असताना शासनाने कायद्यात दुरुस्ती करण्याची प्रक्रिया सुरु केली तर कायद्याच्या ट्रॅंगलमध्ये अडकण्याची शक्यता आहे. हा युक्तिवाद महत्वाचा आहे. म्हणून ह्या सर्व बाबी तपासण्याची गरज आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : हे मत ॲडव्होकेट जनरल श्री.कदम यांनी दिले आहे की, सरकारच्या विधी व न्याय खात्याने मत दिले आहे. सुप्रीम कोर्टात हे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे शासनाने कायद्यात दुरुस्ती करु नये किंवा सुप्रीम कोर्टाला विचारुन करावी असा सल्ला कोणी दिला आहे ?

श्री.सचिन अहिर : अशा प्रकारचा सल्ला ॲडव्होकेट जनरल यांनी दिलेला आहे. त्यांच्याकडे पुन्हा फेर तपासणी करण्यासाठी प्रश्नावली पाठविली आहे. ती त्यांच्याकडे गेल्या 6 महिन्यांपासून प्रलंबित आहे. ही केस लवकरात लवकर निकाली निघाली पाहिजे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. म्हणून ही केस डिस्पोज ऑफ करता येईल का हाही विचार शासनाला करावयाचा आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

श्री. सचिन अहिर...

यामध्ये काही सुधारणा करण्याच्या दृष्टीने ॲडव्होकेट जनरलचे मत घेणे या सारख्या गोष्टी करण्यासाठी हे अधिवेशन संपल्यानंतर महिन्याभराच्या आत या बाबतीतील कार्यवाहीला सुरुवात करु आणि लवकरात लवकर निर्णय घेण्याचा प्रयत्न करु.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महावितरण कंपनीकडून अनियमितपणे वीज बिलांची करण्यात येणारी आकारणी

**मु. शी.** : महावितरण कंपनीकडून अनियमितपणे वीज बिलांची करण्यात येणारी आकारणी यासंबंधी श्री.जयंत प्र.पाटील,वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीकडून दर 30 दिवसांनी मीटर वाचन करुन वीज बिल आकारणी करणे आवश्यक असताना कंपनीकडून 45 व 50 दिवसानंतर मीटरचे वाचन केले जाणे, त्यामुळे 100 युनिटपेक्षा कमी वीज वारपलेल्या ग्राहकांना 125 ते 150 युनिट वीज वापर झाल्याचे दाखवून त्यांना जादा वीज आकारणी करणे, परिणामी 100 युनिटपर्यंत वीज ग्राहकाला असलेल्या सवलतीचा फायदा न होणे व ग्राहकांची फसवणूक होणे, राज्यात 1 कोटी 23 लाख घरगुती वीज ग्राहक असून सुमारे 86 लाख वीज ग्राहक हे 100 युनिटपेक्षा कमी विजेचा वापर करीत असणे, परंतु मीटर वाचन वेळीच न झाल्याने या वीज ग्राहकांना नाहक जादा वीज बिल आकारणी होऊन पैसे भरावे लागणे, सबब शासनाने यासंबंधी केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, मी थोडक्यात काही मुद्दे मांडणार आहे. वीज बिलाची आकारणी करीत असताना 100 पेक्षा कमी युनिट वीज वापरली असेल तर त्यासाठी वेगळे दर आहेत. 100 पेक्षा जास्त युनिट वीज वापरली असेल तर त्यासाठी वेगळे दर आहेत. परंतु ज्या ग्राहकांनी 100 पेक्षा कमी युनिट वीज वापरलेली आहे अशा ग्राहकांकडून 100 पेक्षा जास्त म्हणजे 150, 170 युनिटचे बिलिंग अंदाजे केले जाते. तेव्हा अंदाजाने बिले देण्याची पध्दत रद्द करण्यात येईल काय, तसेच प्रत्यक्ष वापरलेल्या विजेच्या युनिटची मोजणी करुन त्याप्रमाणे बिल देण्यात येईल काय ? या प्रश्नाबाबत ग्राहक संघटनेचे अध्यक्ष श्री. प्रताप उगारे यांनी राज्य शासनाला एक निवेदन दिलेले आहे. त्यांनी महावितरण कडून वीज ग्राहकांची 500 कोटीची लूट होत असल्याचे सांगितले आहे.

..3..



MSS/ D/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

महावितरण कंपनीचे अधिकारी तालुक्याला होणा-या रिडिंगचे ॲव्हरेज बिलिंग करण्याचे काम कोणाकडे तरी देतात. तेव्हा वीज बिले देण्याच्या पध्दतीमध्ये पारदर्शकता आणून प्रत्यक्ष वापरलेल्या विजेचे बिल ग्राहकांना देण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

----

....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक (ऊर्जा राज्यमंत्री) : सन्माननीय सदस्यांनी ज्या विषयी या ठिकाणी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली त्यासंबंधातील आधीची माहिती मी थोडक्यात सांगतो. वीज बिलाची आकारणी युनिट प्रमाणे केली जाते ती याप्रमाणे -

0 ते 100 युनिटसाठी 2.47 रु., 101 ते 300 युनिटसाठी 4.37 रु. आणि 301 ते 500 युनिटसाठी 6.25 रु. याप्रमाणे युनिटनुसार वीज बिलांची आकारणी केली जाते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 30 दिवसाचे रिडिंग केले तर रिडिंग 100 युनिट पेक्षा कमी होईल. परंतु हे रिडिंग 30 दिवसानंतर केल्यामुळे युनिट जास्त दाखविले जातात. आता महावितरण कंपनीने नवीन पध्दतीचे सॉफ्टवेअर घेतलेले आहे. मागील डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी अतिशय चांगली सूचना केली होती. अस्तित्वात असलेल्या सॉफ्टवेअरमध्ये कस्टमायझेशन केले तर 30 दिवसाच्या आत जी काही वीज वापरली जाईल तितकीच नोंद होईल. तेव्हा त्या सूचने प्रमाणे 35 दिवसानंतर रिडिंग केले गेले तर 30 दिवस वापरलेल्या विजेची वेगळी आकारणी आणि नंतरच्या 5 दिवस वापरलेल्या विजेची वेगळी आकारणी करण्यात येईल. या पध्दतीने 1 एप्रिल पासून ग्राहकांना वीज बिले देण्याचे काम सुरु केलेले आहे.

----

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : मुंबईत सर्वसामान्यांना परवडणारी घरे बांधण्यासाठी करावयाची

उपाययोजना

**मु. शी.** : मुंबईत सर्वसामान्यांना परवडणारी घरे बांधण्यासाठी करावयाची उपाययोजना यासंबंधी श्री. विजय सावंत,वि. प. स. यां□ उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ □ि□म 92 अ□ये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रतो :-

"मुंबईत सर्वसामान्यांना परवडण्याजोगी घरे बांधण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याच्या विचारासंदर्भात गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी नुकतीच केलेली घोषणा, जागांच्या वाढलेल्या अवाढव्य किंमती, जर बांधकाम व्यावसायिकांना शासनाने जमीन देऊ केली तरच मध्यमवर्गीयांसाठी घरांचे प्रकल्प त्यांना राबविता येणे शक्य होणे, सर्व सामान्यांना परवडणा-या भावात घरे बांधून देण्याच्या गृहनिर्माण राज्यमंत्र्यांच्या घोषणे बाबत सर्वसामान्य जनतेच्या मनातील साशंकतेची भावना, त्यासंदर्भात शासनाने करावयाची उचित कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये सर्वसामान्यांना, मध्यम वर्गीयांना परवडणारी घरे मिळण्याच्या दृष्टीने ही अर्धा-तास चर्चा मी उपस्थित केलेली आहे. एमएमआरडीएच्या हद्दीमध्ये रेण्टल हौसिंग स्कीम करण्याची योजना आहे. त्याप्रमाणे मुंबई शहरामध्ये म्हाडाच्या माध्यमातून रेण्टल हौसिंग स्कीम केली किंवा विकासकाला 4 एफएसआय दिल्यामुळे त्याच्याकडून मिळणारी फुकट घरे भाड्याने दिली तर मुंबईतील सर्वसामान्यांच्या घरांचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. गरिबांना स्वस्तात घरे बांधून देणे हा म्हाडाचा उद्देश होता.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत...

मुंबई शहरात गरीब आणि मध्यमवर्गीय लोक रहावीत असा खरा उद्देश होता. परंतु म्हाडाने खरा उद्देश बाजूला ठेवल्यामुळे मुंबईतील माहीम पर्यंतची सर्व मराठी रहिवासी मुंबई शहराच्या बाहेर रहावयास गेलेली आहेत. मुंबईतील घरांचे दर प्रचंड प्रमाणात वाढले आहेत, त्यामुळे सर्वसामान्य माणूस मुंबईत राहू शकत नाहीत. सर्वसामान्य माणून मुंबई शहरात रहावे असे वाटत असेल तर रेंटल हाऊसिंग स्कीम आणून म्हाडाने स्वस्तात घरे बांधून दिली पाहिजेत. राजस्थान आणि गुजरात शासनाने अशा पध्दतीच्या योजना अतिशय प्रभावीपणे राबविल्या आहेत. महाराष्ट्र राज्य हे सर्व बाबतीत अग्रेसर आहे. परंतु सर्वसामान्य लोकांना स्वस्तात घरे उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत आपण मागे गेलेलो आहे. मी गुजरात आणि राजस्थान सरकारच्या स्वस्त घरांच्या योजना मागविल्या आहेत. त्या ठिकाणी मोठया प्रमाणात घरांच्या योजना राबवून तथील घरांची कमतरता या योजनेच्या माध्यमातून दूर केल्या जात आहेत. तशा योजना म्हाडाने मुंबई शहरासाठी तयार केल्या पाहिजेत. मुंबई उपनगरातील काही इमारती आहेत, त्याबाबतीत शासनाने नागपूर अधिवेशनामध्ये 0.3.3 एफ.एस.आय.मंजूर केला होता. सदरचा एफ.एस.आय.उपलब्ध करुन दिला तर जुन्या ज्या इमारती आहेत, त्यांची पुनर्बांधणी करण्यासाठी बिल्डरला व रहिवाश्यांना त्याची मदत होते. आज मुंबई शहरात टीडीआरचा भाव 3 हजार रुपये एवढा झालेला आहे. टीडीआर माफियांनी तो टीडीआर दाबून ठेवलेला आहे. टीडीआर माफियांनी टीडीआर दाबून ठेवण्यामागचा उद्देश वेगळा आहे. मागे शासनाने जी.आर.काढून 0.3.3 एवढा एफएसआय दिला होता. त्या बाबतीत शासनास पैसे मिळाले असते. त्या लोकांनी या बाबतीत चॅलेंज केले तरी देखील शासनाने त्या संदर्भात प्रोसेस पूर्ण केली नाही. त्यामुळे शासन कायकोर्टात हरले. शासनाने या बाबतीत पुन्हा प्रोसेस पूर्ण केली व त्या संबंधीचा जी.आर.चे कायद्यात रुपांतर केले. अशा प्रकारचा जी.आर.निघू नये म्हणून संबंधितांचे प्रयत्न सुरु आहेत. महानगरपालिका आयुक्तांनी लिहिले आहे की, या अनुषंगाने शासनास पैसे मिळणार आहेत. टीडीआर घेऊन गरिबांना त्यांची घरे रिडेव्हलप करता येतील. यामुळे उपनगरातील लहान लहान इमारती आहेत, त्या डेव्हलप होतील. म्हाडाने या बाबतीत पुढाकार घेऊन ती देखील कामे हाती घेतली पाहिजेत.

महाराष्ट्र शासन एमएमआरडीएला शासन घरे बांधण्यासाठी परवानगी देते, त्याप्रमाणे म्हाडाला देखील शासनाने या अनुषंगाने घरे बांधण्यासाठी परवानगी दिली पाहिजे. म्हाडाला

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत...

शासनाने परवानगी दिली तर शासनास स्वस्त घरे मिळतील हा खरा उद्देश आहे. राजस्थानमध्ये पंतप्रधान योजनेमध्ये घरकूल योजना आहे, त्या योजनेचा फंड व राजस्थान सरकारचा फंड एकत्र करण्यासाठी केंद्र सरकारची त्यांनी परवानगी घेतली. मुंबई शहरात चतुर्थ श्रेणी कर्मचारी, साफसफाई कामगार मोठया प्रमाणात राहतात. त्या योजना मुंबई बाहेर राबविल्या तर ते लोक मुंबई बाहेर राहू शकत नाही. पंतप्रधान घरकूल योजना मुंबई शहरात राबविली गेली नाही, तर त्या योजनेचे पैसे केंद्राकडे परत जातात. राजस्थान सरकारला केंद्र शासनाने या तिन्ही योजना एकत्र करुन घरे बांधण्यास परवानगी दिली, तशी स्कीम मुंबई शहरात राबविली गेली तर मुंबईत राहणारे चतुर्थ श्रेणी कर्मचारी, साफसफाई करणारे कर्मचारी यांना मुंबईत घरे मिळू शकतील. म्हणून माझी विनंती आहे की, गुजरात आणि राजस्थान सरकारने घरांसाठी ज्या योजना राबविल्या आहेत, त्या या ठिकाणी राबवाव्यात. शासनाने रेंटल हाऊसिंग स्कीम ॲप्रूव्ह केली, परंतु ती शहरामध्ये राबविण्यासाठी मान्यता दिलेली नाही. मुंबईत गरीब लोक राहतात, खाजगी जागेत राहणारे नागरिक आपली स्वत:ची जागा या कामी उपलब्ध करुन देतील, त्यांची जागा या योजनेतून डेव्हलप केली तर चतुर्थ श्रेणी कर्मचारी, साफसफाई कामगार, सर्वसामान्य नागरिक मुंबई शहरात आपल्या स्वत:च्या जागेत राहू शकतील. गरीब,सर्वसामान्य माणसांना मुंबईत घरे असावीत या दृष्टीकोनातून ही अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी योग्य निर्णय घ्यावा अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

---

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यानी अतिशय चांगल्या विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. आयलँड सिटी ऑफ मुंबई, ज्याचे माहीम पर्यन्तचे क्षेत्र धरतो, या प्रभागामध्ये घराच्या किंमती प्रचंड वाढलेल्या आहेत. मुंबई शहरात घरांसाठी नवीन स्कीम तयार होत आहेत, त्या ठिकाणी लहान स्वरुपाची म्हणजे वन रुन किचन, वन बेडरुम किचन अशी घरे विकासक सध्या बांधत नाहीत. सुपर लक्झरी घरे बांधत असताना डीसी रेग्युलेशनमध्ये ज्या काही प्रोव्हीजन्स आहेत, त्यात सर्व्हंट क्वॉर्टर म्हणून बांधण्याची प्रोव्हीजन आहे. विकासकाकडून सर्व्हंट क्वॉटर दाखविले जातात. ज्यावेळी त्या सदनिकामध्ये लोक रहावयास जातात, त्यावेळी त्या सर्व्हंट क्वॉर्टरचा चौथा बेडरुम म्हणून वापर करतात. प्रत्यक्षात त्या ठिकाणी सर्व्हंट ठेवले जात नाहीत. ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या सदनिका बांधल्या जातात, त्याच्या शेजारी अशा प्रकारचे सर्व्हंट रहात नाही, त्यामुळे

झोपडपट्टयांमध्ये वाढ होत आहे. झोपडपट्टयांचे निर्मूलन केले आणि त्या जागेवर मोठया उंच इमारती बांधल्या त्यासाठी लागणारा कर्मचारीवर्ग आहे, ते कर्मचारी नालासोपारा, विरार, भांडूप अशा ठिकाणी रहाणारे असतील,

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे......

तर ज्या वेळेला नोकरीच्या निमित्ताने ते शहरामध्ये येतील त्याचा ताण सार्वजनिक वाहतूक सेवेवर पडणार आहे. यातून मार्ग काढणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आज विकासकांना अतिरिक्त एफएसआय दिला जातो. हा अतिरिक्त एफएसआय देत असताना काही बंधने घातली पाहिजेत. अमुक क्षेत्रफळापेक्षा मोठ्या स्वरुपाची घरे बांधता येणार नाहीत असे बंधन घातले पाहिजे. छोटी घरे बांधली गेली तर त्या घरांच्या किंमती आवाक्यात राहतील. आज सुपर डिलक्स फ्लॅटच्या किंमती 40 ते 50 हजार रुपये प्रती चौ.फूटापर्यंत पोहोचल्या आहेत. त्यामुळे सुपर डिलक्स फ्लॅट बांधून विकता येणार नाहीत असे बंधन घातले तर आपोआप त्यांच्याकडून छोटी घरे बांधली जातील आणि ती गरीब व मध्यमवर्गीयांना उपलब्ध होतील.

सभापती महोदय, मी माहितीच्या अधिकाराखाली काही कागदपत्रे मागविली होती. त्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, डी.सी.रुल्स 33(9) अंतर्गत सुपर डिलक्स फ्लॅट का बांधावे लागत आहेत याचे जस्टीफिकेशन माझ्या वाचनात आले. त्यामध्ये असे म्हटले आहे की, हा एरिया पॉश असल्यामुळे सुपर डिलक्स फ्लॅट बांधावे लागतात. अशा प्रकारचे जस्टीफिकेशन देऊन शासन जनतेची दिशाभूल करीत आहे. विकासकांचा फायदा करुन देण्याचा हा प्रयत्न सुरु आहे. सरकारने छोटी घरे बांधण्यासाठी मार्गदर्शक तत्वे घालून दिली पाहिजेत, कायद्यामध्ये तरतूद केली पाहिजे. महापालिकेच्या आयुक्तांना जे स्वेच्छाधिकार दिले आहेत, त्या संदर्भात गाईडलाईन्स निश्चित केल्या पाहिजेत. महापालिकेच्या आयुक्तांनी ते स्वेच्छाधिकार कुठे वापरावेत, कसे वापरावेत यावर बंधन असले पाहिजे. अन्यथा शहरामध्ये फक्त सुपर डिलक्स फ्लॅट बांधले जातील आणि गरीब लोकांना अशी घरे परवडणारी नसल्यामुळे त्याचा अप्रत्यक्षपणे समाज जीवनावर परिणाम होणार आहे. या मुद्यांचा शासनाने गंभीरपणे विचार करावा.

---

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सर्वसामान्य मध्यमवर्गीयांना भेडसावणारा घरांचा विषय हा अतिशय महत्वाचा आहे. 1960 साली स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात अल्प उत्पन्न गटासाठी गृहनिर्माण मंडळाची स्थापना करण्यात आली. या गृहनिर्माण मंडळाने 20 ते 25 वर्षे चांगले काम केले. मुंबई किंवा इतर शहरांमध्ये अल्प उत्पन्न गटांसाठी अनेक वसाहती उभ्या केल्या. आज सर्वसामान्य मध्यमवर्गीयांना घर घेणे अशक्य झाले आहे. घरांच्या किंमती आवाक्याबाहेर गेलेल्या आहेत. मध्यमवर्गीयांना घर घेणे परवडत नसल्यामुळे कष्टकरी, गरीब लोकांना झोपडपट्टीमध्ये राहण्याशिवाय पर्याय नाही.

सभापती महोदय, प्रत्येक वस्तूची उत्पादन खर्चावर आधारित किंमत ठरलेली असते. परंतु घराची किंमत चौ.फूटाच्या दरानुसार आकारली जाते. या किंमतीवर शासनाचे कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही. आज मोठमोठे विकासक या मुंबई शहरामध्ये टोलेगंज इमारती बांधण्याचे काम करीत आहेत. त्यांना शासनाच्या एसआरए किंवा पुनर्विकासाच्या वेगवेगळ्या योजनेंतर्गत जमिनी उपलब्ध झालेल्या आहेत. मुंबई महापालिकेच्या चाळींचा डी.सी.रुल्सच्या कलम 33(7) अन्वये पुनर्विकास केला जात आहे. त्या माध्यमातून विकासक पुनर्विकासासाठी चाळी ताब्यात घेत आहेत. एसआरए अंतर्गत मुंबईतील झोपडपट्ट्यांच्या जमिनी ताब्यात घेत आहेत. झोपडपट्टीतील नागरिकांनी चांगल्या घरात रहायला जावे यासाठी विकासक पुढे येत आहेत असा समज असेल तर तो चुकीचा आहे. घरांच्या किंमतीवर नियंत्रण राहिले पाहिजे यासाठी मी शासनाला पर्याय सुचवू इच्छिते.

सभापती महोदय, म्हाडाच्या माध्यमातून जी घरे बांधली जातात त्या घरांच्या किंमतीवर शासनाचे नियंत्रण असले पाहिजे. झोपडपट्टीचा पुनर्विकास करुन प्रकल्पग्रस्तांना 269 चौ.फुटाचे घर मोफत दिले जाते. उर्वरित जागेवर जे मोठमोठे टॉवर्स बांधले जातात त्या टॉवर्समधील घरांच्या किंमती सर्वसामान्यांना परवडणाऱ्या नसतात. विकासकांना या जमिनी मोफत मिळालेल्या असतात. त्यांनी त्या जागेवरील झोपडपट्टीधारकांना 269 चौ.फुटाचे घर मोफत बांधून द्यायचे असते. परंतु आज एसआरए योजनेंतर्गत विक्रीयोग्य सदनिकांच्या किंमती पाहिल्या तर दक्षिण मुंबईत 40 ते 50 हजार रुपये प्रती चौ.फूट व उपनगरामध्ये विक्रीयोग्य घरांच्या किंमती किमान 50 लाख रुपयांपर्यंत जाऊन पोहोचल्यामुळे ही घरे कोणाला परवडणार आहेत?

नंतर व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ......

हे परवडणार नाही म्हणून माझे म्हणणे असे आहे की, प्रत्येक वस्तुला उत्पादनासाठी जेवढा खर्च येईल त्यावर किती नफा घ्यावयाचा हे शासनाने ठरवून अशा वस्तूंच्या किंमती नियंत्रित ठेवल्या पाहिजेत. त्याच धर्तीवर घराचे बांधकाम करण्यासाठी प्रत्येक चौरस फुटामागे जास्तीत जास्त दीड हजार रुपये प्रति चौरस फुट एवढा बांधकाम खर्च विचारात घेऊन सामान्यांना परवडतील अशा प्रकारे किंमती नियंत्रित ठेवण्याची भूमिका शासन घेणार काय ? अशी विचारणा करुन माझे भाषण पूर्ण करते.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ पूर्वी श्री. भोगले...... 12:30

श्री. सचिन अहिर (गृह निर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या मुंबईतील घरांच्या बाबतीतील अत्यंत जटिल प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांनी या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित केला आहे.

मुंबईत वाढणाऱ्या घरांच्या किंमतीचा विचार करता ही परिस्थिती का येते याचा प्रामुख्याने विचार केला तर एक गोष्ट निश्चितपणे सांगू इच्छितो की, बाजारात मागणी व पुरवठ्यात जेव्हा असमतोल निर्माण होतो तेव्हाच अशी परिस्थिती निर्माण होत असते. त्यामुळेच घरांचा पुरवठा पाहिजे तेवढा होऊ शकत नाही व त्याचाच हा परिणाम आहे. मुंबईत सन 1994-95 मध्ये घरांची परिस्थिती अशी होती की, असंख्य अतिरिक्त घरे तसेच गाळे उपलब्ध होते व ते घेण्यासाठी कोणीही पुढे येत नव्हते. त्यानंतर सन 2000 मध्ये या परिस्थितीत बदल झाला व घरांची मागणी वाढू लागली होती. सन 2005 च्या दरम्यान सुध्दा घरांच्या किमती खाली जातात की काय अशी भीती वाटू लागली होती पण नंतर सन 2010 मध्ये मात्र सर्वसान्यांना घरे उपलध्ध कशी करुन द्यायची असा प्रश्न पुन्हा नव्याने निर्माण झाला, हे आपल्याला नाकारता येणार नाही. यासंदर्भात प्रामुख्याने आपल्याला दोन तीन बाबींचा विचार करावा लागणार आहे. प्रथम जोपर्यंत घरांचा पुरवठा वाढविणार नाही तोपर्यंत त्यांच्या किंमती सुध्दा नियंत्रणात आणणे शक्य होणार नाही. त्या अनुषंगाने शासनाने वेगवेगळ्या दोन तीन योजना तयार करण्याची भूमिका घेतली.

मुंबईसारख्या सात बेटांचे मिळून बनलेल्या शहरात जमिनीचा प्रश्न ही एक बिकट समस्याच आहे. या शहरात जमिनीचे प्रमाण कमी असल्यामुळेच वेगवेगळ्या भागात झोपड्यांचे प्रमाण वाढले आहे. अशा झोपड्यांना शासनाने कायद्याने संरक्षण देण्याची भूमिका घेतली. अशा योजनांना चालना देण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न केले जेणेकरुन झोपड्यांच्या जागी इमारती बांधून जास्तीत जास्त लोकांना सामावून घेतल्यानंतर पुन्हा दुसरीकडे अशा झोपड्यांचे अतिक्रमण होणार नाही. मग त्यात आपण अगोदरच्या 2.05 एफएसआय मध्ये 0.05 टक्के एवढी वाढ करुन तो 3.00 टक्के एवढा केला व त्या माध्यमातून शासनाने जास्तीत जास्त घरे निर्माण करण्याचाही प्रयत्न केला आहे. त्या अनुषंगाने डी.सी. रुल्स 33 (5) मध्ये दुरुस्ती करावी लागली. तसेच निव्वळ प्रिमीयमच्या माध्यमातून पैसा मिळविणे हा उद्देश असता कामा नये म्हणून म्हाडाच्या माध्यमातून डी.सी.रुल्स 33 (9) मधील कलम 2 (1) व (2) च्या अनुषंगाने नवीन भूमिका घेण्याचा

....3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ........

प्रयन शासन करीत आहे. त्या माध्यमातून अशा प्रिमीयमऐवजी विकासकांकडून अतिरिक्त गाळे घेऊ शकतो काय यासाठी सुध्दा शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. जेणेकरुन म्हाडाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना परवडणारी घरे आपल्याला देता येतील. त्यासाठीच ही डी.सी. रुल 33 (9) मध्ये दुरुस्ती करण्याचे काम शासनाने केले. त्यात आपण 1/3 जमीन त्यांना देऊन एकूण क्षेत्रफळात शेअरिंग करता येईल काय असाही आपला प्रयत्न आहे व त्यातून आपल्याला जास्तीत जास्त गाळे उपलब्ध होऊ शकतील. त्यानंतर जे लोक मास्टर लिस्टवर राहतील त्यांना प्राधान्याने गाळ्यांचे वाटप करुन झाल्यानंतर उर्वरित अतिरिक्त गाळे सर्वसामान्यांना देता येतील काय असाही आपला प्रयत्न आहे.

त्याचप्रमाणे नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर सारख्या उप नगरांच्या ठिकाणी टाऊनशीप योजना सुध्दा आपण करीत आहोत. त्यामध्ये काही प्रमाणात यशस्वी झालो आहोत. तसेच नवी मुंबईसारख्या भागात सॅटेलाईट टाऊनशीलपच्या माध्यमातून येणारे कंजक्शन त्या त्या स्तरावरच थांबविण्याचाही प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांनी मुंबईतील घरांच्या समस्येबाबत ज्या भावना व्यक्त केल्या त्या अनुषंगाने शासन पुढे पावले उचलत आहेच. तसेच सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी जी सूचना केली त्यानुसार शासनाला निश्चितपणे करता येण्यासारखे आहे की अशा प्रकारे कायद्याच्या माध्यमातून लादण्याचा प्रयत्न न करता विकासकांना काही प्रोत्साहन देता येतो काय अशीही शासनाची भूमिका आहे. त्यानुसार एलआयजी आणि एमआयजीच्या लोकांसाठी वन रुम किचन, वन बीएचके अथवा टू बीएचके किमान आरक्षण ठेवावे लागेल व तशी भूमिका शासनाकडून घेतली जाईल व यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न सुध्दा केला जाईल. म्हाडाच्या माध्यमातून हे सर्व प्रयत्न आपण करीत असून मुंबई शहराला लगत असलेल्या काही परिसरात जॉइंट व्हेंचरसारखी योजना आपल्याला घेता येईल काय याचाही विचार शासन स्तरावर सुरु आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .....

जास्त गाळे तयार झाले तर ते सर्वसामान्यांना देण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. मुंबई शहरामध्ये फिजिबिलीटी आणि लँड बँक तयार करीत असतांना जर खाजगी उद्योजक जमिनी घेऊन इमारती बांधत असतील तर ते आपण का करु शकत नाही याचा सुध्दा शासन विचार करीत आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी डिस्क्रीएशन पॉवरच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, डिस्क्रीएशन पॉवर डिसेंट्रलाईज करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. विजय सांवत यांनी डिस्क्रीएशन पॉवरच्या संदर्भात राजस्थान गुजरात राज्यामध्ये काम सुरु आहे तर तशा प्रकारचे काम आपल्या राज्यात का होऊ शकत नाही ? यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आपण राजस्थान आणि गुजरात यांच्याशी बरोबरी करु शकत नाही. कारण मुंबई शहर जागतिक दर्जाचे असल्यामुळे मुंबईमध्ये आपले हक्काचे घर व्हावे यासाठी सर्व जाती धर्माचे लोक प्रयत्न करीत असतात. त्यामुळे मुंबईमध्ये कंजेशन कमी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. ज्यावेळेस आपण कन्सेशन किंवा डिस्क्रीएशन पॉवर देण्याची भूमिका घेतो त्या त्यावेळी शासनावर आरोप केले जातात की, शासन केवळ विकासकाच्या बाजूला आहे काय ? त्यामुळे घरे बांधत असतांना त्यामधून विकासकाने किती नफा कमवावा हा सुध्दा महत्वाचा प्रश्न आहे. एका प्रोजेक्ट मध्ये विकासकाने किती प्रॉफीट कमवावा याला सुध्दा काही तरी बंधन असण्याची आवश्यकता आहे. परंतु आज यावर आपल्याला नियंत्रण ठेवता आले नाही तरी वेगळया माध्यमातून यावर आपण निश्चितपणे नियंत्रण ठेवू शकतो एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

एसआरएच्या योजनामध्ये जे विकासक चांगले काम करीत असतील त्यांना चालना देण्याची भूमिका शासन घेऊ शकते. उपनगरामध्ये .33 चा एफएसआयचा मुद्दा रखडलेला आहे त्याला सुध्दा न्याय देण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे. महानगरपालिकेच्या जागेवर घरे उभारुन व त्यामधून प्रॉफिट न कमविता सर्वसामान्यांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. नियम 33(7),33(9ऋ मध्ये महानगरपालिकेच्या जागेवर घरे उभारतो व त्यामधून आपण प्रिमियमचे पैसे घेतो. त्यामुळे प्रिमियमच्या ऐवजी महानगरपालिकेच्या जागेवर प्लॉट घेऊन घरे उपलब्ध करुन देण्याची भूमिका राज्य शासनाची असणार आहे. एवढेच नाही तर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ....

एसआरए मध्ये एसपीपीएल हा एक भाग आहे. मुंबईच्या झोपडपट्टीचा विकास करण्याची जबाबदारी आपण विकासकांना दिलेली आहे. परंतु यापेक्षा एसपीपीएलला अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न राज्य शासनाकडून होत आहे. ज्या भागामध्ये कोणीही जात नाही अशा ठिकाणी आपण जाऊन जमिनी घेऊन त्या ठिकाणी गाळे बांधून व त्यातून जे अतिरिक्त गाळे निर्माण होतील ते सर्वसामान्य ग्राहकांना उपलब्ध करुन देता येईल काय या संदर्भात शासन प्रयत्न करीत आहे व त्या दृष्टीने शासन निश्चितपणे पाऊले उचलेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

---------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासनमान्य खाजगी अनुदानित शाळेत स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याची सक्ती करण्याबाबत

**मु. शी.** : शासनमान्य खाजगी अनुदानित शाळेत स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याची सक्ती करण्याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यात शिक्षण हक्क विधेयक लागू होणे, विधेयकातील तरतुदीनुसार शासनमान्य खाजगी अनुदानित शाळेत स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याचे शासनाने दिनांक 17 जून,2010 रोजी आदेश निर्गमित करणे, खाजगी अनुदानित शाळांमध्ये बी.पी.टी. ॲक्ट 1950 व सोसायटी ॲक्ट, 1860 अन्वये व्यवस्थापन समिती अस्तित्वात असणे, व्यवस्थापन समितीस धर्मादाय आयुक्तांची मान्यता असणे, 1981 च्या नियमावलीनुसार प्रत्येक शाळेत शाळा समिती गठीत केलेली असणे, शाळा समितीचे व व्यवस्थापन समितीचे अधिकार काढून घेऊन स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याचे शासनाने आदेश दिल्याने संस्था चालकांमध्ये असंतोष निर्माण होणे, याबाबत मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक 4810/2010 मध्ये 17 जून, 2010 च्या शासनाच्या आदेशास स्थगिती देणे, न्यायालयाचा स्थगिती आदेश असतानाही स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याची सक्ती करण्यात येणे व संस्था चालकांवर व शाळावर कारवाई होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही "

सन्माननीय सभापती महोदय, या राज्यामध्ये बालकांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याच्या संदर्भात केंद्रशासनाचा कायदा आहे. हाच अधिनियम राज्यशासनाने आपल्या राज्यात लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने राज्य शासनाने वेगवेगळया प्रकारचे शासन निर्णय निर्गमित करुन या अधिनियमातील तरतुदी लागू करण्याच्या संदर्भात राज्य शासनाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

शाळांना, संस्थांना निर्देश दिलेले आहेत. दुर्दैवाने म्हणावे लागते की, राज्य शासनाने अद्यापही हा अधिनियम, तरतुदी, नियमांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची चर्चा या सभागृहात अद्यापही झालेली नाही. या अधिनियमाच्या अनुषंगाने माझा स्पेसिफिक मुद्दा असा आहे की, राज्य शासनाने 17 जून, 2010 रोजी विनाअनुदानित शाळा सोडून सर्व शाळांमध्ये जेथे 8 वी पर्यंतचे वर्ग आहेत त्या ठिकाणी चालविण्यात येणा-या प्राथमिक, माध्यमिक शाळांसाठी स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याचा आदेश दिलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ..

सभापती महोदय, या राज्यातील खाजगी संस्थांकडून ज्या शाळा चालविल्या जातात या सर्व खाजगी शाळा दोन कायद्यातंर्गत नोंदणीकृत आहेत. ज्या संस्थाकडून या शाळा चालविल्या जातात त्या संस्था बी.पी.टी.ॲक्ट 1950 खाली नोंदणीकृत आहेत त्याचबरोबर 1860 च्या संस्था नोंदणी अधिनियमाखाली या सर्व संस्था नोंदणीकृत संस्था म्हणून काम करीत आहेत . अशा प्रकारे या दोन कायद्याअंतर्गत या संस्था काम करीत आहेत. त्याचबरोबर या शाळा सुरु करण्यासाठी शासनाकडून परवानगी दिली जाते त्या सर्व शाळांना 1981 चा महाराष्ट्र खाजगी शाळा सेवा शर्ती नियमावलीतील तरतूदी लागू करण्यात आल्या आहेत .1981 सालच्या कायद्यातील तरतुदी , बी.पी.टी.ॲक्ट 1950 तसेच सोसायटी ॲक्ट 1860 मधील तरतुदी विचारात घेतल्या तर या कायद्याच्या अनुषंगाने या प्रत्येक शाळांमध्ये या संस्थेची एक व्यवस्थापन समिती आहे व त्याची नोंद धर्मादाय आयुक्ताकडे केलेली आहे. त्या व्यवस्थापन समितीला काही अधिकार दिलेले आहेत. दुसऱ्या बाजूला 1981 च्या कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्येक शाळेमध्ये शाळा समिती स्थापन करण्यात आली आहे . त्या समितीमध्ये व्यवस्थापनाचे 4 प्रतिनिधी, शिक्षकांचे आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचे प्रतिनिधी आहेत . 1981 च्या कायद्याच्या अनुशंगाने शाळा समिती स्थापन करण्यात आली आहे. शाळा समिती हा शाळेचा आत्मा आहे. संस्थे पेक्षा शाळा समितीला जास्त अधिकार देण्यात आलेले आहेत. 1981 च्या कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने ही शाळा समिती तयार
झालेली आहे. या सर्व शाळामध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली पाहिजे असा शासनाने दिनांक 17 जून 2010 रोजी आदेश निर्गमित केला आहे ज्या ठिकाणी खाजगी व्यवस्थापन नाही, ज्या ठिकाणी मॅनेजमेन्ट नाही , ज्या ठिकाणी 1981 चा कायदा लागू नाही , ज्या ठिकाणी शाळा समिती नाही त्याच शाळांना 17 जून 2010 चा शासन निर्णय लागू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा यामध्ये येतात. जिल्हा परिषदांच्या शाळामध्ये नगरपरिषदांच्या शाळा
मध्ये ,महानगरपालिकांचा शाळा मध्ये शाळा समिती नाही तसेच मॅनेजमेन्टची कमिटी नाही. त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे जे मुख्याधिकारी असतात त्यांना हे सगळे अधिकार दिलेले असतात म्हणून या शाळांमध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत होते . त्या समितीला कायद्याने जे अधिकार दिलेले आहेत ते अधिकार स्थानिक व्यवस्थापन समितीला देण्यात आलेले आहेत. त्या

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ..

संदर्भात अधिनियमामध्ये किंवा शासनाच्या आदेशामध्ये तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद त्याच शाळांना लागू होऊ शकेल मात्र खाजगी संस्थांच्या शाळांना लागू होऊ शकणार नाही.

सभापती महोदय, या शासन निर्णयानुसार स्थानिक व्यवस्थापन समितीला अनेक अधिकार देण्यात आलेले आहेत. शिक्षकांच्या नेमणुका करण्याचे अधिकार,शाळांचे वार्षिक उत्पन्न आणि लेखे तयार करण्याचे अधिकार या समितीला देण्यात आलेले आहेत. वास्तविक हे अधिकार मॅनेजमेन्टचे आहेत. तेव्हा शाळा समितीचे अधिकार मॅनेजमेन्टचे अधिकार या कायद्याची अंमलबजावणी करणा-या स्थानिक व्यवस्थापन समितीला देणार आहात काय ? शाळेला, संस्थेला, शाळा सामितीला कायद्यानुसार मिळालेले अधिकार हे शासन काढून घेणार आहे काय ? अशा प्रकारे जर हे अधिकार काढून घेण्यात येत असतील तर ते बरोबर नाही. या तरतुदीचे इंटरप्रिटेशन चुकीच्या पध्दतीने केले गेले आहे. ज्या ठिकाणी स्थानिक व्यवस्थापन समिती आहे, संस्था नोंदणीकृत आहे त्यांनी चालविलेल्या शाळांना या अधिनियमामील कलम लागू होऊ शकत नाही असे माझे म्हणणे आहे तरी सुध्दा स्थानिक व्यवस्थापन समिती सक्तीने गठीत करण्याचा आदेश शासनाने काढला आहे.त्या आदेशाची अंमलबजावणी देखील सुरु झाली आहे.इतकेच नव्हे तर अनेक शाळांमध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत केली नाही म्हणून संबंधित संस्थांविरुध्द कारवाई करण्यात आली असून काही ठिकाणी पगार थांबविण्यात आले आहेत या संदर्भात आम्ही माननीय मंत्र्याची भेट घेतली होती. त्याचबरोबर अधिका-याबरोबर चर्चा देखील करण्यात आली होती. त्यावेळी माननीय मंत्र्यांनी असे सांगितले की, याबाबतीत अद्याप चर्चा व्हावयाची असल्यामुळे अंमलबजावणी व्हावयाची असल्यामुळे त्याची सक्ती करु शकत नाही. त्यामुळे या संदर्भातील चर्चा विधिमडळात होईपर्यत कोणाचेही पगार थाबविण्यात येऊ नयेत. त्याचबरोबर या आदेशाची सक्तीने अंमजबजावणी करु नका असे अधिका-यांना स्पष्ट निदेश देण्यात आले होते परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही आजही सक्तीने ही समिती गठीत करण्यासंबंधी शासकीय अधिका-याकडून संस्था चालकांवर दबाव येत आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धप्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

सभापती महोदय, यासंदर्भात माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, शासनाने शासकीय अधिकाऱ्यांना सांगून देखील त्याची अंमलबजावणी होत नाही म्हणून आम्हाला नाईलाजास्तव मुंबई उच्च न्यायालयामध्ये जावे लागले. अशाप्रकारे त्या संस्था चालकांना शासनाने शाळा चालवायला परवानगी दिली. 1950 च्या आणि 1860 च्या कायद्याखाली या संस्था रजिस्टर्ड आहेत. 1981 ची नियमावली त्यांना लागू आहे. अशा शाळांना स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याबाबत त्यांच्यावर बंधन टाकणे अयोग्य आहे. असे बंधन शासनाने त्यांच्यावर टाकू नये या करिता दिनांक 17 जून 2010 रोजीच्या शासनाच्या आदेशाला आव्हान देणारी याचिका दाखल करण्यात आली. या आदेशाला माननीय उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. या बाबत मी शासनाला पत्र लिहिल्यानंतर शासनाकडून मला असे उत्तर देण्यात आले की, या संदर्भात याचिका क्रमांक 4810/2010 दाखल झाली आहे. दिनांक 17.7.2010 च्या आदेशास तात्पुरती स्थगिती दिली आहे. तसेच, विविध संस्थांनी शाळा समिती गठीत करण्यास आक्षेप घेतले आहेत याचा विचार करुन या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे अशाप्रकारचे उत्तर दिनांक 5 फेब्रुवारी 2011 रोजी मला देण्यात आले. परंतु त्याची कार्यवाही अद्यापि झालेली नाही. म्हणून माझे दोन-तीन स्पेसिफिक प्रश्न आहेत की, शासनाने दिनांक 17 जून 2010 च्या आदेशान्वये स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याचे बंधन खाजगी शाळांवर टाकले आहे, त्याला उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशानुसार आपण 17 जून 2010 च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी थांबविणार काय?

दुसरे असे की, आपण यामध्ये सुधारणा करण्याबाबत म्हटले आहे. तेव्हा या अधिनियमामध्ये तातडीने सुधारणा करणार काय? आणि तिसरा प्रश्न असा की, स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याबाबत अधिनियमामध्ये जी तरतूद आहे ती खाजगी शाळांना लागू नाही अशाप्रकारचे स्पेसिफिक आदेश आपण देणार काय?

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, दिनांक 1 एप्रिल 2010 रोजी या देशातील मुलांना सक्तीचे मोफत शिक्षण देणारा अधिनियम लागू करण्यात आला त्या अधिनियमातील सेक्शन 21 (1) नुसार स्कूल कमिटी स्थापन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक 17.6.2010 रोजी राज्य शासनाने एक शासन निर्णय निर्गमित केला. त्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करुन शाळेमधील शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी व त्यामध्ये समाजाचा सहभाग घेण्यात यावा, त्याचबरोबर शाळेच्या व्यवस्थापनाकडून पालकांचे शोषण होऊ नये याकरिता 75 टक्के पालकांचा सहभाग घेण्यात यावा यासाठी जी.आर. काढण्यात आला. या बाबत आपण सांगितल्याप्रमाणे काही लोक नागपूर उच्च न्यायालयामध्ये गेले आणि दिनांक 6.10.2010 च्या न्यायालयीन निर्णयानुसार शासकीय निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्यात आली ही वस्तुस्थिती आहे.

आपण ज्या व्यवस्थापन समितीचा उल्लेख केला त्यामध्ये कोणता फरक आहे तेवढेच आपणास सांगते. या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हे संस्था चालक किंवा संस्थेचे अध्यक्ष रहातील, तसेच शिक्षकांचे प्रतिनिधी देखील त्यामध्ये आहेत, मुख्याध्यापक हे सदस्य सचिव असतील. पूर्वीच्या समितीमध्ये पालकांचा सहभाग नव्हता, परंतु आरटी नुसार पालकांचा देखील सहभाग असावा याबाबत पूर्वीच्या कायद्यामध्ये तरतूद नव्हती म्हणून जी.आर. काढण्यात आला होता. परंतु त्याला उच्च न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली आहे. आज वस्तुस्थिती अशी आहे की, अशाप्रकारची समिती नेमणे निश्चितपणे शाळेवर बंधनकारक करता येणार नाही. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्यामुळे कुणीही अशाप्रकारे समिती गठीत करणे शाळेवर बंधनकारक करु नये अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील. दुसरे असे की, आपण आरटी खाली नवीन नियम तयार करीत आहोत. आज जी.आर. जरी काढण्यात आलेला असला तरी त्यापेक्षा नियम जास्त महत्वाचे आहेत. अशा प्रकारची नियमावली करीत असतांना दिनांक 9.11.2010 च्या परिपत्रकानुसार या बाबत लोकांकडून सूचना व आक्षेप मागविले आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ पूर्वी श्रीर.सरफरे . . . . . 12:50

श्रीमती फौजिया खान . . . .

त्यानुसार आता रुल्स्बाबत ड्राफ्ट तयार करण्यात येत आहे. यामध्ये सर्वांचा सहभाग घेऊन म्हणजे यामध्ये संस्था चालक, जनता आणि शिक्षण तज्ज्ञ आहेत. या सर्वांची मते जाणून घेऊन आपण हे रुल्स् तयार करीत आहोत आणि हे रुल्स् तयार झाल्यानंतर योग्य तो निर्णय घेता येईल एवढेच मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

----

झेड-2 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या विषयाच्या संबंधात समाधानकारक उत्तर दिलेले आहे. पण माझा एवढाच प्रश्न आहे की, शासनाची ही भूमिका असली तरी सुध्दा यापूर्वी माननीय मंत्री महोदयांनी आणि आजही माननीय राज्यमंत्री महोदयांनी सदनामध्ये याबाबत सांगितले आहे.परंतु विभागीय स्तरावरील जे क्षेत्रीय अधिकारी आहेत,ते याची अंमलबजावणी करीत नाहीत.म्हणून मी या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो.माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, याबाबतीत नियम तयार करावयाचे आहेत. परंतु सदरहू प्रकरण न्यायालयामध्ये असून,सध्या त्याला स्थगिती मिळालेली आहे.अशा वेळी न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून न्यायालयामध्ये या संदर्भात संपूर्ण निर्णय होई पर्यंत याबाबतीत सक्ती करण्यात येऊ नये आणि स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत केली नाही म्हणून संबंधितांवर कारवाई करण्याचे जे संकेत दिले जात आहेत ते थांबविण्याच्या दृष्टीने आपण सगळया अधिकाऱ्यांना सूचना देणारे एक परिपत्रक तातडीने दोन दिवसामध्ये काढण्यात येईल काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मी पूर्वीच सांगितले की, अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

----

झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्प सुरु होऊनही

प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील व्यक्तीला नोकरी न मिळणे

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्प सुरु होऊनही प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील व्यक्तीला नोकरी न मिळणे यासंबंधी श्री.परशुराम उपरकर वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्प सुरु होऊन 25 ते 26 वर्षे होऊनही या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांची नोंदणी करुनही कुटुंबातील एकाही व्यक्तीला नोकरी न मिळणे, आता तर दोन पिढीची वयोमर्यादाही संपुष्टात येणे, आता तिसऱ्या पिढीच्या वयोमर्यादेमधील उमेदवारांनी प्रकल्प ग्रस्त म्हणून नोकरी मिळण्याकरिता केलेली नोंदणी, या प्रकल्पातून 75 टक्के पाणी गोवा राज्याला मिळणार असल्याने गोवा राज्यानेही या प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्यासंदर्भात सन 1990 मध्ये केलेला करार, या करारानुसार अद्यापपर्यंत गोवा राज्याने या प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून न घेणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्प 25 ते 30 वर्षापासून सुरु आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र आणि गोवा दोन राज्यांमध्ये होत आहे. यामध्ये गोवा राज्याचा हिस्सा 73.26 आणि महाराष्ट्र राज्याचा हिस्सा 23 टक्के इतका असून त्याचा गोवा राज्याला जास्त प्रमाणात फायदा होणार आहे. मागच्या वेळेस या प्रकल्पाच्या संदर्भात प्रश्न विचारला होता, त्यावेळी अशी माहिती मिळालेली आहे की, एकंदर 819 प्रकल्पग्रस्तांपैकी 188 प्रकल्पग्रस्तांना "क" आणि "ड" वर्गामध्ये नोकऱ्या देण्याबाबत शासनाने सांगितलेले आहे. याठिकाणी बऱ्याचशा प्रकल्पग्रस्तांनी दाखले सुध्दा घेतलेले आहेत. परंतु आता त्या लोकांची तिसरी पिढी म्हणजे त्यांचा नातू हे सदरहू दाखले घेऊन नोकरीसाठी फिरत आहेत. अगोदरच्या दोन पिढ्यांना नोकऱ्या उपलब्ध झालेल्या नाहीत. दि.06-04-1990 मध्ये गोवा आणि महाराष्ट्र राज्यामध्ये करार झाला. त्यातील 9 व्या क्रमांकाच्या मुद्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, गोवा सरकारने आणि महाराष्ट्र सरकारने येथील प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये सामावून घ्यावे. तसेच 5 आणि 6 क्रमांकाच्या मुद्यामध्ये उल्लेख केलेला आहे.त्यानुसार मुद्दा क्र.6 मध्ये गोव्यातील चीफ इंजिनिअर यांची एक कमिटी नेमण्यात आली असून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामध्ये काही अधिकारी समाविष्ट करण्यात आले होते आणि मुद्दा क्र.6 मध्ये असे नमूद केलेले आहे की, महाराष्ट्र राज्याचे माननीय मंत्री महोदय, माननीय राज्यमंत्री आणि गोवा राज्याचे माननीय मंत्री आणि माननीय राज्यमंत्री यांची कमिटी नेमण्यात आली. परंतु त्यांच्या बैठकाच झाल्या नाहीत. जर या बैठका झाल्या असत्या तर प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागला असता. पण तसे न झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. मी याठिकाणी दिनांक 26-03-2010 रोजी प्रश्न क्रमांक 3013 नुसार प्रश्न उपस्थित केला होता. त्याबाबत माननीय राज्यमंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, आम्ही दिनांक 17 मार्च 2010 रोजी गोवा सरकारकडे पत्रव्यवहार केलेला आहे. सदरहू पत्राबाबत पुढे काय झाले ते माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगावे. त्याचप्रमाणे मी त्यावेळी असाही प्रश्न विचारला होता की, महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव आणि गोवा राज्याचे मुख्य सचिव या दोघांनी बैठक घेऊन या भागातील प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्यासाठी काही उपाययोजना करण्यात येणार आहे काय ? त्यावर माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत लवकरात लवकर बैठक घेण्याचे मान्य केले होते. त्याप्रमाणे ही बैठक झाली आहे काय ? जर तशी बैठक झाली असेल तर त्या बैठकीमध्ये काय निष्पन्न झाले ? याची माननीय मंत्री महोदयांनी येथे माहिती द्यावी.

सभापती महोदय, तसेच या भागातील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविण्यासाठी तत्कालीन माननीय पर्यटन मंत्री श्री.विजयकुमार गावीत हे गोवा राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले होते. डिसेंबर 2010 रोजी सध्याचे माननीय पाटबंधारे मंत्री देखील गोवा राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले होते. पण त्यातून काय निष्पन्न झाले? गोवा राज्याने किती लोकांना नोकऱ्या देण्याचे मान्य केलेले आहे? याबाबत माहिती मिळालेली नाही. याबाबतीत देखील माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी. त्याचप्रमाणे एकीकडे गोवा सरकारचा 1045 कोटी रुपयांचा जो हिस्सा आहे, त्यापैकी त्यांनी 431 कोटी रुपयांचा हिस्सा 2010 पर्यंत दिलेला आहे आणि उर्वरित निधी येण्याचे बाकी आहे. मात्र दुसरीकडे आपण प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देऊ शकत नाही, त्यांचे पुनर्वसन करु शकत नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्ুधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

तर या प्रकल्पग्रस्तांना किमान 20 लाख रुपयाचे पॅकेज देऊन हा प्रश्न सोडविण्यात येणार आहे काय? या प्रकल्पग्रस्तांनी आपल्या जमिनी देऊन गोव्यातील शेतीचा तसेच गोव्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविलेला आहे. या प्रकल्पग्रस्तांना करारामध्ये नमूद केल्या प्रमाणे गोवा सरकारने नोकरी देण्याबाबत आम्ही वारंवार मागणी करुनही प्रकल्प ग्रस्तांना नोकरी दिली जात नाही, याबद्दल शासन काय धोरण आखणार आहे? गोवा सरकार अशा प्रकारे कराराप्रमाणे प्रकल्प ग्रस्तांना नोकरीमध्ये सामावून घेत नसेल तर गोवा सरकारचे पाणी रोकण्यात येणार आहे काय? याबाबतीत मंत्री महोदयांनी माहिती द्यावी. तसेच प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशा प्रकारची मी विनंती करतो.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ( पुनर्वसन व मदतकार्य राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील तिलारी प्रकल्प हा एक आंतर राज्यीय प्रकल्प आहे. त्यामध्ये गोवा शासनाचा 73.30 टक्के आणि महाराष्ट्र शासनाचा 26.70 टक्के इतका वाटा आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे दिनांक 6-4-2009 रोजी गोवा आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांनी करार केलेला आहे. या करारनाम्याममध्ये तिलारी प्रकल्पातील सर्व प्रकल्पग्रस्तांना महाराष्ट्र शासन आणि गोवा शासनाने सार्वजनिक क्षेत्रामध्ये नोकरीमध्ये प्राधान्याने सामावून घ्यावे अशा प्रकारचा उल्लेख आहे. आता पर्यंत 869 प्रकल्प्रस्तांपैकी ज्यांना प्रकल्पग्रस्ताचा दाखला दिलेला आहे अशा 188 प्रकल्पग्रस्तांना महाराष्ट्र शासनाने 'क' आणि 'ड' वर्गात सेवेमध्ये सामावून घेतलेले आहे. या निमित्ताने मला सभागृहाच्या एवढेच नजरेस आणून द्यावयाचे आहे की, काही प्रकल्पग्रस्तांची वये 45 वर्षा पेक्षा जास्त झालेली आहेत. या प्रकल्पग्रस्तांना त्यांचा दाखला त्यांच्या मुलाच्या किंवा नातवाच्या नावाने एकदा हस्तांतरित करता येतो. तशा प्रकारची हस्तांतरणाची प्रकरणे मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच ज्यांनी अद्याप हस्तांतरणासाठी अर्ज केलेले नाहीत, त्यांच्या दाखल्याचेही हस्तांतरण करुन देण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी गोवा सरकारने अद्यापपर्यंत एकाही प्रकल्पग्रस्ताला नोकरीत सामावून घेतलेले नाही, असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. ही गोष्ट मी मान्य करतो. या बाबतीत महाराष्ट्र शासनाच्या वतीने गोवा शासनानकडे सातत्याने पत्र व्यवहार चालू आहे. परंतु त्या बाबबतीत म्हणावे तसे यश मिळालेले नाही. दिनांक 17-01-2011 रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री सन्माननीय श्री.सुनील तटकरे यांनी गोवा जलसंपदा मंत्री, गोवा शासन यांच्या बरोबर बैठक घेऊन करारानुसार 631 लोकांना गोवा शासनाने नोकरीमध्ये समावून घ्यावे अशा प्रकारची चर्चा केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्याप्रमाणे गोवा सरकारच्या मुख्य सचिवांकडे संयुक्त बैठकीसाठी वेळ देण्यात यावा, अशा प्रकारचा वारवांर पाठपुरावा करण्यात येत आहे पण त्यांनी अद्यापपर्यंत वेळ न दिल्यामुळे ती बैठक होऊ शकलेली नाही. तरी सुध्दा परत एकदा मंत्री महोदयांच्या स्तरावरुन ही बैठक लवकरात लवकर घेऊन गोवा सरकारने जास्तीत जास्त प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये सामावून घेण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रयत्न केला जाईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 20 मिनिटांकरिता म्हणजे दुपारी 1.20 वाजेपर्यंत वाढवून देण्यात येत आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या सभागृहामध्ये वारंवार अशा प्रकारचे उत्तर मिळते. गोवा सरकारचा या प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याचा मानस नसेल तर राज्य शासन कोणती उपाययोजना करणार आहे, त्यांचे पाणी शासन थांबविणार का ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगितले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या वतीने गोवा सरकारकडे सातत्याने पाठपुरावा चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी पाणी थांबविण्याची स्टेप सांगितली. या सर्व चर्चेमध्ये आणि करारामध्ये जे काही नमूद केले आहे ते करुन घेण्याचा आपण प्रयत्न करु आणि नंतर आपण जी सूचना केली आहे त्या बाबत विचार करता येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लवकरात लवकर याचा अर्थ काय ? गेल्या मार्चमध्ये सुध्दा शासनाने लवकरात लवकर हाच शब्द वापरला होता. आजही लवकरात लवकर असाच शब्द ते वापरत आहेत. आपण अधिकाऱ्यांना सांगणार की नाही, ते सरकार ऐकत नाही का, आपल्याला कोणी जुमानत नाही का ? आपण पत्र पाठविता त्याचे उत्तर देत नाहीत, पत्राची मोजदाद घेत नाहीत. ते आपला फोन सुध्दा घेत नसतील. अशा मुजोर लोकांना सरळ करण्यासाठी आपल्याकडे अस्त्र नाही का, हे आपण विधिमंडळाच्या माध्यमातून सांगितले पाहिजे. 27 कुटुंबांना आपल्या दारासमोर आणून बसवावयाचे का ? तसे केले तर आपण त्यांच्या हातात बेड्या घालाल. कारण आता प्रकल्पग्रस्तांना मारझोड करण्याचे शासनाचे धोरणच झालेले आहे. काल गोळीबार केला, काठीने मारले तसे यांनाही माराल. शेवटी माणसाने पिढ्या जगविण्यासाठी काय करावयास पाहिजे ? लवकरात लवकर करु असे वारंवार सांगितले जाते. एक मंत्री गेले, दुसरे मंत्री गेले, तिसरे मंत्री गेले. मंत्री येतात आणि जातात पण प्रश्न तेथेच आहे. सरकार म्हणून काही जबाबदारी आहे की नाही ? माननीय मंत्री महोदय, आपण बीड सारख्या भागातून आलेले आहात. त्या ठिकाणी प्रकल्पग्रस्तांची काय हालत आहे, हे आपल्याला माहीत आहे. त्या जाणिवेतून आपण फटका मारा आणि हे करा.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, पुढच्या दोन महिन्याच्या अवधीमध्ये ही बैठक आयोजित करुन या बाबतीत एकदाचा अंतिम निर्णय घेतला जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, गोवा सरकारने जे द्यावयाचे आहे त्या बाबत माननीय मंत्री महोदय प्रयत्न करीत आहेत. गेल्या मार्चमध्ये जे सांगितले तेच आताही सांगत आहेत. हे सर्व ठीक आहे पण आता त्या प्रकल्पावर आधारित काही ऊर्जा प्रकल्प बीओटी तत्वावर कोणी तरी सुरु केले आहेत. श्री. भोसले किंवा श्री. पवार अशी काही तरी नावे आहेत. त्यामध्ये या प्रकल्पग्रस्तांना काही स्थान देता येईल का ? कोणी तरी इकडून जाऊन त्या ठिकाणी प्रकल्प बांधत आहेत. श्री. प्रतापसिंह राणे यांच्याकडून घेण्याची आपली ताकद नाही पण आपल्याच प्रकल्पावर आपल्याच मुंबई-पुण्यातील लोक ऊर्जा प्रकल्प बांधत आहेत त्यामध्ये त्यांना काही स्थान देता येईल का, गोव्याकडून काही मिळाल्यानंतर पुढचे बघू पण यामध्ये आपण असे काही करु शकतो का ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला आहे त्या संदर्भात सांगू इच्छितो की, औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने दिनांक 9.7.2000 रोजी प्रकल्पग्रस्तांची नियुक्ती ही स्पर्धा परीक्षेशिवाय व त्यांच्या अर्हता व गुणवत्ता दुर्लक्षित करुन करता येणार नाही अशा प्रकारचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे येथून पुढच्या काळामध्ये जेव्हा केव्हा प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्याचा प्रश्न येईल त्यावेळी त्यांची गुणवत्ता, अर्हता बघून आणि स्पर्धात्मक परीक्षा घेऊन कार्यवाही करावी लागेल.

श्री. विनोद तावडे : त्याचा काही संबंध नाही.

श्री. प्रकाश सोळंके : आपण सांगत आहात की त्यांना नोकरीमध्ये सामावून घ्या. त्यामध्ये काय अडचण आहे ते मी सांगत आहे. आता स्पर्धात्मक परीक्षा घेतल्याशिवाय प्रकल्पग्रस्तांना नोकरीत घेता येणार नाही अशा प्रकारचे आहेत. या आदेशाचा विचार करुन ज्यांना अद्यापपर्यंत नोकरी मिळालेली नाही त्यांच्या बाबतीत कार्यवाही करावी लागेल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी असा प्रश्न विचारला की, त्या प्रकल्पाच्या आधारे त्या ठिकाणी ऊर्जा प्रकल्प उभा राहात आहे. कोकणातील एकही प्रकल्पग्रस्त त्या ऊर्जा प्रकल्पावर काम करण्याच्या लायकीचा नाही, असे शासनाला म्हणावयाचे आहे का ? या ठिकाणी माननीय मंत्री

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे ....

महोदय भलतेच उत्तर देत आहेत. औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयामध्ये बाकीच्या गोष्टी सुध्दा म्हटलेल्या आहेत. त्याही गोष्टी माननीय मंत्री महोदयांनी वाचून दाखवाव्यात. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, त्या प्रकल्पाच्या पाण्याच्या आधारावर महाराष्ट्रातील काही लोक ऊर्जा प्रकल्प उभे करुन कोट्यवधी रुपये कमवित आहेत. त्या ठिकाणी आपण प्रकल्पग्रस्तांना न्याय देऊ शकता की नाही ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याच्या बाबतीत हायकोर्टाचे असे आदेश आहेत की,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

स्पर्धात्मक परीक्षा घेतल्याशिवाय त्यांना येथून पुढील काळामध्ये नोकऱ्या देऊ नये. प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत ते मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणत आहे. या पुढील काळामध्ये कोणत्याही प्रकल्पग्रस्तांना स्पर्धात्मक परीक्षा दिल्याशिवाय नोकऱ्या देता येणार नाही.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी असे सांगितले की, तो खाजगी उद्योजक आहे. खाजगी उद्योजकाने प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय, ऊर्जा प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : प्रकल्पग्रस्तांना खाजगी नोकऱ्या किंवा शासकीय नोकऱ्या देण्याचा हा प्रश्न आहे. प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरी देत असताना हायकोर्टाच्या आदेशाचे शासनाला पालन करावेच लागेल. हायकोर्टाचे आदेश डावलून शासनाने कार्यवाही करावी असे सन्माननीय सदस्यांना म्हणावयाचे आहे काय, प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्याच्या संदर्भात हायकोर्टाने आदेश दिलेले आहेत. आता प्रकल्पग्रस्तांना बॅक डोअर एन्ट्री मिळणार नाही, नोकरी मिळविताना त्यांना स्पर्धात्मक परीक्षेत पास व्हावे लागेल, आपली गुणवत्ता प्रस्थापित करावी लागेल. हायकोर्टाच्या या आदेशाचे सरकारला पालन करावेच लागेल.

श्री.विनोद तावडे : मंत्री महोदयांनी आता जे वाक्य उच्चारले आहे त्याचा कोकणात येणाऱ्या सर्व प्रकल्पांवर परिणाम होणार आहे. या पुढील काळात प्रकल्पग्रस्तांना नोकरी मिळणार नाही अशी घोषणाच त्यांनी या निमित्ताने केलेली आहे. स्पर्धात्मक परीक्षा कोणाची घेण्यात येणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : जे प्रकल्पग्रस्त आहेत, त्यांची परीक्षा घेऊनच त्यांना नोकरी दिली जाईल. हे आदेश येण्यापूर्वी प्रकल्पग्रस्तांची ज्येष्ठता विचारात घेऊन त्यांना नोकरी दिली जात होती. त्यांच्यासाठी कोणत्याही परीक्षेची अट नव्हती. पण आता प्रकल्पग्रस्तांना ज्येष्ठता तत्वावर नोकऱ्या देता येणार नाही, स्पर्धात्मक परीक्षा घेऊनच नोकऱ्या देता येतील असे हायकोर्टाचे आदेश आहेत. त्यामुळे अडचण निर्माण झालेली आहे. प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्याच मिळणार नाहीत असे मी

2....

18-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC-2
NTK/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हटलेले नाही. परंतु त्यांची परीक्षा घेण्यात येईल व त्यामध्ये जे यशस्वी होतील त्यांना नोकऱ्या देता येतील.

श्री.विनोद तावडे : जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांचीच परीक्षा घेण्यात येणार आहे. परंतु शासनाकडे नोकऱ्याच उपलब्ध नाहीत, त्यामुळे परीक्षा घेऊन काय होणार आहे हा प्रश्न वेगळा आहे. खाजगी उद्योजक शासनाच्या प्रकल्पाच्या आधारावर करोडो रुपये कमवितो. त्यामुळे त्यांनी प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या दिल्या पाहिजेत एवढे तरी शासन सांगू शकते की नाही ? त्या ठिकाणी हायड्रो इलेक्ट्रीकचा प्रोजेक्ट उभा रहात आहे. ते काम बीओटी तत्वावर देत असताना त्या करारात प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्याची अट घातली पाहिजे. प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीवर हा प्रकल्प होणार आहे, त्यातून तो करोडो रुपयांची कमाई करणार आहे. त्यामुळे अशी अट घालणार आहे की नाही आणि ती घालावी असा आमचा आग्रह आहे. यामध्ये स्पर्धात्मक परीक्षेचा विषय कोठून आला ?

श्री.प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा जरुर विचार केला जाईल.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री महोदयांनी केलेल्या घोषणेचा कोकणातील प्रकल्पांवर गंभीरपणे परिणाम होणार आहे. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद येथील खंडपीठाने शासनावर हे बंधन घातलेले आहे. परंतु जैतापूर येथे अणुऊर्जा प्रकल्प होत आहे. त्या प्रकल्पग्रस्तांची स्पर्धात्मक परीक्षा कशी घेण्यात येणार आहे, अणुऊर्जा प्रकल्प उभा करीत असताना प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देऊ अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली आहे. माननीय मुख्यमंत्री लोकांना थापा मारत आहेत का, कोर्टाच्या आदेशामुळे प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्याच देता येणार नाही. आता मंत्री महोदयांनी बॅक डोअर असा शब्दप्रयोग केला आहे. म्हणजे हा वाईट शब्दप्रयोग करण्यात आला आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी माननीय मुख्यमंत्री लोकांना थापा मारत आहेत का असा शब्दप्रयोग केला आहे तो बरोबर नाही. त्यांना जी काही शंका असेल ती त्यांनी जरुर विचारावी. पण अशा प्रकारे बोलणे योग्य नाही.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

श्री.रामदास कदम : कोकणातील बेरोजगारांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम चालले आहे. या राज्यात काय चालले आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्यांनी आपल्या प्रश्नाबाबत शासनाकडे खुलासा मागावा.

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : न्यायालयाने दिलेल्या निकषानुसार प्रकल्पग्रस्तांच्या परीक्षा होणार असतील तर माननीय मुख्यमंत्री यांना हे माहीत नाही काय असा माझा पहिला प्रश्न आहे. त्यांना माहीत असेल तर ते थापा मारत आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 13:10

श्री. दिवाकर रावते...

राज्यमंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामुळे गंभीर परिस्थिती निर्माण होणार आहे. न्यायालयाचे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांना माहीत नाहीत असे आम्ही गृहीत धरायचे काय ?

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. संसदीय चर्चेमध्ये कोणते शब्द वापरायचे याचे भान राखणे आवश्यक आहे.....

श्री. दिवाकर रावते : "मुख्यमंत्री थापा मारतात" अशा प्रकारचा केलेला शब्दप्रयोग मी मागे घेतो. मग मुख्यमंत्री महोदय असत्य कथन करीत आहेत काय ? सभापती महोदय, माझा मुद्दा असा आहे की, ही बाब अतिशय गंभीर आहे. संबंधित अधिका-यांनी मुख्यमंत्री महोदयांची दिशाभूल केली असेल, त्याना न्यायालयाचा निर्णय सांगितला नसेल, त्यांना अज्ञानात ठेवले असेल तर जैतापूर प्रकल्पाला विरोध होत असताना तेथील प्रकल्पग्रस्तांना नोक-या दिल्या जातील असे जे मुख्यमंत्री महोदयांकडून सांगितले जात आहे ते उचित नाही. जैतापूर येथील अणुऊर्जा प्रकल्पाला त्या त्या क्षेत्रातील सगळे कसबी कारागीर लागणार आहेत आणि कोकणातील जे कुणबी आहेत त्यांना त्यातील ज्ञान नाही. मग त्यांना हे शासन नोक-या कशा काय देणार आहे ? आता राज्यमंत्री महोदयांनी प्रकल्पग्रस्तांना द्यावयाच्या नोक-यासंबंधी जे काही विधान केले त्यानुसार जैतापूर येथील कोणत्याही प्रकल्पग्रस्ताला नोकरी मिळू शकणार नाही. या विधिमंडळामध्ये असत्य कथन होत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना वस्तुस्थिती ज्ञात न करता त्यांच्या मुखातून असत्य वदविले जात आहे ही गंभीर बाब आहे. असत्य कथन करुन कोकणी माणसाची फसवणूक केली जात आहे. जैतापूर प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना नोक-या मिळणार नाहीत हे सांगितल्या बद्दल आणि जैतापूर प्रकल्पाच्या विरोधाचे समर्थन केल्याबद्दल मी राज्यमंत्री महोदयांना धन्यवाद देतो.

श्री. एस.क्यू.जमा : सभापति महोदय, भले ही यह प्रश्न कोंकण के तिलारी प्रकल्प के बारे में हो, लेकिन इसका इम्पलीकेशन दूसरे प्रकल्पों के बारे में भी है. अगर सरकार का कोई प्रकल्प है, सरकार ने भूमि का अधिग्रहण किया है तो प्रकल्पग्रस्तों को नौकरी देने का जी.आर. है कि उन को प्राधान्य दिया जाएगा, उनको प्रॉयरिटी दी जाएगी, लेकिन नौकरी की गारन्टी नहीं है. यहां पर इस बात का जिक्र किया गया कि निजी कंपनी के प्रकल्पग्रस्तो को नौकरी देने के बारे में हाईकोर्ट का जजमेंट है. मेरा कहना यह है कि हाईकोर्ट का जजमेंट हो या न हो, लेकिन अगर

. . . DD 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. एस.क्यू. जमा

प्रकल्पग्रस्तों की संख्या अधिक है और नौकरियों की संख्या कम है तो मेरिट के आधार पर ही सलेक्शन होगा. यह नैसर्गिक न्याय का सिद्धान्त है कि अगर 100 लोगों में से 10 लोगों को नौकरी देनी है तो उनका इन्टरव्यू होगा, उनकी फिटनेस देखेंगे, उनकी उम्र देखेंगे, उसके बाद सलेक्शन होगा. यह एक नेचुरल प्रोसस है. शासन की ओर से प्रकल्पग्रस्तों के बारे में एग्रीमेंट किया जाता है कि जमीन का मुआवजा दिया जाएगा, नौकरी दी जाएगी अथवा नौकरी देने के स्थान पर कॅश मुआवजा दिया जाएगा. इस बारे में महाराष्ट्र के अन्य प्रकल्पों के बारे में भी समस्या है. सरकारी प्रकल्प के प्रकल्पग्रस्तों और निजी उद्योग के प्रकल्पग्रस्तों के बारे में सरकार की एक नीति है या अलग अलग नीति है, क्या इस बारे में मंत्री महोदय स्पष्टीकरण देंगे ?

श्री. प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्पाच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली असून आता सन्माननीय सदस्य अन्य खाजगी प्रकल्पाच्या संदर्भातही प्रश्न विचारीत आहेत. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची व्याप्ती खूप मोठी आहे.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंखे...

या बाबतीत निश्चितपणे मला उत्तर देता येईल, त्या बद्दल काही प्रश्न नाही. परंतु या प्रश्नांची व्यापकता आता खूप वाढू लागली आहे....

( अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याच्या प्रयत्न करतात. )

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी** ) : सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यमंत्र्यांचे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहात बसलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचा हा विषय आहे. प्रकल्पग्रस्तांची तिसरी पिढी आज सुरु आहे ही गोष्ट माननीय मदत व पुनर्वसन राज्यमंत्र्यांनी मान्य केले आहे. हा काही व्यक्तिगत विषय नाही. माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी या ठिकाणी जाहीर केले की, पूर्वी प्रकल्पग्रस्तांची ज्येष्ठता विचारात घेऊन त्यांना नोकरी दिली जात होती. त्यांच्यासाठी कोणत्याची परीक्षेची अट नव्हती. आता प्रकल्पग्रस्तांच्या स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नोकऱ्या उपलब्ध करुन देता येतील. स्पर्धात्मक परीक्षेमुळे महाराष्ट्रातील कोणत्याही प्रकल्पग्रस्तांना कोणत्याही नोकऱ्या मिळणार नाहीत. त्यांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य दिले जाणार नाही. महाराष्ट्रासाठी हा अतिशय गंभीर विषय निर्माण झाला आहे. जे प्रकल्पग्रस्त आहेत, ते आपल्या वडिलोपार्जित जमिनी देतात, त्यामुळे प्रकल्प उभे राहतात. त्यामुळे त्यांना नोकऱ्या दिल्या जातात. आपण जलनीतिचा कायदा सभागृहात आणला, तसा प्रकल्पग्रस्तांसाठी कायद्यात बदल करुन तो सभागृहाच्या मान्यतेसाठी आणावा तसेच प्रकल्पग्रस्तांची स्पर्धात्मक घ्यावी व त्याप्रमाणे नोकऱ्या उपलब्ध करुन द्याव्यात असे आदेश न्यायालयाने दिले आहेत, प्रकल्पग्रस्तांसाठी पूर्वी जी पध्दत होती तीच पध्दत यापुढे सुरु रहावी म्हणून शासनाने सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी अशा माझ्या सूचना आहेत.

श्री. प्रकाश सोळंखे : सभापती महोदय, या संदर्भात हायकोर्टाचा निर्णय आलेला आहे, त्यामुळे काही प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्यामध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी या अनुषंगाने जी सूचना केली आहे की, या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात जाऊन या बाबतीत पुन्हा नव्याने निर्णय घ्यावा. ती सूचना निश्चितपणे मान्य करण्यात येईल. या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात जाऊ.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : अर्धा तास चर्चेच्या सूचना क्र.10 व 11 तसेच उर्वरित अर्धा तास चर्चेच्या सूचना पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 1.30 वाजता पुन्हा सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.18 ते 1.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

--------------

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**<u>सभापतीस्थानी माननीय सभापती</u>**

**पृ.शी./मु.शी.: नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे श्री दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.दीपक सावंत, श्री.परशुराम उपरकर यांनी "मराठी भाषेचा प्रसार व प्रचार मोठया प्रमाणात व्हावा यासाठी जुलै, 2010 मध्ये मराठी भाषा विकास विभागाची स्थापना करण्यात आली. परंतु सदर विभागाला अद्याप जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर उत्तर देताना मराठी भाषा या विभागाला जेवढा निधी लागेल तितका निधी दिला जाईल अशी ग्वाही विधानपरिषदेत दिली होती. तसेच या विभागाचे बळकटीकरण करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती आणि त्या विभागाच्या कामासाठी नवीन 35 पदे मंजूर करुनही अद्याप अंमलबजावणी होत नसल्याबाबत" या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना थोडक्यात आपले म्हणणे मांडण्याची मी संधी देत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या राज्याच्या सरकारने मराठी भाषेचा आदर करावा अशा प्रकारचा आग्रह या सदनामध्ये आपल्या माध्यमातून आम्ही आणि आपल्यासह सर्वच सन्माननीय सदस्यांनी धरलेला होता. हा कोणत्याही एका पक्षाचा विषय नसून सदनाचा विषय आहे. आम्ही त्याचा आदर करतो. मुख्यमंत्री महोदयांनी ज्या वेळेला या राज्याची सूत्रे हाती घेतली त्या वेळी प्रथमत: असे जाहीर केले की, मराठी भाषेचा सन्मान केला जाईल, खास विभाग स्थापन केला जाईल. आम्ही त्या घोषणेचे स्वागत केले होते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये देखील हा विषय नमूद केला होता. माननीय राज्यपालांनी मराठी भाषेतून भाषण सुरु करावे, किमान पहिले वाक्य मराठी भाषेतून उच्चारावे आणि नंतर उर्वरित भाषण करावे असा आग्रह धरला होता. अभिभाषणाच्या दिवशी निषेध करता येत नाही म्हणून आम्ही खंत व्यक्त करण्यासाठी खाली जमिनीवर बसलो होतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या वेळी इतर बाबींवर न बोलता फक्त मराठी भाषा या एकाच विषयावर मी सभागृहात भाष्य केले होते. आदरणीय उप

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 13:30

श्री.दिवाकर रावते....

मुख्यमंत्री यांनी चर्चेला उत्तर देताना असे म्हटले होते की, आम्ही मराठी भाषेचा आदर करु, खास विभाग स्थापन करु, एकत्रित व्यवस्था करु. आज माझ्या असे निदर्शनास आले की, मंत्रालयात त्या विभागात श्री.कुलकर्णी नावाचे अधिकारी एकटेच बसत आहेत.

नंतर 2जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .........

फक्त एक शिपाई आणि एक अधिकारी एवढाच स्टाफ या विभागाला दिलेला आहे. ही एक प्रकारे मराठी भाषेची उपेक्षाच आहे. शासनाच्या वतीने सभागृहात जे सांगण्यात आले होते त्यानुसार कोणतीच कार्यवाही मात्र होत नाही. ज्या सभागृहात सर्वात जास्त चर्चा मराठी भाषेचा आदर करण्यासंबंधी झाली त्या मराठी भाषेचा प्रसार करण्यासाठी शासनाकडून ठोस भूमिका मात्र कोणतीच घेतली जात नाही. म्हणून अशा संवेदनशील विषयाकडे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना शासनाचे लक्ष नसेल, मराठी भाषेला सन्मान मिळत नसेल तर ते तुमचे आणि आमचे दुर्दैव आहे. माझी विनंती आहे की, या मराठी भाषेचा सन्मान करण्यासाठी, तिचा आदर राखण्यासाठी सभागृहात सर्वंकष चर्चा व्हावी व त्या चर्चेच्या माध्यमातून शासनाची मराठी भाषेसंबंधीची भूमिका सभागृहाला समजावी यासाठीच मी सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा घेण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली आहे.

**सभापती** : यासंदर्भात माननीय गृह मंत्री यांनी नियम 289 अन्वये सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने मराठी भाषेचा सन्मान राखण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे याची नोंद घ्यावी.

श्री. आर.आर.पाटील : ठीक आहे. यासंबंधीची नोंद घेऊन शासनाची या विषयाची भूमिका स्पष्ट केली जाईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये जी सूचना दिलेली आहे तो प्रस्ताव आजच्या कामकाज पत्रिकेतील कामकाजाचा भाग नसल्यामुळे याबाबत औपचारिक दृष्ट्या परवानगी देता येणार नाही असे म्हटले तरी मराठी भाषेचा प्रसार व प्रचार या अनुषंगाने अत्यंत महत्वाची ही बाब असल्यामुळे मी या विषयावर याच अधिवेशनाच्या पुढील चार दिवसात नियम 97 अन्वये चर्चा घेण्यास परवानगी देण्याचे ठरविले आहे. त्यासाठी देण्यात येणाऱ्या वेळेबाबत मी सभागृहाला विदित करीन.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**<u>पुणे मुंबई महामार्गावरील रावेत येथे तातडीने भुयारी मार्ग करण्याबाबत</u>**

**<u>उत्तराचा दिनांक 18/04/2011</u>**

---

**विधानपरिषद अल्पसचूना प्रश्न क्रमांक 17707**

डॉ. नीलम गोऱ्हे, विधान परिषद सदस्य

---

| | |
|---|---|
| सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय : | श्री. छगन भुजबळ |
| 1. पुणे मुंबई महामार्गावरील देहूरोड कात्रज बाह्यवळण रस्त्यावर रावेत येथे होणाऱ्या अपघातांच्या घटनांकडे लक्ष वेधण्यासाठी तसेच रावेतमध्ये तातडीने भुयारी मार्ग करण्याच्या मागणीसाठी दिनांक 23 मार्च, 2011 रोजी वा त्या सुमारास रास्ता रोको आंदोलन केले हे खरे आहे काय, | 1) होय |
| 2. असल्यास, उपरोक्त मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, | 2) देहूरोड ते सातारा या रस्त्याच्या सहापदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत प्रगतीपथावर आहे. या कामा अंतर्गत "रावेत" येथे वाहनांसाठी भुयारी मार्गाची (व्हेईक्युलर अंडरपास ची तरतूद करण्यात आलेली आहे. सहापदरीकरणाच्या कामात भुयारी मार्गाचे काम पूर्ण करण्यात येईल. |
| 3. अद्यापपर्यंत निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ? | 3) प्रश्न उद्भवत नाही. |

---

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, पुणे-मुंबई महामार्गावरील देहूरोड कात्रज बाह्यवळण रस्त्यावर रावेत येथे भुयारी मार्ग निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण देहू रोडजवळील या रस्त्यावर आतापर्यंत 35 अपघात झालेले आहेत. तसेच या ठिकाणी भुयारी मार्ग काढण्यासाठी महानगरपालिकेने परवानगी देऊन सुध्दा त्या कामामध्ये दिरंगाई होत आहे. त्यामुळे पुण्याच्या जवळपास असलेल्या वाल्हेकरवाडी, कासरासई, जांबेनेरे, चिंचवड या भागातील प्रवाशांसाठी अत्यंत धोका निर्माण झालेला आहे. या ठिकाणी सहा पदरी रस्ता तयार करण्याचे काम पूर्ण करण्यात येईल असे म्हटले असले तरी तोपर्यंत किती वेळ लागणार आहे, त्याचबरोबर या भागात होणारे अपघात टाळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती दक्षता घेतलेली आहे ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, उत्तरातच म्हटले आहे की, भुयारी मार्ग काढण्यासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे. हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग असून चार पदरी रस्त्याचे सहा पदरीमध्ये रुपांतर करण्याचे काम सुरु झालेले आहे. ही निकड लक्षात घेऊन केंद्र शासनाने ही मागणी सुध्दा मान्य केली आहे व त्यानुसारच हा मार्ग होत आहे. तसेच हे काम करणाऱ्या एजन्सीला सांगण्यात आले आहे की, बाकीचे काम कराल तेव्हा करा पण अगोदर हे काम प्राधान्याने करावे. तसेच संबंधित ठेकेदार व पोलीस यंत्रणेला सुध्दा याबाबतीत काळजी घेण्याच्या सूचना दिल्या जातील. तसेच हे काम केंद्र सरकारच्या अखत्यारीत असल्याने ते कधी पूर्ण होईल यासंबंधीची माहिती सध्या तरी माझ्याकडे नाही. तरी देखील काम सुरु झाल्यानंतर लवकरच पूर्ण करण्याची विनंती शासनाच्या वतीने केंद्राला करण्यात आली आहे. सहा पदरी रस्ता पूर्ण करण्याचा कालावधी 31.3.2013 पर्यंत असून सन्माननीय सदस्या डॉ. गो-हे यांनी भुयारी मार्गाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला असून हा भुयारी मार्ग सहा पदरी रस्त्याच्या अगोदर पूर्ण होईल एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

यानंतर श्री. जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**अल्प सूचना प्रश्न क्रमांक** : **17719**

**डॉ. निलम गोऱ्हे.( विधान परिषद सदस्य)** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

**श्री आर. आर. पाटील** :

1. मोंड (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग)या गावात झालेल्या बलात्कार प्रकरणी चार आरोपींना माहे फेब्रुवारी, 2011 मध्ये वा त्या दरम्यान अटक करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
2. असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला, व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
3. अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

(1) होय,

(2) व (3) दिनांक 13.2.2011 रोजी मौ. मोंड येथे घडलेल्या घटनेबाबत पीडित मुलींच्या आईने दिनांक 15.2.11 रोजी दिलेल्या तक्रारीनुसार देवगड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.5/2010 भा.द.वि. कलम -376 (2)(ग), 506 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयात आरोपींना अटक केली असून गुन्हयाचा तपास सुरु आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड तालुक्यात बलात्काराची घटना घडल्यामुळे व या प्रकरणातील आरोपींना अटक होत नसल्यामुळे या ठिकाणी मोठया प्रमाणात आंदोलने झाली होती. या प्रकरणात ज्या गुन्हेगारांना अटक झाली होती ते आता जामिनावर बाहेर आलेले आहेत. बलात्काराच्या प्रत्येक घटनांमध्ये डीएनए टेस्ट केली जाईल अशा प्रकरचे उत्तर डिसेंबरच्या अधिवेशनात माननीय मंत्री महोदयांनी दिले होते. त्यामुळे या प्रकरणामध्ये संबंधित मुलीची व आरोपींची डीएनए टेस्ट करण्यात आलेली आहे काय ? बीडच्या घटनेच्या संदर्भात माननीय गृह मंत्र्यांचे आम्ही लक्ष वेधल्यानंतर त्यांनी या प्रकरणात डीएनए टेस्टची सूचना दिल्यानंतरच या प्रकरणात डीएनए टेस्ट झाली. बीडच्या प्रकरणात डीएनए टेस्ट झाली आहे काय, डीएनए टेस्ट झाली नसल्यास ती केली जाईल काय तसेच देवगडच्या प्रकरणात गुन्हेगारांना जामीन मिळालेला होता तो रद्द केला जाईल काय ?

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अल्प सूचना प्रश्न क्रमांक** : 17719...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, बीडच्या केसमध्ये आंदोलन करावे लागले नव्हते. 13 तारखेला घटना घडल्यानंतर 15 तारखेला या प्रकरणातील चारही आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. या घटनेच्या संदर्भात डीएनएसाठी नमुने घेऊन ते फॉरेन्सीक लॅबला तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहेत. या प्रकरणातील फॉरेन्सीक लॅबचा अहवाल प्रलंबित आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणात अटक झालेल्या आरोपींची नावे काय आहेत, या गुन्हयाचा तपास पूर्ण झाला आहे काय, तपास पूर्ण झाला नसेल तर तपासामध्ये कोणत्या बाबी आढळून आल्या ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या घटनेच्या संदर्भात वैद्यकीय अधिकारी वर्ग 1, यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र माझ्याकडे उपलब्ध आहे. या प्रमाण पत्रात "बलात्कार झाला की, नाही हे निश्चित होत नाही. डीएनए रिपोर्ट आल्यानंतर ते निश्चित होईल." या प्रकरणात कलम 376 खाली आरोपींना अटक करण्यात आलेली असून आरोपींची नावे पुढील प्रमाणे आहे. 1) श्री. दत्तात्रय नाटेकर 2) श्री. रणजित अनभवने 3) श्री. नितेश अनभवने 4) निलेश तांबे यांना अटक करण्यात आलेली आहे. या प्रकरणात फॉरेन्सीक लॅबचा बलात्कार झाल्याचा रिपोर्ट आला तर संबंधित गुन्हेगारांचा बेल रद्द करुन त्यांना पुन्हा ताब्याच घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या सर्व प्रश्नांमध्ये गुन्हेगार दोषी आहेत असे शासनाने मान्य केलेले आहे त्यामुळे सर्व प्रकरणात दोषी व्यक्तींना शिक्षा झाली पाहिजे अशी आम्ही आपल्याकडून आशा करतो.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणात मी माहिती घेतली असून या प्रकरणात आरोपींना अद्याप बेल मिळालेला नसून ते जेल मध्येच आहेत. फॉरेन्सीक लॅबच्या रिपोर्टमध्ये हे गुन्हेगार दोषी आढळले तर त्यांना शासन कदापिही पाठीशी घालणार नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नक्षलवादाच्या विरोधात लढण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष कृती दलातील २२ पोलीस अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१) * १३०४३ प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नक्षलवाद्यांच्या विरोधात लढण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष कृती दलातील २२ पोलीस अधिकाऱ्यांची पदे गेल्या अडीच वर्षापासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०११ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष कृती दलात कायम स्वरुपी अधिकारी नियुक्त नसल्यामुळे नक्षलवाद्यांशी लढताना पोलीस दलाला मोठ्या प्रमाणावर हानी पोहचते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विशेष कृती दलातील रिक्त पदे त्वरीत भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्या करिता:** (१) अंशत: खरे आहे. विशेष कृती दलात पोलीस अधिकाऱ्यांची एकूण २० पदे रिक्त आहेत.

(२) रिक्त पदांमुळे हजर / कार्यरत पोलीस अधिकाऱ्यांवर कर्तव्याचा काहीसा ताण पडतो, हे खरे आहे.

(३) व (४) रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, 22 पोलीस अधिका-याची पदे रिक्त आहेत यासंदर्भात उत्तर देण्यात आले आहे की, 20 पोलीस अधिका-यांची पदे रिक्त आहेत. माझ्या पहिल्या प्रश्नाला " हे अंशत: खरे आहे "असे गमतीशीर उत्तर देण्यात आलेले आहे. माझ्या दुस-या प्रश्नाला उत्तर देण्यात आले आहे की, "कर्तव्याचा काहीसा ताण पडतो". सभापती महोदय, मी जे विचारले आहे त्यामध्ये किती अंशी खरे आहे तसेच ही पदे भरण्याच्या संदर्भात शासन तत्काळ कोणती कार्यवाही करणार आहे?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13043.....

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते बहुतांशी खरे आहे आणि ही पदे भरण्याची बहुतांशी कार्यवाही लवकरात लवकर केली जाईल.

श्री.भाई जगताप : त्या विभागामधील परिस्थिती अतिशय गंभीर आहे.सन्माननीय मंत्री श्री आर. आर. पाटील या जिल्हयाचे पालक मंत्री आहेत. त्यांनी चांगल्या प्रकारे आपल्या कर्तव्याची छाप पाडली आहे. परंतु त्या ठिकाणी जर अधिकारी नसतील तर कारवाया कशा होऊ शकतील. दोन वर्षापासून त्या ठिकाणची पदे रिक्त आहेत. आता बहुतांशी पदे लवकरात लवकर भरण्यात येतील असे माननीय गृह मंत्र्यांनी सांगितले आहे .त्या ठिकाणी 20 अधिकारी कमी असल्याचे मान्य केलेले आहे तेव्हा सर्व प्रक्रिया पूर्ण करुन 20 अधिका-यांची नेमणूक येत्या दोन महिन्यात करण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, राज्यामध्ये पी.एस.आय.ची पदे मोठया प्रमाणावर रिक्त आहेत. मध्यंतरी जवळजवळ चार वर्षे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कामकाज ठप्प झाले होते. एका बाजूला पी.एस.आय.निवृत्त व्हावयाचे आणि दुस-या बाजूला ही पदे भरली जात नव्हती त्यामुळे पी.एस.आय.चा मोठा बॅकलॉग तयार झाला होता. दुर्दैवाने 3 हजार 293 पी.एस.आय.ची पदे राज्यामध्ये रिक्त आहेत.अलीकडच्या काळात ही पदे भरण्यासाठी शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला विनंती केली होती . माझ्याकडे महाराष्ट्र लोक सेवा आयोगाच्या अधिका-यांबरोबर तीन चार वेळा बैठका झाल्या होत्या आणि त्यांनी मोठया प्रमाणावर पी.एस.आय.ची निवड यादी तयार करुन पाठविली होती. लोकसेवा आयोगाने जरी ही पदे भरण्याची तयारी दाखवली असली तरी नाशिक सोडून दुसरीकडे कोठेही पी.एस.आय.ट्रेनिंग सेन्टर नाही. गेल्या चार वर्षामध्ये जो काही अनुशेष तयार झाला होता तो दूर करण्याच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात का होईना परंतु राज्यामध्ये आणखी एक पी.एस.आय.ट्रेनिंग सेंटर सुरु करण्याची आवश्यकता असून त्याही दृष्टीकोनातून प्रयत्न सुरु आहेत. आज जे पोलीस कॉन्स्टेबल ट्रेनिंग सेंटर राज्यामध्ये आहेत त्यातील एकाचे रुपांतर पी.एस.आय.ट्रेनिंग सेंटरमध्ये करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सध्या नाशिक येथे काही पी.एस.आय. भरले होते. एकूण 3 हजार 293 पी.एस.आय.ची पदे रिक्त आहेत. त्यापैकी 11 जून 2011 रोजी 530 पी.एस.आय. चे ट्रेनिंग पूर्ण होऊन शासनाकडे प्राप्त होणार आहेत आणि 19 सप्टेंबर 2011 रोजी आणखी 575



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13043...श्री.आर.आर. पाटील..

पी.एस.आय.चे ट्रेनिंग पूर्ण होऊन ती पदे प्राप्त होणार आहेत. त्याचबरोबर 2009 च्या भरतीसाठी 585 पदांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे नोंदवलेली आहे .2010 च्या भरतीसाठी 627 पदांची मागणी नोंदवली आहे. या संदर्भात मी आज सकाळी महाराष्ट्र लोक सेवा अयोगाच्या अध्यक्षांबरोबर फोनवरुन चर्चा केली आहे.येत्या आठवडाभरात 585 अधिक 627 अशा प्रकारे 1200 पेक्षा अधिक पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द केली जाणार आहे. नाशिक ट्रेनिंग सेंटर मधून ट्रेनिंग पूर्णकरुन बाहेर आलेले पी.एस.आय.आणि बाकीचे पी.एस.आय. आल्यानंतर व्हॅकन्सीज भरल्या जाणार आहेत.गडचिरोलीमध्ये खास पथक निर्माण केले होते आणि त्यामध्ये 18 पदे रिक्त आहेत.जून महिन्यामध्ये ट्रेनिंग पूर्ण करुन 520 पी.एस.आय.उपलब्ध होणार आहेत त्यातून प्राधान्याने ही पदे भरण्यात येतील आणि त्या ठिकाणी पदे रिक्त ठेवली जाणार नाहीत आणि उर्वरित पी.एस.आय. अन्य ठिकाणी नेमले जातील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयात पी.एस.आय.ची 18 पदे रिक्त आहेत आणि संपूर्ण राज्यामध्ये 2 हजार पदे रिक्त आहेत.गडचिरोली जिल्हयातील आव्हान माननीय गृह मंत्र्यांनी स्वीकारलेले आहे त्याबद्दल आपले मनापासून कौतुक आम्ही नेहमीच करीत असतो. गडचिरोली जिल्हयात पालक मंत्री म्हणून कोणी काम केले नाही म्हणून तुम्ही तेथे काम करीत आहात. पालक मंत्री म्हणून सतत त्या ठिकाणी जात असल्यामुळे पोलिसांना अधिक काम करावे लागते त्यामुळे तेथील पोलिसांवर मानसिक ताण येत आहे. नवीन पी.एस.आय.ना गडचिरोली जिल्हयामध्ये पाठविण्यात येणार आहे . गेल्या दोन वर्षात नक्षलवादी चळवळ बरीचशी काबूत आल्या सारखे दिसत आहे.नक्षलवाद्यांचे आव्हान फार मोठे आहे.संपूर्ण देशापुढे हे मोठे आव्हान आहे. काल सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला आहे तो फार महत्वाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की नक्षलवाद्यांबरोबर सबंध ठेवणे म्हणजे देशद्रोह नाही. इतकी गंभीर घटना घडलेली आहे. तेव्हा या बाबतीत केन्द्र सरकार काय करणार आहे हे मला माहीत नाही.परंतु हा एक नवीन त्रास निर्माण होणार आहे.आपल्याकडील चांगले ट्रेन झालेले, जुने आणि अनुभवी, जाणते, वाकबगार अशा अधिका-यांना तातडीने त्या ठिकाणी पाठविणार आहात काय नक्षलववादी भागामध्ये आपण जे काम करीत आहात त्या कामाला यामुळे चांगली बळकटी मिळेल तेव्हा कर्तव्यनिष्ठ, कार्यक्षम अधिकारी तातडीने तेथे रुजू करणार आहात काय ?

नंतर श्री.सरफरे

नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13043...

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, जून महिन्यामध्ये प्रशिक्षण पूर्ण झालेले नवीन 520 लोक आपल्याला उपलब्ध होतील. मध्यंतरी गडचिरोली जिल्ह्यामध्ये पदे भरीत असतांना जवळपास 150 पेक्षा अधिक पी.एस.आय. ची पदे भरण्यात आली. नेमणुकीचे आदेश दिल्यानंतर सुध्दा काही लोकांनी आपली बदली रद्द करुन घेण्याबाबत प्रयत्न केले. त्या जिल्ह्यामध्ये स्वखुशीने जाण्यास कुणीही तयार होत नाही ही वस्तुस्थिती आहे. जून महिन्यात 520 लोक उपलब्ध झाल्यानंतर गडचिरोली जिल्ह्यातील सर्व जागा भरल्या जातील. त्याचबरोबर आज गडचिरोली जिल्हयामध्ये पदवीधर झालेले तरुण उमेदवार कॉस्टेबलच्या पदासाठी सिलेक्ट होत आहेत, परंतु ते एमपीएससीच्या स्पर्धा परीक्षेमध्ये टिकत नाहीत आणि जे स्पर्धेमध्ये टिकतात ते त्या भागात जायला तयार होत नाहीत. या करिता स्पर्धेमध्ये न टिकणाऱ्या व कॉन्स्टेबल म्हणून काम करीत असलेल्या तरुण उमेदवारांना खास सवलत देऊन आणि पी.एस.आय. चे प्रमोशन देऊन त्या भागात कसे नेमता येईल ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तेथील कॉन्स्टेबलला सुध्दा लवकर प्रमोशन कसे मिळेल या साठी निश्चितपणे उपाय योजना केल्या जातील.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने बहुत ही अच्छा और विस्तृत जवाब यहां पर दिया है. मैं यहां पर बताना चाहूंगा कि अभी 3 दिन पहले ही केन्द्रीय गृह राज्य मंत्री श्री गुरुदास कामत साहब आये थे और उन्होंने गडचिरोली से संबंधित स्थिति का जायजा लेने के लिए एक मीटिंग वहां पर ली थी, साथ ही जो सिपाही जख्मी हुआ था उसको देखने के लिए मंत्री महोदय नागपुर के एक अस्पताल भी गए थे. वहां के हालात के संबंध में मंत्री महोदय ने हमसे भी चर्चा की थी.

मेरा कहना यह है कि एमपीएससी द्वारा हमेशा जो नियुक्तियां होती हैं, उनके बारे में किसी को कोई आपत्ति नहीं है. लेकिन गडचिरोली जैसी जगह पर, जहां हमारे जवान मारे जाते हैं और जहां की सुरक्षा के लिए टास्क फोर्स बनायी गयी है, उस टास्क फोर्स में यदि अधिकारियों की कमी होती है तो वहां पर सरकार को यह अधिकार होना चाहिए कि ऐसी जगहों पर नियुक्तियां करने के लिए एमपीएससी का इंतजार न करके सरकार खुद किसी विशेष तरीके से भर्ती कर सके.

एक बात यहां पर माननीय मंत्री महोदय ने अपने उत्तर में बतायी कि स्थानीय लोगों को

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष छूट देकर उन लोगों को वहां भर्ती किया जाएगा. मेरा कहना है कि जून महीने में नासिक सेंटर से ट्रेनिंग पूरी करने के बाद लगभग 5 सौ लोग मिलने वाले हैं. परन्तु जो लोग वहां पर टास्क फोर्स में पहले से ही काम करते हैं, क्या उनको प्रोत्साहन देने के लिए कोई कॅरिअर ग्रोथ स्कीम सरकार जल्द से जल्द बनाएगी. साथ ही मेरा कहना है कि वहां पर जो पद अभी खाली हैं, उनको जल्द से जल्द भरा जाना चाहिए. मैं यह भी कहना चाहूंगा कि उस इलाके में अभी काफी अच्छा असर पुलिस और सरकार के कामों का पड़ रहा है. इसलिए टास्क फोर्स की खाली जगहों को तुरंत भरा जाना चाहिए. मुझे पूछना है कि क्या इन सभी कामों को गति देने का काम सरकार करेगी ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या दलामध्ये ज्या लोकांचा समावेश करतो त्यांना स्पेशल पे बरोबर वेगवेगळया प्रकारच्या सवलती देतो. जून महिन्यात 520 पदे उपलब्ध झ ाल्यानंतर त्या जिल्ह्यामध्ये प्राधान्याने पदे भरण्यात येतील. माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, आज देशामध्ये जेवढी नक्षलग्रस्त राज्ये आहेत त्या पैकी नक्षलवादी कारवाया कमी करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. याला लोकांकडून सुध्दा चांगला प्रतिसाद मिळाला आहे आणि प्रशासन देखील गतिमान व्हावयास लागले आहे. माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा की, एमपीएससीकडून त्या परिसरातील लोकांचे कमी सिलेक्शन केले जाते. गडचिरोली जिल्ह्यातील कॉस्टेबलला लवकर प्रमोशन देण्याकरिता एमपीएससीला शासनाने जे अधिकार दिले आहेत त्यामध्ये सूट देण्याचा शासनाला जरुर अधिकार आहे. तशा प्रकारचा निर्णय घेऊन यामधील काही पदे एमपीएससीच्या कार्यकक्षेमधून काढून घेऊन ती थेट भरण्याची भूमिका शासनामार्फत स्वीकारण्यात येईल.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, नक्षलवाद म्हणजे नेमका काय आहे, माओवाद नेमका काय आहे, मार्क्सवाद, लेनिनवाद नेमका काय आहे, त्यामध्ये घुसखोरी करण्याचे तंत्र काय आहे, त्यांचे संघटन कशा प्रकारे होते, विविध संघटनेच्या लोकांना ते कसे सामावून घेतात , त्यांचे पोलिसांबरोबर कसे संबंध असतात या संबंधात पोलिसांना प्रशिक्षण दिले जाते काय? जोपर्यन्त पोलिसांना प्रशिक्षण दिले जाणार नाही तोपर्यन्त नक्षलवादी कोण आहे आणि कोण नाही याची नीटपणे पोलिसांना जाण होणार नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अप्रकाशित प्रत / मुद्रणासाठी नाही

ता.प्र.क्र.13043 . . ..

श्री.हुसेन दलवाई . . . .

म्हणून निष्पाप लोक देखील पकडले जातील. तेव्हा त्यांची संरक्षण यंत्रणा कशी आहे हे कळले तर त्यांच्याशी डील करणे सोपे जाईल. त्यामुळे याबाबतीत काही प्रयत्न होत आहेत काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपण याबाबतीत देखील आपल्या पोलिसांना ट्रेनिंग देत आहोत. मी सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगू इच्छितो की, त्यांच्याकडून आपल्या व्यवस्थेमधील त्रुटी आणि दोष यांचा फायदा उठविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय गृहमंत्री हे गडचिरोली जिल्ह्याचे पालक मंत्री देखील आहेत. पण ते या जिल्ह्याचे पालक मंत्री होण्यापूर्वी आणि आज सुध्दा अनेक वेळेला एखाद्या जिल्ह्यामधील पोलीस निरीक्षक किंवा पोलीस अधिकारी जर चांगले काम करीत नसेल तर सहजगत्या लोक असे म्हणतात की, संबंधितांची गडचिरोलीमध्ये बदली करावी. माझ्या माहितीप्रमाणे पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचे अधिकार सन्माननीय गृह मंत्र्यांकडे नसून ते सर्वस्वी माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहेत. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यामध्ये कुणाचीही बदली करावयाची आणि जो अकार्यक्षम माणूस असेल त्याला गडचिरोलीमध्ये पाठवावयाचे असे प्रकार झाल्याने त्याचे नंतर आपल्याला दुष्परिणाम पहावयास मिळतात. त्यामुळे माननीय गृहमंत्र्यांनी यासंबंधात काही विचार केलेला आहे काय ? माझा असा प्रश्न आहे की, एखाद्याची अशा प्रकारे शिक्षा म्हणून गडचिरोली मध्ये बदली करण्याचा जो प्रकार होत आहे, त्याला प्रतिबंध करुन योग्य ते अधिकारी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आपण कोणती पावले उचललेली आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, गृह विभागाच्या बाबतीत आणि पोलीस दलाच्या बाबतीत सांगावयाचे तर कोणालाही शिक्षेसाठी पोस्टींग दिली जात नाहीत. ही गोष्ट खरी आहे की, जर एखाद्या विभागातील अधिकारी चांगले काम करीत नसेल, ऐकत नसेल तर संबंधितांची गडचिरोली जिल्ह्यामध्ये बदली करावी असे म्हणण्याचा प्रघात असल्याचे मी देखील ऐकलेले आहे. पण माझी बदली सुध्दा अकार्यक्षम म्हणून सरकारने किंवा पक्षाने गडचिरोलीमध्ये केलेली नाही. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ साहेब याला साक्षीदार आहेत की, मी तो जिल्हा मागून घेतलेला आहे. तसेच पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी सुध्दा माझ्याच भूमिकेचे अनुकरण करतात.जर कधी पोलिसांकडून चूक झाली तर त्याबाबत सदनामध्ये चर्चा होते. परंतु जे पोलीस बरोबर काम करीत आहेत, त्याबाबतीत देखील कधीतरी सदनामध्ये चर्चा व्हावयास पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु दुर्दैवाने त्या गोष्टी समोर सुध्दा येत नाहीत.

सभापती महोदय,जेव्हा आय.पी.एस.अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये डी.जी.यांनी विचारले की, गडचिरोली जिल्ह्यामध्ये जाण्यासाठी कोण तयार आहे? त्यावेळी पुरुषांच्या अगोदर एक महिला आय.पी.एस.अधिकारी, दोन डी.वाय.एस.पी.महिलांनी आपले हात वर केले होते ही वस्तुस्थिती आहे. आज त्या भागामध्ये जे वरिष्ठ अधिकारी नेमलेले आहेत मग त्या महिला असतील किंवा पुरुष असतील, त्यामध्ये बहुतेक स्वत:च्या इच्छेने, स्वखुषीने तेथे जाणाऱ्यांनाच नियुक्त केलेले आहे. त्या परिसरामध्ये टेन्युअर पूर्ण केल्यानंतर ते ज्या ठिकाणाची मागणी करतील तेथे पोस्टींग देण्याच्या बाबतीत तरतूद केलेली आहे. अशा प्रकारे गडचिरोली जिल्ह्यामध्ये टेन्युअर पूर्ण करणाऱ्यांना पुढील काळामध्ये आपण सोयीचे पोस्टींग देत आहोत. पण सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, एक गोष्ट खरी आहे की, आज सर्व विभागातील वर्ग-1 व वर्ग-2 मधील पदे पाहिली तर ज्यांचे रिटायरमेंटसाठी एक वर्ष शिल्लक आहे असे लोक पाठविले जात आहे. ज्यांच्या रिटायरमेंटसाठी सहा महिने शिल्लक आहेत, अशा लोकांनी पालकमंत्री म्हणून माझ्याकडे त्याठिकाणी बदली करण्यासाठी विनंती अर्ज दिला. मग मी त्यासंबंधातील कारणे शोधली तेव्हा एक गोष्ट लक्षात आली की, त्या व्यक्तीला शेवटच्या सहा महिन्याच्या कालावधीसाठी तेथे जावयाचे होते. कारण तेथे स्पेशल-पे मिळतो आणि शेवटचा जो पगार असेल, त्याच्या आधारावर पेन्शन मिळत असते. आपल्याला आयुष्यभर पेन्शनच्या माध्यमातून जास्त पेमेंट मिळावे म्हणून सुध्दा गडचिरोलीमध्ये जाणारे लोक आहेत. काहीजण अशा प्रकारे देखील या गोष्टींचा फायदा घेत आहेत. त्याठिकाणी अन्य विभागातील कर्मचारी देखील फार मोठया प्रमाणात जवळपास रिटायरमेंटला आलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय,माझा पहिला प्रश्न असा आहे की, त्याठिकाणी जे कर्मचारी जातात,त्यांना दोन किंवा तीन वर्षानंतर त्यांच्या इच्छेप्रमाणे पोस्टींग मिळाले पाहिजे अशा प्रकारचा आपण कायदा केलेला आहे.त्यानुसार त्यांना पोस्टींग मिळणार आहे काय? परंतु तेथे गेल्यानंतर संबंधितांना कोणी रिलीव्हर मिळत नाही म्हणून ते लोक सहा-सहा वर्षे तेथेच काम करीत रहातात.त्यामुळे लोक तेथे जाण्यासाठी तयार होत नाही हा महत्वाचा मुद्दा आहे. तसेच त्याठिकाणी जर रिटायरमेंटला आलेल्या लोकांना पाठविण्यात आले तर मग नक्षलवाद्यांच्या मागे ....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कोण धावणार आहे? याचेही माननीय गृह मंत्र्यांनी उत्तर द्यावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी सगळ्यांना तेथे पाठविणार असे म्हटलेले नाही तर काही असे म्हटलेले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जे सांगितले ते खरे आहे की, त्या परिसरामध्ये पोस्टींग केल्यानंतर तेथील टेन्युअर पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या मागणी प्रमाणे त्यांना जिल्ह्यामध्ये पोस्टींग करण्याबाबत आपण आश्वासन दिलेले आहे. पण अनेक अधिकारी त्या परिसरामध्ये 8-8 वर्षे अडकून पडलेले आहेत. तेथे पर्यायी माणसे जाण्यास तयार नाहीत आणि एकदा तेथे गेलेल्या माणसांना बाहेर यावयास वाव नाही, त्यामुळे ते फ्रस्ट्रेड झालेले आहेत, अर्ज करीत आहेत, निघून जात आहेत ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि मी स्वतः मुख्य सचिवांना सूचना दिलेल्या आहेत की, ज्यांचा टेन्युअर पूर्ण झालेला आहे, त्यांना त्यांच्या डिमांडनुसार बदलण्यात यावे आणि तेथे नवीन माणसे देण्यात यावीत.

----

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील निळजे ग्रामपंचायतीचे सरपंच यांनी मुंबईतील एका शैक्षणिक संस्थेकडे ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला देण्यासाठी साडेपाच कोटी रूपयांची केलेली मागणी**

**(2) * 12929 श्रीमती अलका देसाई , श्री.राजन तेली , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्री.सुभाष चव्हाण , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.अमरनाथ राजूरकर , प्रा.सुरेश नवले , श्री.धनंजय मुंडे , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.रामनाथ मोते** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) डोंबिवली (जि.ठाणे) येथील निळजे ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक आणि इतर तीन सदस्यांनी मुंबईतील एका शैक्षणिक संस्थेकडे ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला देण्यासाठी साडेपाच कोटी रूपयांची मागणी केल्याप्रकरणी त्यांच्याविरूद्ध संबंधित पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आल्याचे माहे जानेवारी, 2011 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार या प्रकरणातील दोषी आढळून येणाऱ्या सरपंच व इतर संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्या करिता** : (1) होय, हे खरे आहे.

(2), (3) व (4) सदर प्रकरणी आलोसे (1) श्री.रविंद्र धर्मा पाटील (सरपंच), (2) श्री.विवेक भिमराव देवरे (ग्रामविकास अधिकारी), (3) श्री.संजय शांताराम गायकर (सदस्य), (4) श्री.यशवंत आंबो पाटील, (सदस्य), (5) श्री.गिरीधर मारुती पाटील (सदस्य) यांचेविरुध्द मानपाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक 01/2011 लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, 1988 कलम 7 सह भारतीय दंड संहिता कलम 120 (ब) अन्वये दि.07/01/2011 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी लोकसेवक (1) श्री.रविंद्र धर्मा पाटील (सरपंच), (2) श्री.विवेक भिमराव देवरे (ग्रामविकास अधिकारी), यांना दिनांक 07/01/2011 रोजी तर (3) श्री.संजय शांताराम गायकर (सदस्य), (4) श्री.यशवंत आंबो पाटील, (सदस्य) (5) श्री.गिरीधर मारुती पाटील (सदस्य) यांना दिनांक 09/01/2011 रोजी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली. मा.विशेष न्यायालयाने त्यांना दिनांक 12/01/2011 पर्यंन्त पोलीस कोठडी मंजूर करुन, दिनांक 12/01/2011 रोजी सर्व आरोपींना जामीनावर मुक्त केले आहे. आलोसे (2) श्री.विवेक भिमराव देवरे, ग्रामविकास अधिकारी यांना दिनांक 27/01/2011 पासून शासन सेवेतून निलंबित केले आहे. तसेच आलोसे (1) श्री.रविंद्र धर्मा पाटील (सरपंच), (3) श्री.संजय शांताराम गायकर (सदस्य), (4) श्री.यशवंत आंबो पाटील, (सदस्य), (5) श्री.गिरीधर मारुती पाटील (सदस्य) यांच्याविरुध्द कारवाईबाबतचा प्रस्ताव दिनांक 31/01/2011 अन्वेय विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, श्री. विवेक भीमराव देवरे, ग्रामविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईतील एका शैक्षणिक संस्थेला जागेच्या बदल्यात ना हरकत परवाना देण्याचे पेपर तयार झाले हे खरे आहे काय?



12929....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, श्री. संजय शांताराम गायकर, श्री. गिरीधर मारुती पाटील यांच्या विरुध्द कारवाईबाबतचा प्रस्ताव दिनांक 31/01/2011 अन्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. तो प्रस्ताव लवकरात लवकर मान्य होऊन त्यांना बडतर्फ कधी करणार?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, ग्रामसेवकांना निलंबित करण्यात आलेले आहे तसेच नियम 29 अन्वये विभागीय आयुक्तांची जी चौकशी असते ती, सी.ओ. लेव्हलवर चौकशी होत असते. विभागीय आयुक्तांनी त्या प्रमाणे सी.ओ. ना पत्र पाठवून त्यांची चौकशी करुन निर्णय घेण्याची विनंती केलेली आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भात मी पुरवणी उत्तर देऊ इच्छितो. सभापती महोदय, ही एकूण 26 एकर जमीन आहे. त्यांचे जे संभाषण झाले होते ते ॲन्टी करप्शन ब्युरो मार्फत टेप करण्यात आलेले आहे, ते मी ऐकलेले आहे. ग्रामसेवक, सरपंच आणि सगळया पक्षाचे ग्रामपंचायतीचे सदस्य या सगळयांची अशी इच्छा होती की, पाच कोटी रुपये त्या गावच्या विकासासाठी देण्यात यावेत आणि 54 लाख रुपये त्यांच्यामध्ये वाटून घेण्यासाठी द्यावेत, अशा प्रकारचे संभाषण झाले होते. ते टेप झालेले आहे, त्याच्या आधारावर ॲन्टी करप्शन ब्युरोकडे गुन्हयाची नोंद झालेली आहे. कायद्या प्रमाणे ग्रामसेवकाला निलंबित करण्यात आलेले आहे. पण ग्रामपंचायतीच्या कायद्यानुसार त्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत अटक होऊन गुन्हा दाखल झालेले ग्रामपंचयातीचे सरपंच किंवा सदस्य यांना त्यांच्या पदाच्या कामापासून दूर अथवा वंचित ठेवण्याची किंवा निर्दोष सिध्द होईपर्यंत निलंबित करण्या बाबतची ग्रामपंचायतीच्या नियमात कुठेही तरतूद नसल्यामुळे आयुक्तांनी ग्रामविकास सचिवांना कळविले आहे की, अशा पध्दतीचा बदल किंवा अशा प्रकारची तरतूद ॲक्टमध्ये करण्यात यावी जेणे करुन त्यांना निलंबित करता येईल. आज कायद्यात तरतूद नसल्यामुळे त्यांना निलंबित करता आलेले नाही. पण त्यांना अटक करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्याबाबतचा सगळा तपास पोलिसांनी केलेला आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, कायद्याच्या कक्षेत राहून कारवाई झालेली आहे परंतू ज्याच्यामुळे हा प्रश्न तयार झाला. ज्या संस्थेने ती जागा शाळेसाठी मागितली होती, त्या संस्थेला

..3..



ता.प्र.क्र. 12929......

श्री. भाई जगताप....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही जागा देण्याच्या बाबतीत शासन काही प्रयत्न करणार आहे काय? मंत्री महोदयांनी उत्तर देतांना सांगितले की, या ठिकाणी 26 एकर जागा आहे आणि ही 26 एकर जागा त्या शैक्षणिक संस्थेने मागितलेली आहे. ती 26 एकर जागा योग्य आहे काय, याची पडताळणी करण्यात येणार आहे काय आणि त्या शैक्षणिक संस्थेला ही जागा मिळण्यासाठी मदत करण्यात येणार आहे काय?

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, ही जागा महसूल व वन विभागाने सन 2009 मध्ये या संस्थेला दिली होती. त्या संस्थेकडे किती जागा आहे, त्या संस्थेच्या किती शाखा आहेत, त्यांना ही जागा देणे योग्य आहे की अयोग्य आहे, हे पोलिसांनी तपासलेले नाही. पोलिसांचा हा विषय देखील नाही. जागा देणाऱ्या विभागाचा हा विषय आहे. त्यासंबंधीची माहिती मी देखील घेतली होती. मला अशी माहिती मिळाली की, इंटर नॅशनल सोसायटी फॉर एक्सलन्स इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च, मुंबई या शैक्षणिक संस्थेला ही जागा देण्यात आली होती. या संस्थेचे अध्यक्ष श्री. रमेश जाधव हे आहेत. त्यांच्याकडे पैशाची मागणी केल्या नंतर त्यांनी ॲन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार केली होती.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. आज राज्यात अनेक ठिकाणी मग ते नगराध्यक्ष असतील, सरपंच असतील जे कोणी ॲथॉरिटी आहेत ते आणि जे अधिकारी आहेत त्यांच्याकडून अशा प्रकारे पैसे मागण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भात सुध्दा साडेपाच कोटी रुपये मागण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र. क्र. 12929 .... श्री. राजन तेली ...

माननीय मंत्री महोदय श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितले की, साडेपाच कोटी रुपये मागितल्याची टेप सुध्दा आपल्याकडे आहे. 31.1.2011 रोजी कोकण विभागाच्या आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. पूर्वी कलम 39(3) खाली स्थायी समिती सरपंचावर करावाई करावयाची. आता हे अधिकार आयुक्तांकडे दिलेले आहेत. 31.1.2011 ला प्रस्ताव पाठविलेला आहे. माननीय ग्रामविकास राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. आयुक्तांना अधिकार आहेत. त्या ठिकाणी पैसे मागितले हे सकृतदर्शनी सिध्द झालेले आहे. तशी टेप आहे. आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे ही कारवाई किती दिवसात करणार ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे हायकोर्टाने हरदेवसिंग विरुध्द राज्य सरकार या प्रकरणामध्ये निर्णय दिलेला आहे. अशा प्रकरणामध्ये संबंधित व्यक्ती दोषी आढळून सुध्दा त्यांना दूर करण्याची कारवाई करता येणार नाही असा हायकोर्टाचा निर्णय आहे. हायकोर्टाचा जो निर्णय आहे त्या अनुषंगाने आयुक्तांनी हा निर्णय घेतलेला आहे. या बाबतीत जो निर्णय घ्यावयाचा असेल, जी दुरुस्ती करावयाची असेल ती दुरुस्ती ग्रामविकास विभागाला सांगून लवकरात लवकर केली जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, ग्रामपंचायत अधिनियमातील कलम 39(1) अंतर्गत त्यांना नोटीस पाठवून, त्यांच्याकडून खुलासा घेऊन तीन महिन्यात कारवाई करण्याचे अधिकार आहेत. त्याची अंमलबजावणी शासन करणार का ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, महसूल आयुक्तांना या कलमान्वये कारवाई करता येईल का हे तपासून बघण्यास सांगण्यात येईल. पोलीस ती कारवाई करीत नाहीत. पोलिसांना ते अधिकार नाहीत. या कलमान्वये कारवाई करता येणे शक्य आहे का या बाबत महसूल आयुक्तांना कळविण्यात येईल. कारवाई करता येणे शक्य असेल तर कायदेशीर सल्ला घेऊन आपण ती कारवाई करावी अशी सूचनाही गृह विभागातर्फे दिली जाईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र. क्र. 12929 ....

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सदर जागा गावठाणापासून किती लांब आहे ? सदर जागेमध्ये नवीन कायद्याप्रमाणे आता नाहरकत दाखला घेण्याची गरज नाही. राज्य शासनाने आता कायदा बदललेला आहे. गायरान किंवा गावठाण जमीन शैक्षणिक संस्थेला किंवा कोणत्या संस्थेला द्यावयाची असेल तर आता ग्रामपंचायतीचा दाखला लागत नाही. असे असताना त्या ठिकाणी त्या संस्थेला नाहरकत दाखला मागण्याची गरज का भासली ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, हे प्रकरण 2009 मधील आहे. त्या वेळी नियमात काय तरतूद होती याची माहिती माझ्याकडे नाही. ही जागा गावठाणापासून किती दूर आहे याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/

**गारगांव (ता.वाडा,जि.ठाणे) येथील वाडा ते डाहे (गारगांव) रस्ता दुरुस्ती कामात झालेला गैरव्यवहार**

**(३) * १३६२४ श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.रामनाथ मोते , श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारगांव (ता.वाडा,जि.ठाणे) येथील अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ ठाणे यांच्या अखत्यारितील जव्हार उपविभागामध्ये असलेल्या वाडा ते डाहे (गारगांव) या रस्त्याच्या कामात दुरुस्ती न करताच दिनांक ३१ मार्च, २०१० रोजी वा त्या सुमारास नाबार्डचा निधी परत जाऊ नये हे कारण सांगून सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांनी रु.२५ लाखांचे पेमेंट आगाव काढून निधीचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशत: खरे आहे.

पालघर-वाडा-देवगाव रस्त्यावरील मांडवा पुलाचे काम न करताच रु.१६.९३ लक्ष रकमेचा धनादेश काढलेला आहे, परंतु तो अदा केलेला नाही.

(२) होय,

चौकशीत आढळून आलेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, हा विषय जव्हार सारख्या आदिवासी भागातील आहे. या सगळ्या भागामध्ये रस्ते केले जात नाहीत आणि पैसे लुबाडले जातात. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, चौकशीत आढळून आलेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येत आहे. त्यांनी पैसे काढलेले आहेत हे शासनाने उत्तरामध्ये मान्य केलेले आहे. जव्हारमध्ये अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. परवा शहापूरमध्ये अशाच एका अधिकाऱ्याला निलंबित केले. त्या ठिकाणी असा प्रकार निदर्शनास आला होता आणि तेथील सभापतीच उपोषणाला बसल्या होत्या. या जिल्ह्यातील आदिवासी भागात हे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडतात. यामध्ये अधिकाऱ्यांची चौकशी झालेली आहे आता फक्त शिस्तभंगाची कारवाई करावयाची आहे. किती अधिकारी होते हे देखील सिध्द झालेले आहे. या प्रकरणामध्ये जे संबंधित अधिकारी आहेत त्यांना त्वरित निलंबित करणार का ?

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13624 ......

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, या संदर्भामध्ये कार्यकारी अभियंता आणि त्याच बरोबर कनिष्ठ अभियंता या दोघांना ताबडतोब निलंबित करण्यात आले आहे. या दोघांची ताबडतोब विभागीय चौकशी करण्याचे निदेश सुध्दा देण्यात आलेले आहेत. त्यांची विभागीय चौकशी त्वरित सुरु होईल. उत्तरात म्हटल्याप्रमाणे त्यांनी चेक काढले होते पण दिले नव्हते. नाबार्डचा निधी 31 मार्चला परत जाऊ नये म्हणून त्यांनी अगोदर चेक काढले होते हे खरे आहे परंतु चेक जरी दिले नाही तरी अशा प्रकारचा चेक काढणे ही जरुर अनियमितता आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ... ता.प्र.क्र.13624.....

त्यामुळे ज्यांचा या प्रकरणात सहभाग होता त्या दोघांना निलंबित केले असून त्यांची डी.इ.सुरु होणार आहे. यापैकी एका अधिकाऱ्याचे नाव श्री.मोडके व दुसऱ्या अधिकाऱ्याचे नाव श्री.तांदळे असे आहे.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/

**कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम) विभाग यांचे जव्हार येथील नियुक्तीसंदर्भात**

**(4) * 13914 श्री.जगदीश गुप्ता, श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.रामनाथ मोते , श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) श्री.एन.बी.मोडके कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जव्हार यांना सन 1995-96 मध्ये वा त्या दरम्यान उप अभियंता म्हणून कार्यरत असताना एक पूल कोसळून 10 ते 12 लोक मृत्यूमुखी पडले म्हणून निलंबित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, श्री.मोडके यांना सन 2002-03 वा त्या दरम्यान जव्हार येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असताना लोकलेखा समितीने त्यांच्या कामाबाबत आक्षेप घेतल्याने त्यांना निलंबित केले होते, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या विभागातून त्यांना दोन वेळा त्यांच्या निकृष्ट कामाबाबत निलंबित करुनही परत राज्य शासनाने त्यांना जव्हार याच ठिकाणी कार्यकारी अभियंता म्हणून नियुक्ती दिली, हे ही खरे आहे काय,

(4) श्री.मोडके यांच्या निलंबनाच्याच ठिकाणी पुन्हा नियुक्ती देण्यामागील कारणे काय आहेत,

(5) तसेच त्यांच्या पुन्हा जव्हार येथे नियुक्ती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ** : (1) उल्हास नदीवरील गांधारी गावाजवळील (जि.ठाणे) पूल दि.08/04/1991 रोजी कोसळून एक मजूर मृत्यूमुखी पडल्याने श्री.एन.बी.मोडके, सहाय्यक अभियंता (श्रेणी-1) व इतर 2 यांना निलंबित करण्यात आले होते.

(2) श्री.एन.बी.मोडके, कार्यकारी अभियंता यांनी त्यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीसला उत्तर न दिल्याने लोकलेखा समितीच्या निदेशानुसार त्यांना निलंबित करण्यात आले होते.

(3) होय.

(4) श्री.मोडके, कार्यकारी अभियंता, सा.बां. (उत्तर) विभाग, रत्नागिरी यांची प्रशासकीय कारणास्तव जव्हार येथे बदली करण्यात आली आहे.

(5) व (6) जव्हार येथे प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न सुध्दा श्री.मोडके यांच्याशी संबंधित आहे. हे श्री.मोडके म्हणजे महान अधिकारी आहेत. त्यांनी 1995-96 मध्ये उप अभियंता असताना एक पूल बांधला होता, तो पूल कोसळला. त्यामध्ये 12 लोक मृत्यूमुखी पडल्यामुळे श्री.मोडके यांना

3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13914.... श्री.पांडुरंग फुंडकर.....

निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर सन 2002-03 मध्ये जव्हार येथे त्यांची कार्यकारी अभियंता म्हणून नेमणूक झाली. परंतु लोकलेखा समितीने त्यांच्या कामाबद्दल आक्षेप घेतल्यावर त्यांना निलंबित केले होते. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे निलंबित केल्यानंतर शासनाने त्यांना बढती देऊन पुन्हा सेवेत घेतले. मंत्री महोदयांनी या दोन्ही गोष्टी मान्य केल्या आहेत. परंतु लेखी उत्तरामध्ये "प्रशासकीय कारणास्तव श्री.मोडके यांची जव्हार येथे बदली करण्यात आली" असे नमूद केलेले आहे. या अधिकाऱ्यांची वारंवार बदली केली जाते, त्यांना बढती दिली जाते, पुन्हा निलंबित केले जाते. म्हणजे हे महान अधिकारी आहेत. या अधिकाऱ्यांनी जव्हार येथे भ्रष्टाचार केल्यानंतर त्यांना पुन्हा निलंबित केले होते. परंतु त्यांच्यावर अद्याप दोषारोप ठेवलेला नाही हे खरे आहे काय, अशा या महान अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करुन त्यांच्या संपत्तीची चौकशी शासन करणार आहे का ?

श्री.छगन भुजबळ : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे म्हटले आहे त्याबाबत मी त्यांना सांगेन की, उल्हास नदीवर गांधारी गावाजवळ पुलाचे काम सुरु असताना दिनांक 8.4.1991 रोजी पूल कोसळला होता. त्यामध्ये 12 लोक नाही तर 1 मजूर मरण पावला होता. या कारणास्तव श्री.मोडके यांना निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर त्यांची दोन वर्षाकरिता वेतनवाढ रोखली होती. तसेच त्यांची डी.इ.सुरु केली होती. त्यानंतर त्यांची ठाणे जिल्ह्यात बदली करण्यात आली. परंतु लोकलेखा समितीला साक्षीच्या वेळी त्यांनी उत्तर न दिल्यामुळे त्यांना पुन्हा 1 वर्ष 8 महिने निलंबित केले होते, 3 वर्षाकरिता वेतनवाढ रोखली होती. श्री.मोडके यांची 1991 पासून वेगवेगळ्या ठिकाणी बदली करण्यात आली होती. केवळ एकाच ठिकाणी बदली करण्यात आली असे नाही. भिवंडी, चिपळूण येथे बदली केली होती. त्यानंतर मुंबईत पी.ए. म्हणून साईड पोस्टिंग दिली होती. तसेच यवतमाळ येथेही बदली केली होती. गेल्या 20 वर्षात त्यांच्या बदल्या झालेल्या आहेत. ज्यावेळी सार्वत्रिक स्वरुपाच्या बदल्या करण्यात आल्या त्यावेळी जव्हार येथे रिक्त जागेवर त्यांची नियुक्ती केली होती. आता त्यांना निलंबित केले असून त्यांची डी.इ.निर्देशित केली आहे व ती ताबडतोब सुरु होईल. डी.इ.मध्ये जे आढळेल त्यानुसार जरुर पुढील कारवाई केली जाईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ पूर्वी श्री. खंदारे 14:15

ता.प्र.क्र. 13914.....

श्री. रामनाथ मोते : सन्माननीय मंत्री महोदयांनी श्री. मोडके यांचा सर्व इतिहास सांगितलेला आहे. तीन प्रकरणामध्ये अधिकारी दोषी सापडला, त्याचे निलंबन झाले, त्याची वेतनवाढ रोखली, त्यांची डी.ई.सुरु झाली. त्या प्रकरणामध्ये ते अधिकारी दोषी आहेत, त्या अधिका-यांनी अनियमिता केलेली आहे, कामामध्ये हलगर्जीपणाचा गुन्हा केलेला आहे. असा अधिकारी पुन्हा त्याच ठिकाणी येणे बरोबर नाही. संबंधित अधिका-यावर जी काही कारवाई व्हायची ती होईल. पण तो अधिकारी पुन्हा जव्हारमध्ये येणार नाही याची काळजी शासन घेईल काय ?

श्री.छगन भुजबळ : 20 वर्षातील ही प्रकरणे आहेत. 20 वर्षामध्ये वेगवेगळया ठिकाणी या अधिका-याच्या बदल्या केलेल्या आहेत. मे महिन्यामध्ये हा अधिकारी सेवानिवृत्त होणार आहे. म्हणून त्याला ताबडतोब निलंबित करुन विभागीय चौकशी करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्यामुळे त्याला सेवानिवृत्तीचे लाभ देखील मिळू शकणार नाहीत. या प्रकारे कारवाई केलेली आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई-नाशिक रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम अपूर्ण असतानाही सुरु करण्यात आलेली टोलवसुली**

**(५) * १२८०२ श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.जगदीश गुप्ता , डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-नाशिक रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम अपूर्ण असतानाही या रस्त्यावर टोल वसूली सुरु केल्याने जनतेमध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित कत्रांटदारावर व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही. मुंबई-नाशिक रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत प्रगतीपथावर आहे. कामाची एकूण लांबी ९९.५ कि.मी. असून त्यापैकी ९९.२ कि.मी. काम पूर्ण झालेले आहे. या कामाच्या निविदा शर्तीनुसार एकूण २ पथकर नाके असून ५० कि.मी. काम पूर्ण झाल्यावर पहिला पथकर नाका सुरु करण्याची परवानगी आहे. निविदा शर्तीनुसार कि.मी.४५५/८०० मध्ये घोटी गावाजवळ पहिला पथकर नाका २९.५.२०१० पासून सुरु करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : प्रश्न भाग (1)ला "अंशत: खरे आहे" असे उत्तर दिलेले आहे. हा रस्ता "बीओटी" तत्वावर दिलेला आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झालेले नसतानाही ठेकेदार लोकांकडून टोल वसूल करीत आहे. निविदा अंतिम करताना टोल वसुली संबंधी कोणता करार करण्यात आला होता, प्रकल्पाची किंमत किती आहे आणि टोल वसुलीचा कालावधी किती आहे ?

श्री. छगन भुजबळ : हा राष्ट्रीय महामार्ग आहे. या प्रकल्पाचे काम केन्द्र शासनाच्या अधिनस्त असलेल्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या मार्फत प्रगतिपथावर आहे. वडपे ते गोंदे या रस्त्याची लांबी 99.5 कि.मी.आहे. चौपदरीकरणाच्या कामाची किंमत 579 कोटी रुपये आहे. या रस्त्यावर दोन टोल नाके आहेत. पहिले 50 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर टोल लावण्यासंबंधी करार करण्यात आलेला आहे. तसेच दुसरा 50 टक्के भाग पूर्ण झाल्यानंतर टोल लावण्यासंबंधीचा करार करण्यात आलेला आहे. दुसरा 50 टक्के भाग अजून पूर्ण झालेला नसल्यामुळे तेथे टोल लावलेला नाही. दुस-या भागाचे काम पूर्ण होत आलेले आहे.त्या भागामध्ये

..3..



MSS/ D/ पूर्वी श्री. खंदारे 14:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रेल्वे ओव्हर ब्रिजचे काम सुरु आहे. तीन आरओबी पूर्ण झालेले आहेत. उर्वरित काम सुरु आहे. जेथे काम पूर्ण झालेले आहे तेथे टोल लावलेला असून जेथे काम अपूर्ण राहिलेले आहे तेथे टोल लावलेला नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : आहिरीला लागून असलेला नाशिक शहरातील पूल किती दिवसात पूर्ण होईल ?

श्री.छगन भुजबळ : सन्माननीय सदस्यांनी ज्या भागाचा आता उल्लेख केला तो भाग आणि तेथून आणखी पुढे गोंदे पासून पिंपळगाव पर्यन्त हा 6 पदरी रस्ता आहे. हा रस्ता पूर्वी शहरातून जात होता. हा रस्ता तसाच शहरातून गेला असता तर मोठ्या प्रमाणावर अपघात झाले असते. म्हणून हा शहरातून जाणारा 6 पदरी रस्ता फ्लायओव्हर करावा असा आम्ही आग्रह धरला. ज्यांना मुंबईकडून धुळयाकडे किंवा धुळयाहून मुंबईकडे यावयाचे आहे त्यांना ......

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ... ता.प्र.क्र.12802...

नाशिक शहरात येण्याचे काही कारण नाही. त्यामुळे प्रदूषण वाचेल, अपघात वाचतील. या कामाला उशीर झालेला आहे. सदरचे काम सुरु झाल्यानंतर या रस्त्याच्या लगत झाडे होती, ती तोडू नयेत या अनुषंगाने कोर्टात केसेस सुरु झाल्या. त्यामुळे ते काम उशिरा सुरु झाले. हा जो नाशिक शहरातील पूल आहे, हा मार्च 2012 पर्यंत पूर्ण होईल. सध्या हे काम अतिशय वेगाने सुरु आहे. हा पूल साधारणपणे 5 कि.मी.अंतराचा आहे. देशातील क्रमांक 2 नंबरचा असलेला मोठा पूल आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, या पुलाचे काम थोडे राहिलेले आहे. सदर पुलाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी संबंधित कंपनीस किती कालावधी दिला होता, सदर कंपनीने कालावधीत काम पूर्ण केले आहे काय, ठरवून दिलेल्या कालावधीत कंपनीने काम पूर्ण केले नसेल तर त्या कंपनी विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली, तसेच, या पुलावरील टोल वसुलीची कालमर्यादा किती आहे ?

श्री.छगन भुजबळ : सन्माननीय विरोधी पक्ष नेते वारंवार विचारीत आहेत की, तुम्ही अमूक कंपनीस काम दिले, त्यांचे समवेत ॲग्रीमेंट केले, तुम्ही टोल लावला. या बाबतीत सांगू इच्छितो की, राज्य शासनाने तो रस्ता चारपदरी व्हावा एवढाच प्रयत्न केलेला आहे. या रस्त्याचे काम व्हावे म्हणून केंद्र शासनाकडे सातत्याने आग्रह धरावा लागतो, तो आग्रह शासनाच्या माध्यमातून धरतो आहोत. या कामाचे कंत्राटदार ठरविणे, त्यांचे समवेत ॲग्रीमेंट करणे, तसेच कामाचा कालावधी ठरविणे इत्यादी गोष्टी केंद्र शासनाच्या माध्यमातून झालेल्या आहेत. या ठिकाणी टोलचा कालावधी किती आहे या बाबतची माहिती तपासून घेतो व ती माहिती सभागृहात नंतर सादर करतो.

श्री. केशवराव मानकर : या कामाची एकूण किंमत किती, टोल कधीपर्यंत वसूल केला जाणार आहे, त्या बाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांकडे नसेल तर ते बरोबर नाही असे मला वाटते, सदर काम केंद्र सरकारचे जरी असले तरी महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे ते मंत्री आहेत. त्यामुळे सभागृहाला ती माहिती देण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे.

**सभापती** : आपण स्पेसिफीक प्रश्न विचारावा.

श्री. केशवराव मानकर : माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय, ते काम लवकर पूर्ण करण्यासाठी कोणते उपाय शासनामार्फत केले जाणार आहेत ?

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12802...

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, पहिले काम फॉरेस्टच्या क्लिअरन्स व जमीन भूसंपादन यामुळे उशिरा सुरु झाले. या कामास मे, 2011 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या पुलावरील टोल वसुलीचा कालावधी 2006 ते 2016 पर्यंत आहे.

------------

3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी एलआयसी प्रमाणे**

**पीक विमा महामंडळ स्थापन करण्याबाबत**

**(६) * १४०५३ श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार, श्री.मोहन जोशी , श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्रीमती अलका देसाई , प्रा.सुरेश नवले , श्री.धनंजय मुंडे , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.रामनाथ मोते , श्री.सुरेशदादा देशमुख , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.हुसेन दलवाई , श्री.संजय केळकर, श्री.चंद्रकांत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सध्याच्या पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीतील चुकीच्या निकषामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत नसल्याने पश्चिम महाराष्ट्र, कोकण, खानदेश, या विभागातील शेतकऱ्यांनी या योजनेकडे पाठ फिरविल्याचे माहे डिसेंबर, २०१० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "एलआयसी" प्रमाणे "पीक विमा महामंडळ" स्थापन करावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पीक विमा महामंडळ स्थापन करण्याबाबत मागणी विचाराधीन असल्यास त्याची अंमलबजावणी किती कालावधीत करण्यात येणार आहे,

(४) तसेच नुकसानग्रस्त पिकाला उत्पादन खर्चा एवढी पीक विमा रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.राधाकृष्ण-विखे पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) पीक विमा महामंडळ स्थापन करण्याबाबत मागणी प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) राष्ट्रीय कृषी विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येत असून सदर योजनेअंतर्गत विहित सूत्रानुसार नुकसान भरपाई देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

४...





ता.प्र.क्र. १४०५३

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू.जमा : सभापति महोदय, किसानों से संबंधित यह बहुत ही गंभीर प्रश्न है. पीक बीमा योजना केन्द्र सरकार की योजना है . किसानों की फसल को होने वाले नुकसान की भरपाई से संबंधित यह योजना है. यह योजना एलआईसी द्वारा संचालित की जाती है. महाराष्ट्र में इस योजना का फायदा देने के लिए हम रबी और खरीप की फसल की आणेवारी निकालते हैं कि वहां कितनी उपज हुई है. मेरा कहना है कि आणेवारी निकालने की पद्धति में बहुत कमियां हैं. इस काम में बहुत समय लग जाता है. आणेवारी निकालने की सिस्टम बहुत पुरानी है. यहां पर जो उत्तर माननीय मंत्री महोदाय ने दिया है उसमें गंभीरता दिखायी नहीं देती है. यहां पर बैठे सभी माननीय सदस्यों से मैं कहूंगा कि वे भी इस प्रश्न पर ध्यान देकर अपना सहयोग दें.

मैं पूछना चाहता हूं कि इस योजना के अंतर्गत हमारे किसानों ने कितना प्रीमियम अभी तक भरा है. पश्चिम महाराष्ट्र, कोंकण, खानदेश तथा अन्य सभी विभागों से संबंधित यह जानकारी हमें मिलनी चाहिए तथा यह जानकारी भी हमें मिलनी चाहिए कि मुआवजे के तौर पर अभी तक कुल कितनी रकम हमारे किसानों को इस योजना के माध्यम से मिली है. नागपुर क्षेत्र की जानकारी तो मेरे पास है. मेरी जानकारी के अनुसार जितना प्रीमियम अभी तक किसानों ने दिया है उसका आधा पैसा भी अभी तक वहां के किसानों को मुआवजे के तौर पर नहीं मिला है. वहां पर जनवरी महीने में एक मीटिंग इस संबंध में ली गयी थी. उसमें माननीय आमदारों को भी बुलाया गया था. मैं भी उस मीटिंग में गया था. बहुत सारे सुझाव वहां पर दिए गए थे. वहां पर विभागीय कृषि संचालक ने बताया कि सभी सुझावों पर विचार करने के बाद सरकार द्वारा लिए गए निर्णयों की जानकारी बाद में दे दी जाएगी. मेरा कहना है कि आणेवारी सिस्टम बहुत पुराना है वह बदला जाना चाहिए.

**सभापति** : जमा साहब, आपने काफी बातें बता दी हैं, अब आप अपना सवाल पूछिए.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, मेरे दो प्रश्न हैं. एक प्रश्न यह है कि किसानों ने जो प्रीमियम अभी तक दिया है, उसकी तुलना में किसानों को अभी तक कितना मुआवजा दिया गया है. दूसरा प्रश्न मेरा यह है कि क्या आणेवारी निकालने की पद्धति को सुधारने के संबंध में शासन कुछ नया निर्णय लेगा ?

यानंतर श्री. भोगले...

ता.प्र.क्र.14053......

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेली विमा कंपनी ही एलआयसी नसून केंद्र सरकारच्या एआयसी विमा कंपनीमार्फत ही योजना राबविली जाते. राष्ट्रीय कृषी विमा योजना केंद्र सरकारच्या पुढाकाराने 1999 साली सुरु झाली. मागील 10 वर्षाचा आढावा घेतला असता या योजनेमध्ये साधारणत: 2.57 कोटी शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आणि त्यांच्याकडून विमा हत्याची रक्कम म्हणून 483 कोटी रुपये भरणा करण्यात आली असल्याचे आढळून आले. विमा कंपनीकडून भरपाई म्हणून जो मोबदला दिला गेला ती रक्कम 1870 कोटी रुपये इतकी असून राज्य सरकारने सुध्दा आतापर्यंत 81 कोटी रुपयांचा वाटा विमा हप्त्यापोटी दिलेला आहे. माननीय सदस्यांनी आणेवारी पध्दतीबाबत किंवा विम्याच्या कार्य पध्दतीमध्ये सुधारणा करण्याबद्दल प्रश्न उपस्थित केला आहे. पीक कापणी प्रयोग आणि उंबरठा उत्पन्नाचा आधार घेऊन नुकसान भरपाई निश्चित केली जाते. या पध्दतीमध्ये काही दोष आहेत किंवा कोणत्या सुधारणा करावयाच्या आहेत त्या लक्षात घेऊन नवीन पध्दतीने पीक विमा योजना तयार करण्यासाठी राज्य सरकारने पाऊल उचलले आहे. मध्यंतरी राज्याच्या कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांकडून, स्थानिक लोकप्रतिनिधींकडून, माननीय सदस्यांकडून सूचना मागविलेल्या होत्या.

नंतर 2आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 14053........ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.........

ती माहिती संकलित झालेली आहे. त्यानुसार पाच खाजगी कंपन्यांनी अभिप्रायासह नवीन प्रस्ताव सादर केले आहेत. अशा प्रकारे अधिकाधिक शेतकऱ्यांना सहभागी करुन घेण्याच्या दृष्टीने या कार्यक्रमात बदल करण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न सुरु आहेत.

श्री. अरुण गुजराथी : महोदय, मंत्री महोदयांनी प्रश्न क्र. 2 ला उत्तर देताना पीक विमा महामंडळ स्थापन करण्याबाबतची मागणी प्राप्त झालेली नाही असे सांगितले आहे. मी याच प्रश्नाच्या माध्यमातून अशी मागणी करीत आहे की, पीक विमा योजना महामंडळाची स्थापना शासन करणार आहे काय, कारण आज अस्तित्वात असलेली योजना पूर्णपणे अयशस्वी ठरलेली आहे. म्हणून शासन "फार्मर्स फ्रेंडली क्रॉप्स इन्शुरन्स स्कीम" या धर्तीवर विचार करणार काय, जेणेकरुन अशा योजनेच्या माध्यमातून केळी व द्राक्ष फळ बागायतदारांना सुध्दा लाभ मिळेल. यादृष्टीने शासन विचार करणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, नवीन पीक विमा योजनेबाबत मी मघाशीच उत्तर दिलेले आहे. नैसर्गिक आपत्ती अथवा अन्य आपत्ती नंतर किंवा कमी उत्पन्नामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी अथवा शेतकऱ्यांना मदत मिळावी म्हणून ही योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी नवीन महामंडळ स्थापन करण्याची गरज नाही. तसेच केंद्र शासनाच्या ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कॉर्पोरेशन या योजनेतून केंद्र शासन व राज्य शासन यांच्या संयुक्त सहभागाने ही कार्यवाही चालू आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्यानुसार फळबागांचा या सध्याच्या योजनेत समावेश नसल्यामुळे अशा फळबाग शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून शासन जरुर विचार करील. यामध्ये आपण नारळाला प्रायोगिक तत्वावर मान्यता दिलेली आहे तसेच आंबा वगैरे विम्याचा हप्ता जास्त असल्यामुळे ही योजना यशस्वी होऊ शकली नाही. परंतु नवीन सुधारित पीक विमा योजनेबाबत विचार करता त्यात केळी, द्राक्ष, नारळ, डाळिंब तसेच अन्य फळ पिकांचा समावेश करावा व सर्वंकष पीक विमा योजना केंद्र शासनाचा सहभाग कमी असला तरी अधिकची रक्कम राज्य शासनाने देऊन ही योजना राबविण्याचा विचार आहे. तसेच यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा पुढाकार घेतलेला आहे. अशा प्रकारे राज्यात सर्वंकष पीक विमा योजना आणण्याच्या दृष्टीने धोरण घेण्याचाही शासनाचा विचार आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--------

( ....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन 2009-10 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीचा सन 2008-09 चा बावीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन 2006-2007 चा सदतिसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम, 2011 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर.0808/प्र.क्र.153/परि-2 दिनांकित 22 मार्च,2011 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : आश्वासनाची यादी सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, विधान परिषदेच्या सन 2010 च्या तिस-या(हिवाळी) अधिवेशनात सभागृहात दिनांक 1 डिसेंबर, 2010 ते 16 डिसेंबर, 2010 या कालावधीत मा. मंत्री/मा. राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 418 आश्वासनांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबतचे जोडलेले विवरण छापावे.)

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, सन 1982 च्या दुस-या अधिवेशनापासून ते सन 2010 च्या तिस-या (हिवाळी) अधिवेशनापर्यंत देण्यात आलेल्या आश्वासनापैकी एकूण 750 आश्वासनावरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : विवरण सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबतचे जोडलेले विवरण छापावे.)

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2005-2006, व 2006-2007 चा अनुक्रमे त्रेचाळीसावा व चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने,कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2009-2010 चा वार्षिक वित्तीय अहवाल, सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ मर्यादितचे सन 1999-2000,2000-2001,2001-2002,2002-2003, 2003-2004, 2004-2005, 2005-2006 व 2006-2007 चे वार्षिक अहवाल व ताळेबंद-नफा तोटा पत्रक सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल व ताळेबंद नफा तोटा पत्रक सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

----

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.मु.शी** : नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम,वि.प.स. यांनी "जैतापूर,जि.रत्नागिरी येथे महाऔष्णिक ऊर्जा प्रकल्प उभारण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेली अपघाताची भीती. " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने विवेदन करावे

या नंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते. वि.प.स. यांनी "मे. व्यंकटेश ट्रेडींग कंपनी, भंडारा या कंपनीने निविदा भरलेली असताना पुरवठा विभागाने कंत्राट रद्द केल्याबाबत. " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

या नंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते वि.प.स.यांनी "राज्यात विशेष कृती आराखडयांतर्गत नवापूर, जि. नंदूरबार येथील आदिवासी उपयोजना आणि क्षेत्राबाहेरील तुकडयांना अनुदान मंजूर होऊनही शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वेतनापासून वंचित राहत असल्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

या नंतर सन्माननीय सदस्या डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी " दिनांक 16.4.2011 रोजी मुंबईतील दहिसर येथे दिप्ती चौहान या महिलेने मुलासह केलेली आत्महत्या, दिनांक 17.4.11 रोजी डोंबिवली येथील विद्यार्थीनीवर चाकूने वार करुन केलेला खून, आशा विविध ठिकाणी महिलांवरील अत्याचार, खून, आत्महत्या अशा प्रकारच्या घडलेल्या घटना." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

या नंतर सन्माननीय सदस्य श्री. किशनचंद तनवाणी, डॉ. निलम गोऱ्हे, वि.प. स. यांनी "मुंबई -पुणे द्रुतगती माहामार्गावर बोर घाटात दिनांक 14.4.2011 रोजी झालेल्या अपघातात दोन ठार तसेच अन्य जखमी होणे, सदर घाटात वारंवार होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

या नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी " मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळाचे आधुनिकीकरण करातांना मुंबई विमानतळ प्राधिकरणाने मातीचे रॅबीट संताक्रुझ, आग्रीपाडा या भागातून जात असलेल्या वाकोला नाल्यामध्ये टाकल्यामुळे नाल्याची रुंदी कमी होत असल्याची तक्रार महानगरपालिकेकडे करुनही दुर्लक्ष करीत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

या नंतर सर्वश्री. परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी, वि.प.स.यांनी " मुंबई-गोवा महामार्गावर 15 किलो मीटर अंतरावर अनधिकृतपणे हॉटेलचे बांधकाम केले असून सदर इमारत अनधिकृत असल्यामुळे गुंठेवारी नियमाखाली कायम करण्याचे प्रयत्न करणे, हॉटेल मालकाला वाचविण्यासाठी हे प्रकरण अप्पर आयुक्त, कोकण भवन यांच्याकडे प्रलंबित असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

या नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, दिवाकर रावते, किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर,वि.प.स.यांनी " अकोला महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्तपदी असलेल्या अधिका-याने अनेक गैरमार्गाने पदोन्नती घेतल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 अन्वयेचे पहिले निवेदन पुढे ढकलण्याबाबत

**सभापती** : नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील एकूण पाच निवेदने आलेली आहेत. यातील पहिले निवेदन आदिवासी विकास विभागाशी सबंधित असून हे निवेदन उद्या चर्चेला घेण्यात यावे अशी विनंती माननीय मंत्री श्री बबनराव पाचपुते यांनी केली असल्यामुळे हे निवेदन उद्या चर्चेला घेण्यात येईल.

----

## जैतापूर विद्युत प्रकल्पाला विरोध करणा-यांवर झालेल्या लाठीहल्याबाबत

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला मिळालेल्या माहितीनुसार आज सकाळी जैतापूर विद्युत कंपनीच्या कार्यालयावर स्थानिक लोक मोर्चा घेऊन गेलेले असतांना स्थानिक ग्रामस्थांवर लाठीहल्ला करण्यात आला आहे. आज सकाळपासून जैतापूर येथे आंदोलन करण्यात येत असून काही लोकांना अटकही करण्यात आली आहे. तेव्हा त्या ठिकाणी नक्की काय घडलेले आहे याबाबत आज संध्याकाळपर्यंत शासनाने निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : गृह मंत्र्यांनी या बाबत खुलासा करावा.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, लवकरात लवकर निवेदन करण्यात येईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी. : पेण, जिल्हा रायगड येथील तालुका कृषी अधिका-यांनी महिला

कर्मचा-याबद्दल काढलेले अश्लील उद्गार

मु.शी. : पेण,जिल्हा रायगड येथील तालुका कृषी अधिका-यांनी महिला कर्मचा-यांबद्दल काढलेले अश्लील उद्गाराबाबत श्री.जयंत प्र.पाटील वि.स.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.राधाकृष्ण विखे पाटील ( कृषी मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र.पाटील यांनी "पेण, जिल्हा रायगड येथील तालुका कृषी अधिका-यांनी महिला कर्मचा-याबद्दल काढलेले अश्लील उदगार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो "

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



- निवेदना नंतर -

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, श्री.अशोक चव्हाण हे कृषी अधिकारी असून कार्यालयातील महिला कर्मचा-यांबरोबर ते अश्लील वर्तन करतात तसेच एका एका महिलेला कॅबिनमध्ये बोलावून हातवारे करतात अशी तक्रार तेथील महिला कर्मचा-यांनी वरिष्ठ अधिका-यांकडे केलेली आहे.श्रीमती क्रांती रविंद्र चौधरी या महिलेने तर पोलिसांमध्ये तक्रार केलेली आहे.त्यामुळे श्री.अशोक चव्हाण यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.या अधिका-याविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय,या सगळया प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे. त्या ठिकाणी जो काही प्रकार घडला आहे त्याबाबतीत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे.त्या गुन्हयाचे स्वरुप विचारात घेऊन श्री अशोक चव्हाण यांना निलंबित करण्यात आले आहे.या व्यतिरिक्त त्यांच्याविरुध्द काही गुन्हे दाखल झालेले आहेत त्या बाबतीत विलंब का झाला आहे. तसेच या बाबत महिला अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली एक तक्रार निवारण समिती नेमण्यात आली आहे. त्यांनी देखील चौकशी करण्यामध्ये सात महिन्याचा विलंब केलेला आहे. त्यामुळे त्यांना सुध्दा कारणे दाखवा नोटीस बजाविण्याच्या सूचना दिल्या आहेत.....

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे पाटील...

आणि आवश्यकता वाटल्यास त्या ठिकाणी दुसऱ्या महिला अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. या सर्व प्रश्नाच्या बाबतीत कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, श्री. चव्हाण, तालुका कृषी अधिकारी, पेण हे ज्या ज्या ठिकाणी बदली होऊन गेले आहेत त्या ठिकाणी देखील त्यांचे रेकॉर्ड अशाच पध्दतीचे आहे. महत्वाची गोष्ट अशी की, ते नित्य नेमाने दारु पिऊन कार्यालयामध्ये येतात. या पेणमधील कार्यालयातील जवळपास 12 ते 13 महिला कर्मचाऱ्यांनी त्यांच्याविरुध्द तक्रारी केलेल्या आहेत. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर महिलांना थांबवून ठेवणे, त्यांना आपल्या केबिनमध्ये बोलावून घेणे आणि "तुम्ही मला आवडता" असे बोलणे. या सभागृहामध्ये शब्द उच्चारु शकत नाही अशाप्रकारचे शब्दप्रयोग त्या महिलांच्या बाबतीत हेतुपुरस्सर करणे, इतकेच नव्हेतर त्या महिला कर्मचाऱ्यांचे हात धरण्यापर्यन्त या महाशयांची मजल गेली आहे. त्या कार्यालयातील एक शिपाई श्री. आंबुर्ले यांनी या अधिकाऱ्याविरुध्द तक्रार केली होती. त्या तक्रारीची दखल घेऊन श्रीमती तांबळे या महिला अधिकारी त्यांची चौकशी करण्यास आल्या, त्यांची चौकशी केल्यानंतर पुढे काहीही कार्यवाही झाली नाही. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर या महाशयांची हिंमत आणखी वाढली व त्यानंतर या अधिकाऱ्याने त्रास देण्याचे जास्त प्रकार सुरु केले.

**सभापती** : माननीय सदस्यांनी कृपया प्रश्न विचारावा.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी अशाकरिता सांगत आहे की, महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अत्यंत वाईट वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यावर फक्त निलंबनाची कारवाई करण्यात येत आहे. याचा अर्थ तो करीत असलेल्या चुकीवर पांघरुण घालण्यासारखे आहे. म्हणून शासनाने यापेक्षा जास्तीत जास्त कठोर भमिका घेण्याकरिता या अधिकाऱ्याचे कर्तृत्व मी सभागृहामध्ये सांगत आहे. त्यांच्यासोबत काम करीत असलेले कर्मचारी वारल्यानंतर त्यांना मिळणाऱ्या अंशदानाची रक्कम घेण्यासाठी मृत कर्मचाऱ्याची पत्नी त्यांच्या कार्यालयामध्ये गेली असता या महाशयांनी त्यांच्या घरी जाऊन मला तुमच्या घरी मुक्काम करावयाचा आहे असे सांगण्यापर्यंत त्याची मजल गेली आहे. श्रीमती क्रांती चौधरी यांनी तक्रार केल्यानंतर या अधिकाऱ्याने कळस केला आणि सुट्टीच्या दिवशी त्यांना कार्यालयामध्ये बोलावून घेऊन दिवसभर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/

श्री. विनायक मेटे....

थांबवून ठेवले. अशा प्रकारे या अधिकाऱ्यास केवळ कार्यालयामध्ये दारु पिऊन येण्याच्या कारणास्तव निलंबित न करता त्याला सेवेतून कायम स्वरुपी बडतर्फ करणार काय?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय,श्री.चव्हाण यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्यावर 4 तारखेला गुन्हा दाखल झाल्यानंतर 7 तारखेला त्यांना जामिनावर सोडण्यात आले. या अधिकाऱ्याची एकूण वर्तणूक पहाता जिल्हा सरकारी वकील संघटनेशी तात्काळ संपर्क करुन एखाद्या चांगल्या स्वतंत्र वकिलाची नेमणूक करुन त्या अधिकाऱ्याला मिळालेला जामीन रद्द करुन पुन्हा अटक करण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्याचबरोबर या अधिकाऱ्याची एकूण पार्श्वभूमी लक्षात घेऊन जास्तीत जास्त कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एखाद्या गोष्टीचा स्फोट झाल्यानंतर आपण कारवाई करतो. दिनांक 15.9.2010 रोजी अहवाल प्राप्त झाला आहे. त्या अधिकाऱ्याविरुध्द तक्रार करण्यात आल्यानंतर सकृद्दर्शनी त्या तक्रारीमध्ये तथ्य आहे की नाही हे पाहून श्री. चव्हाण यास तेथून तात्काळ दुसरीकडे हलविण्याची कारवाई का करण्यात आली नाही, ज्या अधिकाऱ्यावर आरोप आहेत त्या अधिकाऱ्याच्या उपस्थितीत चौकशी अधिकाऱ्यांपुढे कोण साक्ष देणार आहे?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच त्याच्या बाबतीत अगोदरची हिस्ट्री आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, दिनांक 15-09-2010 रोजी अहवाल आल्यानंतर 2011 वर्ष येईपर्यंत ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली आहे, त्यांच्यावर देखील तुम्ही कारवाई केली पाहिजे. अन्यथा श्री.चव्हाण यांना संरक्षण देणारे जे लोक आहेत, ते मात्र बाजूला राहतात आणि परत दुसरा कोणीतरी श्री.चव्हाण नामक अधिकारी याचा गैरफायदा घेत असतो. म्हणून या बाबतीत दिरंगाई केलेल्या अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात? हा माझा पहिला प्रश्न आहे.दुसरा प्रश्न म्हणजे जेथे अशा प्रकारची तक्रार असल्याबाबत माहिती येते, त्याठिकाणी जर सकृतदर्शनी तथ्य दिसले तर संबंधित अधिकाऱ्यांकडील चार्ज काढल्याशिवाय पुढील चौकशीच होऊ शकणार नाही. म्हणून माननीय मंत्री महोदयांनी आणि गृह विभागाने तशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे साहेबांच्या एका प्रश्नाचे उत्तर देण्याचे राहिलेले आहे. त्या बाबतीत सांगावयाचे तर संबंधितांना दि.15-04-2011 रोजी निलंबित करण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या बाबत सांगावयाचे तर आपण तक्रार निवारणासाठी महिला अधिकाऱ्याची नेमणूक केली, त्यांच्याकडूनच मोठ्या प्रमाणात म्हणजे 7 महिन्याची दिरंगाई झालेली आहे. त्यामुळे या बाबतीत चौकशी करण्यासाठी सात महिन्याचा विलंब का लागला? अशा प्रकारची संबंधित महिला अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. तेव्हा आपण त्यांच्यावर देखील कारवाई करीतच आहोत. त्यापेक्षाही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जो जिल्ह्याचा प्रमुख कृषी अधिकारी आहे किंबहुना त्या जिल्ह्याचा जो कृषी उप संचालक आहे, त्यांनी खरे म्हणजे तत्काळ या प्रश्नाची दखल घ्यावयास हवी होती. त्यासाठी सात महिने वाट पहाण्याची आवश्यकता नव्हती.त्यांनी संबंधितांना तात्काळ बदलून, त्यांच्याकडील चार्ज काढून घ्यावयास हवा होता. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे,ती अतिशय योग्य आहे.परंतु संबंधितां कडून देखील खुलासा मागविण्याच्या बाबतीत सूचना देण्यात आलेल्या आहेत. कारण ज्यांच्याकडून विलंब झालेला आहे, त्यांनी संबंधितांना पाठीशी घातले आहे काय, तसेच संबंधितांवर तत्काळ कारवाई का करण्यात आली नाही, याबाबतीत चौकशी होईल.पण अशा प्रकारे ज्या-ज्या ठिकाणी घटना होतील, त्यातील जे संबंधित कर्मचारी किंवा अधिकारी असतील, त्यांच्या बाबतीत या सर्व ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पार्श्वभूमीवर सन्माननीय सदस्यांनी ज्या-ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या बाबतीत भविष्य काळामध्ये देखील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----

. . . .2 व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: 2008 ते 2010 पर्यंत महाराष्ट्रातील टाईल्स

व्यापाऱ्यांनी केलेली कर चुकवेगिरी

**मु.शी.**: 2008 ते 2010 पर्यंत महाराष्ट्रातील टाईल्स व्यापाऱ्यांनी केलेली कर चुकवेगिरी याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "2008 ते 2010 पर्यंत महाराष्ट्रातील टाईल्स व्यापाऱ्यांनी केलेली कर चुकवेगिरी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 व्ही-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केंद्रीय विक्रीकर कायद्यानुसार आंतरराज्य खरेदी करताना खरेदीदाराने केंद्रीय विक्रीकर कायद्यानुसार विहित केलेला नमुना "क" दिल्यास

अशा खरेदीवर 12.5 टक्के कर सवलत मिळत असते.या कर सवलतीचा फायदा घेण्यासाठी महाराष्ट्रामध्ये फार मोठया प्रमाणात रॅकेट काम करीत आहे.याठिकाणी उत्तरामध्येच माननीय मंत्री महोदयांनी काही प्रकरणे दिलेली आहेत. आतापर्यंत जवळपास 65 व्यापाऱ्यांविरुध्द पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. यामध्ये मोरबी, गुजराथ येथून काही व्यापारी टाईल्स् खरेदी करतात.आता हा प्रकार केवळ टाईल्स्पुरताच मर्यादित नाही तर सर्वच बाबतीत नमुना "क" चे फॉर्म वापरुन फार मोठ्या प्रमाणात मुंबई, नाशिक, पुणे आणि "ब" वर्ग नगरपालिकां पर्यंत हे व्यवहार होत असतात. मग हे व्यवहार तेलमध्ये, सरकीमध्ये, टाईल्स्मध्ये चालतात आणि अशा प्रकारे "क" फॉर्मच्या माध्यमातून या राज्यामध्ये करोडो रुपयांचा कर चुकविला जातो. माझे असे म्हणणे आहे की, "क" फॉर्मचा सर्रास वापर केला जात असताना आपले विक्रीकर खाते काय करीत आहे ? जर विक्री कर खात्याची त्यावर नजर असती तर "क" नमुना फॉर्म चालूच शकत नाही. पण आता या राज्यामध्ये "क" नमुना फॉर्म हा बनावट नोटांप्रमाणे छापण्याचा छापखानाच सुरु झालेला आहे. त्यातून महाराष्ट्र राज्याचे कर चुकविल्यामुळे हजारो कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. माझा स्पेसिफीक प्रश्न एकच आहे की, "क" नमुन्याच्या फॉर्मबाबत राज्य स्तरावर एक उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून आपण याबाबत चौकशी करणार आहात काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, यासंदर्भात केंद्र शासनामध्ये ई.सी.कमिटी आहे. ज्यामध्ये सर्व राज्यांतील माननीय अर्थमंत्री हे त्या समितीचे सदस्य आहेत. या संदर्भात आपल्या राज्यामध्ये जे काही झाले, त्यासंदर्भात देखील याठिकाणी अशा प्रकारचा घटनाक्रम झाला म्हणून आपण त्या समितीला अप्राईज केले.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ......

त्या समितीमध्ये असा निर्णय घेण्यात आला की, 'क' हा नमुना संगणकीकृत करावयाचा, तो माणसाच्या हातून डायरेक्ट भरुन कर चुकवगिरी करणाऱ्या ट्रेडिंग कंपनीज्‌ला आपण थाबवू शकतो. महाराष्ट्र, गुजराथ, तामिळनाडू आणि इतर राज्य अशा अकरा राज्यांनी यामध्ये सहभाग घेतला आहे. या पध्दतीचा व्यवहार इतरही राज्यात होता होता, हा व्यापक विषय असल्यामुळे या संदर्भात समितीच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला. या समितीची पहिली बैठक एप्रिल महिन्यात दिल्ली येथे झालेली आहे. अंतिम निर्णय घेण्यासाठी दुसरी बेठक चेन्नई येथे होणार आहे. त्या बैठकीमध्ये जो निर्णय होईल त्याप्रमाणे करण्यात आलेल्या उपाययोजना आपल्या राज्यामध्ये राबविण्यात येतील आणि अशा प्रकारच्या कर चुकवेगिरीला थांबविण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न होता. मंत्री महोदयांनी उत्तरात कबूल केलेले आहे की, "65 व्यापाऱ्यां विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. 37 व्यापाऱ्यांच्या बँक खात्यावर टांच ठेवण्यात आलेली आहे." सभापती महोदय, 'क' नमुन्याचा वापर करुन कर चुकवेगिरी करण्यात आलेली आहे, हे आता सिध्द झालेले आहे. शासनाने 185 कोटी रुपयांचा अंदाजित आकडा दिलेला आहे. 185 कोटी रुपयाची खरेदी झाली आणि त्यामध्ये 26 कोटी एवढया रक्कमेची कर चुकवेगिरी झाली आहे. आता नव्याने काय करण्यात येणार आहे हे मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. पण जे घडलेले आहे, व्यापारी आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने या राज्याचे जे कोटयवधी रुपयांचे नुकसान झालेले आहे, त्या संबंधातील चौकशीची मागणी मी केली होती. तेव्हा या संबंधात उच्च स्तरीय चौकशी करण्यात येईल काय?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या संदर्भात जी कारवाई करण्यात आलेली आहे ती निवेदनामध्ये देण्यात आलेली आहे. 136 पैकी 65 व्यापाऱ्यांवर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. त्या अंतर्गत जवळपास 37 व्यापाऱ्यांच्या बँक खात्यांवर टांच ठेवण्यात आली आहे. तसेच 3.83 कोटी रुपयांची रिकव्हरी करण्यात आली आहे. अशा प्रकारे सेल टॅक्स प्रॅक्टीसनर्सकडून गैर व्यवहार केला, त्या व्यापाऱ्यांचे लायसन्स रद्द करण्यात आलेले आहेत. भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी समितीसमोर हा विषय ठेवलेला आहे. भविष्यामध्ये मिळणारा कर ई-रिटर्नस् द्वारे मिळाला पाहिजे या संदर्भात चर्चा सुरु आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 65 व्यापाऱ्यांविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. पण महाराष्ट्रात असे 600 व्यापारी आहेत. मुंबईतील एकाही व्यापाऱ्याची यामध्ये नोंद नाही. मुंबई शहरामध्ये 2000 च्या वर प्रकरणात 'क' नमुन्याचा गैर वापर करुन कर चुकवेपणाचा प्रकार चाललेला आहे. याबद्दल मंत्री महोदयांनी काहीच सांगितले नाही. 65 व्यापाऱ्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात आली म्हणजे शासनाची जबाबदारी संपली काय? या राज्याच्या नुकसानीला जे जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई होणे हे गरजेचे आहे. त्या संबंधीची चौकशी शासन करणार आहे काय?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, अशा प्रकारचे निदर्शनास आले तर इन्फोर्समेंट विंग रेग्युलरली त्या बाबतीत कारवाई करते. या इन्फोर्समेंट विंगच्या माध्यमातून रेग्युलर रेड्स होत असतात. अशा प्रकारे जर कोणी कर चुकवेगिरी करीत असतील तर त्यांना कराचा भरणा करावयाला लावतो. या संदर्भात काही लोकांवर एफ.आय.आर. दर्ज झालेला आहे तर काही लोकांच्या विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी झालेल्या आहेत. काही लोकांचे करार रद्द करण्यात आलेले आहेत. भविष्यात अशा प्रकारच्या घटना आढळून आल्या तर निश्चित स्वरुपात कारवाई केली जाईल.

-----

## नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 4 बाबत

**सभापती** : माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 4 उद्या घेण्यात येईल.

-----

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे जिल्ह्यात मुरबाड येथे दुर्मिळ वनौषधी व वनस्पती उद्यान उभारण्यात येणे

**मु. शी.** : ठाणे जिल्ह्यात मुरबाड येथे दुर्मिळ वनौषधी व वनस्पती उद्यान उभारण्यात येणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.भास्कर जाधव ( वने राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते व संजय केळकर यांनी "ठाणे जिल्ह्यात मुरबाड येथे दुर्मिळ वनौषधी व वनस्पती उद्यान उभारण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांनी मागील अधिवेशनामध्ये वनौषधी व वनस्पतींच्या संदर्भात एक स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यामुळे आदिवासींना आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल, त्यांना आर्थिक बळ कसे देता येईल असे सांगत सविस्तरपणे भाषण केले होते. हे महामंडळ केव्हा पासून सुरु होणार आहे व त्यासाठी किती आर्थिक तरतूद केली जाणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी मी सविस्तरपणे निवेदन केलेले आहे. वनौषधी व वनस्पतींच्या संदर्भात केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार एकत्रितपणे काम करीत आहेत. तसेच या संदर्भातील वेगवेगळया विभागाचे काम पाहिल्यानंतर व वेगवेगळ्या नर्सरीजचे काम पाहिल्यानंतर यासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा सध्या तरी शासनाचा विचार नाही.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांनी त्यावेळी लांबलचक भाषण केले होते, आदिवासींसाठी असे प्रकारचे प्रयत्न केले तरच त्यांचे भले होईल. त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध होईल. त्यांचे त्यावेळचे म्हणणे असत्य होते असे माननीय राज्यमंत्र्यांना म्हणावयाचे आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : माननीय मंत्री महोदय श्री.पाचपुते यांनी त्यावेळी काय भाषण केले होते त्याची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. सन्माननीय सदस्यांनी त्या संदर्भात या नियम 93 अनव्येच्या सूचनेत काहीही उल्लेख केलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी निवेदनात उत्तर दिलेले आहे. म्हणून मंत्री महोदयांनी केलेले भाषण असत्य आहे असे म्हणता येणार नाही.

-----

**सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.35 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 3.02 ते 3.35 पर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री.शिगम....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन**

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. जैतापूर येथे पोलिसांनी लाठीचार्ज आणि गोळीबार केलेला आहे असे मला नुकतेच कळले आहे. याबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे या सदनाला तात्काळ समजणे अत्यंत आवश्यक आहे. या विषयाच्या संदर्भात अल्पसूचना प्रश्नही विचारण्यात आलेला होता. तेथील अजित पवार नावाचा प्रांत अधिकारी हा शेतक-यांवर अमानुष पध्दतीने अत्याचार करीत आहे. "तुम्ही प्रकल्पासाठी जागा दिली नाही तर पोलीस तुम्हाला माझ्या समोर गोळया घालतील" अशा प्रकारे हा प्रांत अधिकारी शेतक-यांना धमक्या देत आहे, तेथील शेतक-यांवर प्रचंड अन्याय आणि अत्याचार करीत आहे. मला आताच कळले की, त्या ठिकाणी लाठीचार्ज आणि गोळीबार झालेला आहे. तेथील नेमकी वस्तुस्थिती सदनासमोर यावी यासाठी शासनाने निवेदन करणे आवश्यक आहे.

श्री. नारायण राणे (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून जैतापूर येथे काही वेळापूर्वी गोळीबार आणि लाठीचार्ज झाला असल्याचे सांगून तेथील नेमकी वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा केलेली आहे. मी 10 मिनिटांपूर्वी रत्नागिरी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. गायकवाड यांच्या कडून माहिती घेतलेली आहे.ती माहिती मी सदनाला देत आहे. या संदर्भात विभागा मार्फत नंतर निवेदन केले जाईल. जैतापूर येथे एका राजकीय पक्षाच्या 100 ते 130 कार्यकर्त्यांनी अणुऊर्जा प्रकल्पाच्या साईटवर घुसण्याचा प्रयत्न केला. तेथे दगडफेक झाली. नंतर लाठीचार्ज झाला आणि त्यानंतर गोळीबारही झाला. आता तेथील परिस्थिती सुरळीत आहे. ही आतापर्यन्तची घडलेली घटना आहे. गोळीबारात कोणीही जखमी झालेले नाही. लाठीचार्ज झालेला आहे. काही पोलीस अधिकारी जखमी झालेले आहेत, आंदोलकही जखमी झालेले आहेत. या घटने संबंधीची सविस्तर माहिती निवेदनाद्वारे दिली जाईल.

----

..2..



MSS/ D/ पूर्वी श्री. खंदारे 15:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## वसई-विरार महापालिकेतून 36 गावे वगळण्यासंबंधी काढलेला लाँग मार्च

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, वसईतील 36 गावे वसई-विरार महापालिकेतून वगळण्याची मागणी या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी आणि सभागृहाबाहेर लोकांनी केली होती. ही गावे वगळण्याबाबत शासनाने आश्वासनही दिले होते. आता या मागणीच्या पूर्ततेसाठी वसईतील हजारो नागरिक लाँगमार्च घेऊन विधान भवनाकडे येत आहेत. ही गावे वगळण्यासंबंधी शासनाने आश्वासन दिलेले असून समितीने तशी शिफारस केलेली आहे. तेव्हा ही गावे वगळी जातील अशी घोषणा शासनाने करावी अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य त्या जिल्ह्यातील आहेत आणि मी देखील त्या जिल्हयातील आहे. मी त्या आंदोलनाची माहिती घेतलेली आहे. साधारणपणे दोनशेच्या आसपास आंदोलक आहेत. या संबंधी शासनाने निवेदन करावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, तेथील लोकांच्या भावना लक्षात घेणे आवश्यक आहे...

**उप सभापती** : याबाबत मी शासनास निवेदन करण्यास सांगितले आहे.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी केलेले नियमबाह्य करार

**मु.शी.** : महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी केलेले नियमबाह्य करार यासंबंधी प्रा.सुरेश नवले, सर्वश्री राजन तेली, अनिल भोसले, सुभाष चव्हाण व संदीप बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालकांनी स्थानिक नामांकित निविदाधारकांना वगळून आपल्या मर्जीतील व्यक्तींना महामंडळाचे कोळशाचे गोडावून भाडेपट्टयाने देणे, मूळ करारनामा ११ महिन्यांसाठी असल्याचे भासवून करारनाम्यात ही मुदत ५ वर्षांपर्यंत वाढविण्यात येण्याची तरतूद करणे, सदर गोडावूनच्या दुरुस्तीचा खर्च अवास्तव दाखवून त्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी प्रतिमहा ५० टक्के भाडे वजावट करण्याची केलेली तरतूद यानुसार अवास्तव खर्चाच्या वजावटीसाठी किमान २० वर्षे इतका कालावधी लागण्याची शक्यता, अस्तित्वहीन/ अकार्यरत लघुउद्योगांचे नावे कोळशाचे वाटप दाखवून हा कोळसा काळ्याबाजारात विकणे, कोळसा वाटप करण्यासाठी लघु उद्योगांशी केलेले करारनामे नियमबाह्य पध्दतीने रद्द करुन त्यांना कोळसा वाटप थांबविणे तसेच त्यांचे पैसे अडवून ठेवून आर्थिक शोषण करणे, उच्च न्यायालयाच्या विरुध्द दरमहा नवीन उद्योगांचे नावे कोळसा वाटप करुन मूळ करारनामाधारक उद्योगांना अत्यल्प प्रमाणात कोळसा वाटप करणे, खरेदी केलेला कोळसा लघुउद्योगांना वाटप न करता खाणीतून परस्पर हॅन्डलिंग एजन्टद्वारे काळ्या बाजारात विकणे, योजनेतील पात्र मूळ अर्जदार उद्योगांना डावलून त्यांचे नावाने आपले हस्तकास कोळसा वाटप करणे, अपात्र उद्योगास नियमबाह्य पध्दतीने वितरण यादीत समाविष्ट करुन त्यांचे नावे कोळशाचे वितरण दाखवून हा कोळसा काळ्याबाजारात विकणे, खरे हॅन्डलिंग एजन्ट मे.मोहीन मिनरल, दिल्ली यांनी श्री. प्रमोद केडीया यांचे अधिकार पत्र रद्द करुनही त्यांचेशी केलेल्या नियमबाह्य करारनाम्याची सखोल चौकशी होण्याची आवश्यकता, या सर्व

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गैरप्रकारांच्या विरोधात आवाज उठविणा-या लघुउद्योगांना कोणतेही सयुक्तिक कारण नसताना कोळसा वितरण योजनेतून वगळण्यात येऊन त्यांचे कोट्यवधी रुपये अडवून ठेवण्यात येणे, परिणामी जनमानसात व लघुउद्योजकांत पसरलेला असंतोष राज्य शासनाने या बाबत तातडीने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

श्री. नारायण राणे (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर विषय आपल्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. या लक्षेवेधी सूचने संदर्भात सविस्तर निवेदन शासनाकडून देण्यात आलेले आहे. त्या निवेदनातील शेवटच्या दोन ओळीत असे नमूद करण्यात आले आहे की, गोदाम भाडे तत्वावर देण्याबाबतच्या व्यवहाराबाबत तसेच कोळसा वितरणा संबंधीच्या तक्रारी संदर्भात भा.प्र.से. अधिकाऱ्यामार्फत चौकशीचा प्रस्ताव विचाराधीन आहे. उद्योग खात्याला जो अहवाल सादर करण्यात आला त्यामध्ये 1174 उद्योगांना कोळसा बंद करण्यात आलेला आहे. लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये असेही म्हटले आहे की, 31 मार्च, 2011 अखेर 584 उद्योग घटकांचा कोळसा वाटप बंद करुन त्यांची सुरक्षा ठेव जप्त करण्यात आली आहे. यामध्ये एक विसंगती आहे. व्यवस्थापकीय संचालकांनी महामंडळाचा पैसा वापरुन कोळसा खरेदी करुन उद्योगांना न देता हँडलिंग एजन्टची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचेकडून काही गैरव्यवहार झालेला आहे,असे म्हटले आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे ए.जी.यांचा अहवाल आहे. ए.जी.यांच्या अहवालात गंभीर ताशेरे व्यवस्थापकीय संचालक आणि महामंडळावर ओढलेले आहेत. ए.जी.यांनी आपल्या अहवालात असे म्हटले आहे की, "Loss of Revenue of Rs. 188.72 lakhs-'Appointment of Ware Housing Agents on leave and licence basis and repairing of Godown premises." व अन्य जवळजवळ सात मुद्दे नमूद केलेले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणे आवश्यक आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी व्यवस्थापकीय संचालकांना रजेवर पाठवून केली तर या प्रकरणाला न्याय मिळू शकतो. म्हणून तशा प्रकारची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करणार आहात काय ?

श्री. नारायण राणे : सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले व अन्य मान्यवर सदस्यांनी लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केलेली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने काही भावनाही व्यक्त केलेल्या आहेत. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळात गैरप्रकार झालेला आहे, गैरव्यवहाराचा सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उल्लेख केला आहे. या गैरव्यवहाराच्या बाबतीत मी यापूर्वीच या महामंडळाचे प्रमुख आयएएस अधिकारी श्री. फिलिप्स यांचे विरुध्द चौकशी करण्यासंबंधीची परवानगी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे मागितली आहे. या गैरव्यवहाराच्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

बाबतीत मी चौकशी सुरु केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे स्वतंत्र आयएसएस अधिका-याव्दारे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल. श्री. प्रमोद केडिया यांच्या कंपनीकडून 15 कोटी रुपयांची बँक गॅरंटी घेतलेली आहे. ती गॅरंटी कॅश केली जाईल. या महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांना त्वरित रजेवर पाठविले जाईल आणि स्वतंत्र आयएएस अधिकाऱ्यांमार्फत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल.

-----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) ZZ-3

ABG/ D/ प्रथम श्री. शिगम 15:40

**पृ. शी.** : नाशिक तालुक्यातील सहा गावातील हजारो शेतकऱ्यांच्या

जमिनी देवस्थानांच्या नावे झाल्या बाबत.

**मु. शी**. : नाशिक तालुक्यातील सहा गावातील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी देवस्थानांच्या नावे झाल्या बाबत सर्वश्री जयवंत जाधव, हेमंत टकले, उल्हास पवार ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयवंत जाधव ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" नाशिक तालुक्यातील (जि.नाशिक) येथील सहा गावांच्या हजारो शेतक-यांच्या 7/12 उताऱ्यावर कब्जेदर सदरात महाराष्ट्र शासनाने 1972 साली श्री. व्यंकटेश बालाजी देवस्थान, नाशिक आणि श्री रामचंद्र देवस्थान, पंचवटी नाशिक यांची नावे दाखल करुन शेतकऱ्यांवर अन्याय करण्यात येणे, या बाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी शेतकऱ्यांची नावे 7/12 उताऱ्यावर घेण्यात यावे असा अहवाल यापूर्वीच शासनास सादर करणे, तथापि, अद्यापही शासनाने निर्णय न घेणे, परिणामी, नाशिक तालुक्यातील सहा गावांतील शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष व निराशेची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रया"

श्री. प्रकाश सोळंखे ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंत जाधव : सभापती महोदय, मी एका महत्वाच्या विषयावर शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्र राज्यातील इतर काही जिल्ह्यांप्रमाणेच नाशिक जिल्ह्यातील व नाशिक तालुक्यातील सहा गावातील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी देवस्थानाची नावे करण्यात आल्या आहेत. या सहा गावातील शेतकरी पिढयांपिढया जमिनी कसत होते, त्यांच्या जमिनीवर 1972 साली अचाकपणे शासनाने निर्णय घेतला आणि त्या निर्णयानुसार या शेतकऱ्यांच्या जमिनीच्या 7/12 वर व्यंकटेश देवस्थान, नाशिक आणि श्री रामचंद्र देवस्थान पंचवटी, नाशिक यांची नावे नोंदविण्यात आली. तेथील शेतकरी अडाणी होते, त्यांना कोणत्याही प्रकारची पूर्व कल्पना न देता या दोन्ही देवस्थानांची नावे लावण्यात आली. या बाबतीत आम्ही चौकशी करण्याचा प्रयत्न केला...

**उप सभापती** : आपण प्रश्न विचारावा.

श्री. जयवंत जाधव : सभापती महोदय, जिल्हाधिकारी यांनी राज्य शासनाला अहवाल पाठविलेला आहे..

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-6..... श्री.जयवंतराव जाधव....

त्या अहवालामध्ये माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी असे म्हटले आहे की, या दोन्ही देवस्थानांच्या विश्वस्तांकडे पाठपुरावा केल्यानंतर त्यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे संबंधित दोन्ही देवस्थाने आता केवळ कागदोपत्री अस्तित्वात आहेत, त्याकरिता शासनाने योग्य ते मार्गदर्शन करावे. या शिवाय या देवस्थानांना शासनाने कामासाठी जो महसूल देऊ केला होता तो महसूल त्यांनी घेतलेला नाही, त्याअर्थी त्यांना निधीची गरज नाही. निवेदनामध्ये म्हटले आहे की, तत्कालीन महसूल राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केला आहे. या अहवालाचे स्वरुप काय आहे, हा अहवाल केव्हा सादर केला आहे, या अहवालावर तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या 7/12 वर देवस्थानांच्या नावाची नोंद केलेली आहे ती रद्द करण्यात येईल काय?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाबद्दल मी सांगू इच्छितो की, जिल्हाधिकारी, नाशिक यांनी आयुक्त, नाशिक यांच्यामार्फत शासनाकडे जो प्रस्ताव पाठविला आहे त्या प्रस्तावामध्ये नाशिक तालुक्यातील शिंगवे बहुला, बेलत गव्हाण व विहित गावातील जमिनी या देवस्थान इनाम जमिनी आहेत, या देवस्थानांनी मागील 8 ते 10 वर्षापासून शासनाकडून जमीन महसूल घेतलेला नाही, म्हणून या देवस्थानांच्या संदर्भात जोगळेकर मॅन्युअलच्या परिच्छेद 66(ब) प्रमाणे पूर्ण आकार बसवून तो वसूल करण्यात यावा, असा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे पाठविला असून तो विचाराधीन आहे. लवकरात लवकर त्या बाबत निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, तत्कालीन राज्यमंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने दिनांक 12.06.2001 रोजी देवस्थान इनाम खालसा करण्याबाबत कोणत्या पध्दतीने कारवाई करावी यासाठी समिती स्थापन केली होती. या समितीने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने गुजराथ राज्याने तयार केलेल्या कायद्यानुसार या राज्यातही देवस्थान इनाम कायदा करुन खालसा करणे, वहिवाटदारांना निम्मी जमीन वहिवाटीसाठी मालकी हक्काने देणे आणि निम्मी जमीन देवस्थानाला देणे, निम्मी जमीन निवडण्याचा हक्क वहिवाटदारास राहील अशा प्रकारच्या शिफारशी केल्या आहेत. सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे. या बाबत विचार करुन निर्णय घेतला जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-6.....

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, नाशिकसारख्या झपाट्याने शहरीकरण होणाऱ्या शहराच्या आसपासची ही जमीन आहे. वरकरणी वेगवेगळ्या देवस्थानांकडे जमीन दिलेली असली तरी कित्येक पिढ्या त्या ठिकाणी शेतकरी शेती व्यवसाय करीत आहेत. त्या शेतीवरच त्यांचे जीवनमान अवलंबून आहे. या जमिनी मुख्य शहराच्या जवळ आल्यामुळे जमिनींच्या किंमती वाढल्या आहेत. देवस्थानांकडून जमिनींचा काहीही वापर केला जात नाही. उलट जे जमीन कसतात त्यांना देवस्थानांकडून जी पावती दिली जाते, त्या पावतीवर रक्कम नमूद केलेली असते आणि तपशीलामध्ये लिहिलेले असते की, 'श्री चरणी समर्पण'. जणू काही त्यांनी देणगी समर्पित केलेली आहे. यामुळे त्यांचा कोणताही अधिकार प्रस्थापित होऊ शकत नाही. अशा तऱ्हेने जमिनीवर ज्या शेतकरी कुटुंबीयांचे जीवनमान अवलंबून आहे....

नंतर 3बी.2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.......

अशा लोकांना वंचित करुन केवळ फायद्यासाठी जुन्या संस्थानांच्या नावावर असलेल्या जमिनी, ज्यांचा ते वापरच करीत नाहीत, शेती करीत नाहीत आणि शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा हक्क डावलून काहीच मोबदला मिळणार नसेल तर त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. यासंदर्भात शासन या शेतकऱ्यांना, कुळवहिवाटदारांना न्याय मिळावा म्हणून सकारात्मक विचार करणार ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, मी आताच सांगितले की, यासंदर्भात राज्य मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे. त्यात केलेल्या शिफारशीत देवस्थानला निम्मे जमीन आणि वहिवाटदाराला निम्मे जमीन द्यावी असे म्हटले आहे. तरी देखील यासंबंधीचा कायदा शासनाला करावा लागेल, त्यानंतरच कायमस्वरुपी हा प्रश्न निकाली निघेल.

श्री. राजन तेली : महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 13 गावांमध्ये वर्षानुवर्षे अशाच प्रकारचा वाद सुरु आहे. बऱ्याच वर्षांपासून अशा संस्थांकडे ती जागा आहे. या सर्वच बाबतीत चौकशी करुन ती जागा ज्या मूळ मालकाच्या ताब्यात आहे त्यांना देण्याबाबत शासन विचार करणार काय?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, यासंबंधी कायदा केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. देवस्थानच्या इनामी जमिनी कायदा करुन खालसा करणे हाच त्यावरील उपाय असल्याने लवकरात लवकर तसा कायदा करण्याबाबतच्या हालचाली शासनाच्या स्तरावर चालू आहेत.

-------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सदस्यांविरुध्द झालेली घोषणाबाजी

**मु. शी.** : पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सदस्यांविरुध्द झालेली घोषणाबाजी यासंबंधी सर्वश्री सुमंत गायकवाड, सुभाष चव्हाण, विनायकराव मेटे, सतीश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुमंत गायकवाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पिपल्स एज्युकेशन सोसायटीवर सदस्य पदी निवड झाल्यानंतर श्री.प्रीतमकुमार शेगांवकर, वि.प.स. हे आपल्या कार्यकर्त्यांसह दिनांक 4/3/2011 रोजी औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन परत जातांना प्रा.किशोर साळवी व त्यांच्या कार्यकर्त्यांसह प्रितमकुमार शेगांवकर यांच्या विरोधात घोषणाबाजी व वाद निर्माण करणे, दोन गटाचे कार्यकर्ते आमने सामने आल्यामुळे सदरचा वाद चिघळणे, श्री. प्रितमकुमार शेगांवकर तेथून परत गेल्यानंतर दोन्ही गटांचे कार्यकर्त्यांसह परस्पर विरोधात घोषणाबाजी होऊन किरकोळ स्वरुपाची मारामारी होणे, प्रा.किशोर साळवी यांनी छावणी पोलीस स्टेशन औरंगाबाद येथे तक्रार देणे, सदरचा गुन्हा हा जवाबाप्रमाणे किरकोळ स्वरुपाचा असतांनाही वरिष्ठ पोलीस निरीक्षकांवर तेथील पोलीस आयुक्त सावरकर यांनी दबाव आणणे, कलम 307 अन्वये श्री.प्रीतमकुमार शेगावकरांसह अनेकांवर गुन्हा दाखल करणे, श्री.प्रीतमकुमार शेगांवकर हे घटनास्थळी नसतांनाही पोलिस यंत्रणा कोणताही तपास न करता त्यांची नावे गुन्ह्यात दाखल करणे, यामुळे जनमानसात तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, संबंधित अधिकाऱ्यावर दंडात्मक कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुमंत गायकवाड : सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पिपल्स एज्युकेशन सोसायटीमार्फत मुंबई, औरंगाबाद, महाड, पुणे या ठिकाणी अनेक कॉलेजेस चालतात. त्यांचे नियंत्रण करणाऱ्या गव्हर्निंग बॉडीवर आपल्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य व माजी राज्य मंत्री ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर यांची निवड झालेली आहे. ज्या कॉलेजमध्ये सन्माननीय सदस्य ॲड. शेगांवकर यांचे शिक्षण झाले त्याच कॉलेजच्या बॉडीवर त्यांना सदस्य म्हणून घेण्यात आले हा त्यांचा एक प्रकारे सन्मानच झाला. निवड झाल्यानंतर दरवर्षी प्रथेप्रमाणे ते औरंगाबाद येथील कॉलेजमध्ये असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार घालण्यासाठी आपल्या अनुयायासह गेले होते. ते पुतळ्याला हार घालून परत आले होते. त्यानंतर त्याच कॉलेजचे प्रा. किशोर साळवी यांच्या मनात काय आले हे माहीत नाही पण त्यांनी बाहेरील कॉलेजचे विद्यार्थी गोळा केले व ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर यांच्याविरुध्द घोषणा सुरु केल्या. सहाजिकच घोषणाबाजी सुरु झाली व त्याचे बाचाबाचीत रुपांतर झाले. परंतु तोपर्यंत माननीय शेगांवकर तेथून निघून गेले होते. राज्याचे माननीय गृह मंत्री हे माननीय सदस्य ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर यांचा 75 वा वाढदिवस यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये साजरा केला त्या कार्यक्रमाला उपस्थित होते...

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुमंत गायकवाड....

त्या कार्यक्रमाला माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील हे सुध्दा हजर होते व त्यांनी या कार्यक्रमात त्यांचा गुणगौरव देखील केला होता. असे असतांना या प्रकरणात कमिशनर श्री. सावरकर यांच्या दबावामुळे सन्माननीय सदस्य श्री. प्रितमकुमार शेगांवकर यांच्यावर कलम 307 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. शेगांवकर हे दादा आहेत परंतु ते दादागिरी करीत नाहीत. मा.शेगांवकर हे नेहमी सुटाबुटात राहतात. त्यामुळे अशी चांगली माणसे काठयांनी मारतील असे होऊच शकत नाही त्यामुळे माननीय गृहमंत्र्यांनी या गोष्टीचा विचार करण्याची आवश्यकता आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी जे खोटे आरोप लावलेले आहेत त्यांना त्वरित सस्पेंड करण्यात येईल काय तसेच सन्माननीय सदस्य श्री. प्रितमकुमार शेगांवकर यांच्यावर कलम 307 चा जो गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे तो त्वरित मागे घेण्यात येईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : आदरणीय सभापती महोदय, पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली असून या एज्युकेशन संस्थेचा कॉम्पलेक्स फार मोठा आहे. ही फार चांगली संस्था आहे. परंतु येथील मॅनेजमेंटमध्ये थोडा वाद आहे. श्री. के.एच.रंगनाथन आणि एस.एम. मोरे यांनी वेगवेगळया पध्दतीने संचालक बोर्डाच्या नियुक्त्या केलेल्या आहेत. श्री. के.एच.रंगनाथन यांनी ज्या संचालक बोर्डाच्या नेमणुका केलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य ॲड. प्रितमकुमार शेगावकर यांचा देखील समावेश आहे. तसेच एस.एम.मोरे यांनी सुध्दा वेगवेगळया नेमणूका केलेल्या आहेत. या नेमणुका झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाला हार घालण्यासाठी काही मंडळी गेली असतांना विरोधी गटाने त्यास प्रतिबंध केला व त्यामधून तणावाची स्थिती निर्माण झाली. या ठिकाणी बाचाबाची झाल्याचेही सन्माननीय सदस्यांनी मान्य केलेले आहे. परंतु या ठिकाणी बाचाबाचीच्या पुढेही हे प्रकरण गेले होते अशी माझ्याकडील माहिती आहे. यानंतर तक्रारी व मेडिकल सर्टिफिकेटच्या आधारावर गुन्हे नोंद झालेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. सुमंत गायकवाड हे या सदनाचे सदस्य आहेत व त्यांनी सांगितलेली सर्व माहिती मला सत्य म्हणून ग्राहय धरावी लागेल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

या प्रकरणाचा तपास डीसीपी लेव्हलच्या वरिष्ठ अधिका-यांनी केलेला आहे. या केसचे गांभीर्य लक्षात घेऊन यामध्ये दोन गोष्टी करण्याच्या आवश्यकता आहेत. एक तर चॅरिटेबल कमिशनरकडे हा दावा प्रलंबित आहे अशा भांडणाचा जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत अशा तक्रारी होतच राहणार. म्हणून गृह विभागामार्फत चॅरिटी कमिशनरने यासंदर्भात योग्य ती भूमिका लवकरात लवकर घेण्याच्या संदर्भात चॅरीटी कमिशनरला सूचना देण्यात येतील. ज्यावेळी मराठवाडा विकासाचा कार्यक्रमाच्या संदर्भात बैठक घेतली होती त्यावेळेस मी या संस्थेला 50 लक्ष रुपये देऊन मदत केली होती. या संस्थेचे महाराष्ट्रातील ऐक वेगळे महत्व लक्षात घेऊन तसेच सन्माननीय सदस्य श्री. सुमंत गायकवाड हे ज्येष्ठ सदस्य असून, सन्माननीय सदस्य ॲड. प्रितमकुमार शेगांवकर हे आरपीआयचे ज्येष्ठ नेते आहेत, त्यांना मी शासनामार्फत आवाहन करतो की, या संस्थेचे महत्व आणि पावित्र्य लक्षात घेऊन त्यांनी आपसातील वाद लवकर मिटवावे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

भांडण मोठयांचे आणि हाल मात्र पोलिसांचे अशी स्थिती राहणार नाही. तेव्हा या संस्थेचे महत्व लक्षात घेऊन त्यांनी लवकर भांडणे मिटवून घ्यावेत असे माझे आवाहन राहील. कलम 307 संबंधी मला असे सांगावयाचे आहे की , दुस-या विभागातील एका आय.जी.लेव्हलच्या वरिष्ठ अधिका-याकडून पुन्हा हे प्रकरण तपासून घेण्यात येईल त्यामध्ये 307 कलम काढणे आवश्यक असेल तर निश्चितपणे 307 कलम मागे घेण्यात येईल. त्याचबरोबर जर कोणी चुकीची कारवाई केली असल्याचे चौकशीमध्ये वा तपासामध्ये आढळून आले तर संबंधिताविरुध्द कारवाईसुध्दा करण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : या संस्थेमधील वाद अनेक वर्षापासून सुरु आहे हे मला माहीत आहे. मला फक्त एवढाच प्रश्न पडला आहे की, माननीय गृहमंत्र्यांनी तंटा मुक्तीचा उल्लेख येथे कसा केला नाही ? या संस्थेतील बरेचसे प्रश्न धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित आहेत. कोणाच्या ताब्यात ही संस्था राहणार आहेच हाच खरा वादाचा मुद्दा आहे. या बाबतीत शासन काही समन्वयाची भूमिका घेणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : मी हा तंटा सोडविण्याचा प्रयत्न केला असता परंतु या संस्थेमधील मंडळी फार मोठी आहेत .त्याचबरोबर त्या संस्थेमध्ये इतकी भांडणे आहेत की शासनाकडून ती भांडणे मिटतील असे मला वाटत नाही. मात्र या संस्थेमधील व्यक्ती एकत्र बसून हा वाद मिटवू शकतात. त्याचबरोबर आपली तंटा मुक्ती राष्ट्रीय स्तरावर गेलेली आहे.

श्री.सुमंत गायकवाड : 307 आणि 120 (ब) कलमाबद्दल शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

श्री.आर आर पाटील : या संबंधीचे निर्णय मंत्री स्तरावर वा सभागृहात होत नाहीत. तपास करुनच त्यासबंधीचे निर्णय घ्यावे लागतील. एखादे कलम काढावयाचे म्हटले किंवा कलम घालावयाचे म्हटले तरी ते कोर्टात फायनल होत असतें.तेव्हा चौकशी करुनच यासंबंधीचा निर्णय घ्यावा लागणार आहे. त्याचबरोबर आय.जी. दर्जाचा दुस-या विभागातील वरिष्ठ अधिकारी पाठवून पुन्हा प्रकरण तपासून घेण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नवी मुंबई येथे सिडकोने बांधलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी 2.5 चटई क्षेत्र निर्देशांक देणे

मु.शी. नवी मुंबई येथे सिडकोने बांधलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी 2.5 चटई क्षेत्र निर्देशांक देण्याबाबत श्री.विनोद तावडे, चंद्रकांत पाटील,संजय केळकर,रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विनोद तावडे ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" नवी मुंबईतील सिडको प्रशासनाने बांधलेल्या निकृष्ट दर्जाच्या इमारतींना पंचवीस वर्षे होऊनही सदर इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी 2.5 चटई निर्देशांक देण्याची मागणी रहिवाशांनी वारंवार करुनही प्रशासनाने निर्णय घेतला नसणे सदर निकृष्ट दर्जाच्या इमारतींच्या प्रश्नाबाबत तेथील नागरिक गेली 20 वर्षे मागणी करीत असणे, नवी मुंबई परिसरातील वाशी येथील सेक्टर 10 मधील श्रध्दा अपार्टमेन्ट येथील नागरिक इमारतींचे बांधकाम धोकादायक झाल्यामुळे गेली 12 वर्षे ट्रान्झिट कॅम्पमध्ये राहत असणे, नवी मंबई महानगरपालिका प्रशासनाने धोकादायक बांधकाम असलेल्या इमारतींना पुनर्विकास करतांना 2.5 चटई निर्देशांक मिळण्याबाबत कार्यवाही करुनही प्रशसनाने निर्णय घेतलेला नसणे, नवी मुंबईतील या सिडकोने बांधलेल्या निकृष्ट दर्जाच्या इमारती अत्यंत धोकादायक परिस्थितीमध्ये असूनही हजारो नागरिक या इमारतींमध्ये भयग्रस्त परिस्थितीत रहात असणे, त्यामुळे पुनर्विकास करतांना 2.5 चटई निर्देशांक देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

श्री.भास्कर जाधव ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, नवी मुंबईतील वाशी येथील सेक्टर 9 आणि 10 मधील जेएन वन आणि जेएन टू टाईपच्या इमारती धोकादायक इमारती म्हणून जाहीर होऊन 15 वर्षे होऊन गेली आहेत.या इमारती धोकादायक असल्याबाबत आय.आय.टी.ने सुध्दा अहवाल दिला आहे.त्या ठिकाणची श्रध्दा अपार्टमेन्ट रिकामी करुन 12 वर्षे होऊन गेलेली आहे अजूनही त्या रहिवाशांना ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये ठेवण्यात आलेले आहे. मी स्वत: तसेच सन्माननीय सदस्य श्री संजय केळकर यांनी त्या ठिकाणी भेट दिली असून तेथील रहिवाशांबरोबर चर्चा देखील केली होती इतकेच नव्हे तर त्या भागातील श्री सुरेश हावरे,श्री. विजय चौघुले श्रीमती वर्षा भोसले यांनी आंदोलने केली होती तसेच श्री.देवेंद्र खडसे आणि श्रीमती प्रमिला खडसे यांनी यासाठी उपोषणसुध्दा केले होते. त्या भागातील रहिवाशांबरोबर आम्ही बोललो होतो त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, या संदर्भात आम्ही सातत्याने हा विषय जे शासनामध्ये आहेत त्यांच्याकडे तसेच स्थानिक नेतृत्वासमोर काढत होतो. त्यावेळी ते असे म्हणाले की, आता हे काम करु. त्या भागातील एका व्यक्तीने मला चिऊताईची गोष्ट सांगितली होती.आम्ही असे विचारले की एफ.एस.आय.चा निर्णय केव्हा घेण्यात येणार आहे ? तेव्हा ते असे म्हणाले की, अगोदर माझ्या मुलाला खासदार होऊ द्या. त्यानंतर पुन्हा विचारल्या नंतर ते असे म्हणाले की , त्याला आमदार होऊ द्या. त्यानंतर पुन्हा विचारल्या नंतर ते असे म्हणाले की, पुतण्याला महापौर होऊ द्या. त्यांनी सांगितल्याप्रमाणे सगळी पदे मिळालेली आहेत. " चिऊताई, चिऊताई दार उघड" अशा प्रकारची ती गोष्ट होती आणि वाशीमधील मतदार हे दार उधडण्याची वाट पहात आहेत. तेव्हा एफ.एस.आय.चे दार केव्हा उघडले जाणार आहे ? एफ.एस.आय. देण्याची मागणी करुन पंधरा सोळा वर्षे होऊन गेली आहेत . तीन निवडणुकामध्ये मते घेऊनही एफ.एस.आय.चा निर्णय झालेला नाही. राजकीय व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास उडण्यास आपले कर्तृत्वच कारणीभूत झाल्यामुळे श्री.अण्णा हजारे यांना पाठिंबा मिळत असतो.त्या ठिकाणच्या लोकांना ख-या अर्थाने न्याय द्यावयाचा असेल तर माननीय मंत्र्यांना माझे आग्रहाचे असे म्हणणे आहे की, 2.5 हा वाढीव एफ.एस.आय. केव्हा देणार आहात ? देणार असाल तर तो कधी पर्यत देणार आहात . आजच माननीय मुख्यमंत्र्यांनी असे घोषित केले आहे की, एस.आर.ए.च्या योजना आता बिल्डरांना देण्यात येणार

4..



श्री.विनोद तावडे .......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नाहीत तर लिलावाने देण्यात येणार आहेत असे आम्ही आजच वर्तमानपत्रात वाचले आहे. अनेक लोकांनी अगोदरच करार करुन ठेवलेले आहेत. त्यातून जनतेची पुन्हा लूट केली जाईल त्यापेक्षा सिडकोने किंवा सबंधित ॲथॉरिटीने लिलाव करुन जो जास्तीत जास्त फायदा जनतेला आणि सरकारला देईल त्यालाच हे काम देण्यात येणार आहे काय ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी मूळ प्रश्न विचारण्यापूर्वी मुद्दा डेव्हलप करण्यासाठी चिऊताईची गोष्ट सांगितली. माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांचे असे म्हणणे आहे की, ही गोष्ट त्यांनी स्वत: रचली किंवा कपोलकल्पित असली तरी मी लहानपणी ऐकली आहे.

श्री.विनोद तावडे (बसून बोलतात) : तेथील मतदारांनी सांगितलेली गोष्ट आहे...

श्री. भास्कर जाधव : होय. परंतु त्यांनी ती गोष्ट अर्धवट सांगितली आहे. चिऊ ताई चिऊ ताई दार उघड असे म्हणण्याकरिता एक कावळा गेला होता, त्या चिऊताईने दार उघडल्यानंतर त्या घराचा ताबा घेण्याकरिता तो कावळा घरामध्ये गेला, आणि मग तो कावळा तेथील तापलेल्या तव्यावर बसल्यानंतर त्याची काय अवस्था झाली अशाप्रकारच्या अर्धवट गोष्टीची आठवण माझ्या सन्माननीय मित्रांनी मला करुन दिली ती मी पूर्ण करुन सांगितली आहे, त्याबद्दल त्यांनी मनाला लावून घेऊ नये.

**उप सभापती** : ही लक्षवेधी सूचना घराच्या प्रश्नाबाबत असतांना आपण चिऊताई विरुध्द कावळा हे द्वंद्व युध्द कशासाठी चालू केले?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, जुन्या गोष्टींना उजाळा देण्याचे काम आम्ही दोघांनी केले आहे. माननीय सदस्यांनी उदाहरण देतांना आपला मुलगा खासदार होईल या अर्थाने ठाणे जिल्ह्याचे पालक मंत्री माननीय श्री. गणेश नाईक साहेबांच्या दिशेने शाब्दिक बाण सोडण्याचा प्रयत्न केला. ज्यांच्याकडून काही अपेक्षा असतात, जे काही करु इच्छितात, करण्याचा प्रयत्न करतात, करीत असतात त्यांच्या बाबतीत असे बाण सुटत असतात हे संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. या संदर्भात त्यांनी सांगत असतांना आपल्या पक्षातील नेतेमंडळींनी त्यामध्ये माननीय सदस्य श्री. संजय केळकर वगैरेंनी पहाणी केल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात त्या जिल्ह्याचे पालक मंत्री माननीय श्री. गणेशजी नाईक यांच्याकडे दिनांक 21 ऑगस्ट 2009 रोजी एक बैठक घेण्यात आली होती. आपण ज्या करिता 2.5 एफएसआय मिळण्याचा आग्रह धरलात त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री अणि माननीय पालक मंत्र्यांच्या बैठकीमध्ये एक सर्वमान्य निर्णय झाला . त्यामुळे तेथील म्हाडाच्या ज्या इमारती धोकादायक म्हणून घोषित झालेल्या आहेत त्यांचे एकंदर 12 नोड असून त्यापैकी 7 नोड डेव्हलप असून ते महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. त्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/

श्री. भास्कर जाधव.....

त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेचे असलेले डीसीआर डेव्हलप करीत असतांना 2.5 एफएसआय देण्याचा निर्णय झालेला आहे. हा निर्णय झाल्याची तारीख माझ्याजवळ आहे, परंतु मी त्याबाबत विस्ताराने सांगणार नाही.

दिनांक 21 ऑगस्ट 2009 रोजी नवी मुंबई महानगरपालिकेच्या जनरल बॉडीची मिटींग असतांना त्याच दिवशी महानगरपालिकेने ठराव संमत करुन घेतला व 2.5 हा एफएसआय स्वीकारुन त्या अनुषंगाने बांधकाम करण्याचा निर्णय घेतला. परंतु त्यामध्ये असा प्रश्न निर्माण झाला की, बाकीच्या ठिकाणी 1.5 एफएसआय होता, आता त्या ठिकाणी एकचा एफएसआय आहे आणि गावठाणाच्या ठिकाणी 1.8 एफएसआय आहे. अशा परिस्थितीत 2.5 एफएसआय वाढवून द्यावयाचा म्हटल्यास त्या अनुषंगाने कोणकोणत्या गोष्टींवर ताण पडेल याचा विचार करणे नवी मुंबई महानगरपालिकेला स्वाभाविकपणे भाग पडले. यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने दिनांक 17.4.2010 रोजी तो प्रस्ताव पुन्हा प्रशासनाकडे पाठवून दिला. त्यानंतर प्रशासनाने त्या बाबत अभ्यास करण्याकरिता एक एजन्सी नेमली, त्या एजन्सीने 2.5 एफएसआय देण्याबाबत दिनांक 10.3.2011 रोजी एक टेंडर प्रसिध्द केले. त्यानंतर दिनांक 6.4.2011 रोजी टेक्निकल बिड तपासण्यात आले. आज दिनांक 18.4.2011 रोजी संध्याकाळी या संदर्भातील फायनान्शिअल बिड अंतिम करावयाचे असून मागविण्यात आलेले टेंडर ओपन करण्याचे काम संध्याकाळी 4 वाजता केले जाणार आहे. त्यामुळे या संदर्भातील अंतिम स्वरुपातील निर्णय लवकरच आपल्यासमोर येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये एक बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी 31 तारखेला बेंजामीन साहेबांनी या बाबत अभ्यास करावा यासाठी त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती जाहीर करण्यात आली.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर .......

बाकीच्या जिल्ह्यातील मोडकळीस आलेल्या धोकादायक . . . .

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : सन्माननीय सदस्य ठाण्याबद्दल बोलत आहेत.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे जिल्हा आणि सिडकोच्या बाबतीत सुध्दा माननीय पालकमंत्र्यांनी जेव्हा तो निर्णय पुटअप केला, तेव्हा त्यांनी सांगितले की, या संबंधातील सगळे निर्णय आपण 15 दिवसामध्ये करु. माझा असा प्रश्न आहे की, त्या समितीच्या बाबतीत काय झाले? कारण 15 एप्रिल रोजी 15 दिवसाची मुदत संपत आहे. तेव्हा याबाबत बेंजामीन समितीने काय अहवाल दिला आहे आणि 2.5 एफ.एस.आय.बद्दल वारंवार मागणी होत होती, त्याबाबत काय निर्णय झालेला आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांच्या प्रश्नांना उत्तर देत असताना एका प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे राहिलेले आहे.एस.आर.ए.स्कीम ही आजतरी सिडको वसाहतीमध्ये लागू नाही. म्हणून यासंबंधातील निर्णयाबाबत सांगावयाचे तर एस.आर.ए. स्कीम लागू नसल्यामुळेच माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठकीमध्ये जी काही घोषणा केली असेल, कारण त्या बैठकीच्या वेळी मी उपस्थित नव्हतो. परंतु त्यांनी जी काही घोषणा केली असेल ती लागू असण्याचा प्रश्न आज तरी उद्‌भवत नाही. दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी ठाणे संबंधी विचारला आहे. आज या ठिकाणी जी लक्षवेधी सूचना देण्यात आलेली आहे, ती सिडकोपुरती मर्यादित आहे. परंतु त्यांनी त्या अनुषंगाने प्रश्न विचारलेला आहे तो संपूर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये . . . .

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मी याठिकाणी माहिती दिली. पण या संबंधातील निर्णय 15 दिवसामध्ये जाहीर करु असे सांगण्यात आले आहे. मी मघाशी सांगितले की, सिडकोला अडीच एफ.एस.आय.देण्यासंबंधात निर्णय होण्याची शक्यता आहे.म्हणून सिडकोने बांधलेल्या 1980 मधील आणि त्या दरम्यान मधील ज्या इमारती आहेत की ज्या धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत त्याला अडीच एफ.एस.आय.देण्याच्या बाबतीत शासनाचा निर्णय झालेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,मी स्पेसिफीक प्रश्न विचारलेला आहे आणि सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्करराव जाधव यांनी उत्तर देताना आपल्या सहकारी मंत्र्यांची बाजू घेत असताना नकळतपणे जनतेला कावळा म्हटले. पण हा जनतेचा कावळा पिंडाला शिवल्याशिवाय समाधान होत नाही एवढे लक्षात ठेवावे. जनताच त्यांच्याकडे मागणी करीत होती आणि तुम्ही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . ..

जनतेला कावळा म्हणत आहात म्हणजे सत्तेमध्ये गेल्यानंतर कशी भूमिका घेतली जाते हे मंत्री महोदय श्री.भास्करराव जाधव आम्हाला कळले. ठीक आहे. आमची काही हरकत नाही आणि तुम्ही काय बोलला आहात हे लोकांना उद्या कळेल. आमचा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, अनेक खाजगी लोकांनी किंवा तेथील नगरसेवकांनी किंवा राजकीय नेत्यांनी कमिट्या नेमल्या आहेत, ज्या एन.ओ.सी.घेतल्या आहेत,परवानग्या घेतलेल्या आहेत आणि एवढा प्रचंड एफ.एस.आय. मिळाल्या नंतर जो फायदा व्हावयाचा आहे तो सिडकोला झाला. त्यामुळे आपण सिडकोमार्फत टेंडर काढून काम करणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी पहिल्यांदा एका गोष्टीचा खुलासा करु इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.विनोदजी तावडे यांच्याबरोबर मी देखील अनेक वर्षे काम केलेले आहे. त्यामुळे कोणता शब्द कुठे टोलवावयाचा हे त्यांना जेवढे जमते, त्याच्या काही अंशी मला सुध्दा जमते. सन्माननीय सदस्यांनी गोष्ट सांगितली आणि ते सांगत असताना त्यांनी माननीय राज्य उत्पादन शुल्क मंत्री श्री.गणेश नाईक यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला म्हणून . . ..

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी नाव घेतलेले नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी अंगुलीनिर्देश केला असे म्हटले आहे, नाव घेतले असे म्हटलेले नाही. मी देखील जबाबदारीने बोलत आहे. त्यामुळे ती गोष्ट मनाला लावून घेऊ नये. ती गोष्ट मी फक्त दोघांपुरतीच मर्यादित ठेवलेली आहे. मी लोकांपर्यंत ही गोष्ट नेलेली नाही.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : जनतेपर्यंत . . .

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी ही गोष्ट जनतेपर्यंत घेऊन गेलो नाही.

**उप सभापती** : आता लक्षवेधी सूचना क्रमांक 5 चर्चेसाठी घेण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मला याबाबतीत उत्तर दिले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगावयाचे तर 7 नोडमध्ये इमारतींचे बांधकाम झालेले आहे, ते आता नवी मुंबई महानगरपालिकेकडे हॅण्डओव्हर केलेले असल्यामुळे याचा निर्णय नवी मुंबई महानगर पालिकेने घ्यावयाचा आहे, सिडकोने घ्यावयाचा नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की,येथील इमारती धोकादायक झाल्यामुळे त्यांची पुनर्रचना करावयाची आहे.सिडकोने एक शहर वसविलेले आहे.मी सिडकोबाबत चर्चा करताना सांगितले की,हे सुंदर शहर एवढे वर्ष रहाणार,आम्ही कौतुक





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केले. पण या इमारतींचे आयुष्य किती आहे ? 35 वर्षापूर्वी बांधलेली इमारत मोडते, 15 वर्षापूर्वी बांधलेली इमारत मोडते मग ज्या अधिकाऱ्यांनी, ज्या ठेकेदाराने या इमारतींचे बांधकाम केले आहे, त्या इमारतींची जर 15 वर्षामध्ये परत पुनर्बांधणी करावी लागत असेल तर मग शासन संबंधितांवर काय कारवाई करणार आहे, या बांधकामांच्या बाबतीत शासन संबंधितांची चौकशी करणार आहे काय, यामध्ये जे-जे ठेकेदार होते, जे-जे अधिकारी होते त्यांच्यावर कारवाई करुन यातील जे ठेकेदार आहेत त्यांना ब्लॅक लिस्ट करणार काय आणि त्यांना सिडकोच्या यादीतून काढणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव प्र.पाटील यांना जो प्रश्न पडलेला आहे, तोच प्रश्न आज सकाळी माझ्या मनामध्ये देखील उपस्थित झाला की, या इमारती कधी बांधल्या, या इमारती कधी मोडकळीस आल्या ? या सगळ्या इमारती 1980 च्या काळातील आहेत आणि आपल्याला सर्वांना आठवत असेल की, 1980 ते 1987-1988 च्या कालावधीमध्ये एकंदरीत सिमेंटच्या बाबतीत झालेली चर्चा आणि त्यावेळी उद्‌भवलेले संकट, त्या काळामध्ये सिमेंट न मिळणे आणि त्यामुळे बाजारात आलेले निकृष्ट दर्जाचे सिमेंट अशी अनेक कारणे याला जबाबदार आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. विनोद तावडे :बाकीच्या इमारती पडल्या नाहीत. मंत्री महोदयांनी भ्रष्टाचाऱ्यांचे समर्थन करु नये.

श्री. भास्कर जाधव : मी कोणाचेही समर्थन करीत नाही आणि कोणालाही पाठीशी घालण्याचे काहीच कारण नाही. परंतु 1980 ते 2011 पर्यंत ....

**उप सभापती** : 1980 साली माननीय मंत्री महोदय कुठे होते.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी त्यावेळी ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करीत होतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ 16:15

**पृ. शी.** : समाजिक न्याय विभागाने फर्निचरच्या संदर्भात काढलेल्या निविदेमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याची शक्यता.

**मु. शी.** :समाजिक न्याय विभागाने फर्निचरच्या संदर्भात काढलेल्या निविदेमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याची शक्यता यासंबंधी श्री. रामदास कदम ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने बांधलेल्या विविध इमारतींकरिता लागणारे फर्निचर व विविध वस्तू तथा सेवा खरेदी करण्यासाठी संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक 24 मे, 2010 रोजी अंदाजीत रक्कम रुपये 220 कोटीच्या काढलेल्या निविदा, नियमानुसार 1 कोटी व त्यावरील कोणत्याही रकमेच्या वस्तू खरेदीकरिता ई-टेंडरींग पध्दत अवलंबिणे आवश्यक असताना ही निविदा प्रक्रिया सदर सूचना धुडकावून सुरु करणे, टेंडरमध्ये ठराविक लोकांनाच भाग घेता येईल अशा शर्ती व नियम तयार करुन यामध्ये फक्त 4 कंपन्यांना पात्र ठरविणे, यामध्ये शासनाच्या काही एजन्सींना अपात्र ठरविणे, उच्च न्यायालयाने ही प्रक्रिया रद्द करुन ई-टेंडरींग पध्दती अवलंबिण्याचे निर्देश देणे, परंतु श्री.सावंत, संचालक, समाजकल्याण यांनी ई-टेंडरींगची फक्त नोटीस काढणे, मात्र प्रत्यक्षात पूर्वी ज्या कंपन्यांनी निविदा भरलेल्या आहेत त्याच कंपन्यांना पात्र ठरविणे, पुरवठा धारकांना 20% अग्रिम रक्कम देण्याची केलेली तरतूद, यामध्ये मोठया प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याची शक्यता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

श्री. शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आठ दिवस अगोदर अशीच एक लक्षवेधी सूचना सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात चर्चेला आली होती. श्री. सावंत यांच्या माध्यमातूनच असे प्रस्ताव कसे येतात असा उप प्रश्न मी त्यावेळी विचारला होता. समाजकल्याण विभागाकडून 220 कोटी रुपयांच्या फर्निचर खरेदीचा प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. खरे तर एक कोटी रुपयापेक्षा जास्त रुपयांची खरेदी करावयाची असेल तर हायकोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार ई-टेंडरिंगच्या माध्यमातून टेंडर काढावे लागतात. माझे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा की, जो सल्लागार नियुक्त करण्यात आला आहे, त्याला दहा कोटी रुपये देण्यात आले आहेत काय? दुसरा प्रश्न असा की, जे चार ठेकेदार नेमले आहेत त्यांना 20 टक्के रक्कम म्हणजे 220 कोटी पैकी 50 कोटी रुपये आगाऊ काम करण्याच्या अगोदर देण्याची तरतूद केलेली आहे. अशा प्रकारे या शासनाच्या पैशाचा भ्रष्टाचार होत आहे. हम करे सो कायदा. माझा तिसरा प्रश्न असा की, ई-टेंडरिंग काढल्यानंतर पुन्हा त्याच चार लोकांना टेंडर देण्यात आले आहे ही गोष्ट खरी आहे काय?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सुरुवातीला ओपन टेंडर काढले. त्यानंतर ई-नोटीस काढली. त्यानंतर माननीय हायकोर्टाच्या निदेशानुसार ई-टेंडरिंग काढण्यात आले. त्यामध्ये 16 कंपन्यांनी भाग घेतला. त्यापैकी 10 कंपन्या पात्र ठरल्या. त्यानंतर पुढची प्रक्रिया होऊन अंतिमत: पाच कंपन्या पात्र ठरल्या. सन्माननीय सदस्यांनी 20 टक्के रक्कम ॲडव्हान्स देण्यात आलेली आहे काय, असा प्रश्न विचारलेला आहे. एक पैसा सुध्दा ॲडव्हान्स रक्कम देण्यात आलेली नाही. जोपर्यंत सप्लाय होत नाही तोपर्यंत पैसे देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. ई-टेंडरिंग काढण्यात आलेले आहे. ते अद्याप फायनल झालेले नाही. त्या संबंधीचा प्रस्ताव अद्याप शासन स्तरावर यावयाचा आहे. त्यानंतर तो फायनल होणार आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत जवळ जवळ 34 जिल्ह्यामध्ये सामाजिक न्याय भवन, 100 निवासी शाळा आणि 271 वसतिगृहचे बांधकाम सुरु आहे. त्यासाठी फर्निचरची अत्यंत आवश्यकता होती त्यासाठी ई-टेंडरिंग काढण्यात आले आहे, त्यामध्ये कोणाची बाजू घेण्याचा प्रश्न येत नाही.

...5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, ज्या चार लोकांना हे काम दिले होते त्याच चार लोकांना ई-टेंडरिंग केल्यानंतर देखील काम देण्यात आले ही गोष्ट खरी आहे काय? 20 टक्के रक्कम देण्याची तरतूद केलेली आहे, हे खरे आहे काय आणि सल्लागारासाठी 10 कोटी रुपये देण्याची तरतूद केलेली आहे, हे खरे आहे काय? असे तीन प्रश्न मी विचारले होते पण माझ्या एकाही प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सल्लागाराला 10 कोटी रुपये देण्यात आलेले नाहीत. अतिशय पारदर्शकपणे ई-टेंडरिंग करुन निविदा बोलावण्यात आलेल्या आहेत. त्या निविदा अद्याप फायनल झालेल्या नाहीत. त्यासंधीचा प्रस्ताव अद्याप शासनाकडे यावयाचा आहे. समाजिक न्याय विभागाला तांत्रिक गोष्टींची माहिती नसल्यामुळे टीएमसी नेमली आहे. त्यांच्यामार्फत जाहीरात देण्यात आली. त्यांच्या मार्फतसुध्दा 16 अर्ज आले होते. त्यापैकी तीन विभागासाठी तीन अर्ज फायनल केलेले आहेत. पैसे देण्यात आलेले आहेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. त्याबाबतची माहिती माझ्याकडे नाही पण ती माहिती घेऊन देण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. पहिल्यांदा ज्या चार लोकांना टेंडर दिले होते त्यांनाच ई-टेंडरींग केल्यानंतर टेंडर दिले का ? 16 लोकांनी भाग घेतला होता. पुन्हा ई-टेंडरींग केले. पण पहिल्यांदा ई-टेंडरींग करण्याच्या अगोदर ज्या चौघांना टेंडर दिले होते त्या चौघांचीच परत नेमणूक केली, ही गोष्ट खरी आहे का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, हा एल-1 टेंडरचा प्रश्न आहे. यामध्ये माझा वैयक्तिक किंवा त्या संचालकांचा प्रश्न नाही. यामध्ये 7 लोकांची कमिटी आहे. त्या समितीमध्ये एकटे संचालक नाहीत. संचालक हे त्या समितीचे अध्यक्ष आहेत. एमएसआरडीसीचे मुख्य अभियंता हे सदस्य आहेत. उप संचालक, लेखा हे सदस्य आहेत. उप संचालक, शिक्षण हे सदस्य आहेत. विभागीय समाजकल्याण अधिकारी त्यामध्ये आहेत. अशा 7 लोकांची कमिटी आहे.

श्री. रामदास कदम : माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून हस्तक्षेप झाला. मी आपल्याला नावे देईन. मी जबाबदारीने बोलतो. 16 लोकांनी भाग घेतला असताना ई-टेंडरींग करण्याच्या अगोदर ज्या चौघांची नावे होती त्या चौघांनाच परत टेंडर दिले का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, एल-1 टेंडर एकट्यालाच मिळणार, ही साधी गोष्ट आहे. ज्यांनी मागाहून फॉर्म भरले त्यांना दिले पाहिजे ही काही जबरदस्ती आहे का ? ज्यांनी मागाहून फॉर्म भरले त्यांना द्यावयास पाहिजे असा नियम नाही. तसे असेल तर सन्माननीय सदस्यांनी दाखवावे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून किंवा कोणत्याही कार्यालयातून काही झालेले नाही. हे सर्व खुले आहे आणि खुलेपणाने केलेले आहे.

श्री. संदिप बाजोरिया : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाने 220 कोटी रुपयांची निविदा काढली त्यामध्ये पहिल्यांदाच ई-निविदा का काढल्या नाहीत ? कंसल्टंटची जी नेमणूक करण्यात आली होती त्यांना एवढी मोठी निविदा काढण्याचा अनुभव होता का ? जरी त्याच्याकडे अनुभव असला तरी त्यामध्ये पर्टिक्युलर आयटेम्सची जी किंमत दाखविलेली आहे त्यामध्ये खुर्चीसाठी 12 हजार रुपये दाखविलेली आहे ती कोणत्या आधारे व कशा प्रकारे ठरविली आहे ? त्यामध्ये एकाच संकुलात फर्निचरचे सर्व आयटेम्स बनविण्याची जी अट घातलेली आहे ती चुकीची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संदिप बाजोरिया .....

आहे. माझ्या माहिती प्रमाणे संपूर्ण भारतामध्ये असे आयटेम्स बनविणारी एकही कंपनी नाही. तरी पहिली निविदा प्रक्रिया संपूर्णपणे रद्द करुन, आपण दिलेल्या उत्तरामध्ये दुसऱ्या प्रक्रियमध्ये आलेले निविदाधारक यांना अपात्र ठरविलेले आहे, त्यामुळे परत नवीन कंसल्टंसी नेमून योग्य त्या नियोजनाव्दारे ही संपूर्ण प्रक्रिया माननीय मंत्री महोदय पूर्ण करणार आहेत का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, जे कंसल्टंट नेमलेले आहेत ते नियमाप्रमाणे नेमलेले आहेत. 16 लोकांचे फॉर्म होते त्यापैकी तीन विभागामध्ये तिघांना नेमलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे ते नियमाप्रमाणे आहे म्हणूनच मान्य केले आहे. नाही तर त्याला चॅलेंज झाले असते. बाकीचे लोक गप्प बसतात का ? नुसते ई-नोटीस झाल्यावर हायकोर्टात चॅलेंज केले म्हणून आम्ही ई-टेंडरींग केले. सन्माननीय सदस्यांनी खुर्चीचा भाव सांगितला. खुर्चीचा भाव वगैरे मला माहीत नाही पण आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुण्याला आपली जी संस्था आहे त्या संस्थेमध्ये आणि नागपूरला कोणत्या स्टॅण्डर्डचे पलंग असावेत, कोणत्या स्टॅण्डर्डच्या काय काय गोष्टी असाव्यात हे दिलेले आहे. त्या स्पेसिफिकेशन प्रमाणेच ते भरले आहे आणि यामध्ये खुली स्पर्धा आहे. अजून ते फायनल झालेले नाही. आमच्याकडे आल्यानंतर त्यामध्ये खूपच अतिरिक्त आहे असे वाटले तर विचार करु.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, एका खुर्चीची किंमत 12 हजार रुपये आहे. टेबलाची जी जाडी आहे ती 24 एमएम आहे. माननीय राष्ट्रपती किंवा माननीय राज्यपाल यांच्या घरामध्ये सुध्दा 24 एमएमचे फर्निचर नसणार. माननीय उप मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. यामध्ये आपण वैयक्तिक लक्ष घालून, हे सर्व तपासून घेऊन, शासनाचा पैसा वाचविण्यासाठी, भ्रष्टाचार थांबविण्यासाठी, पुन्हा याच्या फेरनिविदा काढणार का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, यामध्ये एका पैशाचाही भ्रष्टाचार नाही. स्पेसिफिकेशन प्रमाणे किंमती जास्त आहेत का एवढाच मुद्दा आहे. मी ते अजून पाहिलेले नाही. माझ्याकडे ते आलेले नाही. विभागाकडे ते आले आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे यामध्ये शासनाचे पैसे वाया जाणार नाहीत. स्पेसिफिकेशनप्रमाणे बाजारभाव पाहण्यात येईल तसेच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/

श्री. शिवाजीराव मोघे.....

आपले जे लघुउद्योग आहेत त्यांच्याशी टॅली करु आणि त्यामध्ये योग्य असेल तर ते करण्यात येईल. यामध्ये शासनाचे पैसे वाया जाऊ देणार नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हा सामाजिक न्यायाचा विषय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जेवढी स्मारके बांधली त्यासाठी पैसे खर्ची पडणार आहेत. त्या पैशांचा अपव्यय होता कामा नये. संचालक श्री. सावंत यांचा मी स्पेसिफिक उल्लेख केला. प्रत्येक टेंडरमध्ये श्री. सावंत यांच्याकडूनच प्रस्ताव येतात. म्हणूनच मी पुन्हा पुन्हा प्रश्न विचारला की, ई-टेंडरींग करण्याच्या अगोदर ज्या चौघांना काम दिले होते त्यांनाच ई-टेंडरींग केल्यानंतर 220 कोटी रुपयांचे काम दिले आणि त्यामध्ये 20 टक्के आगाऊ पैसे देण्याची तरतूद केलेली आहे. 20 टक्के म्हणजे 50 कोटी रुपये होतात.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

50 कोटी रुपये काम करण्यापूर्वीच देण्याची तरतूद केलेली आहे. हा सामाजिक न्यायाचा विषय आहे. म्हणून याची तपासणी करुन फेर निविदा काढली जाईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे त्यांना अजून काम दिलेले नाही, त्यामुळे त्यांना पैसा देण्याचा प्रश्न येत नाही. शासनाने जर आर.सी.नुसार हे काम दिले असते तर त्या बाबतीत सुध्दा बोलले गेले असते. या खरेदीसाठी पारदर्शक पध्दत वापरली असताना या पध्दतीबाबत येथे आरोप केले जात आहेत. या खरेदीत जर काही चुका झाल्या तर त्या दुरुस्त करता येतील. मी नाही असे म्हणत नाही. ज्यावेळी हे प्रकरण शासनाकडे येईल, त्यावेळी शासनाला जर त्यात काही गोष्टी अवास्तव वाटल्या तर बाजारभाव पाहिला जाईल, एमएसएसआयडीसीच्या भावाशी तुलना केली जाईल. त्यामध्ये जे रास्त असेल त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. सामाजिक न्याय विभागाचा पैसा अवास्तवपणे खर्च होणार नाही याची पूर्णपणे काळजी घेतली जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ई-टेंडरींगपूर्वी ज्यांना हे काम दिले होते त्यांची नावे व ई-टेंडरींगनंतर ज्या 4 कंपन्यांना हे काम दिले आहे त्यांची नावे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : कोणाला हे काम दिले त्याची माहिती माझ्याजवळ उपलब्ध नाही. पण 10 कंपन्यांपैकी जे पात्र ठरले आहेत त्यांची मी नावे सांगतो. मे.जी.एन.असोसिएटस्, मुंबई, सुपारीबाग मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ, मुंबई, मे.पवार इलेक्ट्रॉनिक सिस्टीम, नाशिक, मे.जे.एम.असोसिएटस्, व मे.अरोबिक्स एण्टरप्राईझेस. सन्माननीय सदस्यांनी अभ्यास केलेला आहे. परंतु नंतर टेंडर भरलेल्या कंपनीला काम दिले पाहिजे असा नियम असल्यास त्यांनी तो मला दाखवावा.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : हा शासनाचा पैसा आहे. अशा प्रकारे मॅनेज करुन कोणालाही काम देता येत नाही. या टेंडरमध्ये 12 हजार रुपये एका टेबलाची किंमत दाखविली आहे. टेबलाची जाडी 24 एमएम इतकी दाखविली आहे. भ्रष्टाचाराच्या माध्यमातून शासनाचा पैसा कोणालाही देण्याचा अधिकार मंत्री महोदयांना सुध्दा नाही. म्हणून ई-टेंडरपूर्वी ज्या चौधांना काम दिले होते तेच 4 जण ई-टेंडरमध्ये पात्र कसे काय ठरतात, हे चौघेजण नेमके कोण आहेत, चौघेजण एकच आहेत काय, याची वरिष्ठ स्तरावरुन चौकशी होईल काय अशी माझी मागणी आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : या कामासाठी अजून कोणालाही पैसा दिलेला नाही. शासनाकडे ते लोक येतील त्यावेळी सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा जरुर विचार केला जाईल.

------

3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेखाच्या सूचना**

**पृ. शी.** : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ.डी.एच.तांबेकर यांनी लोणार सरोवरात बॅसील्युस ओडीसीई हा अतिशय दुर्मिळ जीवाणू असल्याचा शोध लावणे

**मु. शी.** : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ.डी.एच.तांबेकर यांनी लोणार सरोवरात बॅसील्युस ओडीसीई हा अतिशय दुर्मिळ जीवाणू असल्याचा शोध लावणे याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"बॅसील्युस ओडीसीई" हा अतिशय दुर्मिळ असा जीवाणू बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवरात असल्याचा शोध नुकताच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील सूक्ष्म जीव शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.डी.एच.तांबेकर यांनी लावला. या जीवाणूचे अस्तित्व पृथ्वीवर नसल्याच्या निर्वाळ्याला मान्यता देण्यात आली होती. हा सूक्ष्म जीव लोणार सरोवरात सापडल्याने त्याचे अस्तित्व पृथ्वीवर असल्याचे सिध्द झाल्यामुळे या घटनेकडे विशेषत्वाने पाहिले जात आहे. नव्याने शोध लागलेला हा जीवाणू 100 टक्के डीसीसिएशन आहे. यु.व्ही.रेडिएशन्स आणि मामो रेडिएशन्सचा प्रभाव काही अंशी कमी करण्यास हा जीवाणू उपयुक्त असून 121 डीग्री सेल्सियस, 15 एलबी प्रेशरवर हा जीवाणू मरण पावत नसल्यामुळे बदलत्या जागतिक तापमान वाढीच्या पार्श्वभूमीवर या जीवाणूच्या गुणधर्माला महत्व प्राप्त झाले आहे. 16 एस, आरएनए पध्दतीचा वापर करुन या जीवाणूचा शोध लावण्यात आल्यामुळे ही पध्दत जीवाणू शोधण्यास आदर्श मानली जाते. "बॅसील्युस ओडीसीई" हा जीवाणू पृथ्वीवर अस्तित्वात नसल्याचे पेटण्ट यापूर्वी मंजूर झाले असल्यामुळे डॉ.तांबेकरांच्या संशोधनाने या जीवाणूच्या अस्तित्वाला मान्यता मिळणार आहे. या शोधामुळे लोणार सरोवराच्या निर्मितीवर नव्याने संशोधन होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

जीवाणूच्या अस्तित्वामुळे जागतिक तापमानावर तसेच पिकांच्या सुरक्षिततेवर कोणता परिणाम होणार आहे यावर तातडीने संशोधन होणे आवश्यक असल्यामुळे ही बाब मी या विशेष उल्लेखाद्वारे सदनाच्या निदर्शनास आणीत आहे." याबाबत शासनाने कारवाई करावी अशी अपेक्षा व्यक्त करतो.

-----

यानंतर श्री.गिते....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सातारा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या घरास शासनाने राष्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर करुन भूसंपादनाची कार्यवाही अपुऱ्या निधीअभावी अपूर्ण राहिल्याबाबत.

**मु. शी.** : सातारा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घरास शासनाने राष्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर करुन भूसंपादनाची कार्यवाही अपुऱ्या निधीअभावी अपूर्ण राहिल्याबाबत ॲड.उषा दराडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, घटनाकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेत शिक्षण घेत असताना कुटुंबीयासह सातारा गावी राहिले. त्या राहत्या घरास शासनाने राष्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर करणे, भूसंपादनास लागणाऱ्या निधी पैकी शासनाने केवळ 50 लक्ष रुपयांचा निधी जिल्हाधिकारी, सातारा यांचे्कडे वर्ग करणे व उर्वरित लागणारा 50 लाख रुपयांचा निधी देणे बाकी असणे. यामुळे समाजात निर्माण झालेली अस्वस्थता व अशांततेचे वातावरण. याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना.

या बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे अशी मी विशेष उल्लेखाच्या निमित्ताने शासनास विनंती करते.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

**पृ. शी.** : पेपर टेक्नॉलॉजी विषय नसताना नागपूर येथील शासकीय पॉलिटेक्निक येथे पेपर टेक्नॉलॉजी अधिव्याख्यात्यांची एमपीएससीने नियुक्ती करुन त्यांचे वेतन काढल्याबाबत.

**मु. शी.** :पेरप टेक्नॉलॉजी विषय नसताना नागपूर येथील शासकीय पॉलिटेक्निक येथे पेपर टेक्नॉजॉजी अधिव्याख्यात्यांची एमपीएससीने नियुक्ती करुन त्यांचे वेतन काढल्याबाबत श्री. सतिश चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री सतिश चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सतिश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील एकाही शासकीय पॉलिटेक्निकमध्ये पेपर टेक्नॉलॉजी विषय नसताना पेपर टेक्नॉलॉजी अधिव्याख्यात्यांची एमपीएससीने नियुक्ती करुन त्यांना नागपूर येथील शासकीय पॉलिटेक्निक येथे पाठवून त्याचे वेतनही काढण्याबाबतचे दिनांक 3 एप्रिल, 2011 रोजी उघडकीस येणे, सदर घटनेमुळे एमपीएससीच्या कामाबाबत होत असेलला संशय, या बाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

उपरोक्त विषयाच्या बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी अशी माझी शासनास विनंती आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

**पृ. शी.** : मुंबई शहरातील भेसळ दुधाची विक्री होत असून त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत.

**मु. शी.** : मुंबई शहरातील भेसळ दुधाची विक्री होत असून त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत श्रीमती अलका देसाई, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□□य सदस्य श्रीमती अलका देसाई यां□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, मुंबई शहरात दररोज हजारो लिटर भेसळ दूधाची विक्री होत असून त्यामुळे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पोलिसांनी तात्पुरत्या स्वरुपात अनेकदा धाडी टाकूनही ही भेसळ थांबत नसून त्यात भर पडत आहे. प्रामुख्याने लहान मुले व गरोदर स्त्रिया यांच्या आरोग्यावर फार मोठया प्रमाणात विपरित परिणाम दिसून येत आहे. मुंबई बाहेरुन येणाऱ्या दुघात मोठया प्रमाणात भेसळ आढळून आली आहे. मात्र शासनाकडून त्या विरोधात कठोर कारवाई होत नाही. त्यामुळे जनतेमध्ये भेसळयुक्त दुधाची भीती निर्माण झाली आहे. दूध फुंकून प्यावे अशी म्हण आहे. परंतु आज मुंबईत नव्हे तर संपूर्ण राज्यात ही परिस्थिती निर्माण झाली आहे. जो पर्यंत दूध भेसळ करणाऱ्यांवर आजीवन करावासाची शिक्षा होत नाही तो पर्यंत हा प्रकार थांबणार नाही, अशा या गंभीर व महत्वाच्या विषयी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. कृपया स्वीकृत करण्यात यावी.

या बाबतीत शासनाने त्वरित कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे.

--------

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : एस.टी.महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयात वरिष्ठ कारकूनास प्रशासनाने सहाय्यक जनसंपर्क अधिकारी पदावरुन पदावनत केल्यानंतरही सदर कर्मचारी कार्यालयीन शिस्तीचे पालन करीत नसल्याबाबत.

**मु. शी.** :एस.टी.महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयात वरिष्ठ कारकूनास प्रशासनाने सहाय्यक जनसंपर्क अधिकारी पदावरुन पदावनत केल्यानंतरही सदर कर्मचारी कार्यालयीन शिस्तीचे पालन करीत नसल्याबाबत श्री संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय,एस.टी. महामंडळाचे मध्यवर्ती कार्यालयास वरिष्ठ कारकूनाला प्रशासनाने सहाय्यक जनसंपर्क अधिकारी पदावरुन म.आ.आ.क्र.67, दिनांक 1.4.2010 अन्वये पदावनत केल्यानंतरही सदर कर्मचारी कार्यालयीन शिस्तीचे पालन करीत नसून हयाबाबत संदर्भीय पत्र क्र.2 नुसार महाव्यवस्थापक, क.व औ.स. यांना पत्र देण्यात आले असता आज पावेतो कोणतीही कार्यवाही प्रशासनाने केली नाही.

सदर कर्मचारी यांना वरिष्ठ कारकून पदी पदावनत केले असले तरीही ते सहायक जनसंपर्क अधिकारी याचे दालनात बसून सर्व सुविधांचा वापर करीत असून त्याची देयके कोणतेही लेखापरीक्षण न होता अदा केली जातात.

महामंडळात भेट देणारे प्रसिध्दी माध्यमाचे प्रतिनिधी सदर कर्मचाऱ्यास रा.प.महामंडळाचे जनसंपर्क अधिकारी म्हणून भेट देतात व ते स्वत: जनसंपर्क अधिकारी म्हणूनच सर्वत्र वावरतात.

5...



ABG/ D/ प्रथम श्री.खंदारे 16:30

हे दिनांक 3 डिसेसंबर 2010 च्या "दैनिक सकाळमध्ये" आलेल्या बातमीवरुन स्पष्ट होते. सदर कर्मचारी पदावनत झाले असताना व त्यांना पद नसताना भेटणे हे शिस्तीला धरुन नाही. या प्रकारे महामंडळाचीय फसवणूक केली जात आहे.

याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन 2010 मध्ये मांडलेल्या लक्षवेधी सूचना क्र.283 नुसार सभागृहात झालेल्या चर्चेवर मंत्री महोदयांनी स्पष्ट आदेश दिले होते की, सदर जागी त्वरित पात्र कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाईल. परंतु एक वर्ष उलटूनही सदर जागी नेमणूक केली गेली नाही. म्हणजेच एस.टी.चे व्यवस्थापकीय संचालकांचा अशा नियमबाहय,बेकायदेशीर कृतीस पूर्ण पाठिंबा देतात हे दिसून येते व तेच त्यांना पाठीशी घालीत आहेत.

वरील बाब म्हणजे सभागृहाचाअवमान करणारी व शासनाची दिशाभूल करणारी असून त्याबाबत त्वरित विचारणा होऊन अद्याप कारवाई का केली गेली नाही. यावर योग्य कारवाई का झाली नाही म्हणून मी ही बाब विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात मांडत आहे.

या बाबतीत शासनाने त्वरित कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील वांद्रे येथे होत असलेल्या प्रस्तावित धरणाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध.

**मु. शी.** मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील वांद्रे येथे होत असलेल्या प्रस्तावित धरणाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध याबाबत श्री जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील वांद्रे येथे होत असलेल्या शासनाच्या प्रस्तावित धरणाला वांद्रे, फोपळी, करंजी, खपरी आदी गावातील शेतकऱ्यांची दुपिकी शेतजमीन, राहती घरे यांचे मोठयाप्रमाणात नुकसान होणार असल्याने या प्रस्तावित धरणास शेतकऱ्यांचा मोठया प्रमाणात विरोध आहे.

मुरुड तालुक्यातील अंबोली धरणामुळे मुरुड शहराला 15 टक्के व इतर पंचक्रोशीत 85 टक्के पाण्याचा पुरवठा होणार असून नांदगाव येथील प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना (वडघर धरणाचे) जवळ असून त्याचे 40 टक्क्यांपेक्षा जास्त काम झाले आहे.

वडघर धरणावर शासनाचे लाखो रुपये खर्च झाले असून उर्वरित कामावर शासनाने खर्च केल्यास नांदगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पूर्ण होवून पाणी पुरवठयाचा प्रश्न सुटेल.

वांद्रे येथील प्रस्तावित धरणासाठी निधी खर्च करणे व त्यासाठी शेतकऱ्यांच्या दुपिकी जमिनी संपादन करुन शेतकऱ्यांना देशोधडीला लावणे हे योग्य नाही. तसेच वांद्रे धरणाची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आलेली नाही.

वांद्रे धरणाच्या विरोधात पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी तहसीलदार, मुरुड यांच्याकडे तीव्र विरोध नोंदविला आहे. सबब या गंभीर प्रकरणी शासनाने लक्ष घालून शेतकऱ्यांना न्याय द्यावा यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना करीत आहे.

---

7...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोकणात अवकाळी वादळी पावसामुळे आंबा पिकाचे झालेले प्रचंड नुकसान

**मु. शी.** : कोकणात अवकाळी वादळी पावसामुळे आंबा पिकाचे **झालेले** प्रचंड नुकसान याबाबत श्री रामदास कदम वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, आधीच हवामानाच्या लहरीपणाचा परिणामामुळे कोकणातील आंबा बागायतदार हवालदिल झाला असून त्यामध्ये माहे एप्रिल,2011 च्या सुमारास झालेल्या अवकाळी वादळी पावसामुळे अल्पसा लागलेला आंबा देखील गळून पडणे, कृषी खात्याने संरक्षण केलेल्या 30 टक्के आंब्याचे पीक देखील नष्ट होणे, त्यानंतर आलेल्या अवकाळी पावसाने आंबा व काजू बागायतदार पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. याकरिता शासनाने तातडीने कोकणातील शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने निवेदन करावे, अशी मी विशेष उल्लेखाव्दारे शासनास विनंती करीत आहे.

------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मी एका महत्वाच्या मुद्याकडे पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो.

वांद्रे (पूर्व) येथे रेल्वे स्टेशनच्या हद्दीतील गरीबनगर या झोपडपट्टीला आग लागून जवळपास 1000 झोपड्या बेचिराख झाल्या होत्या. त्या घटनेची या सभागृहात चर्चा झालेली होती. मंत्री महोदयांनी सभागृहात सहानुभूतीची भूमिका स्वीकारली होती. परंतु त्यांनी सभागृहाला माहिती देत असताना असे सांगितले होते की, सदरील झोपडपट्टीची जागा ही रेल्वेच्या मालकीची आहे. माझ्याकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे आणि मला तेथील रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार असे स्पष्ट झाले आहे की, ही जागा रेल्वेच्या मालकीची नसून महाराष्ट्र सरकारच्या मालकीची आहे. माझ्याकडे जी कागदपत्रे उपलब्ध आहेत ती मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांकडे सुपूर्द करीत आहे.

**उप सभापती** : ठीक आहे.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधीग्राह्यीकरण) विधेयक.

**मु.शी.**: L.A. BILL NO. XVII OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 17 महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 22 (दोन्ही सम्मिलित), खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

------

नंतर 3एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नगरपालिका मालमत्ता कर मंडळ विधेयक

L.A. BILL NO. IX OF 2011

( A BILL TO ESTABLISH THE MAHARASHTRA MUNICIPAL PROPERTY TAX BOARD )

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि. स. वि. क्र. 9 - महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ स्थापन करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्र. 9- महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ स्थापन करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

महोदय, तेराव्या वित्त आयोगातून 3177 कोटी रुपये आपल्या राज्याला मिळणार आहेत. त्यापैकी 1100 कोटी रुपये आतापर्यंत आलेले आहेत. त्यात एकूण 9 रिफॉर्म्स सुचविण्यात आले असून त्यापैकी 3 ला आधीच मान्यता दिलेली आहे. त्यातलाच हा एक भाग आहे. त्यामध्ये रेव्हेन्यू ऑडिट करण्यासाठी एक अध्यक्ष आणि चार सदस्यांची समिती स्थापन करण्यापुरताच हा मुद्दा मर्यादित असल्याने सभागृहाने या विधेयकाला एकमताने मान्यता द्यावी, अशी माझी विनंती आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2 ते 31 (दोन्ही सम्मिलित), अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही )

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभपती** : ज्याअर्थी परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

------

...3...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. II OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY ENTERTAINMENTS DUTY ACT, 1923.)

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्र.2-मुंबई करमणूक कर शुल्क अधिनियम, 1923 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि. क्र. 2, विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, करमणूक कर अधिनियमाच्या कलम 3 (1) मध्ये सुधारणा करुन सुसूत्रीकरण करण्यात यावे असे या विधेयकाच्या माध्यमातून प्रस्तावित करण्यात आले आहे. सध्या मुंबई महानगर पालिका क्षेत्रात 25 टक्के एकूण प्रवेश मुल्याच्या रकमेवर करमणूक शुल्क आकारले जाते. इतर महापालिका क्षेत्रात 20 टक्के आणि "अ" "ब" "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रात 15 टक्के आणि उर्वरित क्षेत्रात "0" टक्के अशा प्रकारे करमणूक कर शुल्क आकारले जाते. करमणूकीसाठी जे कार्यक्रम आयोजित केले जातात....अडथळा......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, करमणूक कर कशा पध्दतीने लावला जाईल या संदर्भात मंत्री महोदयांनी विस्तृत माहिती देण्याची आवश्यकता आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, संगीताचे कार्यक्रम, आयपीएल आणि वर्ल्ड कप स्पर्धेचा या करामध्ये समावेश केला गेला आहे. 3 (1) (ब) अनुसार प्रवेश शुल्काच्या विशिष्ट टक्कवारीनुसार करमणूक शुल्क आकारण्यात येईल 3(1) (क) अनुसार नक्त प्रवेश मूल्यावर कर आकारण्यात येतो. त्यामुळे एकंदर प्रवेश मूल्यावर कर आकारला तरी व प्रवेश मूल्ल्याच्या 25 टक्के आकारला गेला तरी त्यामध्ये साधारणत: 33 ते 37 टक्के कर बसतो. त्यामुळे प्रवेश शुल्क आकारले जाते त्याच्या नक्त प्रवेश शुल्काच्यावर शुल्क आकारण्यात यावे अशा पध्दतीने या ठिकाणी सुधारणा करण्यात आलेली आहे. महसुलाची जी हानी होणार आहे त्याबाबत आपण ग्रामीण भागात कोणतेही करमणूक शुल्क आकारीत नव्हतो त्यामुळे ग्रामीण भागातून महसूल मिळत नव्हता. परंतु या सुधारणे प्रमाणे ग्रामीण भागात करमणूक कर 10 टक्के प्रमाणे आकारावा या पध्दतीने सुधारणा करण्यात आलेली आहे. प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, करमणूक कर कशा कशावर बसविणार आहात याची मंत्री महोदयांनी सभागृहाला माहिती द्यावी अशी विनंती केली होती. कारण न्यायालयाने यासंदर्भात वेगवेगळे निर्णय केलेले आहेत. बारबालाचा विषय आम्हाला अजून पर्यंत कळलेला नाही. बारमालक न्यायालयात गेले असून त्यांनी न्यायालयाला सांगितले आहे की, आम्हाला या शासनाचा जाच होतो आहे तसेच आमच्या मुलींना लोकांची सेवा हे शासन करु देत नाही अशा प्रकारचा आरोप त्यांनी न्यायालयात केलेला आहे. यासंदर्भात परवा न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, बारमध्ये ज्या मुली जातात त्यांनी तंग कपडे घालावयाचे नाहीत. त्यामुळे आपल्या करात काय फरक पडणार आहे ? मद्य वगैरे दिले जाते त्या ठिकाणी बारबालांनी जावयाचे नाही अशा प्रकारचा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे व तो निर्णय आम्ही वर्तमानपत्रात वाचलेला आहे. बिलामधील पृष्ठ क्रमांक 2 व कलम 2 मध्ये असे म्हटले आहे की, "प्रवेश मिळवण्यासाठी द्यावयाच्या सर्व पैशावर" या मजकुराऐवजी "प्रवेश मिळवण्यासाठी मालकाने निश्चित केलेल्या पैशावर" हे जे वाक्य वापरलेले आहे त्यामधील फरक मंत्री महोदयांनी सांगण्याची आवश्यकता आहे. बिलाच्या पृष्ठ क्रमांक 9 मध्ये काय काय करमणूक आहेत याची माहिती दिलेली आहे. हॉटेलमध्ये जातांना मालक ग्राहकाकडून दरवाजातच पैसे धेणार आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 16.50

श्री.दिवाकर रावते ..

"प्रवेश मिळविण्यासाठी द्यावयाच्या सर्व पैशावर..." या मजकुरा ऐवजी "प्रवेश ् मिळण्यासाठी मालकाने निश्चित केलेल्या पैशावर" असा बदल करण्यात येणार आहे. सिनेमाला जातांना अगोदर तिकीट काढावे लागते व त्याकरिता पैसे द्यावे लागतात हे मी समजू शकतो. त्या तिकीटावर किती कर घ्यावयाचा हे ठरविले जाते. परंतु मालकाने निश्चित केलेल्या पैशावर असा येथे उल्लेख करण्यात आला आहे तेव्हा त्याबाबतीत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा. कलम 3 च्या (ब) मध्ये असे म्हटलेले आहे की, " व्हिडीओ प्रदर्शन,व्हिडीओ खेळ, कोणत्याही प्रकारच्या ॲन्टेनाव्दारे केलेले प्रदर्शन,केबल दूरचित्रवाणी व्दारे, इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीव्दारे, थेट घरपोच प्रसारण सेवेव्दारे केलेले प्रदर्शन." तेव्हा मालकाने निश्चित केलेल्या पैशावर म्हणजे नेमके कोणत्या पैशावर यासंबंधी माननीय मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात आम्हाला समजावून सांगितले पाहिजे. ज्यावेळी अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता त्यावेळी कोणता कर लावण्यात येणार आहे याचा उल्ल्ेख करण्यात आला होता. त्यानुसार हा कर आता लावण्यात आलेला आहे. कलम 3 च्या (ब)मध्ये पुढे " बोलींग-ॲली, गो-कार्टींग याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. तेव्हा बोलींग- ॲली म्हणजे नेमके काय आहे, तसेच गो-कार्टींग म्हणजे काय आहे ? हा कोणता खेळ आहे हे मला अजून कळलेले नाही.विधेयकात या खेळाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. तेव्हा बोलींग ॲली आणि गो-कार्टींग संबंधी माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा . या विधेयकातील तरतुदी माननीय मंत्र्यांनी जर आम्हाला समजावून सांगितल्या तर आम्ही या विधेयकावर एक शब्द सुध्दा न बोलता विधेयक मंजूर करु. त्याचबरोबर या कलमामध्ये "नृत्य बार" असाही उल्लेख आहे. तेव्हा नृत्य बार म्हणजे काय आहे हे समजावून सांगावे. सन्माननीय गृह मंत्री श्री आर.आर.पाटील यांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये बार नृत्य प्रसिध्द करुन टाकले आहे.त्यामुळे बारमधील नृत्य आम्हाला माहीत आहे परंतु नृत्य बार म्हणजे काय ? हे मला कळले नाही. नृत्य बार म्हणजे दारु पिऊन केलेले नृत्य असा त्याचा अर्थ आहे की बारमध्ये केलेले नृत्य असा त्याचा अर्थ आहे ? .नृत्य बारची नेमकी व्याख्या काय आहे ? कायदा म्हटल्यानंतर प्रत्येक शब्दाची व्याख्या महत्वाची आहे. प्रत्येक शब्दाला व्याख्या असते. कोणत्याही व्याख्येशिवाय कायदा होऊच शकत नाही.प्रत्येक गोष्टीची व्याख्या दिल्याशिवाय कायदा तयार होत नाही. तेव्हा बार नृत्य म्हणजे काय याचा खुलासा माननीय मंत्र्यांनी करावा. कलम 3 (ब)मध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "प्रत्यक्ष वाद्यवृंदाचा कार्यक्रम

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

असलेली परमिट रुम किंवा बिअर बार, पब, डिस्कोथेक, मनोरंजन पार्क " इत्यादी गोष्टी आपल्याला सर्व माहीत आहे. या ठिकाणी प्रवेश मिळविण्यासाठी द्यावयाच्या सर्व पैशावर या मजकुरा ऐवजी प्रवेश मिळण्यासाठी मालकाने निश्चित केलेल्या पैशावर असा बदल करण्यात येणार आहे तेव्हा यासंबंधी माननीय मंत्र्यांनी आम्हाला समजावून सांगावे. या पूर्वी किती शुल्क आकारले जात होते आणि आता किती शुल्क आकाराले जाणार आहे यासंबंधी माननीय मंत्र्यांनी आम्हाला समजावून सांगावे अशी आमची त्यांच्याकडून अपेक्षा आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात 25 टक्के, सर्व महानगरपालिका आणि सर्व कटक क्षेत्रात 20 टक्के, अ ब आणि क वर्ग नगरपरिषदा क्षेत्रात 15 टक्के या प्रमाणे कर आकारण्यात येणार आहे मात्र ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात हा कर आकारण्यात येणार नाही.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये आय.पी.एल.चा उल्लेख करण्यात आलेला नाही.या आय.पी.एल.चा उल्लेख या विधेयकामध्ये करावयाचे राहून गेले असेल तर शासनाला तो उल्लेख करावा लागेल. माननीय मंत्र्यांच्या कारकीर्दिमध्ये प्रथमच एवढया मोठया प्रमाणावर कर वसूल केला जाणार आहे.मागच्या वेळच्या आय.पी.एल.वर कर वसूल करण्यात आला होता की नाही हे मला माहीत नाही परंतु या वर्षीच्या आय.पी.एल.वर कर घेण्यात येईल असे या पूर्वीच जाहीर करण्यात आले होते. परंतु आय.पी.एल.चा उल्लेख या विधेयकामध्ये करण्यात आल्याचे मला दिसून येत नाही.त्यामुळे क्रिकेटच्या खेळातील आय.पी.एल. चा खास उल्लेख येथे करावा लागेल. तो उल्लेख केला असल्याचे माझ्या वाचनात आलेले नाही जर उल्लेख केलेला असेल तर तो माझ्या निदर्शनास आणून दिला तर बरे होईल.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

तो या करमणूक शुल्कामध्ये कुठेही दिसले नाही. यामध्ये आयपीएल वगैरे सर्व खेळ आल्याचे मंत्री महोदय म्हणाले. परंतु या सर्व करमणुकीच्या साधनामध्ये कोणकोणत्या गोष्टींचा समावेश आहे हे सांगत असतांना यामध्ये बोलींग-ॲली आणि गो-कार्टींगची व्याख्या आपण मला समजावून सांगणार आहात. परंतु हे विधेयक पहात असतांना यामध्ये क्रिकेट आणि आयपीएलचा उल्लेख कुठेही केलेला दिसत नाही. जर त्यांचा उल्लेख विधेयकात नसेल तर तुम्ही त्यांच्यावर कर कसा लावणार आहात? हा एक प्रश्न आहे. या अर्थसंकल्पामध्ये आतापर्यन्त मिळणारा कर आणि या सुधारणेमुळे आणखी किती कर गोळा होणार आहे, अंदाजित कर किती मिळणार आहे हे सुध्दा आपण सांगितले पाहिजे. शासनाच्या तिजोरीमध्ये या मधून किती भर पडणार आहे, हे विधेयक आपण कशासाठी मंजूर केले पाहिजे हे माननीय अर्थमंत्र्यांनी आम्हाला सांगितले पाहिजे. ते सांगितले तर माझ्या ज्ञानामध्ये भर पडेल, मला नवीन खेळ माहीत होतील आणि वाटल्यास माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव यांना सोबत घेऊन नवीन खेळ खेळण्याचा प्रयत्न करु एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय अर्थमंत्र्यांनी सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 2 मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक मांडले आहे. त्या संदर्भात माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी म्हटल्याप्रमाणे या विधेयकातील काही गोष्टी या सरकारला जनतेपर्यन्त पोहोचविता आल्या असत्या. हे विधेयक सभागृहामध्ये मांडीत असतांना काही गोष्टींची स्पष्टता या ठिकाणी होणे अपेक्षित असते. उदा. आपण यामध्ये मल्टिप्लेक्सना कर माफी दिली आहे. परंतु ही कर माफी देत असतांना एकाच स्क्रीनवर चार आठवडे मराठी सिनेमा दाखविला गेला पाहिजे अशी आपण अट घातली आहे. याचा अर्थ संपूर्ण दिवसभर त्या स्क्रीनवर चार आठवडे मराठी सिनेमा दाखविला गेला पाहिजे. परंतु मल्टिप्लेक्सवाले त्याचा अर्थ असा लावतात की, 28 शो x 4 असे मिळून 112 शो वर्षभरामध्ये लावले पाहिजेत. हे शो सकाळी 8 वाजता, 9 वाजता लावले जातात. ज्या वेळी हिंदी सिनेमाचे शो चांगले चालतात त्यावेळी मराठी सिनेमा दाखवायचा नाही. या ठिकाणी आपला नियम असा आहे की, ही कर माफी हवी असेल तर एका स्क्रीनवर चार आठवडे मराठी सिनेमा दाखविला गेला पाहिजे त्यामुळे सर्व वर्गातील प्रेक्षकांना तो सिनेमा पहाता येईल. त्यामध्ये काही वरिष्ठ नागरिक सकाळी सिनेमा पहावयास जातील, कामावरुन आल्यानंतर संध्याकाळी देखील मराठी प्रेक्षक तो सिनेमा पहावयास जाईल. त्यामुळे मराठी सिनेमाला प्रेक्षक वर्ग मिळू शकेल. परंतु त्यांनी आपल्या सोयीनुसार अर्थ लावून 28 शो x 4 असे मिळून 112 शो लावल्या नंतर आतापर्यन्त त्यांना आपण कर माफी देत आलो आहोत.

सभापती महोदय, मराठी सिनेमा हा कर मुक्त असल्याचे म्हटले जाते परंतु या मल्टिप्लेक्समध्ये सुध्दा तो सिनेमा पहाण्यासाठी 200 ते 250 रुपयांचे तिकिट खरेदी करावे लागते. तेव्हा मल्टिप्लेक्सचे मालक म्हणतात की, आम्हाला पाच वर्षाची कर माफी असल्यामुळे या सिनेमासाठी वेगळी कर माफी आम्हाला मिळत नाही. परंतु हे मल्टिप्लेक्सचे मालक वितरकाला पैसे देतांना मराठी सिनेमाला कर माफी आहे असे सांगून त्या मधील कराचे पैसे वळते करुन बाकीची रक्कम देतात. या ठिकाणी प्रेक्षकांकडून मात्र 200 ते 250 रुपये तिकिटामागे घेतले जातात परंतु वितरकांना पैसे देतांना त्यामधील कर मुक्त भाग वगळून दिला जातो. ही गोष्ट त्यांच्या अकाऊंटमध्ये दिसत असतांना सुध्दा शासन त्या बाबत हरकत घेत नाही. याची स्पष्टता या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. विनोद तावडे....

विधेयकामध्ये होण्याची आवश्यकता आहे. कर्नाटक राज्यामध्ये मल्टिप्लेक्समध्ये असलेल्या सर्वात मोठया स्क्रीनवर तेथील स्थानिक कानडी भाषेच्या संवर्धनासाठी सतत 52 आठवडे सिनेमा दाखविला गेला पाहिजे अशा प्रकारची अट घालण्यात आली आहे. ही अट आपल्याकडे लावण्यात येईल काय? मात्र आपण त्यांना सर्व प्रकारच्या ॲडजस्टमेंट देत असतो. या ठिकाणी आपण अ, ब, क वर्ग नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये 10 टक्के कर लावला तर त्यामधून 6 कोटी रुपये जमा होणार आहेत. हे 6 कोटी रुपये जमा करण्यासाठी आपण किती मोठी यंत्रणा राबविणार आहात? मध्यंतरी सिंगल स्क्रीन थिएटर मालकांचे आंदोलन झाले व त्यांनी सिनेमा दाखविण्याचे बंद केले होते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:00

श्री.विनोद तावडे . . ..

सभापती महोदय, त्यांचे म्हणणे आहे की, यामधून सरकारला सहा कोटी रुपये मिळतात. एक टिचकी मारली तरी कोणत्याही खात्यामधून सहा कोटी रुपये पडतील आणि त्यासाठी सगळी यंत्रणा लावली आहे म्हणजे हे गोळा करण्यासाठी रोजगार हमी योजना आखलेली आहे काय? तसेच यामध्ये आय.पी.एल.चा मुद्दा आहेच. वन-डे मॅच, वर्ल्ड-कप हे क्रिकेटच्या प्रोत्साहनासाठी असल्याने त्यावर कर नाही हे मला माहिती आहे. मग वर्ल्ड-कपच्या मॅचेस चॅनेलवर दाखविल्या जातात त्यांच्या बाबतीत कर लागू आहे. कारण ते ज्यापध्दतीने कमर्शिअली चॅनेल्स्नां प्रसारणाचे हक्क विकतात, त्यातून आपल्याला सहज उत्पन्न मिळू शकते. मला हे 100 टक्के मान्य आहे की, आपल्या येथे क्रिकेटचे सामने झाल्यानंतर त्यातून कर जास्त मिळतो. कारण या सामन्यांच्या निमित्ताने सर्व हॉटेल्स् बुक असतात, वाहनांसाठी पेट्रोलचा खर्च होतो वगैरे अशा प्रकारचा बाजारमूल्या प्रमाणे त्याचा नक्की व्यवहारिक विचार करावा. आपण कर जास्त लावल्यामुळे येथील सामने बाहेर जावेत असे आमचे अजिबात मत नाही. पण तरीही बाकीच्या राज्यांमध्ये तेवढाच कर असून सुध्दा त्यांच्याकडे सामने होत असतात आणि ते तेवढा फायदा कमवित असतात. ज्यावेळी गुजराथ राज्याचे उदाहरण दिले जाते. तेथील कर पध्दतीबाबत तसेच चंदिगढ आणि दिल्ली येथील कर पध्दतीबाबत माहिती घेतली तर मला असे वाटते की, राज्य सरकारने कोणत्या ना कोणत्या रुपाने जास्त महसूल कसा जमा होईल याचा नक्की विचार करावा. पण दुसऱ्या बाजूने मला असे वाटते की, आय.पी.एल.च्या विषयामध्ये मात्र थोडी अधिक कडक भूमिका घ्यावयास पाहिजे. कारण केवळ फक्त पैसे कमाविण्यासाठीच हा खेळ आहे. पण त्याच्या बरोबरीने मला असे वाटते की, राज्याला कशा प्रकारे महसूल मिळेल याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी या विधेयकाच्या माध्यमातून स्पष्टपणे सांगणे आवश्यक आहे. याबाबत स्पष्टता आल्यानंतर मग या विधेयकाबाबत पुढचा विचार केला पाहिजे असे मला वाटते.

----

. . . .3 पी-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी हे विधेयक आणत असताना उद्देश आणि कारणे यामध्ये असे म्हटलेले आहे की,"करमणूक शुल्क बसविण्याच्या आधारात सुसूत्रता आणून असंगती दूर करणे" याठिकाणी "असंगती"चा नेमका अर्थ काय आहे ? संगत आणि असंगत यामध्ये करमणूक कराचा कुठे संबंध येतो हे मला कळलेले नाही. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी कमीतकमी याचे स्पष्टीकरण द्यावे. हा कर सर्व क्षेत्रात लावला जाणार आहे. मग ग्रामीण भागातही लावला जाणार आहे. मध्यंतरी मी याठिकाणी दोन वेळा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता की, ग्रामीण भागामध्ये संस्कृतीचे विडंबन सुरु आहे. तेथील विडंबनाला आळा घालण्यासाठी त्याठिकाणी होणारे कार्यक्रम बंद करु असेही त्यांनी सांगितले आहे. परंतु करमणुकीच्या अंतर्गत निरनिराळया माध्यमातून कार्यक्रमांना परवानगी दिली जाते. जसे आमच्याकडे "बबली नृत्याचा" कार्यक्रम झाला. पण प्रत्यक्षात तेथे नेकेड नृत्य होत होते आणि पाच हजार लोक त्याठिकाणी होते. मालकांनी हा कार्यक्रम 30 हजाराचा ठरविला आणि त्याने तिकिटाच्या माध्यमातून 1 लाख रुपये गोळा केले. परंतु प्रत्यक्षात त्या डान्सच्या वेळी जे पैसे उधळले गेले ती रक्कम कमीतकमी 5 लाखाच्या वर होती.प्रत्यक्षात हा कर मालकाने ठरविलेल्या तिकिटाच्या दरावर आधारीत रहाणार आहे.परंतु नंतर कार्यक्रमाच्या वेळी आतमध्ये उधळले जाणारे जे पैसे आहेत, त्याबाबतीत आपण काय ठरविलेले आहे? त्यावर करमणूक कर कसा लावला जाणार आहे, या पैशाच्या बाबतीत कोणता निर्णय घेण्यात येणार आहे? याबाबतीत याठिकाणी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही.

सभापती महोदय, संस्कृतीवर आघात होणाऱ्या कार्यक्रमांना बंदी असावयास पाहिजे. पण तेही करण्यात आलेले नाही. तसेच मालकांनी तिकीटाचे मूल्य किती ठरवावे याबाबतीत देखील कुठे बंधन नाही. म्हणून आता ग्रामीण भागामध्ये सुध्दा आता निरनिराळे कार्यक्रम वेगवेगळया नावाखाली केले जातात. पण प्रत्यक्षात त्याचा दर्जा कसा आहे याकडे कोणी लक्ष देत नाही. केवळ पैसा कमाविणे आणि तिजोरी भरणे हेच जर सरकारचे ध्येय असेल तर ते खऱ्या अर्थाने योग्य नाही. म्हणून याठिकाणी माझे स्पष्ट म्हणणे आहे की, तिकीटाचे दर किती असावेत, किती पैसे वसूल करावेत, कोणते कार्यक्रम घेण्यात यावेत याबाबतीत शासन काही बंधन घालणार आहे काय? याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने उत्तराच्या माध्यमातून स्पष्टीकरण द्यावे अशी विनंती करते आणि माझे भाषण संपविते.

-----



SMT/ 17:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये वेगवेगळया विषयाच्या संदर्भात विशेषत: जलक्रीडेच्या संदर्भात ग्रामीण भागामध्ये सुध्दा कशा प्रकारे करमणूक शुल्क लावले जाणार आहे, या संबंधीच्या विधेयकावर या ठिकाणी चर्चा करण्यात येत आहे.

सभापती महोदय, कोणकोणत्या बाबींना हे विधेयक लागू होणार आहे, याचा विचार केला तर दोन गोष्टींचे आश्चर्य वाटते. एक म्हणजे व्हिडीओ सुविधेसह पर्यटक बसलासुध्दा करमणूक शुल्क लावण्यात आलेले आहे. याचा अर्थ मलाकांना आता जास्तीचा कर द्यावा लागत असल्यामुळे ग्राहकांवरील कर वाढणार आहे काय, असा प्रश्न निर्माण होतो. दुसरा मूलभूत प्रश्न असा आहे की, एका बाजूला माध्यमांचे जागतिकीकरण झालेले आहे. युटयूबवरील अनेक चित्रपट इंटरनेटवर मोफत बघता येतात. याचा फायदा मंत्री महोदय घेत असतील तसेच शासनाचे अधिकारी सुध्दा घेत असतील. क्रिकेट सारख्या खेळाला मल्टीप्लेक्सना शोची परवानगी दिली. जे लोक मोफत हा क्रिकेटचा सामना दाखवत होते,त्यांच्यावर बंदी घालण्यात आली. कलम 3 (1) मध्ये असे म्हटले आहे की, "कोणत्याही प्रकारच्या ॲन्टेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाहिनीच्या सहाय्याने केले जाणारे प्रदर्शन." मग केबलवर जो कर घेण्यात येतो, त्याचा अर्थ काय? या संदर्भात आता केबलवर बंधन आहेच. त्यामुळे एकाच विषयासाठी दोन वेळा कर कसा लावता येईल. हे योग्य आहे की अयोग्य आहे याबाबत या ठिकाणी चर्चा होऊ शकते. परंतु इतर ज्या गोष्टी बिअरबार, पब, डिस्कोथेक, मनोरंजन उद्यान, जलक्रीडा कार्यक्रम यामध्ये बऱ्याच वेळा मालक असे करतात की, एका भागामध्ये जाण्यासाठी एक तिकीट असते परत रेस्टॉरंट किंवा अन्य ठिकाणी जावयाचे असेल किंवा गो-कार्टिंगच्या खेळाचा सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी या ठिकाणी उल्लेख केला. माझा त्या विषयाचा अभ्यास नाही. पण माझ्या घरात लहान मुले आहेत. जेव्हा त्यांना खेळायला घेऊन जातो तेव्हा लुटुपुटुच्या गाडीतून फेरी मारुन आणतो. उद्यानाच्या त्या भागामध्ये मुले गेली तर त्यांना त्याचा परत वेगळा कर भरावा लागतो किंवा वेगळी तिकीटे काढावी लागतात. माझा प्रश्न असा आहे की, कोणत्याही प्रकारच्या केबल, दूरचित्रवाहिनीवरुन केले जाणारे प्रदर्शन याच्यावर बंधने आणणार म्हणजे ती कशा पध्दतीने आणणार, त्या संबंधीचे शुल्क कसे मोजणार? ग्रामीण भागामध्ये केबल चालूच आहेत.अनेक वाहिन्या मोफत आहेत, त्यामुळे त्याबाबत कर भरण्याचा प्रश्न येत नाही.

...2...



डॉ. नीलम गोऱ्हे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या वाहिन्यांचे केबलवाल्याकडे पैसे भरले नाही तरी त्या मोफत वाहिन्या पाहता येतात. अशा वेळेला या मोफत वाहिन्यांवरील कर कशासाठी वसूल करणार, याचे उत्तर मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, माझा तिसरा मुद्दा असा की, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी एक मुद्दा उपस्थित केलेला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ३ (1) मध्ये सुधारणा करणे इष्ट होते असे म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, हे सगळे कार्यक्रम सेन्सॉर मान्यता प्राप्त हा शब्द असल्या शिवाय, पाहिजे तो कार्यक्रम करण्यास शासनाची पवानगी आहे काय? सेन्सॉर मान्यता प्राप्त कार्यक्रम असले पाहिजेत मग ते नृत्यबार असो, वाद्यवृंद असो अथवा अन्य काहीही असो. म्हणून या संबंधीचे रुल्स आणि रेग्युलेशन्स करत असताना हे स्पष्ट केले नाही तर जे सेन्सॉर मान्यता प्राप्त नाहीत त्या गोष्टींचा धुडघूस घालण्यासाठी सर्व लोकांना परवानगी मिळाली आहे, असा त्याचा अर्थ होणार आहे. आता या ठिकाणी सांगण्यात आले की, वाहिन्यांसाठी नियंत्रक प्रसारक मंडळ असणार. पण सध्या ते नाही. त्यामुळे अनेक ठिकाणी बंदी असलेल्या वाहिन्या गुपचूप दाखविण्यात येतात. शहरामध्ये पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये या संदर्भामध्ये काही समित्या झालेल्या आहेत. पण ग्रामीण भागामध्ये परस्पर पॉवरफुल डिश ॲन्टेनावरुन या वाहिन्यांचे प्रसारण केले जाते. अशा वेळेला त्यांना अधिकृतता मिळवून देण्याचे काम होत आहे. म्हणून जोपर्यंत सेन्सॉर मान्यता प्राप्त असले पाहिजे, असा शब्द प्रयोग येत नाही तोपर्यंत शासन स्वत:हून शुल्क मिळविण्याच्या नादामध्ये या सर्व बेकायदेशीर गोष्टींच्या प्रसारणासाठी परवानगी देत आहे असा त्याचा अर्थ होतो. म्हणून मला असे वाटते की, हे जे वेगवेगळे विषय आहेत त्या प्रत्येक विषयासाठी प्रवेश फी आणि मालक किती पैसे लावणार, यासाठी स्वतंत्र नियमावली केली नाही तर प्रत्येक ठिकाणी आम्हाला शुल्क लावले जाईल आणि आलेल्या ग्राहकाची फसवणूक होण्या शिवाय दुसरे काहीही होणार नाही. म्हणून सेन्सॉरचा मुद्दा तसेच पर्यटक बसमध्ये कारण नसताना शुल्क वाढविण्यात येत आहे,

असे जे काही विषय आहेत ते यातून वगळण्यात यावेत असे मला या ठिकाणी सुचवावयाचे आहे. त्याचबरोबर दूरचित्रवाहिन्यांवरुन केले जाणारे मोफत प्रदर्शन यावर शासन शुल्क लावू शकत नाही. या सगळया मुद्यांचे मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण द्यावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

------

यानंतर श्री. बरवड...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयकावर सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, विनोद तावडे तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. या ठिकाणी शहरी आणि ग्रामीण भागामध्ये ज्यांच्यावर करमणूक शुल्क आकारले जात नाही त्यांची यादी मी वाचून दाखवितो. ज्याच्यावर अजिबात करमणूक शुल्क आकारले जात नाही त्यामध्ये मराठी चित्रपट, तमाशा, मराठी नाटक, मराठी चित्रपट किंवा संगीत कार्यक्रम, जे फक्त मराठी सिनेमा दाखवितात असे टुरींग सिनेमा आणि क्रिकेट व्यतिरिक्त इतर क्रीडा प्रकार यावर आपण कोणतेही करमणूक शुल्क आकारत नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला त्या बाबत सांगू इच्छितो की, 14 जून, 2010 चा जो शासन निर्णय आहे त्यामध्ये कसोटी व्यतिरिक्त विश्वचषक, आयपीएल, टी 20, एक दिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांवर मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 मधील कलम 3(1)(ब) नुसार करमणूक शुल्क अनुज्ञेय केलेले आहे. त्यामुळे आयपीएलवर कर नाही असा जो मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे तशी वस्तुस्थिती नाही.

श्री. विनोद तावडे : बिलामध्ये तसा उल्लेख नाही.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, कलम 3 (1)(ब) प्रमाणे जे शुल्क आकारले जाते त्याप्रमाणे आपण कसोटी क्रिकेट सामन्याच्या व्यतिरिक्त इतर कसोटी सामन्यांना ते शुल्क आकारावे असा उल्लेख केलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : या बाबतीत वेगळा कायदा केला आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्यांनी पूर्ण उत्तर ऐकून घ्यावे. त्यानंतर त्यांचे काही प्रश्न असतील तर ते विचारावेत. सभापती महोदय, आता नुकतीच विश्वचषक क्रिकेट स्पर्धा, 2011 नुकतीच झाली. त्यामध्ये जे सामने महाराष्ट्रात खेळले गेले त्यात नागपूला 22.2.2011, 25.2.2011, 28.2.2011 आणि 12.3.2011 या दिवशी सामने खेळले गेले. ग्रामीण भागामध्ये आपण 10 टक्के करमणूक शुल्क आकारतो म्हणून या विश्वचषक सामन्यांपोटी त्या ठिकाणी 37 लाख 43 हजार 353 रुपये करमणूक शुल्क वसूल केले. त्याच प्रमाणे मुंबईमध्ये 3 सामने झाले.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. प्रकाश सोळंके ....

13.3.2011, 18.3.2011 आणि शेवटचा अंतिम सामना 2.4.2011 रोजी झाला. 13.3.2011 रोजी जो न्युझिलँड विरुध्द कॅनडा सामना झाला त्याबद्दल त्यांच्याकडून साधारणत: 35 लाख रुपये आगाऊ करमणूक शु23ल्क भरुन घेतले. श्रीलंका विरुध्द न्युझिलँड असा जो सामना झाला त्यापोटी 88 लाख रुपये आगाऊ करमणूक शुल्क घेतले आणि शेवटचा अंतिम सामना भारत विरुध्द श्रीलंका असा झाला त्यापोटी 4 कोटी 88 लाख रुपये इतके करमणूक शुल्क आगाऊ भरुन घेतले. आता त्याचे असेसमेंट चालू आहे. यामध्ये साधारणत: एक कोटी रुपयांपर्यंत परतावा द्यावा लागेल असा अंदाज आहे. परंतु इतके करमणूक शुल्क आपण या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांच्या बाबतीत वसूल केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा दुसरा मुद्दा आयपीएल सामन्यांच्या बाबतीत आहे. सध्या आयपीएलचे सामने सुरु आहेत. मुंबई येथील वानखेडे क्रीडांगणावर 15, 20 आणि 22 एप्रिल, 2011 तसेच 2, 7 , 14 आणि 20 मे, 2011 या दिवशी 7 क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले आहेत. या 7 सामन्यांपैकी सद्य:स्थितीत आपण 3 सामन्यांना मान्यता दिलेली आहे आणि त्यापोटी 7 कोटी 12 लक्ष रुपये इतके करमणूक शुल्क त्यांच्याकडून अनामत म्हणून घेतलेले आहे. उर्वरित सामन्यांसाठी साधारणपणे साडेनऊ कोटी रुपये इतकी अनामत रक्कम जमा होणे अपेक्षित आहे. नवी मुंबई येथील डी.वाय.पाटील क्रीडांगणावर दिनांक 10, 13, 17 आणि 27 एप्रिल, 2011 तसेच 4, 16 आणि 19 मे, 2011 या दिवशी 7 क्रिकेट सामने आयोजित केलेले आहेत. या 7 सामन्यांपैकी सद्य:स्थितीत 3 सामन्यांना मान्यता देण्यात आलेली आहे आणि त्यापोटी 4 कोटी 86 लाख रुपये इतके करमणूक शुल्क अनामत म्हणून जमा केलेले आहे. उर्वरित सामन्यांसाठी अंदाजे साडेपाच कोटी रुपये इतकी अनामत रक्कम जमा होणे अपेक्षित आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके....

यातून न विक्री झालेल्या तिकिटापोटी देय करमणूक शुल्क परतावा सामना संपल्यानंतर संबंधित जिल्हाधिकारी त्याचे ॲसेसमेंट करुन घेणार आहेत. सन्माननीय सदस्यांनी अनेक क्रीडा प्रकारांमध्ये करमणूक शुल्क आकारले जाते असा उल्लेख केलेला आहे. त्या क्रीडा प्रकाराची माहिती मी आताच दिली आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विचारले की, व्हिडिओ बसेस आहेत त्यांच्याकडून नव्याने कर आकारणी केली जाणार आहे काय ? या बसेसकडून यापूर्वीच कर वसूल केला जात आहे. या व्हिडिओ बसेसकडून करमणूक शुल्क प्रवेश मूल्यावर वसूल केला जातो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कोणकोणत्या बाबीवर करमणूक शुल्क वसूल केला जातो असे विचारले होते. या करमणूक शुल्कात व्हिडिओ गेम्स, कोणत्याही प्रकारच्या ॲण्टीनाच्या माध्यमातून किंवा केबल दूर वाहिन्याद्वारे किंवा इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीच्या साहाय्याने केलेले प्रदर्शन आणि डीटीएच या सर्वांकडून करमणूक शुल्क वसूल केले जाते. त्याचप्रमाणे बोलिंग ॲली हा एक क्रीडा प्रकार आहे. या क्रीडा प्रकारात हाताने चेंडू फेकून समोरच्या जास्तीत जास्त दांड्या उडविण्यात येतात. बो कार्टिंग हा लहान मुलांचा क्रीडा प्रकार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात सरकारकडून कोणतेही विधेयक मांडण्यात आल्यावर आम्ही त्यावर चर्चा करतो. सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य सुध्दा आपले विचार मांडत असतात. त्यामुळे आम्हाला आनंद वाटत असतो. आता माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असताना या विधेयकावर सत्ताधारी पक्षातील एकही सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे राहिले नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना बोलिंग ॲली कशी असते ते समजले आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, प्रत्यक्ष वाद्यवृंदाचा कार्यक्रम, परमीट रुम, बियर बार, पब, डिस्कोथेक, मनोरंजन पार्क, जल क्रीडा, पूल गेम, व्हिडिओ सुविधेसह असलेली पर्यटक बस या सर्व प्रकारावर कर वसूल केला जातो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : मंत्री महोदयांनी क्रिकेट या खेळामधून किती करमणूक शुल्क वसूल केला आहे ते सांगितले आहे. ज्या क्रीडा प्रकारातून कर वसूल करता येतो ते सर्व क्रीडा प्रकार नमूद केलेले आहेत, परंतु या विधेयकामध्ये त्याचा उल्लेख दिसत नाही. त्यासाठी शासनाने वेगळा कायदा केला आहे काय, हा तांत्रिक व महत्वाचा विषय आहे. कायद्यात तशी तरतूद नसेल तर शासनाला या क्रीडा प्रकारातून कर वसूल करता येणार नाही. म्हणून मी विचारले आहे.

श्री.प्रकाश सोळंके : करमणूक शुल्क अधिनियम 1923 मधील कलम 3 (1) पोट कलम (ब) मध्ये या सर्व गोष्टींचा उल्लेख आहे. त्यानुसार कोणत्याही क्रीडा प्रकारामधून शासनाला कर वसूल करता येतो. तशा प्रकारचा शासनाने निर्णय घेऊन कसोटी व्यतिरिक्त विश्व चषक, आयपीएलचे सामने यांना अनुज्ञेय केलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : आपण या ठिकाणी एका कायद्यावर चर्चा करीत आहोत. अशा प्रकारे कर जमविण्यासाठी कायद्यामध्ये तरतूद करण्याची आवश्यकता नाही असे मंत्री महोदयांनी जाहीर करावे.

श्री.प्रकाश सोळंके : यासाठी नवीन काही करण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते. कारण कलम 3 (1) च्या पोट कलम (ब) मध्ये याची तरतूद आहे.

श्री.दिवाकर रावते : मंत्री महोदयांनी ती तरतूद आम्हाला दाखवावी.

श्री.प्रकाश सोळंके : कलम 3 (1) च्या पोट कलम (ब) मध्ये ही तरतूद आहे. त्या तरतुदीनुसार अधिसूचना काढून अनुज्ञेय केलेले आहे. त्यामुळे कायद्यामध्ये बदल करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : मंत्री महोदयांनी एका गोष्टीचा खुलासा केला तर बरे होईल. या विधेयकात पब, डिस्को थेक व नृत्य बार असे नमूद केलेले आहे. या तिन्हीमध्ये फरक काय आहे ते सांगावे. मंत्री महोदयांना डान्स बार असे म्हणावयाचे आहे काय, डान्सबारवर शासनाने यापूर्वीच बंदी आणलेली आहे.

अस्टुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

ABG/ प्रथम श्री. शिगम 17:20

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2 व 3, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

---------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. II OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA AND UPA-LOKAYUKTAS ACT, 1971.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE

श्रीमती फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 2-महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, 1971 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, केंद्राच्या 13 व्या वित्त आयोगातील शिफारशीनुसार 2010 ते 2015 या कालावधीसाठी पंचायती राज संस्था बळकटीकरणासाठी केंद्र सरकारकडून जनरल परफॉर्मन्ससाठी 1903.43 कोटी आणि स्पेशल एरिया परफॉर्मन्ससाठी 27.60 कोटी रुपयांची तरतूद मिळते, अशी एकूण 1931.03 कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकारला यावयाची आहे. सदरहू तरतूद वितरित करण्यासाठी 13 व्या वित्त आयोगाच्या काही अटी आहेत. त्यात एक अट अशी आहे की, महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत समित्या लोक आयुक्त कायद्याच्या कक्षेत आणाव्यात. या संस्थांवर नियंत्रण करण्यासाठी एखादी नवीन संस्था निर्माण करावी. या कायद्यात ही अट अंतर्भूत करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने दिनांक 3.9.2010 रोजी बैठक घेतली. त्या बैठकीत असा निर्णय घेतला की, लोक आयुक्त कायदा आहे, त्यात एक सुधारणा सुचवून महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा ) विधेयक सभागृहात आणू. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्याचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष या कायद्याच्या कार्यकक्षेत पूर्वीपासून आहेत.

3...

श्रीमती फौजिया खान...

कोणत्याही विषयाचे सभापती त्या स्कोपमध्ये आहेत. नवीन अमेडमेंटप्रमाणे जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदचे सर्व सदस्य या कायद्याच्या कार्यक्षेत्रात आणण्याचे प्रयोजन आहे. तसेच महानगरपालिकेचे महापौर, उप महापौर, कुठल्याही विषयाचे सभापती, महानगरपालिकेचे नगरसेवक यांना या कायद्याच्या कार्यकक्षेत आणण्याचा देखील उद्देश आहे. महानगरपालिकेचे कर्मचारी आणि अधिकारी या कायद्याच्या स्कोपमध्ये आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान.....

या विधेयकामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषदेचे पदाधिकारी अंतर्भूत असावेत यासाठी सुधारणा करण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांनी असे सांगितले की, मंत्रीमंडळाची बैठक झाली, त्या बैठकीमध्ये सुधारणा विधेयक आणण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय घेण्याची आवश्यकता का भासली, मंत्रीमंडळाचे असे मत का झाले? महानगरपालिकेचे महापौर, उपमहापौर, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना या कायद्याच्या कक्षेत आणले पाहिजे अशी सुधारणा का करावीशी वाटली हे मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगितले पाहिजे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मंत्रीमंडळाने ही सुधारणा कशाकरिता आणायचे ठरविले याचा उल्लेख मी यापूर्वीच केलेला आहे. 13 व्या वित्त आयोगाने ज्या अटी घालून दिल्या आहेत, त्यामध्ये त्यांना जी सुधारणा अपेक्षित आहे, त्यानुसार लोक आयुक्त कायद्यामध्ये बदल करण्यासाठी हे सुधारणा विधेयक आणले आहे. दिनांक 14 मार्च, 2011 रोजी दोन्ही सभागृहाच्या पटलावर हे विधेयक मांडण्यात आले असून माननीय राज्यपालांनी मंत्रीमंडळाच्या निर्णयाला दिनांक 9 मार्च, 2011 रोजी संमती दिली आहे. अधिकाऱ्यांसाठी अधिसूचना निर्गमित केलेली असून अध्यादेश प्रख्यापित केलेला आहे आणि आज हे सुधारणा विधेयक चर्चेद्वारे संमत करण्यात यावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.उषा दराडे)**

**तालिका सभापती** : विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचा प्रस्ताव आहे, तो त्यांनी मांडावा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2011 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 2 महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, 1971 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 40 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

सभापती महोदया, हे विधेयक सभागृहापुढे मांडताना मंत्री महोदयांनी उद्देश सांगितला. त्याप्रमाणे केंद्र सरकारकडून जो निधी प्राप्त होतो त्या संदर्भात 13 व्या वित्त आयोगाने ही अट घातली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासनामध्ये ज्या अनियमितता आणि त्रुटी आढळून येतात त्यामध्ये सुधारणा व्हावी म्हणून या कायद्यात बदल करणे अपेक्षित आहे. परंतु प्रशासनामध्ये नेमकी काय सुधारणा अपेक्षित आहे याचा मंत्री महोदयांनी उल्लेख केलेला नाही. 13 व्या वित्त आयोगाने सर्व महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि नगरपरिषदांच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द करण्यात आलेल्या भ्रष्टाचाराच्या, कुप्रशासनाच्या तक्रारी विचारात घेण्यासाठी स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्था प्राधिकरण नेमण्याची शिफारस राज्य शासनाला केली आहे. या शिफारशीनुसार लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्यामार्फत या तक्रारींची दखल घेतली जाणार आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी स्वतंत्र चौकशी प्राधिकरण नेमले जाणार आहे याचा मंत्री महोदयांनी उल्लेख केलेला नाही. लोक आयुक्त यांना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच महानगरपालिकेचे महापौर, उप महापौर, नगरपरिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा अधिकार आहे. परंतु सदस्यांचाही त्या कायद्यामध्ये अंतर्भाव करावा असे शासनाचे म्हणणे आहे.

नंतर 3व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

ज्या वेळेला पैसे येतात तेव्हा त्याचे वेगवेगळया पध्दतीने वाटप होत असते. पचांयत समिती ते ग्रामपचांयतीला जिल्हा परिषदेच्या माध्यमातून वाटप होत असते. महानगरपालिकेला डायरेक्ट पैसे येतात व नगरपालिकेला जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पैसे जात असतात. पैसा आल्यानंतर त्यासंदर्भात काही नियम व अटी घातलेल्या असतात. जिल्हापरिषद, महानगरपालिका, नगरपालिका यांनी प्लॅन तयार करावयाचा व प्लॅनच्या माध्यमातून पैसे खर्च करावे लागत असतात. जेव्हा हा पैसा खर्च होतो तेव्हा जास्तीचा खर्च कोणत्या तरी कामावर करावयाचा असेल तर त्याकरिता जिल्हाधिका-यांची किंवा आयुक्तांची परवानगी घ्यावी लागत असते. हे सर्व काम पदाधिकारीच करतात असे नसून ही सर्व कामे अधिकारीच करीत असतात. नगरपालिकेच्या बाबतीत विषय मांडला होता त्यामध्ये द्वीलक्षी ऑडीट महानगरपालिका, नगरपालिकासाठी काढण्यात आलेले आहे. यामध्ये नगरपालिकेतच पैसे खर्च केला पाहिजे अशा प्रकारची अट होती. परंतु नगरपालिकेच्या आयुक्तांनी वित्त आयोगाकडून मिळालेला पैसा आपल्या मर्जी प्रमाणे खर्च केला, जो अपेक्षित नव्हता. तर तो आयुक्तांनी स्वत:च्या मर्जीतून पैसा खर्च केलेला आहे. यामध्ये अध्यक्षांचा, उपाध्यक्षांचा व सदस्यांचा काही एक संबंध आला नसेल. तरी सुध्दा आपण पदाधिका-यांवर कारवाई करता तर आपण अधिका-यांवर कारवाई का करीत नाही असा माझा आपल्याला सवाल आहे? ख-या अर्थाने अधिका-यांना गुन्हेगार ठरवले गेले पाहिजे.

पूर्ण देश भ्रष्टाचारामध्ये गेलेला आहे असे आदरणीय अण्णा हजारे यांनी सांगितले आहे. हा भ्रष्टाचार जर नष्ट करावयाचा असेल तर लोकपाल विधेयकाशिवाय पर्याय नाही. जर भ्रष्टाचार झ ाला असेल तर लोकप्रतिनिधींना वापस बोलविण्याचा अधिकार सुध्दा त्यामध्ये मागितलेला आहे. जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिकांमध्ये खरेदीमध्ये पदाधिका-यांचा डायरेक्ट कोठे संबंध येतो ? पदाधिकारी केवळ पलॅन मंजूर करतात परंतु खर्च मंजूर करण्याचा अधिकार सीईओ आणि कलेक्टरला असतो. जर आपण यामध्ये पदाधिका-यांना गुंतवत असाल तर ते योग्य नाही. सभापती हे केवळ प्लॅनिंग देण्याचे काम करीत असतात व पैसा मंजूर झाल्यानंतर पैसा बरोबर खर्च झाला की, नाही हे पाहण्याची जबाबदारी आयुक्तांची, सीईओ व कलेक्टरांचा असते.

..2..

श्रीमती शोभा फडणवीस....

जेव्हा भ्रष्टाचार झाला अशा पध्दतीचे आरोप होतात त्यावेळी कंट्रोलरवर कारवाई का केली जात नाही ? खरे म्हणजे यामध्ये अधिका-यांना जबाबदार धरले गेले पाहिजे. ज्यावेळेस 12 व्या वित्त आयोगातून ज्या काही गोष्टी घ्यावयाच्या असतात त्या नियमात असतील तरच आपल्याला 12 व्या वित्त आयोगाकडून मिळतात. जर खर्चच करावयाचा असेल तर त्यासाठी वेगळी परवानगी घ्यावी लागत असते. यामध्ये सर्व सदस्यांना अडचणीत आणण्याचा नवीन पायंडा आपण पाडत आहात व लोकप्रतिनिधींना भ्रष्टाचारी ठरविण्यासाठी हे विधेयक आणले गेले आहे असे माझे स्पष्ट मत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आता महिलांना सुध्दा 50 टक्के आरक्षण दिले जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम चांगल्या पध्दतीने चालावे यासाठीच महिलांना 50 टक्के आरक्षण दिलेले आहे. जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपालिकांना स्वतंत्र अधिकार आहेत. केंद्रापासून ते गावापर्यंत चांगल्या प्रकारचे काम करण्याचे अधिकार आपण सदस्यांना दिलेले आहेत. विकासाचे काम करीत असतांना नवीन आलेला सदस्य असेल, अध्यक्ष असेल किंवा नवीन नियमाप्रमाणे 50 टक्के पदाधिकारी हे महिला होणार आहेत. महिलांना आरक्षण देण्याच्या संदर्भात आपण बिल पास केलेले आहे व दुस-या बाजूने नवीन निवडून आलेल्या पदाधिका-यांना आपण अडचणीत आणण्याचे काम करीत आहात. पदाधिकारी निवडून आल्याबरोबर त्याला काही सर्व नियम माहिती नसतात. खरे म्हणजे सीईओ, आयुक्तांनी पदाधिका-याना कशा पध्दतीने काम केले पाहिजे हे सांगितले पाहिजे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 17.35

श्रीमती शोभा फडणवीस ...

परंतु आज हे अधिकारी जेव्हा मिटींगमध्ये बसतात तेव्हा ख-या अर्थाने सरकारी कागदपत्र कोणते आले आहेत हे सुध्दा सदस्यांना वाचून दाखवत नाहीत. महिन्याचा खर्च किती झाला आहे याची माहिती त्यांनी बैठकीच्या तीन दिवस अगोदर दिली पाहिजे पंरतु ही माहिती सुध्दा दिली जात नाही.टेंडर काढत असतांना एखादे टेंडर जर अध्यक्षांनी मंजूर केले तर त्याला विरोध करुन ते टेंडर रद्द करण्याचे अधिकारसुध्दा सी.ई.ओ. आपल्या हातामध्ये घेत असतात. त्यानंतर स्वत: टेंडर काढून त्या टेंडरप्रमाणे काम करण्याचे सर्वस्वी अधिकार सी.ई.ओ. आपल्याच हातामध्ये घेत असतील आणि अध्यक्षांना दुय्यम स्थान देत असतील तर त्या पापाचे धनी अध्यक्षाना का केले जाते असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदया, नवीन येणा-या सदस्यांना प्रशिक्षण द्यावयास पाहिजे पंरतु त्यांना प्रशिक्षण देण्याची कोणती व्यवस्था शासनाने केलेली आहे. ? कोण कोणत्या कायद्याचे ज्ञान त्यांना असले पाहिजे, खर्च कशा पध्दतीने केला पाहिजे, कोणत्या नियमाने कोणते खर्च केले पाहिजेत यासंबंधी अध्यक्ष आणि उपाध्यक्षांना कोणत्याही प्रकाराचे प्रशिक्षण दिले जात नाही. जे काही त्यांना ज्ञात आहे त्या पध्दतीने अध्यक्ष आणि उपाध्यक्ष कामकाज करत असतात. आता आदिवासी महिलांना आरक्षणाचा लाभ देण्यात येणार आहे.दलित महिलांना तसेच ग्रामीण भागातील महिलांनासुध्दा आरक्षणाचा लाभ देण्यात येणार आहे.आता 50 टक्के महिलांना आरक्षण देण्यात येणार आहे तेव्हा त्या पदासाठी आदिवासी महिला मिळतील किंवा नाही असा प्रश्न आम्हाला पडलेला आहे.कदाचित मुंबई आणि मुंबईच्या लगतच्या प्रदेशामध्ये अशी व्यक्ती मिळू शकेल त्याबाबतीत माझे काहीही म्हणणे नाही.परंतु ग्रामीण भागातील नगरपालिकेमध्ये वा जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीमध्ये शिकलेली आदिवासी महिला हवी असेल तर ती मिळेल किंवा नाही असा प्रश्न आम्हाला पडलेला आहे.या पदासाठी एखादी आदिवासी महिला मिळाल्यानंतर व तिला अधिकार दिल्यानंतर जर तिच्या विरुध्द कारवाई केली जाणार असेल तर या पदासाठी महिला किती प्रमाणात पुढे येतील हा सुध्दा महत्वाचा प्रश्न आहे.जिल्हा परिषद आणि नगरपालिकेच्या पदाधिका-यावर कारवाई होणार आहे. परंतु त्या व्यतिरिक्त ग्रामपंचायत , मंत्रालय, आयुक्त कार्यालय, कृषी विभाग इत्यादी ठिकाणी भ्रष्टाचाराची किती तरी प्रकरणे असतात . ज्या खात्यात भ्रष्टाचार नाही असे एकसुध्दा खाते शिल्लक राहिलेले नाही.भ्रष्टाचार विरहित एक अधिकारी दाखवा आणि बक्षीस

2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

मिळवा असे सांगण्याची जर वेळ आली तर तो अडचणीचा विषय ठरेल असे मला सांगावयाचे आहे.त्यामुळे प्रथम आपले घर स्वच्छ करु या आणि मग इतर भागाकडे आपण वळू या असे जर मी म्हटले तर ते वावगे होणार नाही. श्री.अण्णा हजारे यांना लोकपाल विधेयक लोकसभेमध्ये आणावे असे का वाटले ? महाराष्ट्रात सुध्दा आदर्श घोटाळा, तेलाचा घोटाळा होत आहे तर देश पातळीवर आय.टी.घोटाळा, टू जी स्पेक्ट्रम घोटाळे होत आहेत अशा प्रकारे अनेक घोटाळे पाहिल्यानंतर हा देश भ्रष्टाचारापासून सुरक्षित कसा राहील असें श्री.अण्णा हजारे यांना वाटले असावे. भ्रष्टाचाराचा मोठया प्रमाणावर आंगडोंब उसळलेला असतांना लहानशी काडी लावून एक दिवा पेटविण्यात काही अर्थ नाही. त्यामुळे हे विधेयक आणण्याच्या अगोदर स्वच्छ प्रशासन दिले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.लोक आयुक्त आणि उप लोकआयुक्त यांच्यांकडे किती तरी प्रकरणे प्रलंबित आहेत. त्या पैकी किती प्रकरणांचा त्यांनी निपटारा केलेला आहे. ? कामाचा मोठा ढिग पडलेला असेल आणि त्यांच्याकडे कर्मचारी जर कमी असतील तर या प्रकरणांचा निपटारा वेळेवर होऊ शकणार नाही, अशा परिस्थितीमध्ये त्यांच्या डोक्यावर आणखी प्रकरणे येऊन पडतील. त्यामुळे त्यांना एकही काम व्यवस्थित करता येणार नाही ही बाब देखील बरोबर नाही. ही कामे लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांच्याकडे देण्यात यावीत असेच म्हटलेले आहे.त्याकरिता स्पेशल कमिटी गठीत करण्यास संमती देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रथम राज्य पातळीवरील संपूर्ण भ्रष्टाचार संपविण्यात यावा आणि त्या नंतर या विधेयकाकडे लक्ष देण्यात यावे असे माझे म्हणणे आहे. या विधेयकातील त्रुटी जर दुरुस्त करावयाच्या असतील तर याकरिता दोन्ही सभागृहातील 40 सन्माननीय सदस्यांची संयुक्त समिती नेमण्यात यावी व त्या समितीकडे हे विधेयक विचारार्थ पाठवावे असे मला सांगावयाचे आहे. या ठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहे त्याला नापंसती दर्शवून मी माझे दोन शब्द संपविते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

**तालिका सभापती (ॲड.उषा दराडे)** : आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा होईल त्यानंतर मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव प्रथम मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी भाषण सुरु करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदया,सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 2 महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक मांडण्यात आलेले आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया,या विधेयकामध्ये उद्देश आणि कारणे दिलेली आहेत तसेच हे विधेयक अत्यंत महत्वाचे असल्यामुळे माननीय मंत्र्यांनी जे स्पष्टीकरण दिलेले आहे ते अधिक विस्ताराने सांगण्याची गरज आहे. असे मला वाटते. राज्यामध्ये एकूण 23 महानगरपालिका , असंख्य नगरपालिका आणि पंचायत समित्या आहेत. वाढत्या नगरिकीकरणामुळे महानगरपालिकेकडे मोठया प्रमाणावर निधी येत आहे..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

तो जेएनएनयुआरएमचा असेल, एमएमआरडीएचा निधी असेल. त्या करिता हे शासन अनेक प्रकारचे कायदेकानून करण्याचा प्रयत्न करीत असते परंतु हे करीत असतांना यामध्ये मोठया प्रमाणात कमिशनचे, टक्केवारीचे गैरव्यवहार होत असतात हेही तितकेच सत्य आहे. या विधेयकामध्ये अधिकाऱ्यांना सामावून घेण्याचा कुठेही उल्लेख नाही. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी ठाणे महानगरपालिकेचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास त्या ठिकाणी वारंवार मागणी केल्यानंतर मला देण्यात आलेल्या लेखी उत्तरामध्ये वेगवेगळया घोटाळयांमध्ये 35 अधिकारी अडकल्याचे सांगण्यात आले. त्यामध्ये कुणी 18 कोटींच्या, कुणी 25 कोटींच्या गैर व्यवहारात अडकल्याचे सांगण्यात आले. त्याचबरोबर त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करता ती प्रकरणे अजून प्रलंबित ठेवण्यात आली आहे. ज्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन त्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले होते त्यांना पुन्हा कामावर घेण्यात आले आहे. अशा प्रकारच्या अनेक गडबडी यामध्ये झाल्या असतांनाही कोणतीही कारवाई होत नाही म्हटल्यावर अधिकाऱ्यांमध्ये देखील एक प्रकारचे धैर्य निर्माण झाले आहे. आपण काहीही गडबड केली तरी आपल्यावर कोणतीही कारवाई होत नाही असे चित्र आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये मोठया प्रमाणात पहावयास मिळते. त्यांनी मला दिलेल्या यादीमध्ये 35 अधिकाऱ्यांचा समावेश असून त्यांच्यावर ठेवलेल्या आरोपांबाबत गेल्या दहा वर्षामध्ये कोणताही निर्णय न घेता त्यांची चौकशी प्रलंबित ठेवण्यात आली आहे. ती चौकशी वेळेवर पूर्ण होऊन कारवाई झ ाल्याचे एकही उदाहरण आपल्याला पहावयास मिळत नाही. त्यामुळे या विधेयकाच्या कक्षेमध्ये आपण अधिकाऱ्यांना आणणार आहात की नाही ? याचे उत्तर मिळाले पाहिजे.

ठाणे महानगरपालिकेमध्ये आयुक्तांना कारवाईचे अंतिम अधिकार देण्यात आले आहेत. महापौरांनी सही केल्यानंतर कोणताही निर्णय पूर्ण होत नाही, आयुक्तांनी शेवटची सही केल्यानंतर कारवाई पूर्ण होते. महापौरांना फक्त उद्घाटन करण्याचा, नारळ फोडण्याचा आणि निर्णय जाहीर करण्याचा अधिकार आहे. तेव्हा या विधेयकाचा कॅमेरा आपण लोक प्रतिनिधींवर फोकस करीत राहिला तर ते योग्य होणार नाही. शेवटी लोकप्रतिनिधी जनतेमधून निवडून आले आहेत. आपल्याला मान्य आहे की, लोकप्रतिनिधी सुध्दा घोटाळे करतात याची उदाहरणे आपणासमोर आली आहेत. माननीय सदस्या श्रीमती शोभाताईंनी माननीय श्री. अण्णा हजारे यांनी लोकपाल विधेयकाचा आग्रह धरल्याचे उदाहरण सांगितले. आज मला असे समजले आहे की, माननीय श्री. अण्णा हजारे यांनी आमदार आणि खासदार यांचा स्थानिक विकास निधी बंद

DGS/

श्री.संजय केळकर....

करण्याची मागणी केली आहे. ही बातमी वाचल्यानंतर माझ्या मनात आले की, हा निधी म्हणजे त्या आमदारांचा असलेला अधिकार आहे, त्यांना लोकांनी निवडून दिले आहे. ज्या ठिकाणी शासन विकास कामे करु शकत नाही त्या ठिकाणी लोकप्रतिनिधींना देण्यात आलेल्या निधीचा वापर करुन ते आपल्या मतदारसंघामध्ये विकास कामाची गंगा पोहोचवू शकतात. त्यामुळे हा निधी बंद करण्याची घेण्यात आलेली भूमिका आमदार आणि खासदारांवर निश्चितपणे अन्याय करणारी आहे. त्या मधील असलेल्या त्रुटी दुरुस्त केल्या जाऊ शकतात . परंतु आज मोठया प्रमाणात खेडयापाडयात आमदार मंडळी या निधीचा उपयोग करीत असतात हे देखील तेवढेच सत्य आहे. त्यामुळे यामधील कॅमेऱ्याचा फोकस हा ग्रामपंचायतीपासून लोकसभेच्या खासदारांवर न ठेवता यामध्ये अधिकाऱ्यांना देखील समाविष्ट करुन घेण्यात आले पाहिजे आणि त्या करिता करावयाच्या कारवाई बाबत ठराविक मुदत देखील घालण्यात आली पाहिजे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये ज्यांच्या बाबतीत आपल्याला तक्रार करावयाची असेल ती करण्याची पध्दत कोणती असली पाहिजे. अनेक लोकांच्या टक्केवारीची प्रकरण् बाहेर आल्या नंतर देखील ते लोकप्रतिनिधी पुन्हा पुन्हा निवडून आले आहेत. ठाणे महानगरपालिकेमध्ये स्वर्गीय आनंद दिघे साहेबांनी टक्केवारीचा मुद्दा उपस्थित केला होता. तो अजून संपलेला नाही, केव्हा केव्हा तो बाहेर येत असतो. त्या टक्केवारीमध्ये अनेक अधिकारी आणि लोकप्रतिनिधी अडकले आहेत. गेल्या 20 वर्षामध्ये त्या प्रकरणां बाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. एका बाजूला आपण अशा प्रकारचे विधेयक आणून नवीन नियमावली तयार करतो, परंतु त्यामध्ये पळवाटा ठेवल्या जात असल्यामुळे कोणत्याही प्रकरणां बाबत लवकर निर्णय लागत नाही. मध्यंतरी शासनाने असा निर्णय घेतला की, कोणत्याही अनधिकृत बांधकामामध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग असल्यास आयुक्त त्यांना अपात्र करु शकतात. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार आजपर्यन्त एकही लोकप्रतिनिधी अपात्र झ ालेला नाही. तो लोकप्रतिनिधी एक तर कोर्टामध्ये जातो किंवा महानगरपालिकेमध्ये जाऊन ठराव संमत करुन घेतो. त्यामुळे त्याच्यावरील केसेस पेंडींग रहातात. अशा प्रकारचे विधेयक तयार करीत असतांना त्यामध्ये कोणत्याही पळवाटा राहणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. तसेच, याची अंमलबजावण् ठराविक मुदतीत करण्याची काळजी घेतली पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अग्रधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

मध्यंतरी ग्रामपंचायत सदस्यांच्या डिस-क्वॉलीफीकेशन बाबत विधेयक आणले होते.कोकण आयुक्तांकडे फायलीच्या फायली पडलेल्या आहेत आणि पुरावे दिल्यानंतर देखील अनेक सदस्य डिस-क्वॉलीफाय देखील झालेले नाहीत.त्यामुळे एका बाजूला शासन लोकप्रतिनिधींवर अंकुश आणण्याचा प्रयत्न करीत असताना त्यामध्ये मुदतीच्या बाबतीत उल्लेख असावयास पाहिजे. त्यात कोणतीही पळवाट असता कामा नये. मात्र आज अनेक ठिकाणी याबाबत प्रश्न निर्माण झालेले आहेत.

सभापती महोदय, मी अजून एक महत्वाचा विषय सदनासमोर आणू इच्छितो.आपण याठिकाणी बिलावर चर्चा करीत आहोत. पण तुम्ही कोणत्याही महापालिकेमध्ये जावे. तेथे जो चीफ ऑडीटर नेमण्यात आला आहे, त्याने स्टेटमेंट ऑफ अकाऊंटस्चे ऑडीट केलेले आहे काय ? याबाबत महापालिकेमध्ये विचारणा करावी. मग आपल्या असे लक्षात येईल की, कोणत्याही महापालिकेमध्ये चीफ ऑडीटरचा जो रिपोर्ट आहे, तो देत असताना केवळ प्रशासकीय अहवाल देऊन चालत नाही. केवळ ऑडीट रिपोर्ट देऊन चालत नाही. सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी साहेबांना ते चार्टर्ड अकाऊंटन्ट असल्याने माहिती आहे. इन्कम ॲण्ड एक्सपेंडीचर याचे स्टेटमेंट ऑफ अकाउंटस् बरोबर ऑडीट झाले पाहिजे आणि यामध्ये कोणत्या प्रकारच्या त्रुटी आहेत हे चीफ ऑडीटरने सांगितले पाहिजे आणि महापालिकेने त्या त्रुटी दुरुस्त करण्याचे काम केले पाहिजे. मी हे एवढ्यासाठी सांगत आहे की, याठिकाणी भ्रष्टाचार आणि कु-प्रशासन या दोन शब्दांचा उल्लेख झालेला आहे. आजपर्यंत ज्या महापालिकांचा टर्न ओव्हर 50 कोटी रुपये होता, तो आता 1400 कोटी रुपयांपर्यंत गेलेला आहे. काही महापालिकांचा टर्न ओव्हर 500-500 कोटी रुपयांचा आहे. तसेच जिल्हा परिषद असेल किंवा नगरपालिका असेल याठिकाणी आर्थिक टर्न ओव्हर प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे.याबाबत माहितीच्या अधिकारांतर्गत जी माहिती उपलब्ध झाली, ती धक्कादायक आहे. या माहितीनुसार कोणत्याही ठिकाणी चीफ ऑडीटरच्या माध्यमातून ऑडीट केलेले नाही. केवळ 2 वर्षाचे नाही तर 10-10, 15-15 वर्ष झाले तरी ऑडीट झालेले नाही. हा जनतेचा पैसा आहे आणि त्याचे काय झाले हे आम्हाला माहिती नाही. एकंदर किती पैसे खर्च झाले, कोणत्या विभागामध्ये कोणत्या पध्दतीने पैसे खर्च झाले, किती कालावधीमध्ये पैसे खर्च झाले आहेत, तसेच केंद्र शासनाकडून जो निधी मिळाला, तो कशा पध्दतीने खर्च झाला, यामध्ये कोणाचा हात होता? हे समजले पाहिजे.

18-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3Y-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

सभापती महोदय, आपण याला भ्रष्टाचार आणि कु-प्रशासन असे म्हणतो, परंतु याबाबतीत सरकारकडे जो अधिकार आहे त्याच्या आधारे कोणत्याही महापालिकेवर कारवाई केलेली नाही. बिचारे चीफ ऑडीटर प्रशासनाला सांगतात की, आमच्यासमोर स्टेटमेंटस् ऑफ अकाऊंटस् सादर करावेत. पण त्यांना कोणी दाद देत नाही. चीफ ऑडीटर हे त्यांच्या केबिनमध्ये केवळ हवा खात बसलेले असतात अशा प्रकारची अवस्था आहे. त्यामुळे सदनामध्ये हे बिल आणत असताना त्यामध्ये असंख्य प्रकारच्या त्रुटी आहेत. या बिलामध्ये अनेक गोष्टींचा समावेश करण्याची गरज आहे. आपण कायदे करणार पण त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसेल आणि आपल्याला ज्या कायद्याने ताकद दिलेली आहे त्या कायद्याचा आपण वापर करणार नाही आणि केवळ त्यामध्ये नवीन-नवीन ॲडीशन करणार असलो तर ते योग्य होणार नाही. यामध्ये अधिकाऱ्यांचा देखील सहभाग असला पाहिजे. म्हणून या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, या ठिकाणी सादर करण्यात आलेले बिल आम्हाला मान्य नाही. सदरहू विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे आणि तेथे त्याचे योग्य प्रकारे विश्लेषण व्हावे आणि योग्य पध्दतीने दुरुस्त करुन मग हे विधेयक सदनासमोर मांडण्यात यावे अशा प्रकारची मी या ठिकाणी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

. . . . 3 वाय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, गेल्या चार-पाच दिवसापासून मला एक स्वप्न पडत आहे. लहानपणी मी शाळेतून येत असताना रस्त्यावर माकडाचा खेळ सुरु असावयाचा. त्याठिकाणी एका माणसाच्या एका हातात डमरु असतो आणि त्याच्या दुसऱ्या हातामध्ये माकड आणि माकडीण यांच्या दोऱ्या असतात. मग तो माणूस सांगतो त्याप्रमाणे ते उड्या मारतात. दिल्लीच्या जंतरमंतर रोडवर मला हा प्रकार दिसला. आता माकडीण कोण आणि माकड कोण याचा मी खुलासा करण्याची गरज नाही. पण देशामध्ये सार्वभौम सत्ता असलेले छातीवर हात ठेऊन सांगतात की, आम्हाला लोकांनी निवडून दिलेले आहे म्हणून आम्ही येथे आलो आहोत. पण त्यांना मर्कट करण्याचे सामर्थ्य गांधीबाबांच्या नावाने कोणीतरी दाखविले आणि ते सर्व देशाने पाहिले.

**(सभापतीस्थानी - माननीय उप सभापती)**

यानंतर कु.थोरात . . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

तीच मर्कट चेष्टा घेऊन विधिमंडळामध्ये जेव्हा हे विधेयक येते, मला माफ करा. मी जे बोलत आहे त्या बद्दल कोणीही वाईट वाटून घेऊ नये.

सभापती महोदय, आज तुम्हा- आम्हा सर्वांना आम्ही आमदार आहोत हे समाजात सांगण्याची लाज वाटावी, अशा प्रकारची वातावरण निर्मिती कोणी तरी करीत असेल आणि त्याचे बाके वाजवून स्वागत करण्यात येत असेल तर मर्दासारखे छाती काढून आपण येथे बसलेले आहोत ते आमदार म्हणून बसलेले आहोत, आणि कडवट निष्ठेने येथे बोलण्यासाठी आम्ही उभे आहोत. आम्हाला कोणी तरी भ्रष्टाचारी म्हणतेय आणि ते सगळे ऐकून घेतले जाते.. हे विधेयक आणताना दहा वेळा विचार करावयास पाहिजे होता. अत्यंत उद्विग्न अवस्थेत मी शासना बरोबर चर्चा करीत आहे. हे विधेयक मागे घेण्यात यावे. महाराष्ट्राला भीक लागलेली नाही. वित्त आयोगाच्या नावाने कोणाला सांगता? जर दिल्लीचा वित्त आयोग हे सांगत असेल आणि जर पैसे हवे असतील तर हे सगळे चोर आहेत या चोरांची चौकशी करण्यासाठी हा कायदा करीत आहोत असे जर असेल तर ही भीक कोणाला पाहिजे. मी माननीय मंत्री महोदयांना असे म्हणालो की, 1931.8 कोटी रुपये वित्त आयोगाने कशासाठी दिले आहेत, ते सांगा. पण त्यासंदर्भात सांगण्यात आले नाही. ते म्हणाले मी अत्यंत व्यथित आहे. सन्मानीय सदस्या अलका देसाई आणि सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी या ठिकाणी उल्लेख केला. श्रीमती अलका देसाई मुंबई महनगरपालिकेत नगरसेविका म्हणून होत्या. या विधेयकातील वाक्य रचना अतिशय खराब आहे म्हणून मी प्रश्न विचारला की, मंत्रिमंडळात याबाबतीत काय चर्चा झाली ते सांगा. मंत्रिमंडळाला हे विधेयक आणावे असे का वाटले, हे मी अत्यंत नम्रपणे विचारले होते.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये असे म्हटले आहे की, "भ्रष्टाचार आणि कुप्रशासन या संबंधीच्या तक्रारी विचारात घेण्यासाठी एक स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्था चौकशी प्राधिकारी नेमण्यात यावे". लोकपाल हा वेगळा विषय आहे. सभापती महोदय, मला या ठिकाणी स्पष्ट शब्दात विचारावयाचे आहे. या विधेयकाच्या पृष्ठ 2 वर खंड 2 मधील (क) परिच्छेद (अ) मध्ये असे म्हटले आहे की, (एक ) "जिल्हा परिषदेचा प्रत्येक अध्यक्ष आणि उपाध्यक्ष" या मजकुराऐवजी "जिल्हा परिषदेचा प्रत्येक अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य" हा मजकूर दाखल करण्यात येईल. (दोन) "पंचायत समितीचा सभापती व उप सभापती" या मजकुराऐवजी " पंचायत समितीचा सभापती, उप सभापती आणि सदस्य"हा मजकूर दाखल करण्यात येईल. त्यानंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिवाकर रावते....

(ख) परिच्छेद (ब) मध्ये :- असे म्हटले आहे की,

(एक) "नगरपालिकेचा प्रत्येक अध्यक्ष आणि उपाध्यक्ष" या मजकुराऐवजी "नगरपरिषदेचा प्रत्येक अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

त्यानंतर पुढे असे म्हटले आहे की, "(ग) परिच्छेद (ब) नंतर, पुढील परिच्छेद जादा दाखल करण्यात येईल ":-

"(क) मुंबई महानगरपालिका अधिनियम, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 अन्वये स्थापन केलेल्या सर्व महानगरपालिकेचा प्रत्येक महापौर, उप महापौर आणि महापालिका सदस्य आणि स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचा सभापती"

सभापती महोदय, जंतर-मंतरवरचे जे आंदोलन होते ते या देशातील भ्रष्टाचाराला गवसणी घालण्यासाठी होते म्हणून त्याला पाठिंबा दिला पाहिजे, या मताचे आपण सर्वच आहोत. या पध्दती बद्दल आपल्यामध्ये मत भिन्नता असू शकेल. सभापती महोदय, हे सर्व सुरु असताना एका सन्माननीय सदस्याचे मी नाव घेणार नाही, कारण ते या सभागृहाचे सदस्य नाहीत. मी दूरदर्शनवर ऐकत होतो. या लोकपाल विधेयकामध्ये पंतप्रधानच नाही तर राष्ट्रपतीसुध्दा घेतले पाहिजे असे त्यांचे वक्तव्य ज्यावेळी मी ऐकले त्यावेळी मला टी.व्ही. फोडावासा वाटला.

यानंतर श्री .बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

राष्ट्रपती पद हे या देशाचे सर्वोच्च पद आहे. ते भ्रष्टाचारी आहेत असे सांगून त्या ठिकाणी ते बसतात आणि आपण ते ऐकतो. त्याबद्दल आपण व्यथित होत नाही का ? आपल्या कायद्यानुसार आणि घटनेनुसार राष्ट्रपती पद सगळ्यांच्या बाहेर आहे. त्यांना कशासाठीही न्यायालयात बोलविता येत नाही, असे घटना सांगते आणि लोकपाल विधेयकाचे समर्थक, तथाकथित विद्वान राष्ट्रपतींना सुध्दा या विधेयकात घ्या, अशा प्रकारचे वक्तव्य टी.व्ही.च्या माध्यमातून करुन या देशातील प्रत्येक नागरिक चोर आहे, राष्ट्रपतींपासून सगळे बदमाश आहेत, अशा प्रकारचे वातावरण निर्माण करावयास बघतात. टी.व्ही. वर जे बोलले ते मी ऐकले आहे. नर्मदा आंदोलनाच्या कार्यकर्त्या आहेत, त्यांच्याबद्दल मी बोललो तर सन्माननीय सदस्यांना राग येईल. हे वक्तव्य व्यथित करणारे नाही का ? कदाचित सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना हे वक्तव्य व्यथित करणारे वाटत नसेल. त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही पण माझ्या देशाच्या राष्ट्रपती चोर आहेत, बदमाश आहेत, भ्रष्टाचारी आहेत, त्यांना या लोकपाल विधेयकामध्ये घ्या, असे जेव्हा टी.व्ही.च्या माध्यमातून ऐकवले जाते तेव्हा मला "उतू नका, मातू नका....." ही म्हण आठवते. उतायचे नाही, मातायचे नाही, जनसेवेकरिता समर्पित भावनेने काम करावयाचे, हा तुमचा आणि माझा धर्म आहे. पण हे तर उतल्या मातल्यासारखे झाले. सभापती महोदय, लोकशाहीच्या माध्यमातून निवडून येणारे, निवडून आल्यानंतर विशिष्ट पदावर बसणारे सगळे बदमाश आहेत का ? हे सगळे भ्रष्टाचारी आहेत का ? मला माननीय मंत्री महोदयांकडून सरकारचे मत ऐकण्याची इच्छा आहे की, यामध्ये भ्रष्टाचार करण्यासारखे काय आहे ? या या बाबतीत महापौर भ्रष्टाचार करु शकतो, या या बाबतीत उपाध्यक्ष किंवा उपमहापौर भ्रष्टाचार करु शकतो, या या प्रकरणामध्ये सदस्य भ्रष्टाचार करु शकतो, या बाबत आपल्याला समर्थन करावे लागेल. तुमच्या माझ्यासह आपल्याला हे पटणारे नाही. मी महापौर होतो पण माझ्या अधिकारात काय होते हे मला आठवतच नाही. फक्त सभा चालविण्या व्यतिरिक्त माझ्या हातामध्ये काहीही नव्हते. सभापती महोदय, आपणही महापौर होता. कार्यक्रम पत्रिका सुध्दा सचिव खात्याकडून तयार होत होती. आमच्या हातात काय होते ?

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेची स्थायी समिती आहे. सन्माननीय सदस्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते .....

श्रीमती दिप्ती चवधरी यांचा उल्लेख करीत आहेत. त्या सुध्दा महापौर होत्या. त्या सध्या तिकडच्या बाजूला बसलेल्या आहेत व त्यांचे मत मला माहीत नसल्यामुळे त्या भ्रष्टाचाऱ्यांमध्ये येतात की नाही, हे मला माहीत नाही. त्या वाईट आहेत असे मी म्हटलेले नाही. त्यांनी मत व्यक्त केल्यानंतर मी बोलेन. त्या चांगल्या आहेत म्हणून या ठिकाणी आल्या असे सन्माननीय सदस्य म्हणत आहेत. मग आमच्या श्रीमती वंदनाताई चव्हाण का गेल्या ? त्याही महापौर होत्या.

**उप सभापती** : आम्ही सुध्दा चांगले आहोत म्हणून या ठिकाणी आलो.

श्री. दिवाकर रावते : पण श्रीमती वंदनाताई चव्हाण यांना आम्ही खासदार करणार असा शब्द माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी आपणा सर्वांना दिलेला आहे. ज्यावेळी आपण श्रीमती वंदना चव्हाण यांना निरोप देत होतो, या सभागृहात शुभास्ते पंथानः म्हणत होतो, तेव्हा त्यांनी तो शब्द दिलेला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : माझी हरकत आहे. कारण माझी इच्छा सन्माननीय मंत्री महोदया प्रा. फौजिया खान या खासदार व्हाव्यात अशी माझी इच्छा आहे. मी त्यांना नेहमी शुभेच्छा देतो.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जातात की काय अशी शंका वाटावयास लागली आहे. माननीय मंत्री महोदया प्रा. फौजिया खान खासदार व्हाव्यात यासाठी कदाचित ते राष्ट्रवादीत येतील. सभापती महोदय, मी स्थायी समितीचा अध्यक्ष होतो. सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई सदस्य होत्या. त्या वेळेला मलनिस्सारणासारखे मोठमोठे प्रकल्प महापालिकेच्या माध्यमातून होत होते. सभापती महोदय, आपल्याकडे सुध्दा तसे प्रकल्प होते. त्या बाबत महापौर किंवा अध्यक्ष ठरवित होते का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

जागतिक कीर्तीचे सल्लागार ज्यांच्या सल्ल्याची फी एवढी प्रचंड असते की, त्यामुळे आपल्याला घाम फुटतो. हे प्रकल्प कोणाला द्यावयाचे हे ते ठरवितात. मंत्री महोदयांच्या भाषेत एखाद्या कामाचे टेंडर कोणाला द्यावयाचे हे ते ठरवितात. त्यानंतर तो प्रस्ताव स्थायी समितीपुढे येणार. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून हे प्रकल्प होणार असल्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून महानगरपालिकेडे पैसा येत असल्यामुळे त्याच्यावर सरकारने थेट अधिकार निर्माण केला.

सभापती महोदय, कलम 520 (क) का आणले ते सांगतो. महानगरपालिकेतील सर्व ठरावांचे अधिकार सरकारने स्वत:कडे घेतले. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना हे आठवत असेल. एखादा प्रस्ताव महानगरपालिकेने स्वीकारला आणि त्या प्रस्तावात काही तरी गडबड आहे असे सरकारला वाटले तर तो प्रस्ताव रद्द करण्याचा अधिकार सरकारला आहे. तसेच एखादा प्रस्ताव महानगरपालिकेने नाकारला असेल तर तो प्रस्ताव स्वीकारण्याचा अधिकार सरकारने स्वत:कडे घेतला आहे. अशा प्रकारे शासनाने स्थायी समितीला निष्प्रभ करुन टाकले आहे. एवढेच नव्हे तर स्थायी समितीचे काही सदस्य काही वेळा नाकारलेल्या प्रस्तावावर पुनर्विचार करण्याचा प्रस्ताव देत होते. एखादा प्रस्ताव मंजूर झालेला आहे, पण त्यावर योग्य चर्चा झाली नसल्यामुळे त्याचा पुनर्विचार करावा असे ते सांगत असत. पण सरकारला ते सुध्दा सहन होत नसल्यामुळे सरकारने त्यावर सुध्दा अंकुश आणला. आता पुनर्विचारचा प्रस्ताव देता येत नाही. अशा प्रकारचे बंधन घालण्यात आले आहे. एवढे सर्व निर्बंध असल्यानंतर आयुक्तांनी तयार केलेला प्रस्ताव, अधिकाऱ्यांनी तयार केलेला प्रस्ताव, सल्लागाराने दिलेल्या सल्ल्यानुसार मंजूर केलेला तो प्रस्ताव असतो. येथे निवडून आलेल्या सदस्यांना तो प्रस्ताव मंजूर करणे किंवा नाकारणे असे दोनच पर्याय राहतात. महापौरांना तर अधिकार नाहीतच. स्थायी समितीला ते अधिकार आहेत. अशी सर्व परिस्थिती असताना महापौर भ्रष्टाचारी होऊ शकतो असे मंत्रिमंडळाला कशावरुन वाटले, कोणत्या कारणामुळे वाटले, यामध्ये समिती सदस्याचा काय संबंध आहे ? या विधेयकामुळे एकंदरीत निवडून आलेली सर्व यंत्रणा भ्रष्ट आहे असे शासनाचे मत आहे, असा त्याचा अर्थ होतो. नाच करे बंदर, माल खाये मदारी अशा प्रकारे या........

2....

NTK/

श्री.दिवाकर रावते....

देशामध्ये लोकशाहीची थट्टा करणारे प्रसंग या ढेपाळलेल्या कृतीमधून येत असतील तर ते कधीही माझ्यासारख्या माणसाला सहन करता येणार नाही. एवढे गंभीर आहे.

मी वित्त आयोगाचा अहवाल वाचलेला आहे. त्यामध्ये अशा प्रकारची बंधने आणण्यास सांगितलेले नाही तर नियंत्रण आणण्यास सांगितले आहे. कोणती तरी एखादी यंत्रणा निर्माण करावी किंवा लोकपाल विधेयक आणावे असे आपल्याही प्रस्तावात होते. या ज्या संस्था आहेत त्यामध्ये आयुक्त असतील किंवा प्रशासक असतील त्यांनी नियंत्रित केलेल्या बाबी आहेत. माझ्या भागात गटार लाईन झाली पाहिजे असे एखादे सदस्य सुचवित असतात. आमच्या वेळी महापौरांना 5 रुपयांचे सुध्दा अधिकार नव्हते, परंतु आता त्यांना 1 कोटी रुपयांच्या कामांचा अधिकार दिलेला आहे. महापौर 1 कोटी रुपयांचे टेंडर काढत नाहीत. महापौर एवढेच सांगतात की, ह्या ह्या एरियामध्ये हे हे काम करावयाचे आहे, ते काम महापौर इच्छा निधीतून करण्यात यावे. मग त्या बाबतचा प्रस्ताव आयुक्त आणतात व तेच ठेकेदार नेमतात. ही सर्व यंत्रणा भ्रष्ट आहे असे समजून, ते भ्रष्टाचारी आहेत असे गृहीत धरुन निवडून आलेल्या लोकांवर सरकारकडून आक्षेप घेतला जातो त्यावेळी स्वत:च्या हातून खड्डा खणावयास घेतलेला आहे हे शासनाने विसरु नये.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:05

श्री. दिवाकर रावते...

यांना काय म्हणायचे ? आपण यांना भ्रष्टाचार निर्मूलन किंग म्हणू या. गांधी टोपीचा विसर पडला होता. आता अण्णा हजारेंचे नाव लिहिलेल्या गांधी टोप्या घालून लोक फिरायला लागले आहेत. ते म्हणाले, भस्मासूर कसा निर्माण होतो ? माणूस पाठवितात.... या देशामध्ये फक्त शरद पवार हेच भ्रष्टाचारी आहेत असे ते सांगतात. राष्ट्रवादी पक्षाचे सन्माननीय सदस्य येथे बसलेले आहेत. त्यांना मी पुकारतो, त्यांना आता त्यांच्या नेतृत्वाच्या मागे उभे राहाण्याची संधी आहे. बघू कसे उभे राहाता ? केन्द्र शासनामध्ये पंतप्रधान एकदम चांगले. सोनिया गांधी बद्दल गैरसमज होता तो दूर झाला. सोनिया गांधी बद्दल त्यांच्या मनात गैरसमज होता हे आम्हाला माहीत नव्हते. हे चांगले आहेत, ते चांगले आहेत, एकटे शरद पवारच भ्रष्टाचारी आहेत असे ते म्हणतात. मग ते म्हणाले की, त्यांनी राजीनामा द्यावा. हे सगळे माझ्या समोरच्या सन्माननीय सदस्यांनी मान्य केलेले आहे. म्हणजे केन्द्रामध्ये सगळे स्वच्छ आहेत.

सभापती महोदय, माझ्या आत्महत्या करणा-या शेतक-याकरिता यांचा आवाज मी कधी ऐकला नाही. शेतक-यांसाठी दिलेल्या रु.4 हजार कोटी पंतप्रधान पॅकेजचे ज्या ज्या अधिका-यांनी अपहरण केले त्यांच्या संपत्तीची चौकशी करुन त्यांच्या घरादारावर नांगर फिरवा असे मी टाहो फोडून येथे सांगत असताना त्याबाबतीत कोणतीही कारवाई केली जात नाही. पंतप्रधान पॅकेजमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराचा संबंधी चौकशी करा अशी यांनी कधी मागणी केल्याचे मी ऐकले नाही. माझा गिरणी कामगार तडफडत उपाशी मरत आहे. गिरणीतून बाहेर पडलेल्या गिरणी कामगारांची, त्यांच्या घरच्यांची, माझ्या माय भगिनींची आज काय परिस्थिती आहे ? या उद्ध्वस्त झालेल्या गिरणी कामगारांच्या संबंधी, गिरण्यांच्या जागेवर उभ्या राहाणा-या गगनचुंबी टावर्स संबंधी चौकशी करा असे त्यांनी कुठे म्हटल्याचे मी ऐकले नाही. या मुंबईतील गिरणी कामगार आक्रंदन करीत असताना, महाराष्ट्रातील जनता उद्ध्वस्त होत असताना त्यांच्या बद्दल आम्हाला कधी काहीच ऐकायला मिळाले नाही.... शरद पवार यांना जाणता राजा म्हटले जाते. होय, ते खरे आहे. या महाराष्ट्राला त्यांनी त्यांच्या पध्दतीने शंभर टक्के गती दिलेली आहे. या महाराष्ट्रामध्ये त्यांचे नेतृत्व सिद्ध झालेले आहे. आमचे काही वादविवाद आहेत. श्री. शरद पवार अमुक आहे तमुक आहे असे सर्टिफिकेट देण्यासाठी मी उभा नाही. कारण मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. खडसे नाही........ कारण श्री. खडसे यांच्याकडे जी कागदपत्रे आहेत ती माझ्याकडे नाहीत. त्यामुळे मी बोलू

..2..

श्री. दिवाकर रावते....

शकत नाही. माझी ही व्यथा आहे की, मराठी माणूस मराठी माणसावरच आघात करीत राहातो. दिल्लीत मात्र सगळे साव आहेत. आपण वर्ल्डकप जिंकला त्यावेळी अडीच लाख लिटर दारु विकली गेली. त्याचे किती पैसे आले ?

सभापती महोदय, वित्त आयोगाचे पैसे आम्हाला नकोत. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यामध्ये जनतेने निवडून दिलेला प्रत्येक सदस्य चोर आहे असा समज असेल तर ते पैसे आम्हाला नकोत. ते पैसे परत करा.

....नंतर श्री. गिते....

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 18:10

श्री. दिवाकर रावते...

आम्हाला एवढी भीक लागली आहे काय ? हे राज्य सर्व गोष्टीत अग्रेसर आहे. अशी परिस्थिती असताना तुम्हाला अभिमान कशाचा आहे ? लोकपाल विधेयकामध्ये या सर्वांना गवसणी घालणारे देशातील महाराष्ट्र हे पहिले राज्य राहणार आहे. तुम्हाला कसला अभिमान आहे ? आमच्या राज्यात सर्व निवडून आलेले लोकप्रतिनिधी हे चोर आहेत, बदमाश आहेत, त्यांच्यावर गवसणी घालणारे हे पहिले राज्य आहे.

सभापती महोदय, एक गोष्ट स्पष्ट आहे की, मी निवडणूक लढतो. तुम्ही निवडणूक लढता, आपण सर्व निवडणूक लढतो. निवडणुकीचा फार्म भरताना आपल्या संपत्तीचे संपूर्ण विवरण द्यावे लागते. आपल्याला संपत्तीचे विवरण लपवून ठेवता येत नाही. निवडणुकीच्या वेळी संपत्त्ी लपविणे शक्य नाही. कारण पाच वर्षांनी पुन्हा निवडणूक होते, त्यावेळी मी पुन्हा निवडणूक लढवित असेल तर त्यावेळी देखील मला संपूर्ण संपत्तीचे विवरण भरुन द्यावे लागते. मी जर त्यात काही चुकीची माहिती दिली तर वर आमचे मित्र बजाबाकी आणि बेरीज करण्यासाठी बसलेले आहेत. माझ्याकडे जी काही संपत्ती असेल त्याची माहिती निवडणूक लढवित असताना मोकळेपणाने जनतेला सांगितली पाहिजे. या ठिकाणी काही लपवा लपवी करता येत नाही.

सभापती महोदय, मी थोडे विषयांतर सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांच्यासाठी करु इच्छितो. आपण आमदार का झालात ? तुम्ही वकील आहात, चांगली वकिली करावयाची होती ? काल दिल्ल्ी येथे एक वकील बघितला. त्याने वकिली करुन 111 कोटी रुपये कमाविले आहेत. 111 कोटी रुपये वकिली करुन मिळत असतील तर आपण इतर धंदे तरी कशाला करावयाचे ? तुम्ही अशा गोष्टीचे समर्थन करा. तुमच्या सारखी माणसे आहेत, त्यामुळे सुरवंट वाढतात, कुरवंट वाढतात. घरात शोभेसाठी कॅक्टस् ठेवतात. ते कॅक्ट्स निर्माण करणारे लोक आपल्यात असू शकतात. अधिकार नसलेल्या व्यक्तीं भ्रष्टाचार करणार आहेत, असे गृहीत धरुन त्यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी सरकार कायदा करीत आहे, यात सरकारला कसले भूषण वाटते आहे याची माहिती मला देण्यात यावी. मधल्या काळात नगराध्यक्षांना काही अधिकार देण्यात आले होते. परंतु आयुक्तांना ते अधिकार नाकारण्याचे अधिकार आहेत. आतापर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थेमधील गैरप्रकार करणाऱ्या एकाही अधिकाऱ्याला जबाबदार धरलेले गेलेले नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, आम्ही सभागृहात उठून उभे राहिलो तर आम्हाला निलंबित केले जाते. या अधिकाऱ्यांनी अतिशय सुंदर मांडणी केलेली आहे. निलंबित केलेल्या अधिकाऱ्याची सहा महिन्यापर्यंत चौकशी करावयाची नाही. अधिकाऱ्यांनी नियमामध्ये अशी तरतूद करुन घेतली आहे की, सहा महिन्यात चौकशी पूर्ण झाली नाही तर त्या अधिकाऱ्याला पुन्हा सेवेत घ्यावयाचे. आजच श्री. मोडके या अधिकाऱ्याच्या बाबतीत सदस्यांना माहिती मिळाली. शासकीय अधिकाऱ्यांना निलंबित केल्यानंतर त्यास तीन चतुर्थांश पगार दिला जातो. त्यामुळे ते भ्रष्टाचारी अधिकारी उपाशी मरत नाहीत. सहा महिन्यानंतर तो सेवेत दाखल झाल्यानंतर निर्लज्जपणे कार्यालयात काम करतो. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, या संस्था सामान्य कार्यकर्त्यांची एक शिडी आहे. जनतेची सेवा करुन नंतर ते कार्यकर्ते पुढची शिडी गाठत असतात. अशा लोकप्रतिनिधींवर ठपका ठेवून लोक आयुक्तांकडे बोलाविले तर तो सुटून जाईल. परंतु त्याच्यावर मात्र कायमचा शिक्का बसेल की, या लोकप्रतिनिधींना लोक आयुक्तांनी बोलाविले. चांगल्या कार्यकर्त्यांची बरबादी करणारी तरतूद या कायद्यात केलेली दिसते आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

520 (क) कलमामध्ये सुधारणा करुन महापालिकेवर निर्बंध आणले, महापालिकेच्या हातात काही अधिकार ठेवले नाहीत. एमएमआरडीए या संस्थेला या कायद्यामध्ये अंतर्भूत करता आले असते. महापालिकेपेक्षा कित्येक कोट्यवधी रुपयांचा खर्च आज एमएमआरडीए या संस्थेमार्फत केला जात आहे. या 1931 कोटी रुपयांपैकी काही निधी मुंबई शहरातील विकास कामासाठी एमएमआरडीए संस्थेला दिला जाणार आहे की नाही हे मंत्री महोदयांनी सांगावे. त्यांना निधी दिला जाणार असेल तर त्या संस्थेला या कायद्याच्या कक्षेत का आणले नाही? कारण त्या संस्थेचा प्रमुख हा भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी आहे. त्याला कोण हात लावणार? एमएमआरडीए संस्थेचे इतर सदस्य हे लोकप्रतिनिधी व स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी आहेत. परंतु संस्थेचे अध्यक्ष हे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी आहेत. महापौर, उप महापौर हे सदस्य आहेत. त्यांचे त्या संस्थेमध्ये काहीही प्राबल्य नाही. धोरण ठरविणारे आणि जाहीर करणारे हे एमएमआरडीएचे अध्यक्ष आहेत. ते आय.ए.एस.अधिकारी आहेत. त्यांना या कायद्यामध्ये का अंतर्भूत केले नाही? त्यांच्याकडून थेट आदेश दिले जातात. निवडून आलेले सर्व बदमाश आहेत आणि प्रशासकीय सेवेत सर्व व्यवस्थित आहे ही मांडणी योग्य नाही.

सभापती महोदय, आज एक वातावरण तयार झालेले आहे. निवडून आलेले लोक हे भ्रष्टाचार करणार आहेत, तेव्हा त्यांना कायद्याच्या कक्षेत आणले पाहिजे आणि अशी तरतूद करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे हे दाखविण्याची धडपड सुरु आहे. हे बदमाशांचे राज्य आहे का, निवडून आलेल्या लोकांचा अभिमान वाटत नाही का? मी या सभागृहात कळवळून बोललो होतो. मी आयुष्यात कधी दोन नंबरचा धंदा केला नाही, बिल्डर व्यवसायात गेलो नाही, जीवनामध्ये माझे काम वेगळ्या पध्दतीने सुरु असते. तरी मला धमकीचा फोन का येतो याचे मला अजून उत्तर मिळाले नाही. भीती वाटण्याचा हा विषय नाही. परंतु का फोन येतो, असे काही निर्माण केले आहे का? सभागृहात मी असे काही प्रश्न उपस्थित करीत नाही, जेणेकरुन मला धमकी यावी. सामाजिक प्रश्नावर माझा भर असतो. ग्रामीण भागातील 80 टक्के उद्ध्वस्तता नजरेस पडते तेव्हा तेच प्रश्न मला महत्वाचे वाटतात. गब्बर लोकांचे प्रश्न मला महत्वाचे वाटत नाहीत. माझ्याबरोबर असलेले आमदार, नगरसेवक पक्षामध्ये आहेत, असा कोणी भ्रष्ट नजरेस आला तर पुढच्या वेळी त्याच्याकडे कोणी बघत पण नाही. लोकप्रतिनिधींची बदनामी करणारे हे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

विधेयक या ठिकाणी मांडले आहे. मंत्री महोदयांनी सभागृहाला हे सांगावे की, त्यांच्या मनाला पटते का? त्यांनी नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविली होती. नगराध्यक्ष झाल्या असत्या. परंतु तेथे निवडून न आल्यामुळे आमदार म्हणून या सभागृहात आल्या आहेत. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान चांगले आहे.

सभापती महोदय, या 1931 कोटी रुपयांपैकी किती निधी कोणाला दिला जाणार आहे ते मंत्री महोदयांनी सांगावे. अधिकारी गॅलरीमध्ये नगरविकास विभागाचे प्रधान सचिव बसलेले आहेत. या सभागृहात कोणतेही सुधारणा विधेयक आणले की, 13 व्या वित्त आयोगाचे कारण सांगितले जाते. 13 व्या वित्त आयोगाकडून येणाऱ्या निधीबद्दल अटी घातल्या जात आहेत असे सांगितले जाते. 13 व्या वित्त आयोगाने फेरीवाला झोन करा असे सांगितले आहे. 13 व्या वित्त आयोगाने सांगितले की, तुम्ही कर निर्धारण संकलन प्रक्रियेत सुधारणा करा. वाईट आहे असे मी म्हणत नाही. परंतु 13 व्या वित्त आयोगाने सांगितले म्हणून कर प्रणाली बदलली. अट घातली म्हणून फेरीवाला धोरण आणले. ई-कचरा व्यवस्थापन, बायो-मेडिकल वेस्टबाबत अट घातली म्हणून तुम्ही कायद्यात सुधारणा करीत आहात.

नंतर 4एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

तेराव्या वित्त आयोगातील 10300 कोटी रुपये मिळवण्याकरिता महाराष्ट्रातील सर्वच पक्षाच्या लोकप्रतिनिधींना तुम्ही बदमाश ठरविणार असाल तर माफ करा मला अधिक बोलावयास लावू नका. काही बदमाश असतीलही कारण हाताचे पाचही बोटे सारखी नसतात. परंतु सरसकट सर्वांना बदमाशाच्या रांगेत उभे करावयाचे हे काही ठीक नाही. जो भ्रष्टाचारी आहे त्याला शिक्षा झालीच पाहिजे या मताचे आम्ही सर्व आहोत. या सभागृहात बसलेल्या काही सदस्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत परंतु त्यामध्ये काही तथ्य नाही याची मला माहिती आहे. अपप्रचार करण्यास वेळ लागत नसतो. मी माझ्या चष्म्यातून सगळयांकडे चांगल्या दृष्टीने पाहत असतो. आता तर त्याच्याही पुढे आपण गेलेलो आहोत. आमदार, खासदाराचा निधी वापरणारे सर्व बदमाश आहेत, हे जे काही चालले आहे ते योग्य नाही असे मला म्हणावयाचे आहे. तू बदमाश आहे म्हटले् की, त्याला बदमाश म्हणून ठरवायचे, तू हरामखोर आहे असे म्हटले की, त्याला हरामखोर ठरवायचे हे काय चालले आहे ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला ज्या अद्वितीय पोथ्या दिलेल्या आहेत त्या आता फेकून द्या, काढून टाका. आता एकच आले आहे, टोपी घाला आणि सांगा हा कोण आहे, तो कोण आहे. हे जे काही चालले आहे ते आपल्याला मान्य आहे काय ? हा टीकेचा विषय नाही. आपण म्हणता की, माझा मुद्दा बरोबर आहे परंतु तुमच्यात गुद्दे देण्याची काय ताकद आहे हे मी बघणारच आहे. भ्रष्टाचाराला शिक्षा झालीच पाहिजे हा मुद्दा बरोबर आहे. परंतु ही साखळी कोठपर्यंत न्यावयाची ? आम्हीही या साखळीत होतो परंतु आता ही साखळी कोठपर्यंत जात आहे ? अगोदर आपले राज्य संपूर्ण देशात उद्योग धंद्यात पहिल्या क्रमांकावर होते, आता आमचा नंबर पाचव्या सहाव्या क्रमांकावर गेला असून आता आमच्या राज्याचा पहिला नंबर कशात आहे ? आम्ही नगरसेवक निवडून आणण्यासाठी मेहनत करीत असतो. खोटारडा माणूस माझ्या पुढे उभा राहूच शकत नाही कारण त्याला फटकारण्याची ताकद माझ्यात आहे. नगरसेवक, पंचायत समिती सदस्याच्या संदर्भात आपण या ठिकाणी फार गंभीर विषय आणलेला आहे. जो भ्रष्टाचार करीत असेल त्याला शिक्षा झालीच पाहिजे, मोठी व्यक्ती असेल व तिने भ्रष्टाचार केला असेल तर तिला शिक्षा झालीच पाहिजे. या विधेयकाच्या अनुषंगाने महापौर भ्रष्टाचार करतो असे आपण म्हणत आहात. मला सांगा त्याच्या हातामध्ये भ्रष्टाचार करण्यासाठी काय असते ? या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

राज्यात सर्वात जास्त सत्ता कॉंग्रेस पक्षानेच उपभोगली आहे. आता तुमच्यातच मारामारी सुरु आहे. राष्ट्रवादीची संख्या जास्त की, कॉंग्रेसची संख्या जास्त यावरुन आपल्यातच मारामारी सुरु आहे. आमची ताकद जास्त आहे म्हणून आम्ही स्वबळावर लढणार आहोत हा प्रकार आता तुमच्यात सुरु आहे. हे जे काही चालले आहे ते तुमच्याच लोकांसाठी जास्त आहे आमच्यांसाठी कमी आहे. हे विधेयक लोकप्रतिनिधींचा अपमान करणारे असून ज्यांनी निवडून दिलेले आहेत त्या जनमाणसाचाही अपमान करणारे हे विधेयक आहे असे मला वाटते. या विधेयकाच्या संदर्भात मी खेदाने माझ्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. सभागृहाच्या निर्णयाबरोबर मी असणारच आहे. आमचे विरोधी पक्ष नेते जी काही भूमिका घेतील ती भूमिका आम्हाला मान्य राहील.

इन्कम टॅक्स चुकवायचा, इन्कम टॅक्सचे रिटर्न कमी दाखवायचे

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

कमी भरलेले इन्कम टॅक्सचे रिटर्न मान्य करण्याकरिता इन्कम टॅक्स अधिका-याला पैसे दिले जातात. वास्तवित इन्कम टॅक्स अधिकारी काही पैसे मागत नाहीत परंतु इन्क म टॅक्स भरणारी व्यक्ती लबाडी करीत असते.आपला इन्कम टॅक्स चुकविण्याकरिता इन्क म टॅक्स अधिका-याला पैसे दिले जातात व भ्रष्टाचार केला जातो. काल मेणबत्या घेऊन जाणा-यांमध्ये मला या व्यक्ती दिसत होत्या. एखादा चित्रपट कलाकार अमुक झाले पाहिजे, तमुक झाले पाहिजे असे दिवसभर टी.व्ही.वर सांगत असला तरी चित्रपटाच्या करारावर सहया करीत असतांना रात्री हॉटेलमध्ये बसून काळा पैसा घेऊन गैरव्यवहार करीत असतो. ती मंडळी आम्हाला म्हणजेच जनतेला शिकवत होती व आम्ही सर्वजण टी.व्ही. वर पहात होतो .महात्मा गांधीच्या देशामध्ये हे एक फार मोठे यश आहे.या विषयावर पुष्कळ बोलता येण्यासारखे आहे. परंतु जास्त बोललो तर तो टीकेचा विषय होतो म्हणून मी जास्त बोलत नाही. मी त्या आंदोलनावर टीका करीत नाही परंतु त्या आंदोलनाच्या निमित्ताने जे काही चालले होते ते अण्णांना बदनाम करणारे होते.अण्णांच्या मनामध्ये काहीही नाही.सन्माननीय गृह मंत्री श्री आर. आर. पाटील हे सरळ मार्गी आहेत त्यामुळे त्यांना सर्वजण घेरतात त्याप्रमाणे.अण्णा सरळमार्गी आहेत. परंतु त्याच्या आजूबाजूला असणारी मंडळी काही वेळा गैरप्रकार करतात. सन्माननीय नगर विकास राज्यमंत्री श्री भास्कर जाधव आमच्यातूनच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात गेलेले असल्यामुळे त्यांचे नाणेसुध्दा खणखणीत आहे.

सभापती महोदय, सर्व लोकप्रतिनिधींना बदनाम करणारे हे विधेयक आहे. शासनाने या विधेयकाचा विचार करावा अन्यथा निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधींच्या संदर्भात भ्रष्टाचार नक्की कशाला म्हणावयाचे हे जर ठरवावयाचे असेल तर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी मांडलेला प्रस्ताव स्वीकारावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

. **उप सभापती** : सभागृहाची वेळ 6.30 वाजेपर्यत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



18-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4G 2

श्री.जयंत प्र.पाटील. ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 2 वर पाच दहा मिनिटांमध्ये माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, मी ग्रामपंचायती पासून विधिमंडळात आलेला एक सदस्य आहे .मी ग्रामपंचायतीचा सदस्य होतो त्याचप्रमाणे पंचायत समितीचा सदस्य होतो. पंचायत समितीमध्ये मी जवळजवळ 11 वर्षे काम केले होते. त्यानंतर मी जिल्हा परिषदेचा देखील सदस्य होतो आणि आता मी विधान परिषदेचा सदस्य आहे. मी ज्या वेळी ग्रामपंचायतीचा सदस्य होतो त्यावेळी मला जो अधिकार होता तो अधिकार पंचायत समितीचा सदस्य झाल्यानंतर मला मिळत नव्हता.त्यानंतर मी जिल्हा परिषदेचा सदस्य होतो. मी ज्यावेळी पंचायत समितीचा सदस्य होतो त्यावेळी मला जो अधिकार होता तो अधिकार जिल्हा परिषदेचा सदस्य झाल्यानंतर मिळत नव्हता. जिल्हा परिषदेच्या सदस्यानंतर मी विधिमंडळात आलो तेव्हा मला असे वाटते की मी जेव्हा ग्रामपंचायतीचा सदस्य होतो तेच चांगले होते. ग्रामपंचायतीचा सदस्य म्हणून मला तेथे पूर्ण् स्वातंत्र्य होते आणि मी लोकांच्या कल्याणासाठी काही तरी करु शकत होतो.

सभापती महोदय, या ठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहे त्याबाबत मी मंत्री मंडळातील सदस्यांना विनंती करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव हे सुध्दा जिल्हा परिषदेचे सदस्य होते. जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून त्यावेळी आपल्याला काही अधिकार होते. आता महिलांसाठी 50 टक्के जागा राखीव ठेवण्यात येणार असून त्यासबंधीचे विधेयक ज्यावेळी चर्चेला येईल त्यावेळी मी त्या विधेयकावर सविस्तर बोलणार आहे.अधिका-यांच्या हातामध्ये सगळे अधिकार शासन देऊ पहात आहे.या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्य माना डोलवत आाहेत तसेच टाळयाही वाजवत आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला तुम्ही पाठिंबा देणार आहात काय असा माझा आपल्याला सवाल आहे. हे विधेयक चिकित्सा समितीकडे पाठविण्यात यावे असा प्रस्ताव मांडण्यात आला असून त्याला एकमुखाने सर्वांनी पाठिंबा दिला पाहिजे त्यानंतर त्या समितीमध्ये आपण यासंबंधीची चर्चा करु या.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.उषा दराडे )**

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदया, या सभागृहामध्ये वैद्यनाथन समितीच्या संदर्भात विधेयक मांडण्यात आले होते त्यावेळी मी मागणी केली होती...

**तालिका सभापती (ॲड. उषा दराडे)** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ दहा मिनिटे वाढवून देण्यात येत आहे.

**पृ.शी./मु.शी.**: जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पासंबंधी शासनाने करावयाचे निवेदन

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, माननीय गृह मंत्र्यांनी विधानसभेमध्ये जैतापूरच्या संदर्भात निवेदन केले आहे. विधानसभेमध्ये शासनाकडून निवेदन करण्यात आल्यानंतर ते तत्काळ आपल्या सभागृहामध्ये केले पाहिजे अशी आपली पध्दत आहे. माझी आपणास विनंती आहे की, माननीय सदस्यांना पाच मिनिटे बोलू द्यावे तोपर्यन्त माननीय गृह मंत्र्यांना पाचारण करुन निवेदन करण्यास सांगितले पाहिजे. या संदर्भात शासनाकडून उद्या निवेदन होऊन उपयोग नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, दुपारी या संदर्भात प्रश्न उपस्थित झाला त्यावेळी माननीय गृह मंत्र्यांनी लवकरात लवकर निवेदन करण्यात येईल असे आश्वासन दिले होते . सभागृहाच्या कामकाजाची वेळ संपत आली असल्यामुळे शासनाकडून ताबडतोब निवेदन झाले पाहिजे. याबाबत शासनाकडून दखल घेतली पाहिजे.

**तालिका सभापती** : संबंधित विषयावर निवेदन करण्याचे ठरलेले असल्यामुळे मंत्री महोदयांना निरोप देण्यात येत आहे. तोपर्यन्त माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.** : महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. II OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA AND UPA-LOKAYUKTAS ACT, 1971.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE

(चर्चा पुढे चालू)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, या सभागृहामध्ये ज्यावेळी वैद्यनाथन समितीच्या संदर्भात विधेयक मांडण्यात आले त्यावेळी आपल्याला 13 हजार कोटी रुपये मिळणार आहेत म्हणून सहकार क्षेत्रातील लोक प्रतिनिधींचे अधिकार काढून घेण्याची तरतूद त्या विधेयकामध्ये होती, ती कमी करण्यात आली. त्यावेळी माननीय श्री. भाऊसाहेब होते, माननीय श्री. गणपतराव देशमुख होते, माननीय श्री. विलासकाका पाटील होते. त्या संदर्भात त्यांनी वेगळी भूमिका मांडून शासनाला वेगवेगळया सूचना केल्या होत्या. या ठिकाणी माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये अनेक ज्येष्ठ सदस्य आहेत त्यांच्या बरोबर आपण या संदर्भात चर्चा केली पाहिजे. आज अशी परिस्थिती आहे की, पंचायत समितीचा सभापती होण्यास कुणीही तयार होत नाही तर गावातील ग्रामपंचायतीचा सरपंच होण्यास उत्सुक असतो. तो म्हणतो मला सभापती पद नको, परंतु "अ" वर्गातील ग्रामपंचायतीच्या सरपंचाचे पद मला मिळाले पाहिजे. कारण त्या ठिकाणी सरपंचाला जे अधिकार आहेत ते सभापतीला नाहीत.

आम्ही खालच्या पातळीवर काम करणारे कार्यकर्ते आहोत आपण आम्हाला हे अधिकार केव्हा देणार आहात ते सांगा?

सभापती महोदया, मी आपल्याला या ठिकाणी उदाहरण देऊन सांगतो की, ग्राम पातळीवर कोणताही अधिकारी असो, मुख्य कार्यकारी अधिकारी असो तो लोकप्रतिनिधी म्हणून तुम्हाला भेटून योजनेची माहिती देतो काय? असे मला या सभागृहातील सर्व माननीय सदस्यांना विचारावयाचे आहे. सभापती महोदया, माझ्या घरामध्ये तिसऱ्या पिढीतील आमदारकी सुरु आहे. मी लहान



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जयंत प्र. पाटील.....

असतांना माझे आजोबा, काका आमदार होते, इंग्रजांच्या काळात जिल्हा लोकल बोर्डामध्ये माझे आजोबा अध्यक्ष होते, त्या वेळच्या स्कूल बोर्डाचे अध्यक्ष होते, माजी आजी अध्यक्ष होती. त्यावेळी माझे आजोबा कोणतेही लोकप्रतिनिधी नसतांना माझ्या घरी कलेक्टर येऊन आजोबांना भेटायचे आणि योजनेची माहिती द्यायचे. त्यावेळी मी लहान होतो. माझ्या घरात कलेक्टर आल्यानंतर मी लपून,वाकून बघायचो. माझ्या आजोबांचा एवढा दरारा होता की, सर्व अधिकारी येऊन माझ्या आजोबांना भेटायचे त्यावेळी मी दरवाजा किलकिला करुन त्याच्या फटीमधून अधिकाऱ्यांचे आजोबांशी सुरु असलेले संभाषण ऐकायचो. तुम्हीच सांगा, तुम्हाला कोणता अधिकारी येऊन भेटला? आज मला कुणीही अधिकारी येऊन भेटत नाही. हे अधिकारी कोणतीही योजना आम्हाला सांगत नाहीत अशी आजची परिस्थिती आहे.

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

ही पध्दत ज्यांनी सुरु केली आहे, त्यामुळे आपण आपले अवमूल्यन करुन घेत आहोत. या ठिकाणी विधेयकाच्या माध्यमातून आपले अधिकार या अधिकाऱ्यांना देण्याचे काम तुम्ही करीत आहात. तुम्ही या अधिकाऱ्यांपुढे हतबल झालेले आहात. सभापती महोदय, पूर्वी माननीय राज्य मंत्र्यांना वेगळे अधिकार होते, आज राज्य मंत्र्यांना कोणते अधिकार आहेत?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

सन्माननीय मंत्री महोदय श्री.भास्करराव जाधव हे चांगल्या प्रकारे उत्तर देतात. त्या विभागाचे जे सचिव आहेत त्यांचे ब्रिफींग चांगले आहे. त्यामुळे माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव यांचे उत्तर एकदम मस्त असते. जणू काही सर्व त्यांच्या ताब्यामध्ये आहे अशा पध्दतीचे उत्तर असते. पण त्यांच्याकडे काम घेऊन गेलो तर त्यांना कोणताच अधिकार नाही असे दिसून येते. माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर देखील मस्त गोड उत्तरे देतात, मला आवडतात. पण बिचाऱ्यांना अधिकार नाहीत. माननीय राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान यांच्या बाबतीतही तीच परिस्थिती आहे.

(काही सन्माननीय सदस्य हसतात)

ही बाब हसण्यावारी नेऊ नका. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब यांना सांगू इच्छितो की, 1995 मध्ये आपल्या कारकिर्दीमध्ये हे सुरु झाले. पण तुम्ही ते सुधारावयास पाहिजे, परंतु आता सुधारु शकत नाही.मी सन्माननीय सदस्य श्री. विनायकराव मेटे यांना सांगू इच्छितो की, आम्ही मंत्रिमंडळामध्ये होतो.तुम्ही इकडूनच गेले. आम्हाला अधिकारच नाही. माननीय श्रीमती मिनाक्षी पाटील यांना मंत्री असताना सेक्रेटरी दम द्यावयाचा. मी एकदा फाईल फेकून दिली. याला काही अर्थ नाही. अधिकाऱ्यांच्या बाबतीत कधीतरी चर्चा केली पाहिजे. तुम्हाला लाल दिवा काय करावयाचा आहे? आमचे कधीच कोणतेही काम अडत नाही. आपल्याला लाल दिवा मिळावा. असे आम्हाला कधीच वाटले नाही. पण आताची जी पध्दत आहे, ती कुठेतरी बदलली पाहिजे.सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांचा मुद्दा बरोबर आहे. एमएमआरडीए चा अधिकारी हा मोठा आहे काय ? आमचा महापौर मोठा आहे, कारण तो लोकप्रतिनिधी आहे. लोकप्रतिनिधी म्हणून त्याला जे अधिकार आहेत तो त्यांचा सन्मान आहे.मी अकोला येथे गेलो होतो.या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.बाजोरिया उपस्थित नाहीत. पण तेथील सगळी नगरपालिका लाचार होऊन कमिशनरच्या पुढे बसलेली आहे आणि कमिशनर काहीच ऐकत नाहीत असे मी पाहिलेले आहे. मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांना विचारु इच्छितो की, अशी परिस्थिती आहे की नाही ? मी खोटे सांगत आहे काय?

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : मुंबई महानगरपालिकेमध्ये . . . .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,मुंबईमध्ये तुमच्याबरोबर मीडिया आहे, वेगळे स्टेटस् आहे, तुमचा दंडुका आहे, सगळे आहे. परंतु आपण अकोला येथे जाऊन पहावे.मी माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, अकोला येथील परिस्थिती अत्यंत वाईट आहे. मी ......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . .

वर्षभराच्या काळामध्ये तेथे अनेक वेळा गेलो आहे. अनेक घोटाळे झाले मग त्यामध्ये आदर्श सोसायटीच्या बाबतीत झालेला घोटाळा असेल, त्यामध्ये किती नगरसेवकांना फ्लॅट मिळाले, कोणत्या महापौरांना फ्लॅट मिळाला ?

श्री.विनायकराव मेटे (खाली बसून) : तेथे आयुक्तांना फ्लॅट मिळाला.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी जयराज फाटक यांना एकदम सज्जन माणूस समजत होतो. श्री.जयराज फाटक म्हणजे जणू सानेगुरुजी. त्यांच्याकडे गेल्यावर केवढे तत्वज्ञान सांगावयाचे की, असे आहे, तसे आहे. परंतु तुम्ही याठिकाणी ही असली विधेयके आणून या लोकांना संरक्षण देणार आहात काय, आपण हे कशासाठी करीत आहात ? हे अधिकारी तुम्हाला अशा प्रकारची विधेयके आणावयास लावतात, मग तुमची कुवत राहिली नाही काय ? ज्यावेळेला माझी पत्नी जिल्हा परिषदेची अध्यक्ष होती, तेव्हा तेथे श्रीमती कुंदन या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून तेथे कार्यरत होत्या. त्या टॉक-टॉक करीत येत असत आणि सतत नथिंग, नथिंग आणि कोणत्याही ऑर्डरच्या बाबतीत नो-नो असे म्हणत असत. पण अशा या अधिकाऱ्यांकडे सात-आठ फ्लॅट असतात. आपण अशा संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली? खरे म्हणजे सर्वात जास्त अधिकार विधिमंडळाला आहेत. शासनाचे खरे मालक आम्ही आहोत आणि आम्ही तुम्हाला जनतेच्या वतीने ट्रस्टी म्हणून ठेवलेले आहे.तुम्ही मंत्री पंच म्हणून काम करीत आहात.मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांना विचारु इच्छितो की,आज येथे आपल्याला काही अधिकार आहेत काय, तर कोणताही अधिकार नाही. पण याठिकाणी अशा प्रकारचे कायदे करुन लोकप्रतिनिधींचे अवमूल्यन आणि त्यांचे खच्चीकरण करण्याचे काम खऱ्या अर्थाने होत आहे आणि त्याला आमचा विरोध आहे. तुम्हालाही हे पटते, पण कॅबिनेट मध्ये चर्चा काय होते ? मी पाहिले तर माननीय मुख्यमंत्र्यांचे बिल आहे.

(सन्माननीय राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान खाली बसून बोलतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान यांना सांगू इच्छितो की, मी ग्राम पंचायतीपासून काम करीत या सदनामध्ये आलो आहे आणि विरोधी पक्षामध्ये येऊन बसलो आहे. मी सतत प्रवाहाच्या विरुध्द राहून येथपर्यंत आलो आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 18:40

श्री. जयंत प्र. पाटील ......

आमची ती अपेक्षा नाही आणि आम्ही तशी अपेक्षाही ठेवलेली नाही. आम्ही विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन या ठिकाणी काम करतो.

**उप सभापती** : सभागृहाची कामकाजाची वेळ 6.40 पर्यंत होती. सभागृहाची वेळ रात्रौ 9.00 वाजे पर्यंत वाढवावयाची काय?

अनेक सन्माननीय सदस्य : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांचे भाषण ऑन लेग ठेवण्यात यावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आम्ही आज सकाळी 10.00 वाजता येथे आलेलो आहोत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृह सकाळी 10.00 पासून सुरु आहे.

**उप सभापती** : अत्यंत महत्वाच्या विधेयकावर या ठिकाणी चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन रात्रौ 9.00 वाजे पर्यंत सभागृहाचे कामकाज सुरु ठेवावयाचे काय, असे मी विचारले आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय गृह मंत्र्यांनी जैतापूरच्या संदर्भात विधानसभेमध्ये निवेदन केलेले आहे त्यासंबंधीचे निवेदन विधान परिषदेमध्ये सुध्दा झाले पाहिजे. माननीय गृह मंत्री निवेदन करण्यासाठी या ठिकाणी येणार आहेत काय?

**उप सभापती** : माननीय गृह मंत्र्यांना निरोप पाठविलेला आहे. 6.45 पर्यंत आपण माननीय गृह मंत्र्यांची वाट बघू अन्यथा सदर निवेदन उद्या करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय गृह मंत्र्यांनी विधानसभेमध्ये जे निवेदन केलेले आहे ते विधान परिषदेमध्ये झाले पाहिजे.

**उप सभापती** : माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील हे कॅबिनेट मिटिंगमध्ये आहेत. असा निरोप मिळालेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे भाषण ऑन लेग ठेवण्यात यावे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : ठीक आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या,मंगळवार दिनांक 19 एप्रिल, 2011 रोजी, सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यामध्ये आजच्या कार्यक्रम पत्रिकेतील अर्धा-तास चर्चा व नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी 1.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक संध्याकाळी 6 वाजून 42 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 19 एप्रिल, 2011 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही